

चांगुलपणाची

# चळवळ


सर्जनशील, सकारात्मक, समावेशक प्रवास

दिवाळी २०२१

मूल्य : रु. २००/-

तृतीयपंथी/ट्रांसजेंडर जीवन-आयामांवर
प्रकाश टाकणारा आगळा अंक...

।। सर्वजन सुखाय
सर्वजन हिताय ।।


JETTME
Stories that connect!
INDUSTRY NEWS FROM
ART, CINEMA ,CULTURE,
DESIGN, FASHION, LITERATURE,
MUSIC & PHOTOGRAPHY
VISIT : Jett.Me
EDITOR | Daigo +91 9764148789


बँक एक...
योजना अनेक..!
LOANS for Doctors
महाडॉक
पेन्शनर्ससाठी पेन्शनवर मुदत कर्ज उपलब्ध
गृह कर्ज
वाहन कर्ज
गोल्ड लोन
रुपे कार्ड
महाकनेक्ट
महामोबाईल
शेती मुदत कर्ज
ट्रॅक्टर खरेदी, ठिबक सिंचन, पॉलिहाऊस उभारणे, इ.साठी.
पीक कर्ज
ट्रॅक्टर कर्ज
बँक ऑफ महाराष्ट्र आपणास आपल्या कार्डचा तपशील, सीव्हीव्ही नंबर आणि वैयक्तिक माहिती कधीही विचारत नाही.
बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकारचा उपक्रम
एक परिवार एक बँक
अधिक माहितीकरीता
कृपया आपल्या जवळच्या शाखेत संपर्क करा.
कोल्हापूर अंचल –
५१७/अ/१, महाबँक बिल्डिंग, कावळा नाका, कोल्हापूर ४१६००१.
Terms & Conditions apply
JPPL'20




संकल्पना
**डॉ. ज्ञानेश्वर मुळे**

प्रकाशक
**डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन**

संपादिका
**सौ. शुभांगी नितीन मुळे**

संपादन सहाय्य
**सौ. नीना भेडसगांवकर**

मुखपृष्ठ
**श्री. गिरीश सहस्त्रबुद्धे**

कॅलिग्राफी
**श्री. प्रभाकर भोसले**

आतील चित्रे
**अंजली पुरंदरे / अभय पुरंदरे**

मांडणी / सजावट / छपाई
**अमोघ आर्टस्,**
शनिवार पेठ, पुणे ३०.

अंकातील लेखकांनी मांडलेली लेखने, उद्धृते यांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अ • नु • क्र • म • णि • का

**चांगुलपणाची देदीप्यमान दिवाळी** ........ डॉ. ज्ञानेश्वर मुळे ............. ४

**संपादकीय...** ........................................................ १२

**लिंगपरिवर्तन :**
**संकल्पना, अनुभूती आणि मनोगते** ....... डॉ. अविनाश भोंडवे ....... १४

**कोल्हापुरातील मानवी हक्कांपासून** प्रा. सौ. साधना झाडबुके
**वंचित तृतीयपंथीय** .......................... व बाळ बेकनाळकर ........ २२

**'ट्रान्स' मनोविश्लेषण** ...................... जमीर कांबळे .............. ३०

**लैंगिकतेच्या पलीकडील**
**नव्या जगाची आस!** ........................ मुक्ता मनोहर .............. ३५

**लिंगभाव, लैंगिकता आणि नैतिकता** ..... डॉ. गीताली वि. मं. ........ ४०

**संतांचा अद्वैत विचार :**
**एक व्यापक दृष्टिकोन** ...................... अभिलाष चौधरी........... ४६

**अस्तित्व** ........................................ प्रशांत डोळे ................ ५०

**भूमाता** ........................................... दामिनी रेगडे ............... ५०

**घुसमट** ............................................ दामिनी रेगडे ............... ५०

**तृतीयपंथी :**
**गैरसमजात अडकलेला समुदाय** .......... वीरेंद्र मिश्रा ................ ५१

**किन्नर समाज** ................................ सुषमा देशपांडे ............. ५४

**ओळख स्वतःची** ............................. डॉ. श्रीरंग पंडित ........... ५८

**माणसाने माणसाशी माणसासम वागणे :**
**महामंडलेश्वर लक्ष्मी त्रिपाठी**
**यांची मुलाखत** ................................ सौ. अश्विनी देरेकर ........ ६०

**तृतीयपंथी उपेक्षितांचे**
**वास्तव आणि अंतरंग** ....................... ॲड. दिलशाद मुजावर ..... ६६

**जोगवा माणुसकीचा, जोगवा समानतेचा**
**उपेंद्र लिमये यांची मुलाखत** ............... शुभांगी नितीन मुळे ........ ७०

**एक पाऊल उचलावं लागतं...**
**खंबीरपणे!** ...................................... ॲड. ऋचा मायी .......... ७४

**संसार कार्य** .................................... राहुल शिंदे ................. ८१

**कादंबरी - नदीष्ट (समीक्षा)**
लेखक : मनोज बोरगावकर .................. नंदिनी देशमुख ............. ८७

**मित्र ट्रस्ट** .................................... रुद्राणी छेत्री ................ ९०

**पाडू चला रे भिंत ही मधे आड येणारी,**
**या मनामनातून साधूया एक वाट जाणारी** ... . दीपा देशमुख .............. ९४

**माणूस म्हणून जगायचंय हो आम्हाला** .... श्रीगौरी सावंत ............ १००

**जगण्याचा संघर्ष : हवी साथ तुमची** ...... शमीभा पाटील ........... १०४

**कहाणी एका तडफदार ट्रान्समॅनची** ....... जयराज कारके ........... १०७

**सन्मानाने जगायला शिका!** ................. प्रिया पाटील ............ ११०

**आस प्रेमाची -**
**ओढ आयुष्यभराच्या सोबतीची** ........... सोनाली दळवी ........... ११४

**अनहोनी प्रकृती** ............................. संजना सिंह राजपूत ...... ११७

**इंद्रधनुचे सात रंग** ............................ संभव पुंडकर ............ १२१

**सकारात्मकता, स्वावलंबन :**
**यशाची गुरुकिल्ली** ........................ माधुरी सरोदे शर्मा ....... १२५

**सारथी आहे मी...** ........................... करीना बळीराम आडे ..... १२९

**दामिनीची कहाणी**
**दामिनी यशवंत रेगडे यांची मुलाखत** ...... एसीपी सुधीर कुडाळकर . १३४

**भावना, संघर्ष आणि आत्मविश्वास**
**यांचा सुरेख मिलाफ म्हणजे 'पिया'** ....... पिया सवाईराम ........... १३६

**चांगुलपणाच्या हिंदोळ्यावर** ................ धनंजय भावलेकर ........ १३८

**न्यायालयीन निकाल** ......................... डॉ. ज्योतिका कालरा .... १४०

**सामाजिक न्यायाचे** ॲड. डॉ. सुचित्रा
**एक सकारात्मक पाऊल** .................... घोगरे-काटकर ............ १४२

**तृतीयपंथी समुदाय :**
**कायदे आणि आव्हाने** ....................... डॉ. आशिष देशपांडे...... १४५

**२०१९ पासून चांगुलपणाच्या चळवळीअंतर्गत**
**डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशनने केलेले सामाजिक कार्य** ............ १४७

**चांगुलपणाच्या चळवळीअंतर्गत महत्त्वाच्या सहयोगी संस्था** ...... १४८



**डॉ. ज्ञानेश्वर मुळे**
चांगुलपणाची चळवळ
संस्थापक व मार्गदर्शक
सदस्य, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, दिल्ली
पूर्व सचिव व राजदूत

# चांगुलपणाची देदीप्यमान दिवाळी

**रसिक वाचक व चांगुलपणाचे दूत,**

दिवाळी अधिक प्रकाशमान करण्याचा हा प्रयत्न तुमची दिवाळी सुखाची करो...

'चांगुलपणाची चळवळ' आपल्या अडीच वर्षांच्या अल्प प्रवासात अनेकांच्या जीवनाला स्पर्श करून गेली आहे. सर्वसाधारण संस्थांपेक्षा आणि चळवळींपेक्षा 'सर्वसमावेशक' हे या चळवळीचे वेगळेपण आहे. कोविडच्या या भयानक काळात संथावण्याऐवजी या चळवळीने झेप घेतली आहे. एकाच वेळी तळागाळातील कार्य व नेतृत्वप्रशिक्षण व जनजागरण अशा रूपात ही बहुआयामी चळवळ वाढत चालली आहे. समता, स्वातंत्र्य व न्याय या संविधानप्रदत्त अधिकारांची उपलब्धता सर्व नागरिकांना करणे हे या चळवळीचे लक्ष्य आहे. सकारात्मकता, सर्जनशीलता आणि समावेशकता यांच्या कसोटीतूनच लोकशाहीचे मूल्यांकन होऊ शकते व लक्ष्य गाठता येते. प्रशिक्षण, प्रबोधन व परिवर्तन ही साधने वापरून समाजाला सक्षम करता येईल हा विश्वास आहे.

गेल्या अडीच वर्षांत चळवळीने केलेल्या कामांची यादी आणि महत्त्वाच्या सहयोगी संस्थांची सूची मागील अंकात आली आहे. दोन दत्तक गावांत वैद्यकीय चाचणी, आपत्ती निवारण प्रशिक्षण, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क, पूरग्रस्तांना भरघोस मदत, प्रशासक व गावकरी यांच्यातील संवाद अशा अगणित गोष्टी आयोजित करण्यात आल्या. कोविड काळात मोफत मास्क, पीपीई किट्स, ग्लोव्ज यांच्याबरोबरच कोविड केंद्रात बेड्स, औषधे इत्यादींचे वाटप, इतकेच काय ग्रामीण भागातील भाजी घेऊन शहरात विकण्याचे कामही आमच्या शिलेदारांनी केले. ४५०पेक्षा अधिक वेबिनार्स हाही एक विक्रमच असावा. सर्व कामांची यादी द्यायची तर स्वतंत्र लेख लिहावा लागेल. इतके सांगितले तरी पुरे आहे की १००च्या वर सहयोगी संस्था आणि हजारो नागरिक या चळवळीत सामील झाले आहेत.

रसिकहो, २०२० पासून चांगुलपणाच्या दिवाळी अंकाची सुरुवात झाली. पहिल्याच अंकाला पुरस्कार मिळाला. त्यानंतर २०२१च्या एप्रिलमध्ये वासंतिक अंक काढला आणि आता या वर्षीच्या दिवाळीत फक्त आगळावेगळाच नव्हे, तर जगावेगळा अंक. तृतीयपंथीय / ट्रान्सजेंडर यांच्या जीवनावर व जीवनाच्या विविध आयामांवर प्रकाशझोत टाकणारा दिवाळी अंक. आपली सर्वांची दिवाळी 'गोड' तर होणारच, पण ती थोडी अधिक 'प्रगल्भ'

करणारी ठरली तर? तीच इच्छा घेऊन या अंकाचा दिवाळीचा मेवा घेऊन आम्ही आलो आहोत. आपल्या सर्वांच्या अभिरुचीला आव्हान देत देत खूप काही सांगणारा.

चांगुलपणाच्या चळवळीत दुर्लक्षित, वंचित, उपेक्षित घटकांच्या प्रश्नांवरती चर्चा व त्यांच्या सोडवणुकीत मदत ही एक फार मोठी प्राथमिकता आहे. ज्या घटकांची आपण माणूस म्हणून दखलसुद्धा घेत नाही त्यात देवदासी, देहविक्रय करणाऱ्या व्यक्ती, वेठबिगारी करणारे मजूर व बालमजूर, भटक्या जाती-जमाती असे घटक आहेत. तृतीयपंथीय व्यक्तींचाही यात समावेश होतो. त्यांच्याविषयी माहिती तर सोडाच, त्यांची संख्यासुद्धा कुणालाच माहिती नाही. भारतात त्यांची संख्या ३० लाखांवर तरी असावी असा अंदाज आहे. त्यांचे शोषण अनेक पातळ्यांवर होते. शारीरिक, मानसिक, लैंगिक, सामाजिक व सांस्कृतिक स्तरांवर त्यांना छळ व भेदभाव सहन करावा लागतो. सर्वोच्च न्यायालयाने तृतीयपंथीयांना 'ओळख' दिल्यापासून त्यांच्या प्रश्नांविषयी हळूहळू का होईना, चर्चा होत आहे. गरिबी, बेरोजगारी, उपेक्षा, शिक्षण व आरोग्य सेवांचा अभाव या आणि अशा अनेक आव्हानांमध्ये स्वत:ची अस्मिता टिकवून ठेवण्याची या समूहाची धडपड केवळ प्रशंसनीय आहे. भारतीय संविधानाने न्याय, स्वातंत्र्य, समता यांची तरतूद सर्वांसाठी केली असली तरी या समूहाला ७५ वर्षांत यातील काहीच हाती लागलेले नाही. या अंकात या परिस्थितीला बदलण्याचे आवाहन केलेले आहे. म्हणूनच तृतीयपंथीय व्यक्तींचे बहुविध लिखाण, ज्यात मुलाखत, कथा, कविता, लेख, शिवाय त्यांच्या प्रश्नांची जाण असणाऱ्या व्यक्तींनी विविध अंगांनी पाहिलेले तृतीयपंथीयांच्या विश्वाचे चित्र या अंकात आहे. लक्ष्मी त्रिपाठी, रुद्राणी छेत्री, गौरी सावंत, माधुरी सरोदे, सोनाली दळवी यांसारख्या अनेक नामवंत तृतीयपंथीयांचे मनोगत, लेख इथे आहेत, तसेच अगदी घरातून पळून जाऊन नवे जग जगू पाहणाऱ्या युवकांचीही मनोगते आहेत.

या सर्वांतून अपेक्षा एकच, दिवाळीच्या आनंदातील काही क्षण तृतीयपंथीयांचा विचार मनात यावा आणि त्यांच्यासाठी, त्यांच्याबरोबर काय कार्य करता येईल याचेही मंथन व्हावे. ही माणसे भारताची नागरिक आहेतच, पण तुमच्या-माझ्या रक्ताची आहेत आणि आपल्यातीलच एक आहेत हे लक्षात घेऊ या. वाचा, विचार करा व सक्रिय व्हा!

या अंकासाठी व या आधीच्या अंकांसाठी झटणाऱ्या परिश्रमी संपादिका शुभांगी नितीन मुळे यांची प्रशंसा करावी तितकी कमी आहे. त्याचबरोबर आपले लेखन देऊन आम्हाला उपकृत करणाऱ्या सर्वांचे मन:पूर्वक आभार. मुद्रक श्री. हरीश घाटपांडे यांनी मागच्या वर्षीप्रमाणे एक उत्तम अंक तयार केला आहेच, पण श्री. गिरीश सहस्रबुद्धे यांच्या मुखपृष्ठाने 'चार चाँद' लावले आहेत. याशिवाय प्रायोजकांचे योगदान खूप मोलाचे. त्यांचेही आभार.

**'विश्व स्वधर्म सूर्ये पाहो' हीच दिवाळीची शुभेच्छा!**

वाचक रसिकहो! प्रेमाने या फराळाचा स्वीकार करावा.



# संपादकीय...

'सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती, ओवाळीते भाऊराया रे, वेड्या बहिणीची रे वेडी माया.' खरंच किती सुंदर असतात ना ही नाती आणि दिवाळीच्या देदीप्यमान तेजात या नात्यांची झळाळी अगदी उजळून निघते; आणि मग येतो अनुभव चांगुलपणाच्या तेज:पुंज, उत्साहपूर्ण दिवाळीचा. सगळ्या सणांमध्ये दिवाळी या सणाला विशेष महत्त्व आहे. दिव्यांचा हा सण खरोखरच आयुष्य उजळून टाकणारा सण आहे.

दिवाळी हा सण जर आपण समानता, माणुसकी, आपुलकी, जिव्हाळा अशा विविध गुणात्मक दिव्यांच्या तेजाने साजरा केला तर! आपलं आणि आपल्या आजूबाजूच्या सर्वांचं आयुष्य सुंदर आणि अर्थपूर्ण होईल. हाच विचार घेऊन यंदाच्या वर्षीचा हा आगळावेगळा दिवाळी अंक घेऊन आपल्यासारख्या वाचकांच्या भेटीस येत आहोत.

परराष्ट्र खात्याचे निवृत्त सचिव आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'चांगुलपणाच्या चळवळी'अंतर्गत आम्ही मागच्या वर्षी पहिलाच दिवाळी अंक प्रकाशित करून चांगुलपणाच्या चळवळीचे विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवले. २०२०च्या अंकाला वाचकांनीही खूप चांगला प्रतिसाद दिला. या दिवाळी अंकाची संपादिका म्हणून मला काम करता आले, हे मी माझं भाग्य समजते.



एप्रिल २०२१ मध्ये आपण चांगुलपणाच्या चळवळीचा 'इ-वासंतिक विशेषांक'देखील प्रकाशित केला. चांगुलपणाच्या चळवळीच्या दिवाळी अंकाच्या उदंड प्रतिसादामुळे आता आपण या २०२१च्या दिवाळीत 'ट्रान्सजेंडर्स' या विषयाला समर्पित असा अभिनव दिवाळी अंक प्रकाशित करत आहोत. ट्रान्सजेंडर ही खूप मोठी व्याप्ती असलेली संकल्पना आहे, ज्याच्या अंतर्गत तृतीयपंथी म्हणजे ट्रान्सवुमन व ट्रान्समॅन, इंटरसेक्स असे घटक येतात. ट्रान्सजेंडर्स व्यक्तींचे जीवन, त्यांचे विचार, आकांक्षा, त्यांच्या समाजाकडून व देशाकडून अपेक्षा, त्यांच्या समस्या व आव्हाने यांच्यावर प्रकाशझोत टाकणारा असा हा अंक आहे.

आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक, राजकीय प्रतिनिधित्व अशा विविध क्षेत्रांतील ट्रान्सजेंडर्स यांच्या आजच्या स्थितीविषयीचं भाष्य करणारा हा दिवाळी अंक आहे.

या दिवाळी अंकाची संपादिका या नात्याने विविध तृतीयपंथीयांबरोबर मला संवाद साधता आला. या सर्वांचे विचार, त्यांच्या जीवनातील संघर्ष, समाजाशी त्यांचं असलेलं नातं आणि माणुसकीच्या अतूट धाग्याचे महत्त्व या सगळ्या गोष्टींमुळे जीवनाकडे बघण्याचा एक वेगळाच दृष्टिकोन या अनुषंगाने मला प्राप्त झाला. यामुळे अनेक तृतीयपंथीयांशी मैत्रीचे सूर जुळले. गेल्या काही महिन्यांपासून यानिमित्ताने त्यांच्याबरोबर बोलल्यामुळे त्यांचे विचार माझ्या हृदयात कायम रूंजी घालतायत असंच वाटतंय.

चांगुलपणाच्या चळवळीच्या या दिवाळी अंकासाठी अनेक तृतीयपंथी ट्रान्समॅन, ट्रान्सवुमन, नामवंत डॉक्टर्स, विचारवंत, समाजसेवक, ॲडव्होकेट्स अशा सर्वांचे बहुमोल

विचार लेखांच्या स्वरूपात आपल्याला जाणून घेता येतील. अतिशय आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. उद्धवजी ठाकरे, मा. नितीनजी गडकरी (रस्ता परिवहन व राजमार्ग मंत्री, भारत सरकार), मा. रामदासजी आठवले (सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री, भारत सरकार), मा. धनंजयजी मुंडे (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री, महाराष्ट्र शासन), मा. सुप्रियाताई सुळे (खासदार, लोकसभा) अशा सर्व मान्यवरांनीदेखील या विषयाचं कौतुक करून आपल्या दिवाळी अंकाकरता शुभेच्छापत्रे पाठवली आहेत. या सर्व मान्यवरांचे खूप आभार.

तृतीयपंथीयांशी संवाद साधताना त्यांचे अनेक प्रश्न अस्वस्थ करणारे होते. उदाहरणार्थ, 'बाई, अगं तुला काय पाहिजे? हा प्रश्न का विचारला जातोय?' 'जे तुला पाहिजे, तेच मला पाहिजे.' 'अगं मला पण वाटतं की माझ्यावर जिवापाड प्रेम करणारा जीवनसाथी असावा.' 'आई म्हणून कोणीतरी मला हाक मारावी!' इतर सर्वांसारखंच मीदेखील साधं सरळ आयुष्य जगावं असं मला अगदी अंत:करणातून वाटत असतं गं!' जेव्हा एखादं मूल ट्रान्सजेंडर म्हणून जन्माला येतं तेव्हा त्याचे आई-वडील का म्हणून त्याचा १०० टक्के स्वीकार करत नाहीत? का त्याला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणलं जात नाही? अचानक आपल्यासमोर एखादी तृतीयपंथी व्यक्ती आल्यावर आपल्या तोंडून कळत-नकळत आपुलकीचे, जिव्हाळ्याचे प्रश्न का निघत नाहीत? उदाहरणार्थ, 'कशी आहेस गं? छान दिसतीयेस गं!' तर अशा अनेक विचारांचे काहूर मनात दाटून येते आणि आपली आपल्यालाच लाज वाटते. पण मग असं वाटतं की, आपण आपल्यातील माणूसपण जागृत करावं आणि ही विषमता कशी दूर होईल यासाठी प्रयत्न करावा. यासाठी टाकलेलं एक छोटंसं पाऊल म्हणजेच आपला हा दिवाळी अंक होय.

दिवाळी अंकाचं संपादनाचं काम करत असताना अनेक चांगुलपणाचे हात माझ्या मदतीला आले.

सर्वप्रथम डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांची मी ऋणी आहे कारण त्यांनी मला याविषयी योग्य मार्गदर्शन केलं. स्वतंत्रपणे काम करण्याची संधी दिली आणि मुख्य म्हणजे माझ्यावर जो विश्वास त्यांनी दाखवला तो खूप मोलाचा आहे. लेखिका नीना भेडसगांवकर यांनी शब्दांकन व संपादन सहाय्य करून मला खूप मोलाची साथ दिली. त्याचप्रमाणे सुप्रसिद्ध लेखिका दीपा देशमुख यांचंदेखील बहुमोल सहकार्य लाभलं. ॲड. दिलशाद मुजावर यांचीदेखील सुंदर साथ लाभली. ऋचा मायी, अश्विनी देरेकर, डॉ. उज्ज्वला बर्वे, प्रा. दिलीप सुतार, मुख्याध्यापिका शैला कांबरे या सर्वांनी या अंकासाठी उत्तम योगदान दिलं. ट्रान्सजेंडर समुदायातील माधुरी सरोदे-शर्मा, शमीभा पाटील, सोनाली दळवी, श्रीगौरी सावंत यांचं सहकार्य शब्दांपलीकडचं आहे कारण यांच्यामुळेच या समुदायातील अनेक सदस्यांशी मला सहजपणे संवाद साधता आला.

माझे सासरे डॉ. जयंत मुळे, माझी आई सुषमा चिंचाळकर, माझे यजमान नितीन मुळे या सर्वांची वेळोवेळी आवश्यक अशी साथ मिळाली म्हणूनच मी ही जबाबदारी पेलू शकले. त्याचप्रमाणे नागपूरचे विकास रानडे, भोपाळचे अविनाश बनसोडे, ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशनचे अनिल नानीवडेकर, ब्राह्मी चौगुले यांचीदेखील उत्तम साथ लाभली.

अमोघ आर्ट्‌सचे श्री. हरीश घाटपांडे यांनीदेखील वेळोवेळी सुसंवाद साधून, उत्तम गोष्टी सुचवून हा दिवाळी अंक जास्तीत जास्त आकर्षक, सुशोभित, वाचनीय होईल यासाठी योग्य ते मार्गदर्शन केलं. मुद्रित शोधनाचे काम श्री. अजीत पेंडसे यांनी बिनचूकपणे केलं. मुखपृष्ठाचं समर्पक डिझाईन श्री. गिरीश सहस्त्रबुद्धे यांनी केलं. त्याचप्रमाणे लेखांसाठी योग्य अशी चित्रं अंजली पुरंदरे व अभय पुरंदरे यांनी अतिशय तन्मयतेनी रेखाटली. प्रभाकर भोसले यांची कॅलीग्राफी वाखाणण्याजोगी आहे.

सर्व जाहिरातदारांनी आमच्या विनंतीला मान देऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि त्यामुळे या वर्षीच्याही दिवाळी अंकाच्या निर्मितीचा प्रवास खूपच सुकर झाला. त्यामुळे सर्व जाहिरातदारांचे शतशः आभार. हितचिंतक, नातेवाईक, मित्र परिवार आणि वाचक सर्वांचे मनापासून आभार.

चला तर मग मंडळी, आपण सर्व जण चांगुलपणाच्या चळवळीत सामील होऊयात, माणूसपण जागृत करूयात, ट्रान्सजेंडर्सच्या हातात हात घालून पुढे जाऊयात, त्यांच्यासाठी विविध क्षेत्रांतील दालनं खुली करूयात. त्यांना नोकरी, व्यवसाय सहजपणे कसे प्राप्त होतील यासाठीची पावलं उचलूयात आणि सर्वांनी एकत्र येऊन सुखी, आनंदी, समृद्ध आयुष्याची अनुभूती घेऊयात!

**शुभांगी नितीन मुळे**
**संपादिका**



Wishing you a very Happy & Prosperous Diwali !

Estd. 1999 | Suryadatta Education Foundation's

# SURYADATTA GROUP OF INSTITUTES, PUNE

ISO 9001 : 2015 Certified Institutes & Accredited by NVT-QC, ANAB & IAF

Enriching Careers, Enhancing Lives for Sustainable Development

A — Category in top Leading Group of Institutions in India for 19 Consecutive years — Leading National Survey




Over 70,000 + Students & Alumni from All Parts of India & Various Foreign Nations

## OFFERS MULTIPLE CAREER / JOB ORIENTED COURSES IN EMERGING SECTORS

### SURYADATTA INTERNATIONAL INSTITUTE OF CYBER SECURITY (SIICS)
Affiliated to Savitribai Phule Pune University (SPPU)
www.siics.org

**B.Sc. Cyber & Digital Science** — 1
Unique Program Launched First time in India
✆: 8669602057 / 7756851918 / 9763266829

- Opportunity to pursue Professional Certifications for Career Advancement
- Live Projects with Practising Cyber experts
- Cyber & Digital Forensic Awareness Initiatives
- Minimum 20 Workshop / Seminar by the subject experts
- Visit to Forensic Lab, Policy Makers Office etc.

### SURYADATTA INSTITUTE OF VOCATIONAL & ADVANCED STUDIES (SIVAS)
UGC / Globally Recognized Courses
www.sgisivas.org

Diploma (1 yr) in
- Hotel Management @ SSIHM
- Fashion Design @ SIFD
- Interior Design @ SID
- Event Management @ SIMCEM

Advanced Diploma (2 yrs) in
- Hotel Management @ SSIHM
- Fashion Design @ SIFD
- Interior Design @ SID
- Event Management @ SIMCEM

→ Students can pursue Bachelors Degree from UGC / Globally recognized University

Animation
- B.Sc.MGA (Media Graphics & Animation) @ SIGMA

✆: 020-24330435, 8956932405, 8956932415, 9763266829

### SURYADATTA (SCMIRT)
NAAC Accredited, Affiliated to Savitribai Phule Pune University (SPPU)
www.scmirt.org

Management, Commerce & Information Technology
- BBA
- BBA-IB
- BBA-CA
- B.Sc.CS
- M.Sc.CS
- B.Sc. Animation
- B.Com
- M.Com
- BA*
- B.Sc. Home Science*

* From A.Y. 2021-2022

→ Placement assistance since inception
→ Opportunity to Learn Foreign Languages
→ With 7 Value Added Certifications Per Year

✆: 8956932419, 8669602053

### SURYADATTA INSTITUTES OF MANAGEMENT (SIMMC / SIBMT)
Affiliated to Savitribai Phule Pune University (SPPU). Approved by AICTE & Recognized by Ministry of Education
SIMMC - NAAC Accredited & AICTE Platinum Category
www.simmc.org / www.sibmt.org
SIMMC DTE CODE : 6547 | SIBMT DTE CODE : 6548

- MBA (Master in Business Administration)

→ With 25 Value Added Certification including IIMBx, TCSiON and more...

- MCA (Master of Computer Application)

✆: 7262011336, 8956932417

### SURYADATTA COLLEGE OF HOSPITALITY MANAGEMENT AND TRAVEL TOURISM (SCHMTT)
Affiliated to Savitribai Phule Pune University (SPPU)
www.schmtt.org

Hotel Management
- B.Sc.HS (Hospitality Studies)

✆: 8956932408, 8956938603

→ Commendable National and International Placement in 5 & 7 star Hotels
→ With 7 Value Added Certifications Per Year

### SURYADATTA INSTITUTE OF MANAGEMENT AND MASS COMMUNICATION PGDM
Approved by AICTE Recognized by Ministry of Education Govt. of India
www.simmcpgdm.org

- PGDM (Post Graduate Diploma in Management) with New Age Specializations

→ With 50 Value Added Certification including Harvard (HBS online), IIMBx & more
→ Paid Internship through out 2 years with work experience certificate

✆: 7262011336, 8956932417

### PUNE INSTITUTE OF APPLIED TECHNOLOGY (PIAT)
Approved by Maharashtra State Board of Technical Education
www.sgispiat.org

Interior Design
- DIDD (Diploma in Interior Design & Decoration) - 2 years

✆: 8956932416, 8956932415

KEY HIGHLIGHTS OF ABOVE COURSES
→ Earn while you Learn for Practical Exposure & Skill Development
→ Learning through Latest Software & Projects
→ Extensive Industry Interaction
→ With 7 Value Added Certifications Per Year

### SURYADATTA INSTITUTE OF FASHION TECHNOLOGY (SIFT)
Affiliated to Savitribai Phule Pune University (SPPU)
www.sgisift.org

Fashion Design
- B.Sc.FD (Fashion Design)

✆: 7499915677, 8956932405

→ Practical Exposure through Events and Fashion Shows
→ With 7 Value Added Certifications Per Year

### SURYADATTA RESEARCH CENTRE (SRC)
Affiliated to Savitribai Phule Pune University (SPPU)
www.suryadatta.org

- Ph.D. in Management (Doctoral Research) @ SIMMC / SIBMT

Courses of Lincoln University, Malaysia
- Ph.D. in Multiple Disciplines

✆: 8956932418, 9112297607

### Courses Recognized by KKSU, NAAC Accredited University

- Dipl. in Yoga, Naturopathy & Dietetics
- Dip in Early Childhood Education & Care

✆: 7262011337

- B. Sc. Hospitality Studies
- M. Sc. Hospitality Studies

✆: 8956932408

- Diploma in Theatre & Performing Arts
- Bachelor of Performing Arts (Dance)

✆: 8669602058

Special Scholarship for Academic Year 2021-2022

Interest Free Installments facility from NBFCs

Environment Friendly & Hygienic Campus

www.suryadatta.org
Follow us on

Take a virtual tour of Suryadatta scan QR Code

Celebrating 22 Glorious years of Academic Excellence    For Career Guidance : 9881490036




उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्य मंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२


**शुभेच्छा**

परराष्ट्र खात्याचे निवृत्त सचिव आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या चांगुलपणाच्या चळवळीचा २०२१ चा दिवाळी अंक तृतीयपंथीयांच्या प्रश्नांवरती प्रकाशझोत टाकणार आहे, ही आनंदाची बाब आहे. ही एक अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे आणि ती प्रभावीपणे पुढे नेण्याचे काम चांगुलपणाची चळवळ करत आहे, याबद्दल मी त्यांचं अभिनंदन करतो.

भारतीय स्वातंत्र्याला लवकरच ७५ वर्षे पूर्ण होतायत. या दीर्घ काळामध्ये आपल्या देशाने अनेक क्षेत्रात प्रगती केलेली आहे. आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक,सांस्कृतिक क्षेत्रातही आज भारताची मान जगामध्ये खूप उंचावलेली आहे. त्यातही आपल्या संविधानाने सांगितल्याप्रमाणे समाजातल्या वंचित वर्गाकडे, दुर्लक्षित वर्गाकडे विशेष लक्ष देणे ही सरकारची प्राथमिकता आहे.


आपल्या समाजामध्ये आदिवासी असोत किंवा अनुसूचित जाती असोत त्यांच्या विकासासाठी वेगवेगळ्या योजना राबविल्या आहेत. त्याचबरोबर समाजाचा एक महत्त्वाचा घटक असणाऱ्या तृतीयपंथी- ट्रान्सजेंडर वर्गाच्या हक्कांविषयी समाजामध्ये जाणिव निर्माण व्हावी यासाठी शासन प्रयत्न करत आहे. या वर्गाचा विचार करून काही योजना कार्यान्वित केलेल्या आहेत, आणि त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे. शासन तृतीयपंथी-ट्रान्सजेंडर यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कटिबद्ध आहे.

समाजाने तृतीयपंथीयांच्या समस्यांकडे गंभीरपणे लक्ष द्यावे, समाजाचाच हिस्सा म्हणून त्यांच्या प्रगतीसाठी त्यांचे सहकार्य करावे आणि शासनांच्या उपक्रमाला यशस्वी करण्याबाबतही जागरूक रहावे. या अत्यंत नाविन्यपूर्ण आणि अभिनव अशा दिवाळी अंकाला मनःपूर्वक शुभेच्छा ! या अंकाचे आपण सर्वजण मनापासून स्वागत करूयात!

आपला नम्र,

(उद्धव बाळासाहेब ठाकरे)


दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, फॅक्स : ०२२-२२०२ ९२१४
ई-मेल : cm@maharashtra.gov.in, वेब साईट : www.maharashtra.gov.in




नितीन गडकरी
NITIN GADKARI

सत्यमेव जयते

मंत्री
सड़क परिवहन एवं राजमार्ग
भारत सरकार
Minister
Road Transport and Highways
Government of India


Do No. V.I.P. /VIP/MRT&H/2021
Date :- 16/10/2021

## शुभेच्छा

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण साजरा करीत आहोत. या ७५ वर्षाच्या दीर्घ काळामध्ये आपल्या देशाने अनेक क्षेत्रात प्रगती केलेली आहे. आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातही भारताची मान जगामध्ये खूप उंचावलेली आहे. आपल्या संविधानाने सांगितल्याप्रमाणे समाजातल्या वंचित वर्गाकडे, दुर्लक्षित वर्गाकडे विशेष लक्ष देणे ही सरकारची प्राथमिकता आहे. आपल्या समाजामध्ये आदिवासी किंवा अनुसूचित जाती यांच्यासाठी वेगवेगळया तरतुदी कायद्याप्रमाणे आणि वेगवेगळया योजनांप्रमाणे केल्या गेलेल्या आहेत. त्याचबरोबर एक महत्वाचा घटक, जो आजपर्यंत बऱ्यापैकी दुर्लक्षित राहिलेला आहे किंवा ज्यांच्या हक्कांविषयी समाजामध्ये जाणिवेची कमतरता आहे, तो वर्ग म्हणजे तृतीयपंथी/ट्रान्सजेंडर वर्ग. याबाबतही सरकारने विचार करुन काही योजना कार्यान्वित केलेल्या आहेत आणि त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे. शासन तृतीयपंथी /ट्रान्सजेंडर यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कटिबध्द आहे.

मला आनंद वाटतो की, डॉ.ज्ञानेश्वर मुळे, जे परराष्ट्र खात्याचे निवृत्त सचिव आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य आहेत, यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या चांगुलपणाच्या चळवळीचा २०२१ चा दिवाळी अंक तृतीयपंथीयांच्या प्रश्नांवर प्रकाशझोत टाकणार आहे, ही एक अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे आणि ती प्रभावीपणे पुढे नेण्याचे काम चांगुलपणाची चळवळ करत आहे. याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. समाजाने तृतीयपंथीयांच्या समस्यांकडे गंभीरपणे लक्ष द्यावे आणि समाजाचा घटक म्हणून त्यांच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे आणि शासनाच्या उपक्रमाला यशस्वी करण्याबाबतही जागरुक रहावे. या अत्यंत नावीन्यपूर्ण आणि अभिनव अशा दिवाळी अंकाला मी शुभेच्छा देतो. या अंकाचे आपण सर्वजण मनापासून स्वागत करुया.

आपला,

(नितीन गडकरी)


Room No. 501, Transport Bhawan, 1, Sansad Marg, New Delhi – 110 001, Tel.: (RTH) 011-23710121, 23711252 (O), 23719023 (F),
E-mail: nitin.gadkari@nic.in; website-www.morth.nic.in
Camp Office Nagpur : Plot No. 25, Opp. Orange City Hospital, Beside Jupiter School, Khamla Chowk, Nagpur-440015(MS)
Tel.: 0712-2239918/20/22/23/24 Email : office@nitingadkari.net



रामदास आठवले
RAMDAS ATHAWALE

सामाजिक न्याय और अधिकारिता राज्य मंत्री
भारत सरकार

MINISTER OF STATE FOR
SOCIAL JUSTICE & EMPOWERMENT
GOVERNMENT OF INDIA

दिनांक:०९.१०.२०२१

## ।। हार्दिक शुभेच्छा ।।

लवकरच भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षं पूर्ण होत आहेत. या ७५ वर्षांच्या दीर्घ काळामध्ये आपल्या देशाने अनेक क्षेत्रात प्रगती केलेली आहे. आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातही आज भारताची मान जगामध्ये खूप उंचवलेली आहे. त्यातही आपल्या संविधानाने सांगितल्याप्रमाणे समाजातल्या वंचित दुर्लक्षित वर्गाकडे विशेष लक्ष देणे ही सरकारची प्राथमिकता आहे. आपल्या समाजामध्ये आदिवासी असोत किंवा अनुसूचित जाती असोत, त्यांच्यासाठी वेगवेगळ्या तरतुदी कायद्याप्रमाणे आणि वेगवेगळ्या योजनांप्रमाणे केल्या गेलेल्या आहेत. त्याचबरोबर एक महत्त्वाचा घटक जो आजपर्यंत बऱ्यापैकी दुर्लक्षित राहिलेला आहे किंवा ज्यांच्या हक्काविषयी समाजामध्ये जाणीवेची कमतरता आहे, तो वर्ग म्हणजे तृतीयपंथी / टान्सजेंडर वर्ग.

याबाबतही सरकारने विचार करून काही योजना कार्यान्वित केलेल्या आहेत आणि त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे. शासन तृतीयपंथी / ट्रान्सजेंडर वर्ग यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी कटिबद्ध आहे. मला सांगायला आनंद वाटतो की, डॉ. ज्ञानेश्वर मुळे जे परराष्ट्र खात्याचे निवृत्त सचिव आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या चांगुलपणाच्या चळवळीचा २०२१चा दिवाळी अंक तृतीयपंथीयांच्या प्रश्नांवरती प्रकाशझोत टाकणारा आहे. ही अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे. आणि ती प्रभावीपणे पुढे नेण्याचे काम चांगुलपणाची चळवळ करत आहे. याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

समाजाने तृतीयपंथीयांच्या समस्यांकडे गंभीरपणे लक्ष द्यावे आणि समाजाचाच हिस्सा म्हणून त्यांच्या प्रगतीसाठी त्यांना सहकार्य करावे आणि शासनाच्या उपक्रमाला यशस्वी करण्याबाबत या अभिनव अशा दिवाळी अंकाला मी महाराष्ट्र शासन आणि भारत सरकार यांच्यावतीने आणि माझ्या वैयक्तिक आणि रिपाई पक्षातर्फे हार्दिक शुभेच्छा देतो. या अंकाचे आपण सर्वजण मनापासून स्वागत करूया!

**स्नेह आहेच वृध्दींगत व्हा!**

आपले,

9.10.2021

**(रामदास आठवले)**

**प्रति,**

**मा.डॉ.ज्ञानेश्वर मुळे**
परराष्ट्र खात्याचे निवृत्त सचिव तथा
राष्ट्रीय मानवाधिकार आयोग सदस्य

Room No.: 101, 'C' Wing, Shastri Bhawan, Dr Rajender Prasad Road, New Delhi-110001, Tel.: 011-23381656, 23381657, Fax: 011-23381669



**धनंजय पंडितराव मुंडे**

मंत्री
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य,
महाराष्ट्र शासन

दि. / /

## शुभसंदेश

भारतीय समाजरचनेत सर्वांना समान न्याय, समता, बंधुता या मुल्यांना एकत्रित प्रस्थापित करणाऱ्या सामाजिक न्यायाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशाची आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतीक, औद्योगिक क्षेत्रात ज्या पद्धतीने प्रगती सुरू आहे त्यालाच समांतर सामाजिक क्षेत्रातही प्रगती अपेक्षित आहे. आदिवासी, अनुसूचित जाती, दिव्यांग, निराधार अशा विविध समाज घटकांना कायद्यात तरतूदी करून वेगवेगळ्या योजना राबवत त्यांचा हक्क व न्याय आपण देत आहोत. त्याचबरोबर सामाजिक प्रवाहापासून सतत उपेक्षित असलेल्या तृतीयपंथीयांना देखील आता मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून आम्ही प्रयत्नशील आहोत.

महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यानंतर प्रथमच राज्यात तृतीयपंथीयांच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ आम्ही स्थापन केले आहे व या महामंडळाच्या माध्यमातून तृतीयपंथीयांची शासन दरबारी नोंद करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे, हे सांगताना निश्चितच आनंद वाटतो.

परराष्ट्र खात्याचे निवृत्त सचिव आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या 'चांगुलपणाची चळवळ' च्या २०२१ च्या दिवाळी अंकात तृतीयपंथीयांच्या प्रश्न, समस्या, त्याचबरोबर तृतीयपंथीयांची एकूण सामाजिक स्थिती या विषयावर प्रकाश टाकून विचार मंथन केले जाणार आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे.

तृतीयपंथीयांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहत त्यांची नोंदणी करून जिल्हानिहाय संख्या निश्चित करणे, कौशल्य आधारित प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, मोठ्या शहरात शेल्टर होम्स उभारणे, व्यवसायासाठी बीज भांडवल कर्ज देणे यांसारख्या काही महत्त्वाकांक्षी योजना सामाजिक न्याय विभागामार्फत निर्माण केलेल्या महामंडळाच्या माध्यमातून आम्ही प्रस्तावित केल्या आहेत. सर्वांच्या सहकार्याने या योजना लवकरच प्रत्यक्ष लाभार्थीपर्यंत पोहचतील.

'चांगुलपणाची चळवळ' दिवाळी अंकाने समाजातील उपेक्षित वर्गाला यावर्षी अग्रस्थानी नेमले आहे. तृतीयपंथीयांच्या प्रश्नांकडे गंभीरपणे पाहिले जावे, शासन दरबारी त्यांची दखल घेतली गेलीच आहे त्या उपक्रमाला सर्वांचे सहकार्य लाभावे; या देशाचे नागरिक म्हणून सन्मानाने जगण्याचा या देशाच्या संविधानाने दिलेला अधिकार तृतीयपंथीयांना मिळावा व त्यांची प्रगती साधावी यासाठी सर्वांच्या सहकार्यांच्या अपेक्षेसह दिवाळी अंकाला व सर्व वाचकांना मनस्वी शुभेच्छा!

आपला

धनंजय मुंडे

प्रति,
मा. संपादक,
दिवाळी अंक - चांगुलपणाची चळवळ


: कार्यालय :

**मुंबई कार्यालय:-**
दालन क्र. १०२ (मुख्य इमारत),
पहिला मजला, मंत्रालय, मुंबई - ३२.
दुरध्वनी क्र.: ०२२-२२८८६२९३
०२२-२२८८६०२५

**मुंबई निवास:-**
'चित्रकुट' बंगला, रतीलाल ठक्कर मार्ग, मलबार हिल
पोलीस स्टेशन समोर, मलबार हिल, मुंबई-४००००६.
दुरध्वनी क्र.: ०२२-२३६७ ६९५१
०२२-२३६८ ५५०१

**परळी वैजनाथ :-**
जगमित्र कार्यालय, सिंचन भवन समोर,
अंबाजोगाई रोड, परळी, वैजनाथ, जि. बीड,
दुरध्वनी क्र.: ०२४४६ / २२५७७७
२२३३७७

Email: dhananjay.munde@gov.in Dhananjay Munde @dhananjay_munde Dhananjay Munde



सत्यमेव जयते

**सुप्रिया सुळे**, खासदार
(लोकसभा)

दि. ०५/०५/२०२१

आपला देश विविध क्षेत्रात अग्रेसर राहिला आहे. आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक,सांस्कृतिक क्षेत्रातही भारताने देदिप्यमान यश मिळवले आहे. संविधानाने सांगितल्याप्रमाणे समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गाकडे विशेष लक्ष देणे याला सरकारचे प्राधान्य आहे. आपल्या समाजामध्ये आदिवासी असोत किंवा अनुसूचित जाती असोत त्यांच्यासाठी वेगवेगळ्या तरतुदी कायद्याप्रमाणे आणि वेगवेगळ्या योजनांप्रमाणे केल्या गेलेल्या आहेत.

त्याचबरोबर एक महत्त्वाचा घटक जो आजपर्यंत बऱ्यापैकी दुर्लक्षित राहिलेला आहे किंवा ज्यांच्या हक्कांविषयी समाजामध्ये जाणिवेची कमतरता आहे तो वर्ग म्हणजे तृतीयपंथी/ ट्रान्सजेंडर वर्ग. याबाबतही सरकारने विचार करून काही योजना कार्यान्वित केलेल्या आहेत आणि त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे.

मला सांगायला अभिमान वाटतो की डॉ.ज्ञानेश्वर मुळे जे परराष्ट्र खात्याचे निवृत्त सचिव आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य आहेत त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या चांगुलपणाच्या चळवळीचा २०२१चा दिवाळी अंक तृतीयपंथीयांच्या अंतरंगाचा ठाव घेणारा आहे.

प्रत्येकाला आत्मसन्मानाने जगण्याचा अधिकार आहे आणि माणुसकी हाच धर्म आपण अंगीकारला पाहिजे असं मला वाटतं. ही एक अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे व ती प्रभावीपणे पुढे नेण्याचे काम 'चांगुलपणाची चळवळ' करत आहे याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

समाजाने तृतीयपंथीयांच्या समस्यांकडे गंभीरपणे लक्ष द्यावे आणि समाजाचाच हिस्सा म्हणून त्यांच्या प्रगतीसाठी त्यांचे सहकार्य करावे आणि शासनांच्या उपक्रमाला यशस्वी करण्याबाबतही जागरूक रहावे. या अत्यंत नाविन्यपूर्ण आणि अभिनव अशा दिवाळी अंकाला माझ्या वतीने मनापासून शुभेच्छा देतो. या अंकाचे आपण सर्वजण मनापासून स्वागत करूयात.

घराघरात हा अंक नक्की पोहोचेल आणि प्रभावी ठरेल असा मला विश्वास आहे.

सुप्रिया सुळे

**दिल्ली** : सी-१/५, लोधी गार्डन, नवी दिल्ली - ११० ००३
• दूरध्वनी: ०११-२३०१८८७० / २३०१८६११ • टेलीफॅक्स: ०११-२३०१८६०१ • ई-मेल: supriyassule@gmail.com

**मुंबई** : सिल्व्हर ओक इस्टेट, बंगला नं. २, १ ला मजला, भुलाबाई देसाई रोड, मुंबई - ४०० ०२६
• दूरध्वनी: ०२२-२२८५२३४५ (कार्यालय), ०२२-२३५१५२२२ (निवास) • टेलीफॅक्स: ०२२-२२८१३०१८

**पुणे** : इ १५ निसर्ग, मार्केट यार्ड, पुणे - ४११ ०३७
• दूरध्वनी: ०२०-२४२६३२६६ • टेलीफॅक्स: ०२०-२४२६४२५३



# लिंगपरिवर्तन

## संकल्पना, अनुभूती आणि मनोगते

**डॉ. अविनाश भोंडवे**
फॅमिली फिजिशियन

सृष्टीच्या निर्मितीमध्ये सजीवांची व्युत्पत्ती झाल्यावर अमिबा, बॅक्टेरिया, आर्कियासारखे एकपेशीय जीव निर्माण झाले. काही वनस्पती आणि बुरशीजन्य जीवही निर्माण झाले. सृष्टीच्या सुरुवातीपासूनच प्रत्येक सजीवाच्या जाती-प्रजातीचा 'वंश' पुढे सुरू राहावा, यासाठी पुनरुत्पादनाची प्रक्रिया त्या त्या सजीवात अंतर्भूत होती. या एकपेशीय सजीवात विभाजनाच्या पद्धतीने पुनरुत्पादन होऊ लागले. याला 'एसेक्शुअल रीप्रॉडक्शन' म्हटले जाते. विभाजनायोगे एका पेशीच्या दोन पेशी होऊन मूळच्या पेशींचे गुणधर्म पुढच्या 'पिढीला' मिळतात.

त्यानंतर काही सजीवांमध्ये पार्थेनोजीनेसिस प्रक्रियेने पुनरुत्पादन होऊ लागले. पिसवा, जंत, काही विशिष्ट प्रकारच्या माश्या, मासे, सरपटणारे प्राणी, पक्षी यांच्यात नर आणि मादी असे दोन प्रकार असूनही, मादीचे अंडे पुबीजाच्या संपर्कातही न येता फलित होऊन नवे सजीव जन्माला येऊ लागले.

पण सृष्टीच्या विकासामध्ये पृष्ठवंशीय प्राण्यांमध्ये आणि सजीवांच्या साखळीमध्ये अखेरची शृंखला असलेला मानवामध्ये नर आणि मादी किंवा स्त्री आणि पुरुष असे दोन लिंगभेद निसर्गत: निर्माण झाले. प्रजोत्पादनासाठी ही दोन्हीही लिंगे आवश्यक असल्याने मानववंशाच्या इतिहासामध्ये त्यावरच भर दिला गेला.

प्रगत मानवाच्या वैद्यकीय अभ्यासामध्ये, सामाजिक व्यवहारांमध्ये आणि लैंगिक विचारांमध्ये आधुनिक काळादरम्यान एक विरोधाभास लक्षात येऊ लागला. प्रगत मानवामध्ये केवळ पुरुष आणि स्त्री हे दोनच लिंगभेद नसून, एक तिसऱ्या स्थितीचेही अस्तित्व आहे असे लक्षात येऊ लागले. यालाच तृतीयपंथ असे मानले जाऊ लागले. विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत, या तिसऱ्या स्थितीतही अनेक उपप्रकार ठळकपणे दिसून आले. त्यामध्ये L, G, B, T, Q हे मुख्य प्रकार मानले जाऊ लागले. यांबाबत संक्षिप्तपणे सांगायचे झाले तर -

**लेस्बियन (एल)** - ज्या स्त्रियांमध्ये स्त्रियांबाबतच एकप्रकारचे शाश्वत स्वरूपाचे शारीरिक, भावनिक आणि लैंगिक आकर्षण असते आणि त्यातूनच ज्या स्त्रियांसोबतच शारीरिक संबंध ठेवतात त्यांना समलिंगी महिला किंवा लेस्बियन म्हणून ओळखले जाते.

**गे (जी)** - ज्या पुरुषांमध्ये शारीरिक, भावनिक आणि लैंगिक आकर्षण समान लिंगाच्या पुरुषांबाबत असते आणि जे पुरुषांशी शारीरिक संबंध राखतात अशा लोकांना गे किंवा समलिंगी पुरुष म्हणतात.

**बाय-सेक्शुअल (बी)** - या व्यक्तींना समान लिंगाच्या आणि दुसऱ्या लिंगाच्या व्यक्तींबाबत सारखेच शारीरिक, भावनिक आणि लैंगिक आकर्षण वाटत असते. त्यांच्या लैंगिक जीवनात ते स्त्री आणि पुरुष अशा दोन्ही लिंगाच्या व्यक्तींशी शरीरसंबंध ठेवतात. या व्यक्ती त्यांच्या जीवनात वेगवेगळ्या प्रकारे आणि वेगवेगळ्या पातळीवर हे आकर्षण अनुभवू शकतात. उभयलिंगी लोकांना उभयलिंगी होण्यासाठी विशिष्ट लैंगिक अनुभव असणे आवश्यक नसते.

**ट्रान्सजेंडर (टी)** - काही व्यक्तींना जन्मजात ज्या लिंगाने ओळखले जाते, त्या लिंगापेक्षा त्यांच्या मानसिक,

शारीरिक आणि भावनिक अनुभूती वेगळ्या असतात. म्हणजे एका बाजूने लैंगिकदृष्ट्या मुलगा म्हणून जन्मलेल्या व्यक्तीच्या मनात आपण मुलगा नसून मुलगी आहोत अशी तीव्र आणि शाश्वत भावना जागी होत राहते. त्याचप्रमाणे लैंगिकदृष्ट्या मुलगी म्हणून जन्मलेली व्यक्ती मनोमन पुरुषत्वाच्या भावना आणि संकल्पना जोपासत राहते. त्यांचे विचार, आवडी-निवडी, शारीरिक वर्तन यामध्ये इतर सर्वसाधारण मुलामुलींपेक्षा वेगळे आणि शारीरिकदृष्ट्या असलेल्या लिंगाच्या विरुद्ध लिंगाच्या वर्तनाशी आणि विचारांशी निगडित असतात. यांना ट्रान्सजेंडर म्हणून ओळखले जाते.

**क्विअर (क्यू)** – काही व्यक्तींची लैंगिक प्रवृत्ती केवळ विषमलिंगी नसते, परंतु बरीचशी विचित्र असते त्यांना क्विअर (विचित्र) म्हणून ओळखले जाते. त्यांच्यासाठी समलिंगी आणि उभयलिंगी या संज्ञा खूप मर्यादित आणि / किंवा सांस्कृतिक अर्थाने परिपूर्ण असल्यातरी त्या त्यांना लागू होत नाहीत.

एखाद्या व्यक्तीची लैंगिकता जन्मजात लिंगापेक्षा वेगळी किंवा समलिंगी असेल, अशा लैंगिक अभिमुखतेचे किंवा लिंग ओळखीचे वर्णन करण्यासाठी 'क्विअर' किंवा विचित्र ही संज्ञा वापरली जाते. जे लोक समलिंगी, अलैंगिक किंवा ट्रान्सजेंडर आहेत, ते आपल्या लैंगिकतेचा उल्लेख क्विअर म्हणून करतात. अनेकदा या व्यक्तींची लैंगिकता किंवा लिंग गुंतागुंतीचे असू शकते, कालांतराने बदलू शकते किंवा कोणत्याही पूर्वीच्या लैंगिक अभिमुखता किंवा लिंग ओळखीमध्ये बसत नाही. यापैकी काही लोक स्वत:ला विचित्र म्हणतात. कारण आज मान्यता असलेली लैंगिक प्रवृत्ती किंवा लैंगिक ओळखीच्या व्याख्येत ते बसत नाहीत, त्यांच्या मते ते त्यापेक्षा वेगळे असतात. काही LGBTQI रिसोर्स संस्थांच्या मते ही एक प्रकारे किंचितशी वेगळी पण अपमानास्पद संज्ञा मानली जाते.

**जनुकीय दोष :**

काही व्यक्तींमध्ये जन्मजात जनुकीय दोषांमुळे पुरुष किंवा स्त्री यापेक्षा वेगळी स्थिती जन्मजात निर्माण झालेली असते. यात -

**क्लाईनफेल्टर सिंड्रोम** – यामध्ये जन्मजात गुणसूत्रात (क्रोमोसोम्स) विसंगती असते. साधारणपणे मानवात ४६ गुणसूत्रे असतात. त्यातील २३ आईकडून आणि २३ वडिलांकडून येत असतात. यापैकी ४४ गुणसूत्रे ही इतर शारीरिक गुणधर्मांना नियंत्रित करतात आणि २ गुणसूत्रे लैंगिक असतात. या २ गुणसूत्रांमध्ये आईकडून X गुणसूत्र येते तर वडिलांकडून X किंवा Y यापैकी एक येते.

ज्या बालकात दोन्ही गुणसूत्रे X येतात, त्याच्यात स्त्रियांची

> **मी जन्माने पुरुष असलो, तरी मनाने स्त्री आहे याची जाणीव मला शाळेत असताना नववीमध्ये झाली. आई-बाबांना हे सांगून मी मोकळा झालो. नंतर कुठल्याही घरात होईल अशी भीषण रडारड झाली. मला सायकिॲट्रिस्टना दाखवण्यात आले. माझा विश्वास नसतानाही अंगारे धुपारे करणाऱ्या देवर्षीकडे मला नेण्यात आले. पण माझ्या लैंगिक कलामध्ये कणभरही बदल झाला नाही, तो होणार नव्हताच.**

पुनरुत्पादन संस्था आणि त्या दृष्टीने स्त्रीविषयक हार्मोन्सचे संतुलन बनते. तर ज्या बालकात XY अशी गुणसूत्रे येतात, त्यांच्यात पुरुषांची जननसंस्था आणि त्यानुसार हार्मोन्सचे प्राबल्य निर्माण होते. क्लाईनफेल्टर सिंड्रोममध्ये दोनऐवजी तीन लैंगिक गुणसूत्रे येतात आणि एकूण ४७ गुणसूत्रे असतात. याला ट्रायसोमी म्हणतात.

क्लाईनफेल्टर सिंड्रोम सहसा पुरुष बालकामध्ये आढळते. त्यांच्यात एक X गुणसूत्र जास्त असते. म्हणजे XXY अशी ट्रायसोमी लैंगिक गुणसूत्रे असतात. त्यामुळे ते पुरुष म्हणूनच जगतात परंतु त्यांच्यात लैंगिक आणि पुनरुत्पादनविषयक आरोग्य समस्या उद्‌भवतात.

क्लाईनफेल्टर सिंड्रोममधील काही जगद्‌विख्यात व्यक्तींनी आपले लिंगपरिवर्तन करून घेतलेले आहे. परंतु तरीही त्या व्यक्ती तृतीयपंथी मानल्या जात नाहीत.

**सुपर फीमेल सिंड्रोम** – या ट्रायसोमीतही ४७ किंवा ४८ आणि क्वचितप्रसंगी ४९ क्रोमोसोम्स असतात. त्यातील ४४ सर्वसाधारण आणि ३ किंवा त्याहूनही अधिक X पद्धतीची लैंगिक गुणसूत्रे असतात. त्यामुळे याला ४४XXX, ४४XXXX किंवा ४४XXXXX सुपर फीमेल म्हटले जाते. यांच्यात लैंगिक आणि पुनरुत्पादनविषयी समस्या उद्‌भवतात.

**टर्नर सिंड्रोम** – मुलगी म्हणून जन्मलेल्या या बालकांमध्ये एका X गुणसूत्राचा अभाव असतो. साहजिकच त्यांच्यात मानसिक, भावनिक, शारीरिक आणि लैंगिकदृष्ट्या अनेक समस्या निर्माण होतात.

**जन्मजात दोष :**

जन्मापूर्वी आईच्या गर्भात असताना अर्भकांची वाढ होताना काही दोष निर्माण होतात. यामध्ये लैंगिक अवयव निर्माण होताना मुलांमध्ये शिश्न, अंडकोष आणि मुलींमध्ये योनी आणि योनीमार्गाचे मुख (लेबिया) यांचा समावेश असू शकतो. कधीकधी जननेंद्रिये संदिग्ध रीतीने बनतात, म्हणजे ते बालक स्पष्टपणे स्त्री किंवा पुरुष नसते.

गर्भाच्या विकासादरम्यान लैंगिक संप्रेरकांची कमी-जास्त पातळी, गुणसूत्र विकृती, पर्यावरणीय घटक किंवा आनुवंशिक घटकांमुळे जननेंद्रियाचे दोष होऊ शकतात. काही बालकांत जननेंद्रिये स्पष्टपणे नर किंवा मादी म्हणून ओळखता येत नाहीत. अनेकदा मुलगी म्हणून जन्मलेल्या बालकांत कन्जनायटल ॲडरीनल हायपरप्लासिया हा हार्मोन्सविषयक विकार असतो आणि त्यातून अशी संदिग्ध जननेंद्रिये निर्माण होतात.

संदिग्ध जननेंद्रिये असलेल्या अर्भकाचे लिंग निश्चित करण्यासाठी, गुणसूत्रांचे विश्लेषण करण्यासाठी आणि हार्मोनची पातळी मोजण्यासाठी शारीरिक तपासणी, इमेजिंग चाचण्या आणि रक्त चाचण्या केल्या जातात. जननेंद्रियाच्या अशा अनेक दोषांमध्ये जननेंद्रियाच्या शस्त्रक्रियेची आवश्यकता असते. अशा शस्त्रक्रिया ट्रान्सजेंडर शस्त्रक्रिया म्हणून ओळखल्या जातात.

**धार्मिक आणि सामाजिक संकल्पना :**

भारतातील काही राज्यांमध्ये आणि काही विशिष्ट धार्मिक रूढीनुसार नवसाच्या मुलांना देवीच्या चरणी वाहिले जाते. यातल्या मुलांचे संगोपन मुलींसारखे केले जाते. त्यांच्यात कोणताही शारीरिक दोष नसूनही ते तृतीयपंथी व्यक्ती म्हणून समाजात वावरतात. यापैकी काही जणांनी लिंगपरिवर्तन शस्त्रक्रिया करवून घेतल्या आहेत.

भारतीय समाजजीवनात हिजडा, छक्का म्हणून आलेल्या संकल्पना पूर्णपणे शास्त्रीय नाहीत. त्यांची व्याख्या स्पष्ट नाही. यामध्ये मुख्यत्वे चार प्रकार येतात.

१. जन्मतः लैंगिक ओळख पूर्णपणे 'नॉर्मल' म्हणजे मुलगा किंवा मुलगी म्हणून स्पष्ट असते. पण काही धार्मिक अंधश्रद्धा, नवस, सामाजिक रूढी किंवा व्यावहारिक कारणांमुळे त्यांना त्यांच्या विरुद्ध लिंगाप्रमाणे 'भूमिका' करावी लागते. त्यांना सर्वसाधारणपणे हिजडा म्हणून संबोधले जाते.
२. क्वचित प्रसंगी जन्मतः मुलगा किंवा मुलगी म्हणून लिंगभेद स्पष्ट होत नाही. अशांनाही हिजडा म्हणतात.
३. मुलगा असूनही मुलीसारखे वागणाऱ्या मुलांना हिजडा किंवा छक्का म्हणून संबोधले जाते. परंतु ते शारीरिक आणि लैंगिकदृष्ट्या सक्षम पुरुष असतात.
४. लैंगिकदृष्ट्या अकार्यक्षम असल्यामुळे स्त्रीशी शरीरसंबंध ठेवू न शकणाऱ्या व्यक्तींनाही छक्का म्हणून संबोधले जाते.

आज एलजीबीटीक्यूआय या संज्ञांच्या व्याख्या पूर्णतः शास्त्रीयदृष्ट्या केल्या आहेत. त्यामुळे हिजडा ही संज्ञा अपुरी आणि अशास्त्रीय ठरते.

**लैंगिक कल :**

लैंगिक कल म्हणजे एखाद्या व्यक्तीचे विषमलिंगी किंवा समलिंगी किंवा दोन्ही प्रकारच्या लिंगाच्या व्यक्तींबद्दल वाटत असलेले भावनिक, लैंगिक आकर्षण. अलैंगिकता हाही एक प्रकार आहे ज्यामध्ये कसल्याही प्रकारचे लैंगिक आकर्षण कोणत्याच लिंगाच्या किंवा लिंगभावाच्या व्यक्तीबरोबर वाटत नाही.

लैंगिक कलामध्ये लैंगिक अस्मिता हीदेखील एक संकल्पना आहे.

- सर्वलैंगिक (पॅनसेक्शुअल)
- अनेक लैंगिक (पॉलीसेक्शुअल) असे दोन प्रकार असतात.

एखाद्या व्यक्तीला असलेल्या लैंगिक आकर्षणाच्या प्रकारावर, त्याबद्दलच्या वर्तनावर आणि ती कोणत्या समुदायाचा समाजाचा भाग आहे यावर आधारित अस्मितेवर अथवा ओळखीवर आधारित 'स्व' कल्पना हाही एक महत्त्वाचा भाग असतो.

यामध्ये **अँड्रोफिलिया आणि गायनोफिलिया** या संकल्पना वर्तनअभ्यास शास्त्रामध्ये व्यक्तीच्या लिंगावर आधारित लैंगिक कलाच्या व्याख्येला म्हणजेच समलिंगी किंवा विषमलिंगी संज्ञांना पर्याय म्हणून वापरल्या जातात. कोणत्याही लिंगाच्या व्यक्तीच्या पुरुषांप्रती असलेल्या आकर्षणाला अँड्रोफिलिया म्हणतात, तर स्त्रियांबाबत असलेल्या लैंगिक आकर्षणाला गायनोफिलिया म्हणतात.

लैंगिक प्राधान्ये आणि लैंगिक कल या दोन्हीही संकल्पना सामान्यपणे एकाच अर्थाने वापरल्या जातात. मानसशास्त्रीय संशोधनांमध्ये मात्र या दोन्हीही संकल्पना वेगवेगळ्या अर्थाने वापरल्या जातात. **लैंगिक प्राधान्ये** म्हणजे एखाद्या उभयलिंगी लैंगिक कल असलेल्या व्यक्तीने एका लिंगाच्या व्यक्तीपेक्षा दुसऱ्या लिंगाच्या व्यक्तीला जास्त प्राधान्य देणे. लैंगिक प्राधान्य हे व्यक्तीच्या लैंगिक निवडीबद्दलचे आहे, त्याच्याच तुलनेत वैज्ञानिक अभ्यासांमध्ये हे सिद्ध झालेले आहे की, लैंगिक कल (सेक्शुअल ओरिएन्टेशन) ही निवड नसून ती न बदलण्याच्या



पातळीवर व्यक्तीच्या अस्मितेत घडत गेलेली स्थिर आणि शाश्वत बाब असते.

**लैंगिक कलाची जडणघडण** – अनेक संशोधने होऊनही शास्त्रज्ञांना लैंगिक कल नक्की कसा निर्माण होतो याचे कोडे पूर्णपणे उमगलेले नाही. पण लैंगिक कल घडवण्यामध्ये जनुकीय, संप्रेरके आणि सामाजिक संदर्भांच्या घटकांचा एकत्रित परिणाम होत असतो, हे स्पष्टपणे आढळून आलेले आहे. अनेक शास्त्रज्ञ जीवशास्त्रीय अभ्यासांना केंद्रस्थानी ठेवून विचार करतात, त्यामुळे ते फक्त जनुकीय घडामोडी, आईच्या पोटात बाळ असतानाच्या, आईच्या मानसिक-शारीरिक आंदोलनांचे तिच्या आसपासच्या परिसराचे किंवा कधीकधी इतर सामाजिक घडामोडींचा त्यावर परिणाम होतो असे मानतात.

बाळ जन्माला आल्यानंतर त्याच्या लिंगभावावर आसपासच्या वातावरणाचा परिणाम होण्यासंबंधी खूप कमी शास्त्रीय आधार आहेत. मुलांच्या बालपणातील आणि वाढीच्या वयातील अनुभवांचा किंवा पालकांच्या काही कृतींचा परिणाम मुलांचा लैंगिक कल घडवण्यात सहभागी असतो असे सिद्ध करणारे कोणतेही आधार नाहीत. लैंगिक कल अतिशय मर्यादित लैंगिक आकर्षणापासून अमर्यादित आकर्षित होण्यापर्यंतच्या वेगवेगळ्या पातळींवर आढळतो.

**ट्रान्सजेंडरबाबत आणखी काही संकल्पना :**

वस्तुतः ट्रान्सजेंडर किंवा लिंगातरित ही सर्वसमावेशक संज्ञा (अम्ब्रेला टर्म) आहे. यात विविध प्रकारच्या व्यक्तीप्रवृत्ती येतात.

**१) इंटरसेक्स** – सामान्यतः नुकत्याच जन्मलेल्या बाळाच्या जननेंद्रियांकडे पाहून मुलगा आहे की मुलगी हे ठरवले जाते. मात्र काही वेळा जन्मत:च बाळाच्या जननेंद्रियात दोष असतो, आणि मग तो मुलगा किंवा मुलगी सांगणे कठीण होऊन बसते. मूल जसजसे मोठे होत जाते, तसतसे त्याचे जे कुठले हार्मोन्स प्रबळ होतात, त्यावर त्याचे बाह्यरूप ठरते. त्याप्रमाणे त्याला / तिला मुलगा किंवा मुलगी म्हणून आयुष्य जगणे भाग पडते.

**२) क्रॉसड्रेसर्स** – या व्यक्ती स्त्री किंवा पुरुष असतात, पण यांना भिन्नलिंग पोशाख घालायचे जबरदस्त आकर्षण असते. खाजगीत किंवा सुरक्षित चौकटीत हे आपली हौस पूर्ण करतात, इतर वेळेस मात्र आपल्या कुटुंबासकट चारचौघांसारखे आयुष्य जगतात.

**३) ड्रॅग** – या व्यक्ती त्यांच्या व्यवसायाचा एक भाग म्हणून विरुद्धलिंगी व्यक्तीचे कपडे घालून प्रेक्षकांसमोर येतात. थायलंडसारख्या ठिकाणी स्त्री म्हणून स्टेज शो करणारी मुले या प्रकारात येतात. आपल्याकडे पूर्वी नाटकात आणि अगदी सुरुवातीच्या सिनेमात स्त्रियांचे कपडे घालून स्त्री-भूमिका करणारे असंख्य नट होते. हे पूर्णपणे आपल्या मूलभूत लैंगिक स्वरूपात जीवन जगत असतात.

**४) तृतीयपंथी** – हा खरा तर एक समूह आहे, समाजाच्या दबावाखाली टाकून दिलेली अनिश्चित लिंगाची मुले, धार्मिक कारणांसाठी खच्ची केलेले पुरुष यांच्यात सामील होतात. केवळ पैसे मिळवण्यासाठी स्त्रीचे कपडे घालून भीक मागणारे पुरुषसुद्धा यात येतात. ही एक वेगाने वाढणारी कम्युनिटी आहे. गुरू-चेला पद्धतीने नवीन येणाऱ्या लोकांना ते आपल्यात समाविष्ट करून घेतात.

**ट्रान्सजेंडर** – वरील चारही गटांना सर्वसामान्यपणे ट्रान्सजेंडर म्हणतात. पण या संज्ञेअंतर्गत खरे तर जी व्यक्ती स्त्री किंवा पुरुष म्हणून जन्माला येतात, पण मोठे होताना त्यांना जाणवू लागते की ते ज्या लिंगाचे आहेत म्हणून समजले जाते, ते तसे नसून खरे तर विरुद्ध लिंगाच्या भावना असलेले आहेत, म्हणजे एखाद्या स्त्रीलिंगी व्यक्तीला असे वाटू शकते की तिच्या आत पुरुष आहे आणि ती पुढे जाऊन पुरुषांसारखी वागू लागते किंवा वैद्यकीय मदत घेऊन ती आपले बाह्यरूप तिच्या अंतर्गत वसणाऱ्या लिंगाशी मिळतेजुळते करून घेते. किंवा एखाद्या पुरुषामध्ये मनोमन आणि आचारविचारात स्त्रीचा निवास असतो आणि कालांतराने तो स्त्रीमध्ये लिंगपरिवर्तन करून घेतो. हे लिंगपरिवर्तन शस्त्रक्रियेने केले जाते किंवा संप्रेरके वापरून लिंगी भावना आणि आचार निर्माण होत जातात.

**संवाद काही ट्रान्सजेंडर्सशी :**

मी वैद्यकीय व्यवसाय सुरू करून सुमारे ३८ वर्षे झाली. ८०-९०च्या दशकात अशा ट्रान्सजेंडर्सची दवाखान्यातील उपस्थिती आजच्या इतकी असायची, पण आपल्या लिंगभावाबाबत ते कमालीची गुप्तता पाळायचे. मात्र गेल्या १५-२० वर्षांत अनेक कारणांसाठी वैद्यकीय उपचार घ्यायला येणाऱ्या ट्रान्सजेंडर व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय लिंगभावाबाबत अधिक जागरूक आणि मनमोकळे झाल्याचे लक्षात येत आहे. अशाच काही व्यक्तींशी मी केलेले विशेष संवाद अनुभवणे सर्व वाचकांसाठी नक्कीच ज्ञानरंजक ठरेल.

**तृतीयपंथी रमेश :** रस्त्यावर, चौकामध्ये गाड्या उभ्या राहिल्या की टाळ्या वाजवून पैसे मागणारे, साडी घातलेले आणि चेहऱ्याची रंगरंगोटी केलेले अनेक किन्नर किंवा हिजडे आपल्याला दिसतात. त्यातीलच 'रमा' ऊर्फ 'रमेश' माझ्याकडे औषधासाठी यायचा. त्याच्याशी बोलल्यावर अनेक गोष्टींचा मला उलगडा झाला.

रमेशचे कुटुंब हे निम्न-मध्यमवर्गीय. पुण्याच्या पेठेत राहणारे. त्याच्या आजोबांपासून हे कुटुंब माझ्याकडे औषधाला यायचे. शाळेत असल्यापासून रमेशला तो मुलगा आहे की मुलगी हे कळायचे नाही. त्याला मुलींमध्ये खेळायला आवडायचे. आपण पण मुलगीच आहोत, असे वाटायचे. त्याला सगळे बायल्या म्हणायचे. वयाच्या ८व्या वर्षी त्याला मुले चिडवायची. त्याचे वडील म्हणायचे, 'ही मुलं तुला का चिडवतात?'

एकदा शेजारचा एक मुलगा त्याला घरात येऊन छक्का म्हणाला. तो कसा बाईसारखा वागतो, बोलतो याची नक्कल केली. तेव्हा रमेशच्या वडिलांनी रमेशला बेदम मारले. ते म्हणाले, ''तू पुरुषासारखी पावले टाकत जा.'' तो म्हणाला, ''मी सरळच चालते.'' वडील म्हणाले, ''चालते नाही म्हणायचं, 'चालतो' म्हणायचं.'' पण असे का बोलायचे? असेच का चालायचे? या रमेशच्या प्रश्नावर त्याचे समाधान करणारे उत्तर मिळायचे नाही.

शेजारचे म्हणायचे, ''जेवलास का?'' तो म्हणायचा, ''आताच जेवण करून आले.'' मित्र खेळायला बोलावयाचे, तो ''आले गं... आले'' म्हणायचा.

त्याच्या जीवनातील अनुभवांबाबत तो म्हणतो, ''मला चेहऱ्याला पावडर लावणे, डोळ्यांत काजळ घालणे, लिपस्टिक लावणे खूप आवडायचे. संध्याकाळी मेकअप करायचा, छानपैकी कपडे घालायचे आणि घरापुढच्या चौकामधून फिरून यायचे असा माझा शिरस्ता असायचा. मी फिरायला गेले की मला रस्त्याने जाणारे पुरुष हिजडा म्हणायचे, येतेस का आज रात्री म्हणायचे. चल संध्याकाळी खूश कर, शंभर रुपये देतो, असे काहीबाही बोलायचे. आमच्या शेजारच्या बायका माझ्याबद्दल एकमेकीच्या कानात बोलायच्या. माझ्या आईला म्हणायच्या, 'तुमचा रमेश असे का हो वागतो?' माझ्याबाबतच्या चर्चा आई-वडिलांच्या कानावर जायच्या. त्यांना नक्कीच अपमानास्पद वाटत असणार. दु:ख आणि त्रासही होत असणार. पण अशा वेळेस त्याचे उट्टे माझ्यावर काढून मला लाथाबुक्क्यांनी मारायचे. माझ्यामुळे त्यांना होणाऱ्या वेदनांचा राग माझ्यावर काढून मला दुप्पट वेदना द्यायचे. समाजात पुरुष आणि स्त्रिया दोन्हीही हिणवायचे. पुरुष गैरफायदा घ्यायला बघायचे, बायका कुचकट निंदानालस्ती करायच्या आणि घरचेही माझी मन:स्थिती समजून न घेता मला बडवायचे.

''माझ्या वडिलांनी माझे नाव 'रमेश' ठेवले होते. पण रमेश या शब्दाचा अर्थ आहे की तो पुरुष आहे. आता मी माझे नाव रमा सांगते.

''शाळेतल्या मित्रांबाबत बोलायचे झाले, तर त्या वयातल्या मुलांना हिजडा, छक्का हे शब्द माहिती असायचे. पण त्याचा अर्थ नक्की काय, हे माहिती नसायचे. मग त्याला आपल्यात घ्यावे, सहानुभूती द्यावी, शिक्षणामध्ये मदत करावी ही जाणीव तर दूरच राहिली. त्याउलट संपूर्ण शालेय जीवनात मला चिडवणे, नावे ठेवणे, अश्लील शब्द वापरणे, मांड्यांना नाहीतर कंबरेला हात लावणे, माझ्या नावाने शाळेच्या मुतारीत अश्लील संदेश लिहून ठेवणे, अशा प्रकारे त्या वारंवार त्रास देण्याच्या घटना शाळेमध्ये मित्रांकडून घडत गेल्या.


''घरीदारी असे प्रकार घडत गेल्याने मला वडिलांनी आणि काकांनी खूप मारले. आठवडाभर घरात कोंडून ठेवले. तेव्हा मी गळ्याला चादर बांधून आत्महत्या करायचा प्रयत्न केला. मग त्यांनी मला घरातून हाकलले. मग मी कायमची घराबाहेर पडले. एकदा फिरता फिरता मी एका पार्कात बसलेली असताना, मला माझ्यासारखीच 'एक जण' भेटली. होता-करता आमच्या तीन-चार मैत्रिणी झाल्या. यातून माझा 'हिजडा' या समाजाशी संपर्क आला. त्यांनी एका गुरूशी भेट घालून दिली. हिजड्यांच्या समाजात सामील व्हायला एक गुरू असावाच लागतो. तो आम्हाला कामे मिळवून देतो आणि वर्षाला आमच्या कमाईतले दहा हजार रुपये तो घेतो.

''तृतीयपंथी म्हणून सरकारने आम्हाला नागरिक म्हणून मान्यता दिलेली आहे. पण नोकऱ्या दिलेल्या नाहीत. आमचे पोट भरण्यासाठी आम्ही हळदी समारंभ, एंगेजमेंट, बारसे अशा कार्यक्रमात नाचायला जातो. रस्त्यावर लोकांकडून किंवा दुकानदारांकडून टाळ्या वाजवत पाच-दहा रुपये मिळवतो.

''मी अकरावीपर्यंत शिकलेली आहे. आज मी भीक मागून पोट भरते. तेच जर मला नोकरी मिळाली, तर मी जास्त सन्मानाने जगू शकेन. आम्ही पण माणूस आहोत आणि माणूस म्हणून सगळ्यांनाच समान वागणूक मिळाली पाहिजे.''

**नर्तक :** बँक मॅनेजर असलेल्या वडिलांचा सुशील हा मुलगा. त्यांचे कुटुंब माझे पेशंट होते. शाळेत असल्यापासून त्याचे स्त्रैण हावभाव आणि वागणे यामुळे तो मित्रांत, नातेवाइकांत टिंगलीचा विषय होत असे. कॉलेजमध्ये गेल्यावर त्याने केस लांब वाढवले. त्याचे कपडे आणि पादत्राणे मुलींसारखी असायची. एवढेच नव्हे तर त्याच्या कॉलेजमधील एका बॉक्सरवर तो प्रेम करू लागला.

त्यासाठी त्याने त्या मुलाचा आणि त्याच्या मित्रांचा सडकून मारही खाल्ला. त्यानंतर तो पाश्चात्त्य नृत्य शिकू लागला. तिथे नृत्य शिकवणारे त्याचे गुरू समलिंगी होते. त्या गुरूंचा तो पट्टशिष्य झाला. त्यांची 'प्रेयसी' म्हणवून घेण्यात त्याला खूप मोठेपणा वाटू लागला. त्यांच्या पावलावर पाऊल टाकत अनेक मुलांशी त्याचा संबंध येत गेला. शैक्षणिक बाबतीत सुशील तसा खूप बुद्धिमान होता. दहावी आणि बारावीला उत्तम मार्क्स मिळवत तो पुढे आयटी इंजिनिअर झाला आणि एका आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या कंपनीत उत्तम नोकरीला लागला. त्याच काळात त्याने डॉक्टरांशी सल्ला-मसलत करून आपले लिंगपरिवर्तन करून घेतले. आपल्या मानसिकतेविषयी बोलताना सुशील म्हणतो -



मी जन्माने पुरुष असलो, तरी मनाने स्त्री आहे याची जाणीव मला शाळेत असताना नववीमध्ये झाली. आई-बाबांना हे सांगून मी मोकळा झालो. नंतर कुठल्याही घरात होईल अशी भीषण रडारड झाली. मला सायकिॲट्रिस्टना दाखवण्यात आले, माझा विश्वास नसतानाही अंगारे धुपारे करणाऱ्या देवर्षीकडे मला नेण्यात आले. पण माझ्या लैंगिक कलामध्ये कणभरही बदल झाला नाही, तो होणार नव्हताच.

मला भरभक्कम मुले आवडायची. त्यांचे दंड, छाती पाहिले की मला कसनुसे व्हायचे. शाळेतल्या एका स्ट्राँग मुलासमोर मी माझे मन मोकळे केले, पण त्याने आणि त्याच्या मित्रांनी मला कपडे काढून मारले.

मध्यंतरीच्या काळात एका मुलीने मला प्रपोज केले. तिला मी दुसऱ्या दिवशी कॉलेजच्या कँटिनमध्ये बोलावले आणि समजावले की मी गे आहे. तुझे प्रेम मी नाही स्वीकारू शकत. त्यानंतरही आमची मैत्री सुरूच राहिली. त्या काळात मी तिच्यात भावनिकरीत्या गुंतत गेलो. वर्षभराने मी तिला प्रपोज केले आणि ती 'हो' म्हणाली. जवळजवळ सहा महिने आम्ही प्रेमपाशात एकत्र होतो. पण फक्त गप्पा, मिठ्या आणि चुंबने होत असत. कोणतेही शारीरिक संबंध आले नाहीत. मात्र त्या काळातही माझे पुरुषांबद्दलचे आकर्षण कमी झाले नाही. त्या मुलीशी वर्षभराने ब्रेकअप झाला. मी ते नाते अकारण निर्माण करत असल्याची जाणीव मला सतत होत असे. त्यानंतर आयुष्याचा साथीदार म्हणून एका योग्य पुरुषाचा शोध घेण्यास सुरुवात केली. परंतु तो शोध अजूनही संपलेला नाही.

याच काळात एक प्रसिद्ध एंडोक्रायानॉलॉजिस्टचा मी सल्ला घेतला. त्यांनी मला इस्ट्रोजेन्सची आणि ॲन्ड्रोजेन्स दबवणारी इंजेक्शन्स दिली. माझ्या शरीरातील बदल मला जाणवायला लागले. माझी छाती, माझी कंबर, नितंब मुलींसारखे दिसतायत असे वाटू लागले. पण मला अंतर्बाह्य मुलगीच व्हायचे होते. डॉक्टरांनी मला पुरुषांच्या गुप्तेंद्रियांच्या जागी स्त्रियांची इंद्रिये निर्माण करणारी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. मी त्याप्रमाणे मुंबईच्या एका इस्पितळात दाखल झाले. माझ्या अनेक तपासण्या केल्या. रक्ताच्या चाचण्या, एक्सरे, सोनोग्राफी अशा असंख्य प्रकारच्या टेस्ट्स करून मला एक दिवशी रुग्णालयात दाखल केले.

शस्त्रक्रिया पार पडली. ही तशी एक वेदनादायक गोष्ट होती, पण माझ्या अंतर्मनातील स्त्री त्यातून प्रत्यक्षात येत होती. मी सुशीलची सुशीला झाले होते. शस्त्रक्रियेनंतर मला दोन-तीन महिने शारीरिकदृष्ट्या खूप कष्टाचे गेले. पण माझ्या नव्या अंगप्रत्यांगांची जाणीव मला एका वेगळ्या जगात घेऊन जात होती. माझी नोकरी सुरूच आहे. पण आता माझ्या जीवनाचे एकच उद्दिष्ट आहे. जीवन साथीदाराचा शोध.

**टॉमबॉय सुमेधा :**

तीस वर्षांच्या सुमेधाला लिंगपरिवर्तन करून घ्यायचे आहे. लहानपणापासून टॉमबॉय म्हणून ती वाढली. मुलांशी मारामारी करणे, कुस्ती करणे, फुटबॉल खेळणे तिला मनोमन आवडायचे. पण वयात आल्यावर तिला मुलीच आवडू लागल्या. दोन मुलींबरोबर आणि एका ट्रान्सजेंडरबरोबर तिची प्रेमप्रकरणेही पार पडली. शारीरिक, मानसिक आणि लैंगिकदृष्ट्या ती पूर्णपणे मुलगीच होती. पण मनोमन ती स्वत:ला मुलगा मानायची. तिचा लैंगिक कल समलिंगी होत गेला. तिने मानसशास्त्रात एम.ए. केले. आपल्या स्त्रीच्या

शरीरात एक पुरुष वावरतोय असे तिला सतत जाणवते. कोणत्याही दुःखद प्रसंगात तिला कधीही रडू येत नाही. मोटारसायकल हे तिचे आवडते वाहन. रस्त्यावर स्त्रियांच्या गळ्यातील मंगळसूत्र पळवणाऱ्या चोराला तिने मोटारसायकलवरून पाठलाग करून पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले होते. सुमेधाला पूर्णतः सुमेध व्हायचे आहे. तिच्याशी झालेल्या संवादातून उलगडलेले तिचे मनोगत. सुमेधा म्हणते -

मला भेटणारे लोक नेहमीच गोंधळतात. प्रथम मी एक मुलगी होते, ज्याला मुली आवडायच्या, आणि नंतर एक असा मुलगा बनत गेले, की ज्यालाही मुली आवडायच्या. मला नेहमी प्रश्न पडायचा की लिंग म्हणजे काय? आणि लैंगिकता म्हणजे काय? माझी याबाबतची थिअरी अगदी सोपी आहे. लिंग म्हणजे आपण कोणत्या रूपात झोपतो आणि लैंगिकता म्हणजे आपण कोणाबरोबर झोपतो. पण हा दुसरा भाग शोधण्यासाठी मला बराच वेळ लागला.

मला आतल्या आत, मानसिक पातळीवर नेहमी वाटायचे की मला मुलगा व्हायचेच. मी माझ्या आयुष्यात तीन मुलींशी खरोखर अर्थपूर्ण रोमँटिक संबंध ठेवले.

पहिली मैत्रीण भेटली तेव्हा मी आठवी इयत्तेत होतो. जगाच्या दृष्टीने मी तेव्हा मुलगीच होतो. दुसरी मैत्रीण मी अकरावीत असताना भेटली. त्या वेळेस मला मासिक पाळी सुरू होऊन तीन वर्षे झाली होती. माझ्यातला पुरुष मला स्त्रीत्वातून पुरुषत्वाकडे नेत होता. ही माझी दुसरी मैत्रीण माझ्यापेक्षा मोठी होती, पण ट्रान्सजेंडर होती. कॉलेजात मी खेळत असे तेव्हा ती माझ्याकडे गुपचूप पण विस्फारित नजरेने पाहत असे. या नात्यादरम्यानच मला समजले की मीदेखील ट्रान्सजेंडर आहे. या माझ्या मैत्रिणीने मला शिकवले की आमच्या नात्यात मी पुरुष आणि ती स्त्री आहे. तिला मी ट्रान्सजेंडर आहे हे नुसते पाहूनच कळले होते. माझे तिसरे प्रेम सर्वांत अलीकडच्या काळात मी ज्या मुलासोबत कॉलेजला जात होतो त्याच्यासोबत होते.

कॉलेजमध्ये असताना एकदा मी आईपाशी माझे सर्व मन मोकळे केले. माझी आई जगातील सर्वांत आश्चर्यकारक आई ठरली. ती या बातमीने मुळीच पॅनिक झाली नाही. तिने उलट, 'मी स्वच्छ सांगितले' याचे कौतुक केले. ती म्हणाली की बाहेरून असे कळण्याआधीच मी या गोष्टीची कल्पना दिली. हे खूप चांगले झाले.

वयाच्या १८ व्या वर्षी माझ्या आईच्या पाठिंब्याने आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने मी टेस्टोस्टेरॉन हार्मोन थेरपी सुरू केली. जेव्हा मी माझ्या पुढच्या मैत्रिणीला भेटलो तेव्हा माझ्या संक्रमणाच्या सुरुवातीला होतो. ती स्वतः पुरुषापासून मादीपर्यंतच्या संक्रमणामध्ये जात होती आणि लवकरच पदवीधर होणारी पहिली ट्रान्स ठरणार होती. ती मला खूप आवडली. लग्नाच्या गाठी जशा वरून जुळून येतात, तसा प्रकार आमच्या बाबतीत घडला असे मला वाटत असे. तिच्यासोबत माझा काळ जीवन बदलणारा आणि जीवनाला पुष्टी देणारा होता. आम्ही कोण आहोत? काय आहोत? काय करायला हवे? हे तिला पूर्णपणे उमजले होते.

डॉक्टरांच्या हार्मोन ट्रीटमेंटचा परिणाम जाणवू लागला होता. सुमारे सहा महिन्यांत मी एक पुरुष आहे हे मला जाणवू लागले. मी शेवटी, मला नेहमी पाहिजे असलेल्या शरीरात होतो आणि माझी एक सुंदर मैत्रीण होती. याचा मला आनंद वाटू लागला होता.

समलिंगी माणसाला भेटण्याची आशा बाळगणारा एक ट्रान्सजेंडर माणूस ही माझी पुढील पायरी आश्चर्यकारकपणे त्रासदायक होती. मी जैविकदृष्ट्या स्त्री म्हणून जन्माला आलो आहे, पण मला एक पुरुष मिळेल जो सर्व आयुष्य माझ्यासमवेत आनंदाने व्यतीत करेल याची मला खात्री नव्हती.

माझ्या शाळेतल्या दुसऱ्या मैत्रिणीशी माझा ब्रेकअप झाल्यावर मला तो भेटला. माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच माझ्याजवळ एक भव्य माणूस बसला होता. त्याने माझ्याकडे ज्या नजरेने पाहिले, ती एक नवीन भावना होती आणि मला ती चांगलीच भावली.

मी कोण आहे हे शोधणे हा खूप कठीण प्रवास असतो. परंतु माझ्या स्थितीतील बहुतेक लोकांच्या तुलनेत, मी भाग्यवान होतो. तीन कमालीच्या आश्चर्यकारक व्यक्ती माझ्या जीवनात आल्या. त्यांनी मला प्रेम म्हणजे काय हे शिकवले. मी कोण आहे आणि मला कोण व्हायचे आहे याबद्दलही खूप शिकवले. त्यापेक्षाही, मला खात्री आहे की माझ्यासाठी योग्य व्यक्ती मला अजूनही भेटायची आहे... माझा हा शोध सुरू आहे. कदाचित लिंगपरिवर्तनाची शस्त्रक्रिया केल्यावर हे आणखी सोपे होईल. पण त्याचाही शोध अजून सुरूच आहे.

*(वरील आत्मकथने प्रत्यक्षातल्या ट्रान्सजेंडर्सची असून, त्या व्यक्तींच्या बोली परवानगीने ती नावे बदलून छापली आहेत.)*



आपल्या
दिपावली अंकास
हार्दिक शुभेच्छा!
दर्जेदार
शिक्षण देणारी
विश्वसनीय
शिक्षण
संस्था...
GURUKUL SCHOOL
HOSTEL FOR BOYS & GIRLS
GURUKUL IIT & MEDICAL ACADEMY
GURUKUL OLYMPIAD SCHOOL
GURUKUL SCHOLAR ACADEMY
GURUKUL ENGLISH MEDIUM SCHOOL & JUNIOR COLLEGE
GURUKUL VIDYALAY (SEMI-ENGLISH)
GURUKUL PRE-SCHOOL
GURUKUL CAMPUS
ICHALKARANJI - ABDUL LAT.
Mo.: 7057005666, 7038625666.
www.gurukulschools.org
www.facebook.com / gurukulschoolinfo
Gurukul™
गणेश नायकुडे
चेअरमन, गुरुकुल स्कूल
अध्यक्ष, इंग्लिश मेडियम स्कूल असोसिएशन

# कोल्हापुरातील मानवी हक्कांपासून वंचित तृतीयपंथीय

**संशोधक : दलितमित्र**
**प्रा. सौ. साधना झाडबुके व**
**बाळ बेकनाळकर**

**(१) प्रस्तावना :**

तृतीयपंथीय कोणाला म्हणायचे? तर ज्याचे शरीर पुरुषाचे पण मानसिकता स्त्रीची असणाऱ्या किंवा शरीर स्त्रीचे पण मानसिकता पुरुषाची असणाऱ्या व्यक्तीला तृतीयपंथीय समजले जाते. त्यांना जोगते, लुगडेवाले, खोती, खोजी आणि किन्नर या नावाने ओळखले जाते. उपेक्षेने त्यांना ई-मेलसुद्धा म्हटले जाते. शरीर पुरुषाचे असले तरी शारीरिक व्यंगामुळे अशा व्यक्तींना पुरुषांचे आकर्षण असते. त्यामुळे त्यांच्यात समलैंगिकता आढळते. वयात आल्यानंतर त्यांचे हावभाव, मानसिकता यामुळे त्यांच्यातील दोष लगेच लक्षात येतो. प्रामुख्याने त्यांचे वागणे, बोलणे आणि चालणे हे बायकी असते. वैद्यकीयदृष्ट्या हे एक प्रकारचे व्यंग असते. हे व्यंग लक्षात येण्यासाठी व्यक्तीला वयाची पंधरा ते सोळा वर्षे ओलांडावी लागतात.

साधारणतः अचानक येणारे व्यंग हे त्याला बळी पडलेल्या व्यक्तीकडून लवकर स्वीकारले जात नाही. आधी समाजाकडून अशा व्यक्तीबद्दल सहानुभूती निर्माण होते मग हळूहळू व्यक्तिगत पातळीवर हे व्यंग स्वीकारले जाते. उदाहरणार्थ, डोळे अधू झाल्यानंतर सुरुवातीला चष्मा न वापरण्याबाबत असणारी सर्वांचीच मानसिकता. तृतीयपंथीयांना भेटल्यानंतर हे लक्षात येते की त्यांनी हे व्यंग लगेचच स्वीकारले आहे. वाढणारे केस, दाढी-मिश्या न ठेवण्याकडे असलेला त्यांचा कल, स्त्रियांसारखे नटण्याची असलेली आवड, नृत्याकडे असलेला त्यांचा कल हे सहज सिद्ध करतो की, त्यांनी हे व्यंग स्वीकारले आहे. तथापि, संबंधित पीडिताच्या घरातून हे व्यंग लपवण्यासाठी तऱ्हेतऱ्हेचे उपाय योजले जातात. भराभर वाढणारे त्यांचे केस कापले जाणे, मुलांचेच कपडे वापरण्यास भाग पाडणे आणि काही वेळा जबरदस्तीने त्यांचे लग्न लावून दिले जाणे. अशा प्रकारे प्रश्न सुटण्याऐवजी तो चिघळला जातो. घरात तृतीयपंथीय जन्माला येणे म्हणजे फार मोठा गुन्हा आपण केला आहे अशी समजूत घरातील व्यक्तींची होते आणि पीडित व्यक्तीची पहिल्यांदा घरातल्या लोकांकडूनच छळवणूक होण्यास सुरुवात होते. सहनशक्तीपलीकडे असा छळ झाला की, पीडित घर सोडून पळून जातो अथवा घरातून त्याला हाकलून दिले जाते. या दोन्ही गोष्टींपैकी कोणतीतरी गोष्ट निश्चितपणे प्रत्येक तृतीयपंथीयाच्या बाबतीत घडलेली आहे. पीडितांबाबत दुसरा एक प्रकार घडतो तो म्हणजे समाजात अशा व्यक्तीची ससेहोलपट होऊ नये म्हणून अशा व्यंगाला धार्मिक रूप दिले जाते. पीडिताला देवाला वाहिले जाते आणि जोगता किंवा वाघ्या होतो.

तृतीयपंथीयांना समाजात कोणतेही स्थान असत नाही. त्यामुळे सहजासहजी त्यांना नोकरी मिळत नाही. नोकरी मिळाली तर त्या ठिकाणी त्यांचे लैंगिक शोषण केले जाते. त्यांना इतरांकडून तुच्छतेने वागवले जाते. मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. अशा प्रकारच्या सर्व त्रासाला कंटाळून पीडित नोकरी सोडून इतर व्यवसाय करण्यासाठी मोकळे होतात.

> **ना पुरुष ना स्त्री अशा तृतीयपंथीयांच्या मानवी हक्कांचे सर्वच क्षेत्रांत उल्लंघन होते. कायद्याने सर्व जण समान आहेत असे म्हटले तरी तृतीयपंथीयांना भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते. त्यांच्या अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजाही पूर्ण होत नाहीत. सुप्रीम कोर्टाने सर्व शाळा, महाविद्यालय, शासकीय व खाजगी फॉर्मवर लिंग या शब्दासमोर स्त्री / पुरुष / तृतीयपंथीय असा उल्लेख करून त्यांना नोकरी व शिक्षणामध्ये इतर मागासवर्गीयांना दिल्या जाणाऱ्या सवलती देण्यात याव्यात असा निर्णय दिलेला आहे. पण असा बदल केल्याचे आढळून येत नाही.**

समाजाच्या त्रासापासून मुक्त होण्यासाठी ते एकत्र राहणे पसंत करतात. एक प्रकारे तो त्यांचा कम्फर्ट झोन असतो. कोल्हापूर जिल्ह्यातील तृतीयपंथीयांकडून भाजीपाला विक्री, फळविक्री असेच व्यवसाय केले जातात. त्याचबरोबर बरेचसे तृतीयपंथीय शरीरविक्रय व्यवसाय करतात.

प्रत्येक तृतीयपंथीयांच्या समाजव्यवस्थेमध्ये प्रत्येकाला एक गुरू असतो. एका गुरूचे कितीही चेले असू शकतात. त्यांच्या समाजात गुरूला फार महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्यात एकमेकांशी वाद-विवाद असले तरी संकटसमयी ते क्षणात एकत्र येतात.

टाळ्या वाजवण्याची त्यांची एक लकब असते. तृतीयपंथीयांशी बोलताना प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे, ते रागावले, कुणाला भीती दाखवावयाची असेल तर ते टाळ्या वाजवतात. इतर समाजाचा समज असा आहे की, त्यांनी टाळ्या वाजवून शाप दिला तर त्यातून सुटका होत नाही, आपले अतोनात नुकसान होते. म्हणूनच ते म्हणतात की टाळ्या हेच आमचे हत्यार आहे. तृतीयपंथीयांवर झालेल्या अन्यायाची दखल समाजाकडून, शासकीय यंत्रणेकडून घेतली जात नाही. जर दखल घेतलीच तर ती गांभीर्याने हाताळली जात नाही. कोल्हापुरातील एका तृतीयपंथीयावर ॲसिड हल्ला झाला. आजही तो त्या जखमांचे व्रण आपल्या चेहऱ्यावर वागवत आहे. पंचतारांकित एमआयडीसी येथील लक्ष्मी टेकडीजवळ एका तृतीयपंथीयावर बलात्कार करण्यात आला. एका तृतीयपंथीयाकडील किमती हॅन्डसेट आणि रोकड जबरदस्तीने पळवली गेली. तथापि, त्यांनी न्याय मागितला नाही अथवा तक्रार दाखल केली नाही.

एका तृतीयपंथीयावर त्याच्या पत्नीने फसवून लग्न केल्याबद्दल दावा दाखल केला आहे. सध्या हा दावा न्यायप्रविष्ट आहे. कायद्याच्या अपुऱ्या ज्ञानामुळे आणि घरच्यांनी केलेल्या चुकीमुळे तो गोंधळलेल्या अवस्थेत आहे.

शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी त्यांच्याकडे तृतीयपंथीय असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्राची मागणी केली जाते. हे प्रमाणपत्र शासकीय रुग्णालयातून प्राप्त करणे आवश्यक असते. वैद्यकीय तपासणीत शुक्राणू आढळले तर असे प्रमाणपत्र मिळत नाही. त्यामुळे योजनांचा लाभ मिळण्यास ते अपात्र ठरतात.

एखाद्या लहान मुलाला जबरदस्तीने तृतीयपंथीय केले जाते अशी समाजाची धारणा आहे, पण अशी कोणतीही गोष्ट एकाही तृतीयपंथीयाच्या बाबतीत घडल्याचे कोणीही सांगितले नाही.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत होणाऱ्या मानसिक त्रासापेक्षा स्वत:च्या वाहनाने अथवा रिक्षाने फिरणे पसंत करतात. बऱ्याच तृतीयपंथीयांजवळ स्वत:ची मोपेडसारखी वाहने आहेत. त्यावरूनच ते प्रवास करत असतात.




**मानवी हक्क वैश्विक जाहीरनामा १९४८**

**कलम – १ :** सर्व मानवजात जन्मत: स्वतंत्र आणि व्यक्ती प्रतिष्ठा व हक्काच्या बाबतीत समान आहे.

**कलम – २ :** वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राजकीय अथवा इतर मत, राष्ट्रीय अथवा सामाजिक मूळ, मालमत्ता, जन्म अथवा इतर स्थान या आधारे भेदभाव केला जाणार नाही.

**कलम – ३ :** प्रत्येकाला जीवन, स्वातंत्र्य, व्यक्तिगत सुरक्षिततेचा अधिकार.

**कलम – ४ :** कोणत्याही व्यक्तीला गुलामगिरीत ठेवता येणार नाही.

**कलम – ५ :** कोणत्याही व्यक्तीचा छळ केला जाऊ नये अथवा कोणत्याही व्यक्तीला क्रूर, अमानवी अथवा अपमानास्पद वर्तणूक अथवा शिक्षा दिली जाऊ नये.

**कलम – ६ :** प्रत्येकाला कायद्यासमोर एक व्यक्ती म्हणून ओळख असण्याचा अधिकार आहे.

**कलम – ७ :** सर्व जण कायद्यापुढे समान असतील.

**कलम – १६ :** सुज्ञ स्त्री व पुरुषांना वंश, राष्ट्रीयत्व अथवा धर्म या आधारे कोणताही भेदभाव न करता विवाह करून स्वत:चे कुटुंब स्थापन करण्याचा अधिकार आहे.

**कलम – १७ :** प्रत्येकाला व्यक्तिगत व सामूहिकरीत्या मालमत्ता बाळगण्याचा अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीची मालमत्ता बेकायदेशीररीत्या हिरावून घेता येणार नाही.

**कलम – २३ :** प्रत्येक व्यक्तीला कामाचा, आपल्या इच्छेनुरूप रोजगार निवडीचा, कामाच्या ठिकाणी न्याय व अनुकूल परिस्थितीत असण्याचा आणि बेकारीपासून संरक्षणाचा हक्क आहे.

**कलम – २५ :** प्रत्येकाला स्वत:चे आणि आपल्या कुटुंबाचे आरोग्य व कल्याण साधण्यासाठी आवश्यक जीवनमान राखण्याचा अधिकार आहे. यात अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय सेवा आणि आवश्यक सामाजिक सेवांचा समावेश होतो.

याशिवाय प्रत्येकाला बेकारी, आजारपण, अपंगत्व, वैधव्य, वृद्धत्व किंवा आपल्या नियंत्रणापलीकडे असलेल्या परिस्थितीमुळे निर्वाह प्राप्त करणे अशक्य झाल्यास सुरक्षा मिळण्याचा हक्क आहे.

**तृतीयपंथीयांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन**

ना पुरुष ना स्त्री अशा तृतीयपंथीयांच्या मानवी हक्कांचे सर्वच क्षेत्रांत उल्लंघन होते. कायद्याने सर्व जण समान आहेत असे म्हटले तरी तृतीयपंथीयांना भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते. त्यांच्या अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजाही पूर्ण होत नाहीत. सुप्रीम कोर्टाने सर्व शाळा, महाविद्यालय, शासकीय व खाजगी फॉर्मवर लिंग या शब्दासमोर स्त्री / पुरुष / तृतीयपंथीय असा उल्लेख करून त्यांना नोकरी व शिक्षणामध्ये इतर मागासवर्गीयांना दिल्या जाणाऱ्या सवलती देण्यात याव्यात असा निर्णय दिलेला आहे. पण असा बदल केल्याचे आढळून येत नाही.

समलैंगिक संबंधावर सर्वोच्च न्यायालयाने भारतीय दंड विधानाचे ३७७ कलम रद्द केलेले आहे. परंतु विवाहाचे, मूल दत्तक घेण्याचे व मालमत्तेवरील हक्कासंबंधी कोणतेही विधान केलेले नाही. त्यामुळे राज्यघटना कायद्यासमोर सर्व जण समान आहेत, असे म्हणत असले तरी तृतीयपंथीय सर्व हक्कांपासून वंचित आहेत.

**(२) संशोधन आराखडा :**

१. **विषय निवडण्यामागची भूमिका** – गेली अनेक वर्षे मी देवदासी मुक्ती चळवळीत काम करीत आहे. सन १९९३ साली मा. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आणि मार्गदर्शनाखाली कोल्हापूर जिल्ह्यात देवदासींचे जे सर्वेक्षण झाले त्यामध्ये मी सहभागी होते. सर्वेक्षण फॉर्ममध्ये लिंग या शब्दासमोर केवळ स्त्री आणि पुरुष असे लिहिले होते. परंतु त्या वेळी अनेक असे पुरुष दिसले की ज्यांचे हावभाव, पोषाख, बांधा एखाद्या स्त्रीसारखा पण त्यांचा आवाज एखाद्या पुरुषासारखा, तेव्हा यांना कोणत्या प्रकारात समाविष्ट करावे असा प्रश्न उपस्थित झाला. त्यानंतरच्या काळात मी विविध तृतीयपंथीयांची निरीक्षणे केली. त्यांच्याशी स्नेहभाव जुळवला, त्यांना विश्वास दिला आणि हे करत असताना त्यांचे प्रश्न आणि समस्या समजावून घेतल्या. त्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्याने त्यासाठी काय करता येईल याचा विचार करत राहिले व त्यातूनच मानवी हक्कांपासून वंचित तृतीयपंथीय यावर अभ्यास करण्याची कल्पना सुचली. त्यामुळे या शोधनिबंधाला मूर्त स्वरूप आले आणि मानवी हक्कांपासून वंचित तृतीयपंथीय या शोधनिबंधाची निर्मिती झाली.

२. **उद्देश** –

(अ) तृतीयपंथीयांच्या जीवनपद्धतीचा अभ्यास करणे

(ब) तृतीयपंथीयांच्या सामाजिक व आर्थिक दर्जाचा विचार करणे

(क) तृतीयपंथीय मानवी हक्कांपासून कसे वंचित आहेत ते शोधणे

(ड) तृतीयपंथीयांना पालक, पोलीस, समाजातील सर्व स्तरांतील लोक कसे वागवतात याची पाहणी करणे

(इ) तृतीयपंथीयांचे पुनर्वसनासाठी शासनाच्या कोणत्या योजना, कायदे आहेत याचे मूल्यमापन करणे

(ई) तृतीयपंथीयांच्या मानवी हक्कांची जपवणूक व्हावी व माणूस म्हणून त्यांना जगता यावे यासाठी उपाययोजना करणे.

३. **शोधनिबंधाचे नाव** – कोल्हापूर शहरातील मानवी हक्कांपासून वंचित तृतीयपंथीयांचा अभ्यास

४. **संशोधनाची व्याप्ती** – कोल्हापूर शहरामधील अजूनही तृतीयपंथीयांची जनगणना झालेली नाही. त्यामुळे कोल्हापूर शहरातील वेगवेगळ्या तृतीयपंथीय समूहांचा, ओढ्यावरील श्री रेणुका मंदिरात असलेले तृतीयपंथीय आणि मैत्री या नावाने समजल्या गेलेल्या तृतीयपंथीयांच्या स्वयंसेवी संघटनेतील तृतीयपंथीय या सर्वांचा या अभ्यासामध्ये समावेश आहे. कोल्हापूर शहरात २७७ तृतीयपंथीय आहेत अशी माहिती तृतीयपंथीयांच्या मैत्री या संस्थेमधून मिळाली.

५. **संशोधनपद्धती** – वेळ, खर्च आणि संपर्क साधण्याच्या दृष्टीने येणाऱ्या अडचणी वाचवण्यासाठी कोल्हापूर शहरातील तृतीयपंथीयांचा नमुना सर्वेक्षण या पद्धतीने अभ्यास केला. अभ्यास करताना तृतीयपंथीयांचे सॅम्पल शास्त्रीय पद्धतीने काढण्यात आले. प्रथम सर्व तृतीयपंथीयांच्या नावाच्या चिठ्ठ्या करण्यात आल्या व त्या एका बॉक्समध्ये ठेवण्यात आल्या. एका तृतीयपंथीयाने पन्नास चिठ्ठ्या उचलल्या. त्या चिठ्ठ्यांवर ज्यांची नावे होती त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखत घेण्यापूर्वी पायलट स्टडीमध्ये बोलक्या व नेतृत्व असणाऱ्या चार-पाच तृतीयपंथीयांच्या मुलाखती घेऊन त्या आधारे मुलाखतीचे प्रश्न तयार करण्यात आले. त्या आधारे पन्नास तृतीयपंथीयांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या. जी माहिती प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे घेण्यात आली त्याचे सांख्यिकी वर्गीकरण करून निष्कर्ष मांडण्यात आले. त्या निष्कर्षांच्या आधारे तृतीयपंथीयांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी व तृतीयपंथीय मानवी

हक्कांपासून वंचित राहू नयेत यासाठी काही सूचनाही करण्यात आल्या. एकूणच हे संशोधन ॲप्लाईड आहे.

**(३) निष्कर्ष :**

१. बहुसंख्य तृतीयपंथीयांचे प्राथमिक शिक्षण झालेले आहे. केवळ २६% माध्यमिक शिक्षण, तर एकाचेही पदव्युत्तर शिक्षण झालेले नाही. १० पूर्ण निरक्षर असून आधुनिक काळात ही गंभीर बाब आहे.

२. बहुसंख्य तृतीयपंथीयांना घरामध्ये बंद करून मारहाण करणे, शिवीगाळ करणे, उपाशी ठेवणे, सातत्याने अपमानास्पद वागणूक देणे व सरतेशेवटी घराबाहेर काढून टाकले जाते. बहुसंख्य तृतीयपंथीयांचे शारीरिक व लैंगिक शोषण घरातील जवळचे नातेवाईक व आजूबाजूच्या लोकांकडून होते.

३. बहुसंख्य तृतीयपंथीयांना वयाच्या अठरापर्यंत घरातून बाहेर काढल्याने त्यांनी घर सोडलेले आहे. खरे तर या पौगंड अवस्थेत त्यांना प्रेम, काळजी, समुपदेशनाची गरज असते, त्याच वेळी ते घराचा सहवास व प्रेमापासून वंचित आहेत.

४. बहुसंख्य तृतीयपंथीय तरुण, म्हणजे १९ ते २८ या वयोगटातील आहेत. ३० नंतरच्या तृतीयपंथीयांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. याचाच अर्थ असा की तृतीयपंथीय वयाची पन्नाशी गाठू शकत नाहीत. यावरून असा निष्कर्ष निघतो की त्यांची वयोमर्यादा कमी आहे.

५. बहुसंख्य तृतीयपंथीयांना ते शरीराने स्त्री किंवा पुरुष असले तरी त्यांची स्वत:ची लिंगनिहाय ओळख वयाच्या १२ ते १४ पर्यंत समजली. याचाच अर्थ ते वयात येताना त्यांची खरी लिंगनिहाय ओळख त्यांना समजली.

६. बहुसंख्य तृतीयपंथीयांना तरुणपणीच घरातल्या भेदभाव वागणुकीमुळे घर सोडावे लागले. केवळ ४% तृतीयपंथीयांना घराने स्वीकारले.

७. तृतीयपंथीयांना प्रवास करताना मुख्यत: पोलिसांकडून व इतर प्रवाशांकडून त्रास-अडवणूक व चिडवणूक-चेष्टा यांना सामोरे जावे लागते. रेल्वेपेक्षा बसमध्ये बसण्यास प्रतिबंध केला जातो. तृतीयपंथीय एकटादुकटा असेल तर सर्वांकडून त्रास दिला जातो त्यामुळे ते सात-आठ लोकांच्या समूहाने फिरतात.

८. बहुसंख्य तृतीयपंथीयांचे चरितार्थाचे साधन धार्मिक रूढी परंपरांचे जतन, मेळ्यात नाचकाम, गोंधळ घालणे, देव आणणे, देव घालणे, नुकत्याच जन्मलेल्या बाळाला आशीर्वाद देणे, धंद्यात बरकत येण्यासाठी उपाय करणे याद्वारे त्यांना पैसे मिळतात. बहुसंख्य तृतीयपंथीय रात्री वेश्याव्यवसाय करतात, पण दिवसा भीक मागतात व छोटा-मोठा धंदा करतात. एकाही तृतीयपंथीयाला अद्यापही नोकरी मिळाली नाही.

९. सरकारी दवाखान्यात तृतीयपंथीयांना मोफत वैद्यकीय सुविधा मिळत असल्या तरी डॉक्टर, नर्सेस यांचेकडून भेदभावपूर्ण व दुय्यम दर्जाची वागणूक मिळते. त्यामुळे या सुविधा मोफत असल्या तरी ते तेथे जात नाहीत. आजारपणाच्या काळात गंडा-दोरा, मंत्रतंत्र अथवा मेडिकल स्टोअर्सचा आधार घेतला जातो. जे स्वत:च्या घरी राहतात ते खाजगी दवाखान्यातून वैद्यकीय सुविधेचा लाभ घेतात.

१०. बहुसंख्य तृतीयपंथीय सार्वजनिक स्वच्छतागृहांचा वापर करू शकत नाहीत, कारण पुरुषांच्या स्वच्छतागृहात गेल्यास त्यांचे लैंगिक शोषण होते. स्त्रियांच्या स्वच्छतागृहात गेल्यास त्यांना हाकलून दिले जाते त्यामुळे आडोसा बघून नैसर्गिक विधी करतात.

११. बहुसंख्य तृतीयपंथीयांना कोणीही घर भाड्याने देत नाही. भाडे जास्त असल्यामुळे ते घर भाड्याने घेऊ शकत नाहीत. त्यामुळे असे समदु:खी तृतीयपंथीय एकत्र समूहाने गुरूजवळ किंवा देवळात राहतात.

१२. बहुसंख्य तृतीयपंथीयांना कोणत्या ना कोणत्या प्रकारचे व्यसन आहे. त्यामध्ये स्वत:चे दु:ख विसरण्यासाठी स्वस्तातील हातभट्टीची दारू पिणे, गुटखा खाणे याची त्यांना जास्त सवय असते. बरेचसे तृतीयपंथीय संडासला जाण्यापूर्वी तंबाखुची मिश्री लावतात.

१३. बहुसंख्य तृतीयपंथीय खाजगी सावकारांकडून कर्ज काढतात. त्याचा उद्देश रोजचा चरितार्थ चालवणे हा असतो, पण मुख्यत: स्वत:च्या मृत्युनंतर आवश्यक धार्मिक विधी करण्यासाठी असतो. पुन्हा हा तृतीयपंथीयाचा जन्म वाट्याला येऊ नये म्हणून असा धार्मिक विधी केला जातो. यामध्ये जवळच्या देवदासी, जोगते, तृतीयपंथीय यांना कपडे, जेवण दिले जाते.

१४. बहुसंख्य तृतीयपंथीयांनी ऑपरेशन केलेले नाही. असे ऑपरेशन करून लिंगबदल करता येतो याबद्दल ते अनभिज्ञ आहेत. तसेच सदरचे ऑपरेशन हे खर्चिक असते आणि त्यासाठी कोणतीही शासकीय योजना अद्यापि अस्तित्वात नाही.

१५. बहुसंख्य तृतीयपंथीयांना लग्न करण्याची इच्छा आहे पण कोणाशी लग्न करावयाचे याविषयी साशंक आहेत, कारण समलैंगिक संबंध ठेवणे कायद्याने गुन्हा आहे व त्यासाठी शिक्षा आहे याची त्यांना जाणीव आहे. ३०% तृतीयपंथीयांना लग्न करावे वाटत नाही, कारण आपण एकटे स्वत:ला पोसू



शकत नाही तर बायकोला कोण पोसणार हा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहतो.

१६. बहुसंख्य तृतीयपंथीयांना महाराष्ट्र शासनाच्या कल्याणकारी बोर्डाविषयी माहिती आहे, पण त्याचे कार्य, योजना याबद्दल अनभिज्ञता आहे.

१७. २०% तृतीयपंथीय पुरुषांसारखेच विजार-शर्ट घालतात पण त्यांच्या चालण्याची ढब बायकी असते. ४५% पंचरंगी हे कधी पुरुषांसारखे विजार-शर्ट, लुंगी वापरतात, तर कधी ऊर्मी आली तर स्त्रियांसारखे साडी, दागदागिने, हेअर स्टाईल करतात. त्यामध्ये नटवेपणा डोकावतो. ४५% तृतीयपंथीय कायम साडीच नेसतात. जे वृद्ध आहेत ते नऊवारी लुगडे नेसतात तर तरुण सहावारी साडी नेसतात.

१८. बहुसंख्य तृतीयपंथीय हिंदूधर्मातील असून मुख्यत: अनुसूचित जाती-जमाती व भटक्या समाजातील आहेत. मुस्लिम, ख्रिश्चन धर्मातील तृतीयपंथीयांचे प्रमाण नगण्य आहे.

**(४) तृतीयपंथीयांचा अभ्यास करत असताना काही निरीक्षणे आढळली ती खालीलप्रमाणे :**

१. काही तृतीयपंथीयांमध्ये लिंग सदृश दोष आढळतो. तर काही तृतीयपंथीयांचे समाजीकरण लिंगाने पुरुष असले तरी स्त्रीमध्ये व लिंगाने स्त्री असले तरी समाजीकरण पुरुषांच्यात झाल्यामुळे मोठेपणी दोष आढळतात. संप्रेरकांचे असंतुलन हेही तृतीयपंथीय होण्यास कारणीभूत आहेत.

२. तृतीयपंथीयांची एक सांकेतिक भाषा आहे. ती सर्वसामान्यांना न समजण्यासारखी आहे.

३. समाजाने झिडकारल्यामुळे आणि असुरक्षिततेच्या भावनेमुळे तृतीयपंथीय प्रामुख्याने समूहाने राहणे पसंत करतात.

४. समाजातील काही घटक अंधश्रद्धेपोटी जे धार्मिक विधी करतात त्यामध्ये या तृतीयपंथीयांना एका पौरोहित्याइतका मान दिला जातो, पण इतर वेळी त्यांना पूर्णपणे झिडकारले जाते.

५. समलैंगिक संबंधामुळे बरेचसे तृतीयपंथीय एड्सचे बळी ठरलेले आहेत.

६. तृतीयपंथीयांच्या शिव्या, शाप यामुळे प्रचंड नुकसान होते अशी समाजाची गैरसमजूत आहे. त्यामुळे समाजातील लोक त्यांच्यापासून चार हात दूर राहणेच पसंत करतात.

७. भीक मागताना अथवा इतर कारणांसाठी तृतीयपंथीय एक प्रकारच्या टाळ्या वाजवतात. टाळ्या वाजवण्याच्या ह्या क्रियेमुळे हृदयरोगापासून ते मुक्त असतात असा एक समज प्रचलित आहे.

८. तृतीयपंथीयाच्या मृत्युनंतर इतर तृतीयपंथीय प्रेताला चपलाने मारतात इतरांना प्रेताला शिवू देत नाहीत. मयत झालेल्या तृतीयपंथीयाचे विधी रात्रीच गोपनीय पद्धतीने करतात असा समज प्रचलित आहे, पण हे पूर्णपणे खोटे आहे.

९. तृतीयपंथीयांच्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान हे गुरूला आहे.

१०. तृतीयपंथीय आपले घर सोडल्यानंतर नाव बदलतात.

११. तृतीयपंथीय आपल्या गुरूचे आडनाव लावतात. सध्या जे आधारकार्ड अस्तित्वात आहे त्यावर गुरूचे आडनाव आढळून आले.

१२. भिक्षा मागून अथवा अन्य प्रकारे मिळालेले पैसे गुरूकडे प्रामाणिकपणे सुपूर्त केले जातात. सर्वांचे जेवणखाण, राहणे हे सर्व या पैशांमधून गुरूकडून केले जाते.

१३. गुरूबरोबर ज्या घरात तृतीयपंथीय राहतात त्याला दयार असे म्हणतात.

१४. नवीन तृतीयपंथीय जर त्यांच्यात सामील होण्यासाठी आला तर त्याला ३० दिवस एकट्याला खोलीत ठेवले जाते. ही एक प्रकारे त्याची परीक्षाच असते.

१५. दयारमध्ये असलेल्या भांडी-कुंडी आणि इतर वस्तूंची कधीच वाटणी केली जात नाही.

१६. तृतीयपंथीय हलक्या दर्जाची प्रसाधने वापरतात त्यामुळे त्यांना बऱ्याच वेळा त्वचारोगाला सामोरे जावे लागते.

१७. तृतीयपंथीयांवर होणाऱ्या अन्यायाची दखल पोलीस किंवा प्रशासनाकडून घेतली जात नाही.

१८. तृतीयपंथीयांना नोकरीत सामावून घेतले जात नाही. एखाद्याने स्वतंत्र व्यवसाय सुरू केला तर त्याचे लैंगिक शोषण केले जाते.

१९. बहुसंख्य तृतीयपंथीय वेश्याव्यवसाय करतात, पण स्पष्टपणे तसे कबूल करत नाहीत.

२०. तृतीयपंथीयांच्या जवळ स्वत:ची वाहने आहेत.

२१. मा. सर्वोच्च न्यायालयाने निरनिराळ्या संस्था, विद्यापीठे, नोकरीची आवेदन पत्रे यामध्ये नमूद असलेल्या रकान्यात स्त्री, पुरुष याबरोबर तृतीयपंथीय असा उल्लेख करण्याचे आदेश दिले आहेत. तथापि अंमलबजावणी झालेली नाही.

२२. तृतीयपंथीयांचा समावेश इतर मागासवर्गीय प्रवर्गात केला असून त्यांना इतर मागासवर्गीयांना मिळणाऱ्या सवलतींचा लाभ घेता येतो. तथापि असा लाभार्थी आढळून येत नाही.

२३. भारतीय दंड विधान कलम ३७७ नुसार समलिंगी संबंध हा दखलपात्र गुन्हा आहे. हे कलम नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले आहे. तृतीयपंथीयांमध्ये समाधानाची भावना आहे, पण समलिंगी लग्न करू शकत नाहीत, बाळ दत्तक घेऊ शकत नाहीत याविषयी खंत आहे.

२४. निरीक्षण - १. महाराष्ट्र शासनाच्या संजय गांधी, श्रावणबाळ, म. फुले आरोग्य, पूरक पोषण आहार, अंत्योदय इत्यादी योजनांचा लाभ तृतीयपंथीयांना मिळत नाही.
कोल्हापुरातील फक्त एका वृद्ध तृतीयपंथीयाला शासनाच्या श्रावणबाळ योजनेचा लाभ मिळाला आहे.

**(५) तृतीयपंथीयांचे प्रश्न सोडवण्यासाठीच्या उपाययोजना :**

१. तृतीयपंथीयांना आपण तृतीयपंथीय आहोत हे सिद्ध करण्याची गरज लागू नये यासाठी प्रत्येक जिल्ह्यात मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सर्वांगीण अभ्यास करणारे (आर्थिक, सामाजिक, भावनिक, शारीरिक) सर्वेक्षण करावे. तृतीयपंथीयांना त्यांच्या फोटोसह विशिष्ट रंगाचे ओळखपत्र द्यावे.

२. तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, स्नानगृहे शासनाने किंवा सामाजिक संस्थांनी सीएसआर फंडाकडून बांधावीत आणि त्यावर फक्त तृतीयपंथीयांसाठी असा स्पष्ट उल्लेख करावा.

३. कुटुंब, समाज बहिष्कृत तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र निवारागृहे व वृद्धाश्रम बांधावेत.

४. पौगंडावस्थेत तृतीयपंथीयांचे घरातील पालकांबरोबर संबंध बिघडतात, अशा वेळी तृतीयपंथीय व त्यांचे पालक यांचेसाठी स्वतंत्र समुपदेशन केंद्र असावे. यात मानसोपचार तज्ज्ञ, प्रशिक्षित समाजकार्यकर्ते, संप्रेरकांसाठी संबंधित वैद्यकीय तज्ज्ञ यांचा समावेश असावा.

५. सर्व सरकारी दवाखान्यांमध्ये तृतीयपंथीयांना मोफत वैद्यकीय सेवा पुरवावी. त्यापूर्वी दवाखान्यांशी संबंधित कर्मचारी व डॉक्टर यांना तृतीयपंथीयांविषयी व त्यांच्या समस्येविषयी संवेदनक्षम बनवावे.

६. पोलीस दल व समाजाच्या सर्व स्तरांतील वर्गातील शाळा कॉलेज विद्यार्थ्यांसाठी तृतीयपंथीय म्हणजे आहे तरी कोण, ते तसे का आहेत, त्यांच्या समस्या याविषयी प्रबोधन करावे.

७. नालसा जजमेंटची अंमलबजावणी त्वरित व्हावी. यामध्ये प्रत्येक राज्याने तृतीयपंथीयांना आधार कार्ड, ज्यावर लिंग या रकान्यात तृतीयपंथीय असा स्पष्ट उल्लेख असलेले द्यावे. निवडणूक ओळखपत्रावर तृतीयपंथीय असा स्पष्ट उल्लेख असावा. महाराष्ट्रामध्ये संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, म. फुले आरोग्य योजना, पूरक पोषण आहार योजना, शिधापत्रक, ओळखपत्र या सर्व योजनांचा तृतीयपंथीयांना लाभ द्यावा असा निर्णय झालेला आहे.
लोकसभेमध्ये तृतीयपंथीयांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी जे विधेयक मांडले गेलेले आहे त्याचा प्रसारमाध्यमाद्वारे प्रचार होऊन समाजामध्ये त्यावर साधक बाधक चर्चा व्हावी.

८. देवदासी म्हणजे स्त्री-पुरुष तृतीयपंथीय अशी व्याख्या शासनाने स्वीकारलेली असली तरी महिला व बालविकास विभागामार्फत देवदासी पेन्शन योजनेचा लाभ केवळ स्त्री देवदासींनाच मिळतो, तो तृतीयपंथीयांना मिळणे गरजेचे आहे.

९. तृतीयपंथीय म्हणजे कोण? याची शास्त्रीय व्याख्या शासनाने या क्षेत्रात कार्य करणारे कार्यकर्ते, वैद्यकीय तज्ज्ञ, समुपदेशक, समाजशास्त्र व मानसशास्त्रज्ञ यांच्या सहकार्याने करावी व राज्य आणि केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत तृतीयपंथीयांच्या पुनर्वसनासाठी विशेष योजना तयार केली जावी.

१०. नवीन योजना तयार करून अमलात आणणे अवघड व वेळखाऊ असल्याने सद्यस्थितीत शासनाच्या विशेष सहाय्य विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या संजय गांधी निराधार अनुदान योजना, इंदिरा गांधी भूमिहीन शेतमजूर योजना व वृद्धांसाठी असणाऱ्या श्रावणबाळ योजनेचा लाभ तृतीयपंथीयांनाही मिळावा.

११. तृतीयपंथीय हा माणूस आहे तेव्हा त्याच्या मानवी हक्कांची जोपासना होईल व त्याच्या मानवी हक्कांचे कोठेही उल्लंघन होणार नाही याची दक्षता सर्वच स्तरांवर (शासकीय कार्यालय, दवाखाने, शिक्षण क्षेत्र व इतर) होणे आवश्यक आहे. तसे प्रबोधन प्रसारमाध्यमे, मीडिया, नाटक, सिनेमा, दूरदर्शन, बोधवाक्य, पोस्टर्स व शासनाद्वारे विविध पातळ्यांवर करणे आवश्यक आहे.

१२. तृतीयपंथीयांच्या गरजा, समस्या, त्यांचे होणारे लैंगिक शोषण या आधारे शासन व स्वयंसेवी संस्थेमार्फत एड्स जनजागृती कार्यक्रम राबवणे आवश्यक आहे. तसेच एड्स समुपदेशन हस्तक्षेप प्रकल्प राबवण्याची नितांत आवश्यकता आहे.

१३. तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण करणारा केंद्रीय कायदा होण्याची आवश्यकता असून त्यामुळे माणूसपणाच्या परिघाबाहेर असलेल्या तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदत होईल.

१४. तृतीयपंथीय म्हणजे कोण? त्यांचे शारीरिक, मानसिक, भावनिक, आर्थिक, लैंगिक प्रश्न काय आहेत, त्यांचा समाजातील दर्जा, त्यांची जीवनपद्धती यावर प्रकाशझोत टाकणारे सर्वेक्षण महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये आवश्यक आहे. त्यामुळे किमान महाराष्ट्रामध्ये तृतीयपंथीयांची संख्या, जीवनमान यावर प्रकाशझोत टाकता येईल.

१५. तृतीयपंथीयांमध्ये जे शारीरिक दोष आहेत ते निर्माण होऊ नयेत यासाठी काय दक्षता घेतली पाहिजे याविषयी समाजाचे प्रबोधन (गरोदरपणी सोनोग्राफीद्वारे तपासणे, हार्मोन्सच्या गोळ्या घेणे इत्यादी) किंवा असे दोष निर्माण झाल्यास ते काढण्यासाठी किंवा त्यांची तीव्रता कमी करण्यासाठी कोणते उपाय आहेत याविषयी जनजागृती आवश्यक आहे.

१६. लिंगबदल करण्यासाठी काही ऑपरेशन असतील तर ती कोठे, कशी सहजसुलभ केली जातात व कमीत कमी पैशामध्ये ती कशी करता येईल याविषयी समाजाचे प्रबोधन आवश्यक आहे. शासनाच्या महात्मा फुले आरोग्य योजनेअंतर्गत या ऑपरेशनचा समावेश करावा.

१७. समुपदेशनाने व्यक्तिमत्त्वातील दोष काढता येतील याविषयी जनजागृतीबरोबरच अशी समुपदेशन केंद्रे स्वयंसेवी संस्थेमार्फत अल्पमोबदला घेऊन चालू करावीत व अशा समुपदेशन केंद्राला शासनाची मान्यता व आर्थिक मदत मिळावी.

१८. शारीरिक दोष निर्माण होऊ नयेत यासाठी वैद्यकीय पातळीवर संशोधनाची आवश्यकता व त्यास प्रोत्साहन आवश्यक.

१९. तृतीयपंथीयदेखील माणूसच आहे व त्यास माणूस म्हणूनच पाहणे व इतर सामान्य माणसांशी आपण जसे वागतो तशाच प्रकारे वागण्याची समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असून 'जगा व जगू द्या' हा संदेश प्रसारमाध्यमांद्वारे कुटुंबामध्ये, शाळेमध्ये सामाजिकीकरणाद्वारे जाणे आवश्यक आहे.

२०. एकूणच तृतीयपंथीयांच्या मानवी हक्कांचे पालन होण्यासाठी कायदा, योजना, समाजाची मानसिकता बदलणे जसे आवश्यक आहे तसेच केवळ कायदा करून चालणार नाही तर कायद्याला व तृतीयपंथीयांना माणूस म्हणूनही समाजमान्यता मिळणे अत्यंत आवश्यक आहे.


तृतीयपंथीयांचे मानवी हक्क संरक्षण व्हावे यासाठी सदर विधेयक लोकसभेत मांडण्यात आले होते.

**(७) प्रश्नावली :**

१. संपूर्ण नाव -
२. आपले वय -
३. आपली जात आणि धर्म -
४. आपण विवाहित आहात की अविवाहित?
५. आपले शिक्षण काय झाले?
६. आपण एकत्रित कुटुंब पद्धतीतील की विभक्त कुटुंब पद्धतीमधील आहात?
७. आपणास कुटुंबात कशी वागणूक मिळते?
८. आपण घर कधी सोडलेत?
९. आपण तृतीयपंथीय आहोत किंवा आपणास लिंगाची ओळख कधी झाली?
१०. आपणास प्रवासामध्ये कोण-कोणत्या अडचणी येतात?
११. आपल्या उपजीविकेचे साधन काय आहे?
१२. आपण वैद्यकीय सुविधा कोठून घेता?
१३. सार्वजनिक ठिकाणी आपण कोणत्या स्वच्छतागृहाचा वापर करता? (स्त्री / पुरुष)
१४. आपण कोठे राहता?
१५. आपणास घर भाड्याने उपलब्ध होऊ शकते का?
१६. आपणास व्यसन आहे का? असल्यास ते कोणते?
१७. आपण कोणाकडून कर्ज घेतले आहे का?
१८. आपण लिंगबदल शस्त्रक्रिया करून घेतली आहे का? कोठे केले आहे?
१९. अशा शस्त्रक्रियेसाठी किती खर्च आला?
२०. कौटुंबिक मालमत्तेत वाटा दिला आहे का?
२१. आपणास विवाह करण्याची इच्छा आहे का?
२२. शासनाच्या कल्याणकारी बोर्डाविषयी माहिती आहे का?
२३. आपण तृतीयपंथीयांच्या कोणत्या प्रकारात मोडता?
२४. आपल्या पुनर्वसनासाठी कोणते उपाय योजावेत असे आपणास वाटते?
२५. मानवी हक्कांपासून आपण वंचित आहोत असे आपणास वाटते का?



The Unique
SPORTS SHORT FILM FESTIVAL
(SSFF-21)
SPORTSINDI PRESENTS
SPORTS iNDI
The Online Sports Hub
World's first Sports Short Film Festival of its kind.
Best Wishes From SSFF
Shooting Sports...
Get set...
Go...!
LIGHTS
CAMERA
SPORTS
It's a "Festival Of Lights"
Days Of Diwali.
It's Time To Dress Up Folks,
Adorn The Thali.
AND
The Best Muhurta to
Shoot a Short Film
Shooting Sports
Get
Set
Go...
-: Entries :-
Up to
2nd Nov. 2021
"Let's come together to make the sports ecosystem a grand success!"
https://
REGISTER NOW
www.sportsshortfilmfest.com
FOR MORE ENQUIRY
www.sportsindi.com



# ‘ट्रान्स’ मनोविश्लेषण

**जमीर कांबळे**
**सल्लागार, मिळून साऱ्याजणी**

जागतिक राजकारणाला व चळवळींना आज ‘ट्रान्स मनोविश्लेषणाची’ नितांत गरज आहे. यामध्ये ट्रान्सजेंडर व्यक्तींचे मनोविश्लेषण नव्हे तर ‘मनोविश्लेषण’ नावाच्या ज्ञानशाखेचेच ‘ट्रान्सजेंडरीय’ परिवर्तन अपेक्षित आहे. त्याआधी दोन महत्त्वाचे प्रसंग सांगतो. पहिला प्रसंग तृतीयपंथी समुदायाच्या अनुभवविश्वात सातत्याने घडणारा, रस्त्यावर अनेक ठिकाणी, ट्रेन किंवा दुकानांमध्ये भीक मागणाऱ्या तृतीयपंथी व्यक्तींनी अनेकदा भीक मागणाऱ्या ‘बोगस’ तृतीयपंथी व्यक्तींना कधी मारहाण केली आहे, कधी त्यांना ‘परकर वर करून लिंग दाखव’ असे आवाहन केले आहे, तर कधी याच्या विरोधात सरकारकडेही दाद मागितली आहे.

दुसरा प्रसंग म्हणजे सरकारने नुकतेच ‘तृतीयपंथी व्यक्तींना ओळखपत्र देऊ!’ अशी घोषणा केल्याचा प्रसंग. ओळखपत्र देण्यासाठी एका व्यक्तीची ‘बोगस’ नाही तर ‘खरी’, ‘अस्सल’ ओळख सरकारला पटावी लागते. तृतीयपंथी व्यक्तींच्या संदर्भात एक तर ‘शिश्न छाटलेला असणे’ याचा वैद्यकीय पुरावा किंवा ‘शिश्न छाटलेले नसेल’ तर मानसोपचार तज्ज्ञाकडून ‘मानसिक’ पातळीवर शहानिशा करून मिळवलेला पुरावा असा आधार घेतला जाईल अशी कायदेशीर तरतूद केली आहे. नुकतेच अनेक तृतीयपंथी व्यक्तींनी मानसोपचार तज्ज्ञाच्या या तरतुदीविरोधात आवाज उठवला आहे. ‘विषमलिंगी स्त्री-पुरुष स्वत:चे लिंग पटवून देण्यासाठी कधी मानसशास्त्रीय पुरावा देतात का?’ असा सवाल त्यांनी केला.

मला हे दोन्ही प्रसंग आपल्या संविधानामध्येच ‘ओळख’ (identity) या नावाचा आणि त्याच्या व्याख्येचा नव्याने विचार करण्यासाठी एक महत्त्वाची संधी वाटतात. ही संधी आपण दुर्लक्षित करू नये असे वाटते.

‘ट्रान्सजेंडर’ समुदाय म्हटले की आपल्याला केवळ तृतीयपंथी समाज आठवतो. परंतु ट्रान्सजेंडर या नावामध्ये अनेक व्यक्ती येऊ शकतात. शरीरात शिश्न (penis) किंवा योनी (vagina) असली की माणसांना जन्माच्या वेळीच ‘पुरुष’ किंवा ‘स्त्री’ अशी वैद्यकीय ओळख मिळते. परंतु मला शिश्न असूनही मला माझी ओळख निराळी पटू शकते - म्हणजे मी स्त्री आहे, मला स्त्रियांसारखी शिश्नाच्या जागी योनी असावी, मलाही स्तन असावेत, माझ्या भावनाही स्त्रियांच्या आहेत, स्त्रियांसारखेच मी लैंगिक आणि भावनिक नात्याने केवळ पुरुषांकडेच आकर्षित होतो आणि म्हणून लोकांनी मला ‘पुरुष’ आणि ‘तो’ या नावांनी संबोधू नये असे कळू (वाटू) लागते.

तसेच मला योनी असेल आणि मला ‘स्त्री’ अशी ओळख मिळाली असेल तर मला माझी ओळख निराळी पटू शकते. म्हणजे मी पुरुष आहे, मला पुरुषांसारखे योनीच्या जागी शिश्न असावे, स्तनांच्या जागी केवळ छाती असावी, मला भावनाही पुरुषांच्या आहेत. पुरुषांसारखेच मी लैंगिक आणि भावनिक नात्याने केवळ स्त्रियांकडेच आकर्षित होतो आणि म्हणून लोकांनी मला ‘स्त्री’ आणि ‘ती’ या नावांनी संबोधू नये असे कळू (वाटू) लागते.

आपल्याला वैद्यकीय पुराव्यांनिशी मिळालेली लैंगिक ओळख आणि आपल्याला वाटणारी, भावलेली लैंगिक ओळख यांच्यात होणाऱ्या या संघर्षाला Gender Trouble म्हणतात. इतिहास आणि वर्तमान दोन्ही पाहिले, तर ‘लिंगबदल’ करण्यासाठी अशा व्यक्ती अनेक मार्ग अवलंबतात आणि त्यानुसार आज त्यांचे वर्गीकरणही होते.

**१. पहिला प्रकार : Crossdresser**

काही व्यक्ती केवळ पोशाख बदलतात. पुरुषाने स्त्रियांचे कपडे, उदाहरणार्थ, साडी नेसली की त्याला Crossdresser हे नाव मिळते. स्त्रियांनी पुरुषांचे कपडे घातले की त्यांना आपण असे नाव देत नाही त्याचे कारण हे आहे की पुरुषसत्ताक समाजाची व संस्कृतीची पुरुषाच्या 'पौरुष्या'वर मोठी आर्थिक गुंतवणूक असते. पुरुषाने स्त्रीचे कपडे घातले की ही आर्थिक गुंतवणूक जास्त धोक्यात येत असते.

**२. दुसरा प्रकार : तृतीयपंथी**

पुरुष म्हणून जन्मलेल्या, मात्र स्त्रियांसारखे वागणाऱ्या अनेक व्यक्तींना घरच्यांचा विरोध आणि जाचाला कंटाळून घर सोडावे लागते. त्यातील काही जण इतर ठिकाणी तृतीयपंथी समाज शोधतात, तर कधी घरचेच लहानपणीच आपल्या मुलाला या समाजाला सुपूर्त करतात. 'तृतीयपंथी' हे केवळ नाव नाही, तर स्वत:ची अशी स्वतंत्र संरचना असलेला एक समाज आहे. या समाजाचा भाग व्हायचे म्हटल्यावर या संरचनेने आखून दिलेले जगण्याचे नियम पाळावे लागतात. हे नियम परंपरेने चालत आलेले आणि जपले गेलेले आहेत. 'निर्वाणी' हा या समाजातील अत्यंत महत्त्वाचा नियम ज्याच्या साहाय्याने एका व्यक्तीची या समाजामध्ये 'तृतीयपंथी' म्हणून ओळख ठरते. हा शब्द शरीरातील शिश्नाला विलग करण्याच्या प्रक्रियेसाठी वापरला जाणारा सांस्कृतिक, धार्मिक आणि आध्यात्मिक शब्द आहे. निर्वाणी करण्याचे अनेक मार्ग दिसतात - परंपरेतून चालत आलेली विनासर्जरीची, वैद्यकीयदृष्ट्या अवघड आणि जिवाला धोकादायक अशी प्रथा आणि वर्तमानात तयार झालेली वैद्यकीय सर्जरीची कमी धोकादायक पद्धत.

समुदायाच्या आत अनेक तृतीयपंथी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती सामील होतात तेव्हा त्यांची समुदायामध्ये उतरंडीनुसार जागा ठरते. इथे निरनिराळे गट तयार केले जातात. या गटाचे शहरामध्ये एकच केंद्र ('दयार') असते. तिथे या सर्व गटांचा मुख्य गुरू असतो त्याला नायक म्हणतात. नायकाच्या खालोखाल अनेक गट असतात. या गटांचा स्वतंत्र गुरू असतो. यातील इतरांना गुरूचे 'चेले' असे म्हणतात. चेल्यांनी पैसे कमवून आणायचे आणि त्यातील काही 'हिस्सा' गुरूला द्यायचा. त्या पैशातून गुरूने गट चालवायचा आणि त्यातील काही भाग नायकाला द्यायचा. गटामध्ये चेले एकमेकांना 'गुरूभाऊ' म्हणतात आणि बहीण, आई, अम्मा, नानी अशी अनेक नातेसंबंध अधोरेखित करणारी 'कौटुंबिक' नावेही वापरतात. शेवटी हा एक केवळ आर्थिक व्यवस्था असलेला समाज नसून घर सुटलेल्या अनाथ व्यक्तींच्या एकमेकांसाठीच्या प्रेमातून तयार झालेला कौटुंबिक समुदायच आहे.

समाजामध्ये जिवंत राहण्यासाठी व उदरभरणासाठी लग्न व बारसे अशा समारंभामध्ये नाचणे, गाणे, आशीर्वाद देणे, रस्त्यावर, दुकानांमध्ये आणि ट्रेनमध्ये भीक मागणे, वेश्याव्यवसाय करणे इत्यादी अशीच कामे त्यांनी नेमून ठेवली आहेत. शिक्षण नाही म्हणून आणि जिथे शिक्षणाची गरज नसते तिथेही कोणी साडीतल्या पुरुषाला नोकरी देत नाही. अशा परिस्थितीमध्ये या समुदायाने त्यांना उपलब्ध झालेल्या कामांचे व्यवस्थापन केले. समुदायातील लोकांची एक उतरंड व तिचे नियम तयार केले. कोणत्याही राजकीय चळवळीची मदत न घेता या पितृसत्ताक आणि स्त्री-पुरुष या दोनच लिंगांच्या चष्म्यातून जग पाहणाऱ्या समाजामध्ये स्वत:ची वंचित, दुर्लक्षित असली तरी एक भक्कम जागा तयार केली. तिला इतिहास, परंपरा, संरचना आणि संस्कृती असे सगळेच आहे. म्हणून आपण त्याला 'समाज' म्हणतो.

**३. तिसरा प्रकार : फीमेल टू मेल ट्रान्सजेंडर**

'ट्रान्सजेंडर' या नावामध्ये जन्माने 'स्त्री' अशी ओळख मिळालेल्या आणि नंतर मात्र स्वत:ची 'पुरुष' अशी ओळख बनवू पाहणाऱ्या व्यक्तीही येतात. भारतामध्ये आजतागायत अशा 'फीमेल टू मेल' ट्रान्सजेंडर व्यक्तींची समाजाने, इतिहासाने, संस्कृतीने व अगदी राजकीय चळवळींनीही फारशी काय जवळजवळ दखलच घेतलेली नाही असा माझा दावा आहे. जसे एलजीबीटी चळवळीमध्ये तृतीयपंथी पुरुष बराच काळ दुर्लक्षिले गेले तसेच भारतातील 'ट्रान्सजेंडर' चळवळीमध्ये 'फीमेल टू मेल' ट्रान्सजेंडर व्यक्तीबद्दल फारसे बोलले जात नाही हेही आता लक्षात घेणे खूप गरजेचे आहे.

**४. चौथा प्रकार : कोती**

अजून एक संख्येने खूप मोठा आणि वर्गीकरणासाठी अत्यंत जटिल असा गट आहे. हा गट स्वत:चे 'कोती' या नावाने संबोधन करतो. अनेक व्यक्ती ज्या घराबाहेर पडत नाहीत किंवा घराबाहेर पडल्या तरी तृतीयपंथी समाजामध्ये दाखल होत नाहीत आणि तृतीयपंथी समुदायात दाखल झाल्या तरी त्या निर्वाणी करत नाहीत. कोत्या स्वत:ला 'मनाने' बाई मानतात. बायकांसारखे बोलतात, चालतात, वागतात. कधी बायकांचे कपडे घालतात परंतु तृतीयपंथी समुदायाचे नसतात. हा एक लैंगिक ओळख या विषयाचीच गुंतागुंत दाखवणारा गट आहे. काही तृतीयपंथी म्हणतील की कोती आणि तृतीयपंथी यांमधला फरक हा 'निर्वाणीच्या' म्हणजे 'सर्जरी'च्या आधारावर ठरवता येऊ शकतो. परंतु आधीच सांगितल्याप्रमाणे तृतीयपंथी समुदायात राहूनसुद्धा अनेक व्यक्ती आयुष्यभर निर्वाणी करत

नाहीत किंवा अनेक कारणांमुळे करूही शकत नाहीत. वर तृतीयपंथी समुदायातसुद्धा काही जण एकमेकींना 'कोती'ही म्हणतात.

**वर्गीकरणाचे Gender Trouble :**

ट्रान्सजेंडर व्यक्तींची व्याख्या 'लिंग' या निकषाच्या आधारावरही केली जाते. म्हणजे समलैंगिक आणि उभयलिंगी व्यक्ती यांची ओळख केवळ त्यांचा 'लैंगिक कल' या आधारावर ठरते. तुम्हाला एक प्रकारचे लिंग असून तुम्ही कोणाकडे म्हणजे आपल्याविरुद्ध की आपल्यासारख्या लिंगाच्या व्यक्तीकडे आकर्षित होता याला 'लैंगिक कल' असे म्हटले जाते. तसेच ट्रान्सजेंडर ओळख मात्र शरीरातील 'असलेल्या', 'छाटलेल्या', 'बदललेल्या' लिंगाच्या आधारावर ठरते. थोडक्यात, इथे दोन निकष तयार होतात - 'लिंगभाव' (gender) आणि 'लैंगिक कल'(sexual orientation). हे वर्गीकरण चुकीचे आहे असा माझा दावा आहे कारण समलिंगी, कोती आणि तृतीयपंथी यांची लैंगिक ओळख तयार होताना 'लिंगभाव' आणि 'लैंगिक कल' हे दोन्ही निकष काम करत असतात.

कोत्यांचे विश्व पाहता 'कोती' ही स्वत:ला बाई समजते म्हणून ती समाजामध्ये तयार झालेल्या बाई या सर्व प्रतिमांतून (सोयीनुसार!) आपली प्रतिमा निवडत असते. कधी साडी नेसून, छान नीटनेटका मेकअप करणारी बाई, कधी शोषिक स्त्री, कधी सुंदर स्वयंपाक करणारी अन्नपूर्णा, कधी नवरा म्हणजे पंतीचे ऐकणारी, त्याचे सर्व शोषण 'सहन' करणारी बाई, कधी स्वत:चे शील जपणारी, एकाच पंतीवर प्रेम करणारी 'घरंदाज'बाई, कधी समाजाचे लिंगभावाचे नियम झुगारणारी, पंतींच्या पितृसत्ताक अपेक्षांना न जुमानणारी आधुनिक स्त्रीवादी बाई तर कधी सामाजिक व्यभिचाराचे नियम फाट्यावर टाकून अनेक पुरुषांच्या प्रेमात पडणारी, अनेक पुरुषांसोबत संभोग करणारी बाई! या सर्व प्रतिमांना कोत्या स्वत:च एकमेकींना अनेक नावे वापरून चिडवतात; उदाहरणार्थ, छान मेकअप करणारी कोती स्वत:ला एखादी सिनेतारका म्हणून चिडवते, हे चिडवणे जितके विनोदी तितकेच चपखल आणि पितृसत्ताक प्रतिमांचे पितळ उघडे पडणारे!

कोती व पंती बहुतांशी सगळेच पितृसत्ताक 'पुरुष' वा 'बाई'ची प्रतिमा जगत असतात व त्यांचेच अनुकरण करत असतात. वरील उदाहरणे पाहता आपण 'लिंगभाव' आणि 'लैंगिक कल' असा फरक किंवा असे वर्गीकरण करू शकत नाही असे समजते. म्हणून सगळ्या ओळखींच्या मुळाशी असलेल्या 'लिंगभाव' या निकषाकडे लक्षपूर्वक पाहू या.

**प्राकृतिक - अप्राकृतिक - सामाजिक :**

लिंगभाव हा आपल्या जैविक लिंगामध्ये नसून आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय नेणीवेत आहे. म्हणून आपली प्रत्येक ओळख ही प्राकृतिक नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीयच असते हे ध्यानात घेतले पाहिजे. इथे पुन्हा एका 'समलिंगी ओळख प्राकृतिक असते की अप्राकृतिक' या वादाची आठवण करून द्यावीशी वाटते. हा वाद जगभरात घडला आणि आजही पुन्हा पुन्हा वर येतो. समलिंगी ओळख ही अप्राकृतिक वाटते. लैंगिकता ही विषमलिंगीच असते किंवा असली पाहिजे असे दावे केले जातात. लैंगिकतेच्या या चौकटीतून पाहता समलिंगी, उभयलिंगी, ट्रान्सजेंडर, तृतीयपंथी अशी सर्वच माणसे 'विकृत', 'अप्राकृतिक' म्हणून हिणवली जातात.

फ्रॉइडला एकदा कोणीतरी विचारले, 'विषमलिंगी आणि समलिंगी संभोग यांच्यातले नाते प्राकृतिक-अप्राकृतिक असेच आहे ना?' त्यावर फ्रॉइड म्हणतो, 'विषमलिंगी आणि समलिंगी संभोग यांच्यातले नाते एकच, ते दोघेही अप्राकृतिकच असतात.'

एलजीबीटी चळवळीमध्ये नेहमी 'समलिंगी संभोग' हा प्राकृतिक असतो, विषमलिंगी संभोगासारखाच असतो असा वाद केला गेला. महाराष्ट्रातही चळवळीच्या प्राईड परेडमध्ये कित्येकदा 'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आणि आमचं सेम असतं' हे मंगेश पाडगावकरांच्या कवितेतील वाक्य घोषणा म्हणून वापरले गेलेय. अगदी समलिंगी लोकांच्या विरोधातला भारतीय कायदा कलम ३७७, याच्या विरोधात केलेले स्पष्टीकरण याच 'सारखेपणाच्या' आधारावर दिले गेले होते. त्यामध्ये असे लक्षात आणून दिले होते की विषमलिंगी लोक जर सेक्सला प्रजननाचे 'प्राकृतिक' प्रयोजन लावत असतील तर विषमलिंगी समुदायामध्येही केवळ प्रजननासाठी सेक्स केला जात नाही. तसे असते तर विषमलिंगी लोकांनी खरे तर चुंबन, मुखमैथुन, गुदमैथुन अशा क्रिया करूच नयेत. आणि मग कंडोमचादेखील वापर करू नये. कारण कंडोम तर 'अप्राकृतिक' ठरेल, त्याच्यामुळे प्रजनन थांबवले जाते. आणि याच समुदायामध्ये असंख्य स्त्री-पुरुष ज्यांना मूल होऊ शकत नाही किंवा त्यांना स्वत:लाच मूल नको असते तेही 'अप्राकृतिक' ठरतील.

इथे प्रजनन म्हणजे प्रकृती हा जो माणसांची व्याख्या करण्यासाठी तयार झालेला निकष आहे तोच मुळी चुकीचा आहे. माणूस हा सामाजिक प्राणी आहे, असे आपण म्हणतो. म्हणजेच माणसाची व्याख्या करताना त्याचे 'प्राणी असणे' आणि 'सामाजिक असणे' या दोन्ही घटनांचा एकत्रित विचार

करावा लागेल. माणूस आणि प्राणी यांच्यात फरक करायचा झाला तर आपण असे म्हणू शकतो की प्राण्यांसाठी सेक्स फक्त प्रजनन एवढ्या गरजेपुरता असतो. माणसांसाठी मात्र सेक्स ही 'गरज'ही असते आणि 'इच्छा'ही. माणसाची इच्छा (जिला बुद्ध 'तृष्णा' म्हणतात) ही गरजेच्या प्राकृतिक नियमाला कधीच जुमानत नसते. 'गरज' भागवण्यापुरती असते, इच्छा मात्र आनंद मागत असते. आणि संपूर्ण आनंद कधीच मिळत नाही, तृष्णा कधीच संपत नाही. शाश्वत परमानंद, ज्याला आपण शारीरिक, मानसिक, वैचारिक, आध्यात्मिक असा एकत्रित अनुभवलेला उत्कर्षबिंदू (orgasm) म्हणू शकतो तो आपण कधीच गाठू शकत नाही. आणि हीच 'अशक्यता', 'अपूर्णता' माणसाच्या व्याख्येमध्येच अद्यारूत आहे. संभोग हा नेहमी दुसऱ्या व्यक्तीसोबत केला जातो इथे एक अप्राकृतिक माणूस दुसऱ्या अप्राकृतिक माणसाच्या जवळ येतो. हे दोन 'अप्राकृतिक' घटक एकत्र येतात तेव्हा 'सामाजिकता' जन्म घेते. म्हणून लैंगिक परमानंद जो अशक्य असतो तो इतरांसोबतच्या प्रेमातून शक्य होतो. लाकान नावाचा मनोविश्लेषक म्हणतो, 'माणूस हा त्याच्या जन्मापासूनच प्रकृती-संस्कृती, नेणीव-भाषा, शरीर-मन, स्त्री-पुरुष, स्वयं, इतर अशा द्वैतांनी विभागला (split) गेला आहे. या विभागल्या जाण्याला तो 'castration' शब्द वापरतो.

**Castration :**

Castration म्हणजे लिंग छाटण्याची प्रक्रिया. 'स्त्री', 'पुरुष' आणि 'तृतीयपंथी' या त्रिकोणातील सामाजिक ओळखींचा प्रश्न आपण कायद्यामध्ये, उदाहरणार्थ, 'ट्रान्सजेंडर बिल'मध्ये जैविक जननेंद्रिय यांच्या असण्या-नसण्या किंवा छाटले जाण्याच्या मुद्द्यांवरून ठरवत असू तर लाकान म्हणतो तसा माणूस हा मुळातच castrated म्हणजे लिंग छाटलेला आहे आणि त्याने स्वतःची मानलेली कोणतीही ओळख ही त्याच्या मुळातल्या castration अवस्थेतून 'निर्मित' झालेली आहे. माणसासाठी लिंग ही गरज नसून आनंदाची तृष्णा आहे आणि ही तृष्णा कधीच तृप्त होत नाही. हीच माणसाच्या लैंगिकतेची आणि त्याच्या असण्याची व्याख्या आहे. त्याच्या या 'असण्या-नसण्यामुळे' त्याच्या सर्व ओळखी या खोट्या किंवा आपण म्हणू या 'अप्राकृतिक' म्हणजेच 'सामाजिक' आहेत. लाकान ज्याला castration म्हणतो त्याला स्लावॉय झिजेक आणि आलेन्का झुपान्चीक नावाचे तत्त्वचिंतक 'शॉर्ट सर्किट' असे आधुनिक नाव देतात.

इथे मला एक विनोदी किस्सा सांगावासा वाटतो. माझ्या एका कोती मित्राला एकदा रस्त्यावरून गाडी चालवत जात असताना वाहतूक पोलिसाने अडवले आणि त्याचे लायसन्स (ओळखपत्र!) मागितले. त्याच्याकडे लायसन्स नव्हते म्हणून तो भावूक होण्याचे नाटक करत सांगू लागला, 'बघा ना साहेब, मला कोणीच लायसन्स देत नाय. आम्हाला कोणीच विचारत नाय, उलट 'बत्ती गुल' म्हणून चिडवतात.' त्यावर हवालदाराने विचारले, 'का? तुझी बत्ती पेटत नाही का?' त्यावर माझा मित्र म्हणाला, 'नाय ना साहेब! माझ फ्यूजच उडालाय ना!' हे उत्तर ऐकून हवालदार हसला आणि त्याने त्याला तसेच जाऊ दिले. खरे तर हा विनोद आपल्या सगळ्यांच्या माणूस असण्यातील 'उडालेल्या फ्यूजची' आठवण करून देतो, नाही का?

फ्रॉइड आणि लाकान यांनी मांडलेले माणसाचे मनोविश्लेषण माणसाच्या अस्तित्वाच्या 'अशक्यता' दाखवते. मात्र माणसाच्या याच अपूर्णतेतून आपण त्याच्या सामाजिक अस्तित्वाच्या शक्यतांचा विचार करू शकतो. 'स्त्री', 'पुरुष' आणि 'तृतीयपंथी' या तीन ओळखींवर पितृसत्ता उभी आहे. आणि पितृसत्तेच्या मदतीने धर्म, जात, वर्ण, वर्ग अशा सर्व ओळखींचे राजकारण चालवले जाते. तेव्हा हे सर्व तिढे माणसाच्या लैंगिकतेमध्ये गुंतलेले आहेत. हा गुंता सोडवण्यासाठी इतर सगळ्या गोष्टी करत असताना आपण आपल्या 'लैंगिक वर्गीकरण' या प्रक्रियेलाही तटस्थपणे पाहणे गरजेचे वाटते. त्यातून एक नवी 'मानसिकता', एक नवा 'समाज' उभा राहील अशी आशाही वाटते.

**ट्रान्स मनोविश्लेषण :**

इथे 'ट्रान्सजेंडर' या नावातल्या 'ट्रान्स' या शब्दाची खूप मदत होऊ शकते. ट्रान्स हा एक प्रत्यय आहे, तो अनेक शब्दांना जोडला जातो. उदाहरणार्थ, transcription, transcendence इत्यादी. मला या प्रत्ययाचा मुख्यत: दोन शब्दांमधील वापर चर्चेला ठेवायचा आहे. दोन शब्द म्हणजे transition आणि transformation. 'ट्रान्स' या प्रत्ययाचा या दोन शब्दांमध्ये जास्त प्रभावीपणे दिसणारा अर्थ म्हणजे 'एका अवस्थेतून (state) दुसऱ्या अवस्थेत जाण्याची प्रक्रिया'. 'ट्रान्स' हा प्रत्यय फ्रॉइड आणि लाकान यांनी दाखवून दिलेला मानवी लैंगिकतेचा अप्राकृतिक-सामाजिक यांमधला तिढा उत्तम मांडू शकेल असे वाटते.

या प्रत्ययामुळे माणूस म्हणून आपण कायमच 'एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाण्याच्या प्रक्रियेत असतो' याची सतत आठवण राहील. कोणतीही एक अवस्था त्याची संपूर्ण व्याख्या करू शकत नाही किंबहुना त्याची संपूर्ण व्याख्याच अशक्य आहे. माणसाचे अस्तित्व, त्याची माणूस म्हणून ओळख आणि त्याच्या इतर लैंगिक, धार्मिक, जातीय, वर्णीय, राजकीय इत्यादी असंख्य ओळखी या सर्वच आणि कायमच

'प्रक्रियेत' (in transition) असतात कारण मुळात माणसाचे असणेच मुळी कायम प्रक्रियेत असते.

अग्निशमन दल अधूनमधून 'फायर ड्रिल' नावाचा स्वाध्याय करतात. अग्निशमनाची सुरक्षा यंत्रणा ही बरोबर काम करते ना, हे तपासण्यासाठी एक आग लागल्याचा खोटा प्रसंग उभा केला जातो आणि मग सगळी यंत्रणा ती आग विझवण्याचे काम करते. हा एक सराव असतो. या सरावामुळे यंत्रणा स्वत: कधीही नष्ट होत नाही, तिला काहीच धक्का लागत नाही. उलट ती तपासलीही जाते आणि अजून भक्कमही होते.

तृतीयपंथी ओळखपत्राचा वाद माझ्यामते सरकारसाठी 'फायर ड्रिल'चे काम करतो. या वादातून त्यांच्या ओळखपत्राची समस्या, त्याच्या कायद्यातील त्रुटी दुरुस्त केल्या जातील किंवा नाही हे सांगता येत नाही, परंतु हे 'फायर ड्रिल' सरकारी सुरक्षा यंत्रणेला म्हणजे पितृसत्तेला थोडाही धक्का देऊ शकणार नाही. उलट ती तृतीयपंथी व्यक्तींना कवेत घेऊन अजूनच भक्कम होईल. म्हणून आला बाड्यू नावाचा तत्त्वचिंतक म्हणतो, आपल्याला नवीन समाजाच्या निर्मितीसाठी 'फायर ड्रिल' सारख्या प्रसंगांची नाही तर या जुन्या समाजाच्या प्रस्थापित व्यवस्थांना भंग (rupture) करेल अशी एक घटना (event) हवी आहे. ही घटना 'फायर ड्रिल'सारख्या प्रसंगांमध्ये अडकलेल्या अपूर्ण माणसातून एक नवा सार्वत्रिक माणूस घडवू शकेल.

**सार्वत्रिक माणुसकी :**

सौम्यब्रत चौधरी हे आपल्या संविधानाच्या बाबतीत एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न विचारतात, बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या टीमने अथक विचार आणि प्रयत्नातून तयार केलेल्या भारतीय 'घटने'मध्ये प्रत्येक ओळखीचे मानवी हक्क मांडले असले तरी त्याच्याही आधी उद्देशिकेत 'we the people' म्हणजे 'आम्ही भारताचे लोक' असे म्हटले आहे. इथे 'भारताचे लोक' या ओळखीच्या आधीच एक 'we' एक 'आम्ही' आहे. कोण आहेत हे 'आम्ही'? हे आम्ही म्हणजे 'सार्वत्रिक माणुसकी' (generic humanity) आहे. माणूस अपूर्ण, त्याच्या ओळखी अपूर्ण परंतु या अपूर्णतेतूनच 'सार्वत्रिक माणूस' होण्याची शक्यता तयार होते.

तृतीयपंथी लोकांनी ओळखपत्र देण्याच्या नियमांना प्रश्नचिन्ह लावले आहे. मुळात सरकार त्यांना काही सवलती मिळाव्यात, त्यांचा उद्धार व्हावा यासाठी ओळखपत्र देऊ इच्छित आहे. परंतु रस्त्यावर साडी नेसून भीक मागणाऱ्या 'बोगस' तृतीयपंथींचे काय? 'तृतीयपंथी' व्यक्ती हा समाजात इतका शोषित, वंचित घटक असताना कोणी आपणहून 'बोगस' तृतीयपंथी बनतो म्हणजे त्याची आर्थिक परिस्थिती किती बिकट असेल याची मी कल्पनाही करू शकत नाही. तो बोगस आहे म्हणून त्याच्या पोटाचा प्रश्न आपल्याला पडणार नाही का? मुळात आपण सगळेच बोगस स्त्री, बोगस पुरुष, बोगस समलिंगी, बोगस उभयलिंगी, बोगस तृतीयपंथी नाही का? मग 'सवलती' कोणाला मिळाल्या पाहिजेत? समता ही सगळ्यांसाठी असते तेव्हा सवलती सर्व गरजूंना मिळाल्या पाहिजेत ना? त्यासाठी ओळखीचे हे लेबल कशाला?

आणि 'ओळख' व तिचे 'नाव' हे इतकेच गरजेचे वाटत असेल तर आपली ओळखींची संस्कृती किती बोगस असते याची आठवण राहावी म्हणून आपण खरे तर एक प्रयोग करून पाहू या. हा प्रयोग मला 'कोती' नावाच्या सिनेमातून सुचत आहे. या सिनेमात एक लहान मुलगा मुलींसारखा वागत असतो म्हणून त्याला त्याच्या वडिलांचा मार बसत असतो आणि गावातले सगळे लोकही त्याला चिडवत असतात. परंतु शाळेतील त्याचे मित्र, त्याची लहान बहीण यांना त्याच्या अशा वागण्यामध्ये काहीही चुकीचे वाटत नसते. एकदा त्याच्या वडिलांचे आणि गावातल्या मोठ्यांचे मनपरिवर्तन (transformation) घडावे म्हणून गावातील सर्व मुले साडी नेसून गावातून फेरी काढतात. सिनेमातील हे विलोभनीय चित्र माझ्या कायम लक्षात राहिले आहे. आपणही आपल्या खऱ्या आयुष्यात असे करू शकतो का? आपण सगळेच वेगवेगळ्या दिवशी कधी स्त्रियांचे तर कधी पुरुषांचे कपडे घालू या. हे वाटते तितके सोपे नाही, परंतु आपण खरेच धाडस दाखवले तर आपल्याला रोज आपल्या शहरात इथे-तिथे साडीतले, दागदागिने घातलेले पुरुष, शर्टातल्या बायका दिसू लागतील. या नव्या संस्कृतीमुळे आपल्या नेणीवेतल्या पितृसत्ताकचा फुगा काही अंशी तरी फुटेल! आपल्या सामाजिक नात्यांच्या, प्रेमाच्या, कुटुंबाच्या कल्पना काही अंशी तरी बदलतील! एका लैंगिक ओळखीच्या नाट्यातून पितृसत्ता नष्ट होऊ शकली तर आपल्या इतर विषमता दूर करणेही सोपे जाईल अशी आशा वाटते. इथून पुढे आपण सगळेच ना स्त्री, ना पुरुष. आपण सगळेच 'ट्रान्सह्यूमन'. कशी वाटते कल्पना?

**संदर्भ :**


- Alain Badiou, Being and Event, 2005
- Alenka Zupancic, What is Sex? 2017.
- Patricia Gherovici, Transgender Psychoanalysis, 2017
- Soumyabrata Choudhury, Now It's Come to Distances, 2020



# लैंगिकतेच्या पलीकडील नव्या जगाची आस!

**मुक्ता मनोहर**
**जनरल सेक्रेटरी,**
**पुणे म.न.पा. कामगार युनियन**
**व लेखिका**

**काही मूल्य कल्पनांचे पलायन :**

१९७८ सालातली ही घडामोड आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन या संस्थेत मी तेव्हा नुकतीच नोकरीला लागले होते. गांधीवादी समाजवादी विचाराच्या अनेक नामवंत व्यक्ती या संस्थेच्या चालक होत्या. देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांचा एक अभ्यास या संस्थेला करायचा होता. त्यात माझी नेमणूक झाली. अर्थात केवळ हिजडा असा काही तो विषय नव्हता. तर देहविक्रय करणाऱ्या स्त्रिया असा तो विषय होता. या कामाची सुरुवात मला महानगरपालिकेच्या गाडीखाना इथल्या दवाखान्यात बसून करायची होती; शिवाय या कामासाठी प्रत्यक्ष बुधवार पेठ, दाणे आळी वगैरे ठिकाणी जाऊन सर्वेक्षणही करायचं होतं. गाडीखान्यात विजयाताई लवाटे होत्या. त्यांचा या कामात प्रामुख्याने सहभाग असणार होता. मग आमचं काम सुरू झालं.

पुण्याच्या महात्मा फुले मंडई परिसराला रविवार, बुधवार, शुक्रवार वगैरे पेठांचा गराडा आहे. या भागातच एकेकाळी केवळ पुण्यातल्या नव्हे तर कदाचित अख्ख्या भारतातल्या लोकांचं श्रद्धास्थान प्रस्थापित केलेलं होतं, ते म्हणजे दगडूशेठ हलवाई यांचा गणपती. सालंकृत असलेली या गणपतीची एक खूप मोठी मूर्ती आहे. अगदी दोन रस्ते मिळतात अशा एका जागेवर मंदिरासह तेव्हा ती तिथे ठेवलेली असायची. गणेश उत्सव नसला तरीसुद्धा तिथे भाविकांची नेहमीच गर्दी असायची. आता मंदिर व मूर्ती दोन्ही वेगळ्या ठिकाणी हलवलेले आहेत. तर, सगळ्यांचा श्रद्धास्थान असणाऱ्या श्रीगणेशाच्या उजव्या बाजूची गल्ली म्हणजे म. फुले मंडईकडे जाणारा रस्ता. पण हा रस्ता ओलांडला की विरुद्ध बाजूला छोट्या छोट्या अनेक गल्ल्या आहेत. जेव्हा मी विजयाताई लवाटेंबरोबर त्या गल्ल्यांमध्ये जायला सुरुवात केली, तेव्हा माझ्या मनात त्या गल्ल्यांबाबतची दडून, दबा धरून बसलेली एक आठवण वर आली.

मी जेव्हा लहान होते तेव्हा आम्ही शुक्रवार पेठेतच काळ्या हौदाजवळ राहत होतो. मंडईच्या भागातून नेहमीच जाणं-येणं व्हायचं. तर जेव्हा या छोट्या गल्ल्यांतून कधी क्वचित जरी जाण्याचा प्रसंग आला तरी आई माझा आणि माझ्या बहिणीचा हात घट्ट पकडायची आणि आम्हाला सूचना द्यायची की वर अजिबात बघायचं नाही. अर्थातच आईला चुकवून माझी नजर हळूच वर जायचीच. तेव्हा वरती भल्यामोठ्या खिडक्यांमध्ये चेहऱ्याला भरपूर काही रंगरंगोटी केलेल्या, ओठाला गडद लाल लिपस्टिक लावलेल्या स्त्रिया मला दिसायच्या. याबाबत काही प्रश्न विचारलेच तर या स्त्रिया चांगल्या नाहीत असं अगदी थोडक्यात घाईघाईत आई उत्तर द्यायची. तर असं ज्यांच्याकडे बघायचंही नव्हतं अशा स्त्रियांकडे, त्या वाड्यांमधले जिने चढून मी वरच्या वरच्या मजल्यांवर जायला लागले होते.

वेश्या वस्त्यांमध्ये जा-ये सुरू झाल्यापासून माझ्या मनातल्या अनेक मूल्य कल्पनांनी काहीसं भिऊन जाऊन चक्क माझ्या मनातून पलायन केलं. एक म्हणजे इथल्या स्त्रिया काहीतरी वाईट वगैरे असतात, तर जितकी मी तिथे वावरले मला ठामपणे वाटायला लागलं, त्या वाईट वगैरे नाहीत. त्यांचं त्यांचं एक जीवन आहे. याबरोबरच एक स्त्री आणि एक पुरुष यांचे

विवाहबंधनातून निर्माण झालेले लैंगिक संबंधच केवळ पवित्र असतात या मूल्यालाही तिथे चॅलेंजच स्वीकारावा लागला. तिथल्या मातीच्या जुनाट घरांमध्ये थाटामाटात उभ्या असणाऱ्या रेणुका देवीच्या किंवा यल्लमा देवीच्या मूर्ती साक्षीला असतानाच तिथल्या स्त्रिया जेव्हा त्यांच्या या देहविक्रीच्या बाजारात येण्याच्या वेगवेगळ्या पण धक्कादायक कहाण्या सांगायला लागल्या तेव्हा परिस्थिती सापेक्ष माणसांचे जीवन प्रवास बघायला हवेत हे मी ठामपणे मान्य केलं. माझ्यासाठी या वेगळ्या जगाचा दरवाजा हळूहळू उघडायला लागला. देवाशी झालेलं पवित्र लग्न आणि त्याचा व्यवहारातला अर्थ हे नवंच दालन माझ्यासाठी तेव्हा समोर आलं. आणि नंतरही या दालनात मी येत राहिले ती आजतागायत. लग्न, पावित्र्य, योनी शुचिता आणि मूल जन्माला घालणं यातले धागेही केवळ विवाहसंस्थाच बांधू शकते हाही माझ्या मनातला एक खुणेचा दगड कोसळून पडला. एक तर या देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांना बऱ्याच वेळेला मूल हवं असायचं. त्या ती मागणी विजयाताईंकडे करायच्या. बच्चा चाहिये, हा त्यांचा आग्रह असायचा. याबरोबरच त्यांचे कित्येक वेळा यार असायचे, म्हणजे जरी त्या देहविक्रय करत असल्यातरी त्यातल्या कित्येक जणी आपल्या यारासाठी, पैसे देण्यापासून अनेक गोष्टी करायच्या. त्यांच्या जीवनाचा तो अगदी गाभ्याचा केंद्रबिंदू असायचा. मूल, मुलावर माया करणं, ते हवं वाटणं ही एक नितळ भावना आहे. कोणत्याच पवित्र-अपवित्रतेच्या वेष्टनात न बांधता येणारी.

**ही माणसं – ती माणसं :**

तर अशा या सगळ्या गर्दीमध्येच मला मर्दानी शरीरयष्टीचे, अनेक वेळा घोगऱ्या आवाजाचे, कधी पानाच्या ठेल्यांवर तर कधी घरवालीच्या घरातच काही जण भेटले. हो तेच ते ज्यांच्या टाळ्यांची एक विशिष्ट पद्धत असते, ज्यातून ते अनेक गोष्टींसाठी संवादच साधत असतात. हेच ते, जे आपल्याला कधी कधी सिग्नलला गाडी थांबल्यावर फटकन टाळी वाजवून आपल्यासमोर येतात. आणि ते असे आपल्यासमोर आले की आपण नजर चुकवतो, त्यांना बघितलं असूनही न बघितल्यासारखं करतो आणि आपल्या मनातला कप्पा घाईघाईने त्यांच्या विचारापासून आपण बंद करून टाकतो. तेच ज्यांची भीती बाळगली पाहिजे असं मानलं जातं आणि त्यांना किन्नर किंवा हिजडा म्हटलं जातं. तृतीयपंथी, वेगळ्या पद्धतीचं जीवन जगणारे, हिजडे. अर्थात या हिजडा समाजाचं जीवन समस्यांनी घेरलेलं आहे. म्हणून त्यांच्या जीवनाचा अभ्यास करण्यासाठी काही संस्था पुढे यायला लागल्या व त्याचंही एक वेगळं राजकारण सुरू झालं. जसं मी करत असलेला त्या काळातला वेश्यांच्या जीवनाच्या पाहणीचा प्रकल्प. प्रकल्पवाले बदलत राहतात, आणि समस्या अनेक वेळा असतात तिथेच राहतात. या स्त्रियांकडे किंवा माणसांकडे बघू नये, भिऊन राहावं असं काहीही नाही या निष्कर्षाला मी फार लवकर आले.

गेल्या काही वर्षांत वेगवेगळ्या समस्याग्रस्त समाज विभागांचे अभ्यास सुरू झाले. जसं हिजडा समुदाय, देहविक्रय करणाऱ्या स्त्रिया, दलित, आदिवासी, रस्त्यावरची मुलं, धरणग्रस्त किंवा विस्थापित वगैरे आणि यात मग स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा प्रश्न जेव्हा गोवला जातो, तेव्हा समाजाच्या मुख्य प्रवाहातल्याच सुखवस्तू लोकांचं प्रमाणच अल्प आहे, तेच अल्पसंख्याक आहेत हे प्रकर्षाने जाणवतं. तरीसुद्धा त्यानिमित्ताने आपल्या समाजातल्या समग्र अन्याय व्यवस्थांचं दर्शन माझ्यासारखीला त्यामुळे झालं, हे त्या अभ्यासांचं नक्कीच श्रेय म्हणता येईल. पण डोळे विस्फारले तर फाटतील, इतकं हे अल्पसंख्याक समजलं जाणारं जग व्यापक आहे. लैंगिकतेबाबत वेगळ्या धर्ममान्य अधिकृत समाजाचं एक अफाट दर्शन मग मी जाणीवपूर्वक जाऊन घेतलं. मी मुद्दाम संदत्ती इथे जी यल्लमा नावाच्या देवीची जत्रा भरते ती बघायला गेले. डोक्याला पिवळी हळद लावलेले हिजडे मी पाहिले. हे जग किती अफाट मोठं आहे हे तिथली गर्दी सांगत होती. तो डोंगर चढताना माझ्या मनात अनेक विचार कधी घोंगावत, कधी बोचकारे घेत तर कधी प्रश्न बनून अंगात आल्यासारखे घुमत राहिले ते कायमचे. तो डोंगर चढणाऱ्या सर्वांना डोंगरावर विराजमान झालेल्या देवीचं दर्शन हवं होतं आणि तो त्यांचा विसावा होता. तो डोंगर अज्ञान, दारिद्र्य, विषमता, आधुनिक जगातले सर्व प्रकारचे अत्याचार यांनी चांगला सुदृढ झालेला होता. शिवाय मला तर वाटलं त्याची उंचीही सतत वाढतीच आहे. आणि हा डोंगर काही समाजापासून तुटलेला थोडाच आहे? तो एका व्यापक जगाचाच अविभाज्य भाग आहे.

देवाशी लागणारं लग्न असेल नाहीतर नवस फेडण्याच्या इतर गोष्टी असतील, ते सगळेच व्यवहार आणि समस्याही आपल्याच व्यापक जगाचा अविभाज्य भाग आहेत. पुन्हा पुन्हा जन्म घेणाऱ्या कोणत्या गोष्टी चांगल्या, कोणत्या घातक याचं काही तारतम्य ठेवण्याची गरज आहे का नाही? हजारो वर्षांच्या जुन्या कथांमधून आणि त्या कथांच्या वारंवार केल्या जाणाऱ्या कथनांमधून काही प्रथा सतत सतत जन्म घेत आहेत. त्यामुळे केवळ जन्म घेत नाहीत तर सजीव होऊन जीवन जगतायेत. बहुसंख्येने असणाऱ्या वेश्या, देवदासी, वाघ्या-मुरळ्या, हिजडे अशा लोकांच्या आयुष्याची होरपळच आहे. ती काय परमेश्वरी कृपा आहे का? परिस्थितीत होरपळून निघणाऱ्यांच्या आयुष्याचं

अस्तित्व स्वतंत्र समाजापासून तुटलेलं आहे का? असे प्रश्न अंगावर घेत मी डोंगर चढत होते. सर्व समाज कसा चांगला आहे आणि यांच्यात काहीतरी सुधारणा करण्याची गरज या गैरसमजाला आपण किती काळ चुचकारू शकू. खरोखरच यांच्या जीवनात आमूलाग्र बदल कोण करणार? कसे? इतर प्रश्नांचं काय? असे सगळे प्रश्न गुरगुरत समोर येतातच.

**लक्ष्मीची भेट :**

माझा असा वैचारिक प्रवास सुरू असतानाच काही वर्षांपूर्वी मला मनोविकासच्या अरविंद पाटकर यांचा फोन आला. एका पुस्तकाचं प्रकाशन मी करावं म्हणून काहीसं आयत्या वेळेस त्यांनी मला निमंत्रित केलं. 'मी हिजडा मी लक्ष्मी' असं त्या पुस्तकाचं नाव होतं. प्रकाशन होण्यापूर्वी मला पुस्तकाची एक प्रतही अरविंद पाटकर यांनी पाठवलेली होती. उंच आणि रेखीव चेहऱ्याच्या बाईचा स्कूटरवर स्वार झालेला फोटो कव्हरवर होता. या पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने मी अगदी अल्पवेळेसाठी लक्ष्मीच्या सान्निध्यात आले. विचारमंचावरती माझ्या शेजारी ती बसलेली होती. झगझगीत सुंदर साडीत, नेटकेपणाने खुललेला तिचा उंचापुरा देह मला जाणवत होता. कार्यक्रमाचा हॉल खचाखच भरलेला होता. त्या काळात बिग बॉस नावाच्या टीव्ही कार्यक्रमात सामावली गेलेली लक्ष्मी अर्थातच लोकांच्या उत्सुकतेचा आणि आकर्षणाचा विषय होती. मला ती नुकतीच म्हणजे तिच्याच पुस्तकातून आदल्या दिवशी भेटलेली होती.

लक्ष्मी म्हणजे लक्ष्मीनारायण त्रिपाठी. एक मुलगा. याचं कुटुंब उत्तर प्रदेशातलं. म्हणजे वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण जातीतलं. जातीची ओळख जरी वरिष्ठ म्हणून असली तरी घरची स्थिती मध्यमच असणार. घराच्या वर्णनावरून अनुमान लागत होतं. लक्ष्मीनारायण सर्वांत मोठा मुलगा. लहानपणी आजारी-आजारी असणारा, त्यातच काही नात्यागोत्याच्या किंवा आसपासच्या मित्रांनी लैंगिक बळजबरी केल्याने मानसिक धक्क्यातून गेलेला आणि मग स्वत:ची हळूहळू ओळख होत जाणारा. लहानपणापासून उत्तम नृत्य करणारा. पुरुषाचं शरीर असलं तरी संपूर्ण शरीरात जणू स्त्रीचंच वास्तव्य. नाच करण्याची प्रचंड आवड आणि क्षमताही. कदाचित या नृत्यामुळे तर स्वत:कडे पुरुष आकर्षित होतात याचा आलेला प्रत्यय. तर अशी ही लक्ष्मीनारायणची लक्ष्मी बनण्याची सत्य हकिकत. पहिला टप्पा गे लोकांच्या ग्रुपमध्ये स्वत:ला शोधण्याचा. मात्र पुढे आपण हिजडा आहोत हे स्वीकारण्याचा टप्पा.

हिजडा, मानवी समाजातलं एक सनातन काळापासूनचं अस्तित्व. प्रभू रामचंद्रांची वाट पाहत वेशीपाशी चौदा वर्षे थांबलेल्या समुदायाची एक पुराण कथा. ज्यातून साक्षात श्रीरामानेच मग हिजड्यांना ऊर्फ किन्नरांना सांगितलं, कलियुगात तुमचं राज्य येईल. तुम्ही दिलेले शाप आणि आशीर्वाद खरे होतील. स्वत:च्या अस्तित्वाची अशी सनातन पाळंमुळं लक्ष्मीला जगायला बळ देणारी वाटली. कुटुंब, आपली माणसं, आपला समुदाय. या सगळ्यामुळे तिने हिजडा आहे, हीच स्वत:ची ओळख नक्की केली. काळाच्या ओघात हिजडा संस्कृतीमध्ये मुस्लिम संस्कृतीतले घटकही मिसळून गेले. मोहरमच्या तिज्जा हिजड्यांसाठी महत्त्वाचा ठरला. तिज्जाच्या वेळी त्यांना स्वत:चे चेले नक्की करता येतात. लक्ष्मीचा प्रवास असा बहुसांस्कृतिक आयामांनी गुंफला गेलेला. त्यात आधुनिक संस्कृतीचाही वावर सुरू झाला. हिजडा कम्युनिटीसाठी काम करणारी 'दाई वेलफेअर सोसायटी' लक्ष्मीच्या आयुष्याला घडवायला समोर आली. त्या वेलफेअर संस्थेत लक्ष्मी फिट ठरली. हिजड्यांना कंडोम देण्याचं, थोडक्यात त्यांच्या आरोग्याचं रक्षण करणाऱ्या या संस्थेच्या कामात लक्ष्मीला खूपच गती आली. ती संस्थेचं काम करायला लागली. हिजडा कम्युनिटीसाठी कंडोमचं वाटप करणं वगैरे आणि त्यानिमित्ताने परदेशातही गेली.

> **ती अनेकांना कदाचित एक आयडॉल वाटू शकत होती. अनेकांना आपण 'ती' व्हावं अशी इच्छाही निर्माण झाली असेल. चमकत्या जगात होणाऱ्या सौंदर्य स्पर्धा लक्ष्मीला केवळ हिजड्यांसाठी भरवाव्यात असं वाटलं. आणि इंडियन सुपरक्वीन अशी स्पर्धा खुद्द लक्ष्मीला केवळ हिजड्यांसाठी भरवाव्यात असं वाटलं. आणि इंडियन सुपरक्वीन अशी स्पर्धा लक्ष्मीच्याच पुढाकारातून साकार झाली.**

**प्रसिद्धीच्या वलयांकित जगात :**

एक समज असाही आहे की, हिजडा म्हणजे परमेश्वराचे लाडके जीव. त्यांच्यात साक्षात परमेश्वराचा वास असतो. ते पुण्यात्मा. लक्ष्मीचं आयुष्य बघितलं तर ती नक्कीच पुण्यात्मा असणारच. आयुष्यात तिच्या वाट्याला जे आलं म्हणजे झी टीव्हीसारख्या प्रसिद्ध चॅनेल्सवरती मुलाखती, कार्यक्रम, परदेश वाऱ्या, बिग बॉस यातून मिळालेलं ग्लॅमर, समाजातल्या उच्चभ्रू श्रीमंत लोकांच्यात उठबस, पार्ट्या इत्यादी गोष्टी खास होत्या, तरीसुद्धा बॉम्बे जिमखान्यासारख्या बुजुर्ग संस्थेकडून आलेला धक्कादायक अनुभव. तो तिला जगापुढे खरमरीतपणे मांडणं शक्य झालं ते तिच्या सेलिब्रेटी स्टेटसमुळेच. तिला जे काही वाटत होतं ते व्यक्त करायला, थोडीशी काहीतरी मोकळी वाट तिला ती प्रसिद्ध असल्यामुळे मिळाली.

ती अनेकांना कदाचित एक आयडॉल वाटू शकत होती. अनेकांना आपण 'ती' व्हावं अशी इच्छाही निर्माण झाली असेल. चमकत्या जगात होणाऱ्या सौंदर्य स्पर्धा लक्ष्मीला केवळ हिजड्यांसाठी भरवाव्यात असं वाटलं. आणि इंडियन सुपरक्वीन अशी स्पर्धा खुद्द लक्ष्मीला केवळ हिजड्यांसाठी भरवाव्यात असं वाटलं. आणि इंडियन सुपरक्वीन अशी स्पर्धा लक्ष्मीच्याच पुढाकारातून साकार झाली. अर्थात वी केअर नावाच्या कंपनीने मोठं बजेट देण्याचं मान्य केलं. मात्र त्या बजेटमध्ये आयत्या वेळेस मोठ्या प्रमाणात काटछाट करण्यात आली. प्रस्थापित जगात सर्वसामान्य म्हणून मान्यता मिळावी यासाठी तिचा हा प्रयत्न होता. स्त्रियांच्या सौंदर्य स्पर्धांचं स्तोम गेल्या काही वर्षांत प्रचंड वाढलेलं आहेच. त्याला खेटून आहे ते चंगळवादी सौंदर्यप्रसाधने, सौंदर्यासाठी सर्जऱ्या इत्यादींचं एक राजकीय जग. त्यामागे असतो कार्पोरेट जगाचा पैसा. असं का? कार्पोरेट कंपन्यांना यातून नक्की कोणता फायदा? पण एक नक्की, पुरुषांच्या देहात वसत असणारी स्त्री आपणही सर्वांत सुंदर आहोत हे सिद्ध करायला तयार होणार यासाठी स्पर्धा. सर्वांनाच आपण नक्कीच सुंदर स्त्री आहोत असं अजून अजून वाटावं यासाठी स्पर्धा. अशी स्पर्धा नैसर्गिक स्त्रिया आणि ट्रान्सजेंडरमधून निर्माण झालेल्या स्त्रिया अशी घेता येईल का? शिवाज जे खुजे किंवा तथाकथित स्पर्धेसाठी लागणारी उंची नसलेले स्त्रिया झालेले पुरुष या स्पर्धेत थोडेच उतरणार? अर्थात असे प्रश्न फारसे प्रस्तुत नव्हतेच. लक्ष्मीला स्पर्धा आयोजित करण्याची जिद्द होती. ती कार्यरत झाली होती. प्रस्थापित समाजातही सर्वसामान्य माणसांचा ज्या क्षेत्रांत फारसा वावर नसतोच, ती क्षेत्रं लक्ष्मीने निवडली हे खरं असलं तरी बाकी बहुसंख्य पुण्यात्मे कोणी गोठ्यात राहणारे तर कोणी देहविक्रीच्या यातनामय अत्याचारांना सहन करत खचून जाणारे. कोणाचीही मदत न मिळणारे. लक्ष्मी त्यांना मदत करायला झटणारी. 'दायी' संस्थेची बघता बघता पदाधिकारी झालेली. शिकलेली... कितीतरी ठिकाणी परदेशात ती गेली, तिने जिंकलं अशीच त्याच्यामधल्या तो असलेल्या किंवा तो आहे का ती हे नक्की नसलेल्यातही ती झालेल्या, तीची कहाणी. इतरांना प्रेरणा देणारी. पण कदाचित अशी कहाणी जी प्रस्थापित जगाच्या विसंगतींशी टक्कर घेणाऱ्या घटकांपासून खूप दूर.

आपण स्त्रीच आहोत किंवा स्त्री होण्यात काहीतरी जास्त नीट जगणं होईल असं वाटतं का असा एकदा मला प्रश्न पडला. मला भेटायला एका सफाई सेविका आली होती. तिला काय मुलं-बाळं आहेत अशी मी चौकशी केली तेव्हा तिच्या डोळ्यांत पाणी आणि कंठात हुंदका दाटून आला. काही सेकंदाने ती स्वत:ला सावरत म्हणाली, ''मोठा मुलगा होता. पण त्याने खच्चीकरण करून घेतलं.'' ती गप्प. आणि मीही गप्प. पुढे एका कामगाराकडे गेले. त्याला दोन मुलगे आहेत हे माहीत होतं. घर लहान. बाहेरच्याच खोलीत एक पाठीवर दाट केस रुळणारी एक व्यक्ती झोपलेली होती. कोणाची मुलगी मी सहज विचारलं. माझा मुलगा आहे. त्याने माझ्याकडे न बघता उत्तर दिलं आणि कामाचा विषय काढला.

**कैद केलेले कळप :**

यानंतर माझ्यासमोर आलं ते 'कैद केलेले कळप'. म्हणजे डॉ. अरुण गद्रे यांनी लिहिलेलं पुस्तक. डॉ. अरुण गद्रे स्त्रीरोगतज्ज्ञ (गायनॉकॉलॉजिस्ट). पण याच क्षेत्रातल्या एका एनजीओमध्ये सल्लागार म्हणून ५-६ वर्षं पूर्णवेळ काम केलेले. त्यांनी आपल्या अनुभव आणि निरीक्षणांवर आधारित ही कादंबरी लिहिलेली. त्याचा ब्लर्ब (सारांश) काढावा यासाठी छपाईपूर्वीच ते लिखाण माझ्याकडे आलं होतं. ते लिखाण शब्द न् शब्द मी वाचलं. आणि त्यातला महत्त्वाचा मुद्दा मी पुस्तकाच्या मागील पानावर (मलपृष्ठावर) छापण्यासाठी दिला. त्या पुस्तकातला मुख्य मुद्दा आजच्या बाजारपेठीय, चंगळवादी जगात भयंकर विषमता आणि पोलिसी अत्याचाराच्या पायावर सगळेच मानवी संबंध कसे विस्कटून गेले आहेत त्याच हकिकती होत्या. स्वाभाविकता संपण्याची एक कर्कश घंटा शब्दाशब्दांतून वाजत असल्याचा मला भास होत होता. स्वार्थावर फंड उपलब्ध करून चालू राहणाऱ्या संस्थांची वाटचाल, परिस्थिती बदलण्यापेक्षा ती आहे तशीच ठेवण्याकडे सुरू राहते. प्रेम, वात्सल्य, जिव्हाळा, जगण्यातली स्वाभाविकता चंगळवादी जगाने, बाजारपेठीय तत्त्वांच्या काळ्या डोहात थंडगारपणे बुडवून

टाकल्याचं मला जाणवत होतं. मग मी त्या कादंबरीसाठी मागच्या पानावर छापण्यासाठी तसाच ब्लर्ब लिहिला. प्रसिद्ध लेखक अरुण साधू यांना ती कादंबरी खूप आवडली व त्यांचा परीक्षणात्मक लेखही पुढे लोकसत्तात छापून आला होता. कशाला स्वाभाविक म्हणायचं, स्त्री आणि पुरुष अशी दोन्ही लिंग जन्मत:च असणाऱ्या लोकांचं प्रमाण काय आणि नंतर स्त्रीच व्हावं वाटतं म्हणून स्त्रीत रूपांतरित होण्याचं प्रमाण काय? आपलं लिंग काय असावं हे ठरवण्याचा अधिकार एकट्या व्यक्तीचा असावा का? त्याला कोणता सामाजिक संदर्भ आहे? हा मानव अधिकाराचा गाभ्याचा प्रश्न आहे का? नैसर्गिक लैंगिक संबंधातून मूल जन्माला येतं. या संबंधातून नवनिर्मिती होण्याची शक्यता सध्यातरी नाही. शिवाय ज्या गुंतागुंतीच्या रचनांमधून वळचणीला असणाऱ्या सगळ्याच जिवंत माणसांचे प्रश्न निर्माण झालेले आहेत त्याचा संबंध व्यापक राजकारण, अर्थकारण आणि समाजकारण या सर्वांशी कसा जोडलेला आहे? स्त्री-पुरुष संबंधांचं स्वाभाविक रूप कसं आहे? शिवाय लिंगभावाच्या पलीकडे माणूस उतरतोच तो कोणता? असे अनेक प्रश्न मनात ठेवत मी 'कैद केलेले कळप' त्यावर ब्लर्ब लिहून बाजूला ठेवलं.



**मिनिस्ट्री ऑफ ॲटमोस्ट हॅपिनेस :**

मग या सगळ्या वाटेमध्येच मला भेटली अंजूम. जी होता आफताब. लेखिका अरुंधती रॉयच्या मिनिस्ट्री ऑफ ॲटमोस्ट हॅपिनेस या कादंबरीमधील एक महत्त्वाची व्यक्ती. कादंबरीच्या सुरुवातीलाच विलक्षण जादूई दुनियेत मी खेचली गेले. आफताबचा जन्म होतो आणि एक धक्कादायक वास्तव आपल्यासमोर येतं. जहाँआरा बेगमला तीन मुलींनंतर झालेला मुलगा म्हणजे आफताब. तिने आणि तिच्या नवऱ्याने मुलगा झाला तर हेच नाव ठरवलेलं असतं खास मुलासाठी आफताब. ते दोघं आफताबची सहा वर्षं वाट बघत असतात. आणि तो जन्मतो. ती रात्र जहाँआराच्या आयुष्यातील सर्वांत आनंदाची रात्र असते. पण दुसऱ्या दिवशी... सूर्य उगवल्यानंतर, खोली हळूहळू उबदार झाल्यानंतर ती त्याचा इवलासा देह पाहू लागते. डोळे, नाक, डोकं, मान, काखा, पायांची बोटं... त्याच वेळी तिला त्याच्या पुरुषी अवयवांच्या खाली दडलेला इवलासा, अजून आकार न आलेला, पण नि:संशय बायकी अवयव दिसतो. जहाँआरा बेगमला भीती वाटते... आपल्या पोटच्या बाळाची... मग जहाँआरा काही वर्षं आफताबचं रहस्य स्वत:पाशीच ठेवते. पण अखेरीस ते तिला नवऱ्याला सांगायची वेळ येतेच. मुलाकात अली म्हणजेच आफताबचे वडील. त्यांना हे समजल्यावर प्रचंडच धक्का बसतो. पण मग डॉक्टर नबी यांची भेट... ते सांगतात, आफताब म्हणजे खरं तर पुरुषी देहात अडकलेला स्त्री नाहीये. त्याच्यात पुरुष आणि स्त्री या दोघांचीही गुणवैशिष्ट्ये असणारा तो 'हर्माफ्रोडाईट'. उभयलिंगी व्यक्तीचं अत्यंत दुर्मिळ उदाहरण. कदाचित दहा हजारांत एक. पुढे उलगडतात त्याच्या वाढीचे काही तपशील. जसं आवाज फुटणं, कंठ येणं, दाढी येणं वगैरे. असं असलं तरी आफताबला स्त्रीच व्हावं वाटतं. आफताबला अंजूमच व्हायचं असतं. मग त्याचं ख्वाबगाह या हिजडे राहत असणाऱ्या ठिकाणी पळून जाणं. ख्वाबगाह हे त्या जुनाट हवेलीचं नाव. मग अंजूम हळूहळू ख्वाबगाहची होते. पण जेव्हा तिला एक मुलगी सापडते तेव्हा त्या मुलीला ती जैनब म्हणायला लागते. त्यानंतर तिला सामान्य लोकांच्या दुनियेत परत जाण्याचं मनात येतं. तिला सर्वसामान्य माणसासारखं जगायचं असतं. तिला आई व्हायचं असतं. सकाळी स्वत:च्या घरात जाग यावी असं वाटत असतं. जैनबला दप्तर व डबा घेऊन शाळेला पाठवायचं असतं. मग प्रश्न निर्माण होतो अशा प्रकारच्या इच्छा-आकांक्षा तिच्यासारख्या व्यक्तीने बाळगणं योग्य होतं का? तिच्या संपूर्ण जीवनाच्या उलाढालीत २००२ साली गुजरातमध्ये झालेला नरसंहार असेल, नाहीतर जंतरमंतर इथली विविध आंदोलनं असतील तिचा संबंध येत राहतो. दोन्ही जागेतले संघर्ष समान सूत्रांनी बांधलेले जाणवत राहतात. अंजूम ख्वाबगाह सोडते पण छोटी जैनब तिच्याबरोबर येतच नाही. ख्वाबगाहपासून टेम्पोतून निघालेली अंजूम दहा मिनिटांनंतर एकदा एका वेगळ्या जागेत पोहचते.

ते एका छोटंसं कब्रस्तान असतं. तिथे शहरातील भटक्या आणि बेवारस लोकांचे मृतदेह ठेवले जात असत. तिथेच अंजूम एक प्रथम झोपडं आणि मग तिथेच तिचं जन्नत गेस्ट हाऊस आकाराला येतं... अंजूम एका अर्थाने एक सृजनशीलतेचा साक्षात्कार देणारं व्यक्तिमत्त्व त्या सर्व गुंतागुंतीतून पुढे येतं आणि लैंगिकतेच्या पलीकडेही प्रभावीपणे धडपडणारं मनुष्यपण आपल्याला नवं जग कसं असायला हवं याचं स्वप्न रंगवायला भाग पाडतं!

# लिंगभाव, लैंगिकता आणि नैतिकता



**डॉ. गीताली वि. मं.**
**संपादिका - मिळून साऱ्याजणी**

चां गुलपणाची चळवळ'चा दिवाळी अंक या वेळी ट्रान्सजेंडर या विषयाला वाहिलेला आहे, त्यात मी लेख लिहावा असं संपादक शुभांगी यांनी मला सुचवलं आणि मला प्रखर माणूसभान असणारी स्वत:ला जाहीरपणे अभिमानाने हिजडा म्हणणारी दिशा पिंकी शेख आठवली. पुरुष उवाचच्या फेब्रुवारी २०१८च्या मासिक अभ्यासवर्गात 'हिजडा संस्कृतीची शिवी कशी व का झाली?' या विषयावरचा दिशाचा मुक्तसंवाद ही खणखणीत कार्यशाळा ठरली. भिन्नलिंगी लैंगिक संबंध असणारे स्त्री-पुरुष फक्त 'नॉर्मल', बाकी सगळे 'ॲबनॉर्मल', असं मानणाऱ्या बहुसंख्याकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालून त्यांना लैंगिकतेसंदर्भात खडबडून जागं करण्याचं महत्त्वाचं काम या मुक्तसंवादानं केलं.

प्रथम पुरुष, बाई द्वितीय आणि हिजडा तृतीय हेच दिशाला मान्य नाही. हिजडा ही शिवी होण्यामागे मूळ कारण पितृसत्ता आहे. खरं तर हिजडाचा अर्थ समूह सोडून स्वत:ची वेगळी वाट निवडणारा. अशा लोकांकडे तर प्रस्थापित समाजात आदराने बघितलं जातं, आदर्श मानलं जातं. मग इथे उलटा न्याय का? कारण बाई म्हणजे आई असावी. त्याग करणारी, रिप्रॉडक्शन करणारी असाच बाईकडे बघण्याचा दृष्टिकोन! व्यवस्थेमध्ये बाईचे हे स्थान पुरुष घेऊ पाहतो तेव्हा या व्यवस्थेलाच तो नाकारत असतो. तो पुरुषी भाषा, वेग नाकारून पितृसत्तेला आव्हान देत असतो. भरीस भर म्हणून तो स्त्रीसारखं पुनरुत्पादनसुद्धा करू शकत नाही. तरीही स्त्रीचे जीवन जगण्याचा त्याचा निर्णय त्याला जगण्याच्या वेगळ्या वाटेवर नेऊन उभा करतो. पुनरुत्पादन ही व्यवस्थेची, भांडवलाची आणि सत्तेची गरज आहे. आणि ती पूर्ण करू शकत नसल्याने हिजडा हा खालचा समजला जातो. बायका हीन दर्जाच्या आणि मी बाई असून बाईसारखी राहत नाही म्हणून त्यापेक्षाही हीन अशी ही उतरंड आहे. शुद्रातिशूद्र आम्ही, शूद्र स्त्री आणि स्त्रियांपेक्षा शूद्र आम्ही हिजडे, म्हणजे या उतरंडीतले सर्वांत खालचे भांडेसुद्धा नाही. म्हणजे आम्ही चुंबळ आहोत आणि आमच्या उरावर ही उतरंड रचली आहे असं दिशा बेडरपणे मांडते.

स्वत:च्या धगधगत्या अनुभवांचे निखारे जेव्हा दिशा आपल्यासमोर मांडते तेव्हा आपलं संवेदनशील मन होरपळून निघतं. दिशासारख्या तेजाबी कार्यकर्त्यांना सलाम!

हजारो वर्षं स्त्री-पुरुषांच्या लैंगिक नात्याला समाजमान्यता देणारा विवाहसोहळा अनेकांच्या मनाच्या गाभ्याशी जिवाभावाचं नातं सांगणारा असतो. आजही लग्न हे अनेक स्त्री-पुरुषांचं सोनेरी स्वप्न असतं. मात्र काही काळानंतर त्या जिवाभावाच्या वैवाहिक नात्यात असंतोष, असमाधान का खदखदू लागतो? ते स्वप्न उद्ध्वस्त का होतं? लग्न म्हणजे जुगार असं वाटण्यासारखं चित्र अवतीभोवती का दिसतं? त्या असंतोषाची परिणती अनेकदा विवाहबाह्य संबंधात कशी होते? विवाहांतर्गत व विवाहबाह्य स्त्री-पुरुषांच्या लैंगिक नात्यात ताण-तणाव का असतात? या सर्व कूट प्रश्नांची उत्तरं खूप गुंतागुंतीच्या मानवी मनोव्यापारात आणि मानवाने निर्माण केलेल्या संस्था-संरचनांमध्ये आहेत. लैंगिक नातेसंबंधात काय नैतिक-अनैतिक, न्याय-अन्यायाचं आहे यांच्या उत्तराची विहीर इतकी खोल, काळोखी, अथांग आणि अगाध असते की तिथे हाताशी काही लागत नाही. मात्र चर्चा-चर्वितचरण सतत होत राहतं.

लैंगिकता, लैंगिक संबंध हे माणसाच्या जीवनात अतिशय उत्कट, तरल, संवेदना जागवणारे विषय आहेत. लैंगिकतेचा जन्म जिवाच्या जन्माबरोबर होतो व विस्तार जिवाच्या वाढीबरोबर होत जातो. माणसाची लैंगिकता जैविक, भावनिक, मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक अंगाने विकसित होत असते. त्यात अर्थकारण आणि राजकारणही महत्त्वाची भूमिका बजावतं.

साठोत्तरी स्त्रीचळवळीने लैंगिकता ही व्यक्तिगत बाब नसून ती राजकीय आहे अशी मांडणी करत 'जे जे व्यक्तिगत ते ते राजकीयच' ही घोषणा दिली. मानवी आयुष्यात कामप्रेरणा, रति व मदन क्रीडा, प्रणयाराधन, प्रणय, संभोग, सेक्स या संकल्पनेला अन्य प्राण्यांपेक्षा अनेकानेक पदर व पैलू आहेत. निसर्गदत्त जैविक लैंगिक प्रेरणा भावनिक, मानसिक, शारीरिक पातळीवर आविष्कृत होत असताना सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक पैलूही खूप महत्त्वाचं काम करत असतात. प्रेम नावाची अतिव्यामिश्र कल्पना कामप्रेरणा व सेक्सशी जोडली गेली की एक अद्‌भूत रसायन तयार होतं. म्हणून लिंगभाव, लैंगिकता आणि नैतिकता यांचे आपापसातले प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आणि त्यांचे एकमेकांवर खोलवर होणारे परिणाम काय आहेत याचा शोध घेण्याचा प्रयत्न या लेखात आहे.

योनी असणारी व्यक्ती स्त्री आणि लिंग असणारी व्यक्ती पुरुष! स्त्री-पुरुष हे समाजाचे मूलभूत घटक आहेत. प्रजननासाठी भिन्नलिंगी संबंध आवश्यक म्हणून ते नैसर्गिक, नॉर्मल आणि त्यापलीकडच्या सर्व व्यक्ती विकृत, ॲबनॉर्मल असं म्हणत त्यांची उपेक्षा करत त्यांना मुख्य प्रवाहापासून वगळलं जाणं हे विसाव्या शतकापर्यंत अतिशय नैसर्गिक मानलं जात होतं. मात्र गेल्या १५-२० वर्षांपासून समलिंगी, उभयलिंगी संबंध असणारे स्त्री आणि पुरुष, लिंगबदल केलेले ट्रान्सजेंडर, LGBTIQA समुदायाने आपली लैंगिक ओळख आणि आवड-निवड यांच्या हक्क-अधिकाराविषयी चळवळ उभारली आहे. त्यामुळे त्यांची उपेक्षा-अपमान थांबवून त्यांना माणूस म्हणून जगता यायला हवं यासाठी आपणही आग्रही असायला हवं.

स्त्रीचळवळीने प्रथम स्त्री-पुरुषांच्या जीवनाची निर्मिती करणाऱ्या वेगळेपणाला पितृसत्ताक पुरुषप्रधान व्यवस्थेने शोषणयंत्रणेद्वारा श्रेणीबद्ध विषमतेत रूपांतरित कसं केलं हे सविस्तरपणे मांडलं. बाईच्या शरीरातून मूल जन्माला येतं त्यामुळे मुलाची आई कोण हे सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ आहे. मात्र वडील कोण याबाबत संदिग्धता आहे. स्त्रीचा ज्या पुरुषाबरोबर लैंगिक संबंध होऊन त्यातून गर्भधारणा झाली तो पुरुष त्या स्त्रीच्या अपत्याचा पिता! याचा अर्थ अपत्याचा पिता ठरवण्याचा अधिकार सर्वस्वी स्त्रीच्या हातात राहतो. त्यामुळे साहजिकच तिच्या हातात सत्ता राहते जी मातृसत्ताक व्यवस्थेत होती.

शेतीचा शोध स्त्रियांनी लावला हे आता सर्वमान्य आहे. मात्र पुढे नांगराचा शोध लागल्यावर शेतीची मालकी, निर्णय स्वातंत्र्य पुरुषांच्या हाती गेलं. जास्तीचं उत्पन्न, जमीन मालकी, स्थावर जंगम या सर्वांवर पुरुष आपला हक्क सांगू लागले आणि आपल्या पश्चात ती सर्व संपत्ती आपल्याच 'वारसा'ला मिळावी या मानवी भावनेतून आपला खरा वारस कोण हा प्रश्न पुरुषांना बेजार करू लागला. यातूनच पिता निश्चितीसाठी विवाहसंस्थेचा उदय झाला असं ढोबळमानाने सर्व जण मान्य करतात. तसंच कामभावनेचं स्वरूप सर्वस्पर्शी आणि अफाट असल्यामुळे लैंगिक संबंध नियंत्रित करण्यासाठीही विवाहसंस्था कार्यरत असते. विवाह या व्यवहारात लिंगाधिष्ठित श्रमविभागणी आहे. घरकाम, बालसंगोपन स्त्रीने करायचं त्याला वेतन नाही, तर पुरुषांनी घराबाहेरचं काम करायचं त्याला मात्र वेतन असतं, त्यातून प्रतिष्ठा. या विषमतेतून पती पत्नीची सेवा विकत घेतो. यात शारीरिक, भावनिक आणि लैंगिक सेवांचाही समावेश असतो. त्यामुळे पत्नीचं लैंगिक शोषण हा विवाहात पतीचा हक्कच मानला जातो. जबरीसंभोग वेश्यांपेक्षाही विवाहित स्त्रियांना कितीतरी जास्त पटीने सहन करावा लागतो, असं विचारवंत बर्ट्रांड रसेल यांनी लक्षात आणून दिलं आहे. पुरुषाची नैतिकता तो त्याची आर्थिक जबाबदारी किती व्यवस्थित पार पाडतो या निकषावर जोखली जाते. उलट, स्त्रीची नैतिकता ती लैंगिकदृष्ट्या पतीशी एकतर्फी एकनिष्ठ आहे की नाही यावरच ठरते. यातून पत्नी ही पतीची मालमत्ता, भोगवस्तू समजली जाते. या दुटप्पी नैतिकतेतून विवाहात स्त्री-पुरुष समता, दोघांनाही विकासाच्या समान संधी आदी मूल्यं बिनदिक्कतपणे पायदळी तुडवली जातात. जिथे विषमता आणि शोषण तिथे अनैतिकता, हे नैतिकतेसंदर्भातले मूलभूत निकष असायला हवेत. पण पितृसत्ताक पुरुषप्रधान विवाहसंस्थेत त्याला कौटुंबिक मूल्य असं गोजिरवाणं नाव देऊन समाजस्थैर्यासाठी ही मूल्यं आवश्यक म्हणून योग्य असं समीकरण बिनधास्तपणे मांडलं जातं ते समीकरण बदलायला हवं.

स्त्रीच्या योनिशुचितेचं अवडंबर माजवून तिची अब्रू म्हणजे काचेचं भांडं असं म्हटलं जातं. त्यासाठी स्त्रीवर सासरी चोवीस तास पहारा तसंच समाजातही तिच्या वावरण्यावर, संचार, पोशाखावर कडक नजर असते. पुरुषांच्या लिंगशुचितेची तर कल्पनाही केली जात नाही. त्यांची अब्रू कशात असते? ते काचेचं भांडं नाही तर धातूचं भांडं असतं का? कसंही वागलं, कितीही स्त्रियांशी संबंध आले तरी फुटत नाही का? असे भेदक प्रश्न स्त्रीचळवळीने विचारले. बलात्काराने स्त्री कलंकित होत नाही. तिच्या मनाविरुद्ध झालेला तो एक गंभीर अपघात समजावा आणि स्त्रीवर ठपका न ठेवता ज्याने बलात्कार केला त्याला त्वरित आणि कडक शासन व्हावं असंही स्त्रीचळवळ आग्रहाने मांडते.

स्त्री-पुरुषांचे एकास एक लैंगिक संबंध असणं हे विवाहसंस्थेचं व्यवच्छेदक लक्षण आहे. पण ही बाब नैसर्गिक नाही. लैंगिक संबंधांविषयी असणाऱ्या अंत:प्रेरणा कमी-अधिक

तीव्रतेच्या असतात आणि त्या त्या व्यक्तीनुसार त्या वेगवेगळ्या असतात. एका अर्थाने लैंगिक संबंध ही बाब प्राणी पातळीवरची असल्यामुळे निसर्गनियमानुसार स्त्री-पुरुषांमध्ये ती अंत:प्रेरणा क्रियाशील राहते. नर-मादीच्या शरीरसंबंधांना 'मैथुन' म्हणतात तर स्त्री-पुरुष शरीरसंबंधांना संभोग! मैथुन केवळ शारीरिक स्तरावर असून ती निसर्गाची गरज कृती असं मानलं जातं. संभोगात मात्र मनाचा सहभाग असतो. प्रेमाचीही गरज असते. सम + भोग किंवा सम्यक् भोग अशी संभोग शब्दाची कोणतीही व्युत्पत्ती मान्य केली तरी या कृतीत ऋजुता, सहवास व संयोग अभिप्रेत आहे.

शारीरिक वासनांपैकी कामवासना ही एक अत्यंत प्रबळ वासना असून तिच्या पूर्तीपासून मनुष्यास निरतिशय आनंदाचा लाभ होतो. मात्र शारीरिक सुख तुच्छ व त्यामागे लागणारा क्षुद्र हे समीकरण माणसाच्या तन-मनात सांस्कृतिक-धार्मिक अंगाने खोलवर रुजवलं गेलं आहे. त्यामुळे लैंगिक संबंधांविषयी अपराधभाव माणसाच्या मनाच्या तळाशी पक्का जाऊन बसला आहे. खरं तर मानवी जीवनाचे दोन आधार, शरीर व आत्मा. आत्म्याची महती, थोरवी खूप गायली जाते. मात्र शरीराची थोरवी 'कामसूत्रा'च्या आधारे चवथ्या शतकात जन्मलेल्या महर्षि मल्लनाथ वात्स्यायनाने केली. त्याच्याइतका अभ्यासू व पारदर्शक कामसंशोधक भारतात दुसरा नाही असं 'आधुनिक कामशास्त्र' लिहिणारे र. धों. कर्वे म्हणतात. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत र. धों. लिहितात, 'तर्कशुद्ध शास्त्रीय विचार करण्याची पद्धत फारच थोड्या लोकास साधते. त्यातही ती पद्धत कामवासनेला लावण्याची फारच थोड्यांची तयारी असते. कारण स्वत:च्या अनुभवांचा जबरदस्त पगडा पुरुषांच्या मनावर असतो. तो पूर्वग्रह क्षणभरही त्यांना बाजूला ठेवता येत नाही. त्यामुळे पुष्कळ आधुनिक म्हणवणारे लोकही या बाबतीत आधुनिक नसतात. कामवासनेकडे बघण्याचा दृष्टिकोनच वाकडा त्यामुळे या विषयात विचारच सरळ करता येत नाही. म्हणून मग तो विषयच घाणेरडा, अश्लील समजून आपण त्याचा विचारच करत नाही, अशी समजूत करून घेतात. दुसरीकडे धर्म व पावित्र्य या असंबद्ध बाबी घुसडतात आणि प्रजोत्पादनाचा उद्देश असल्याशिवाय समागम करता कामा नये. वगैरे हास्यापद विधान करून स्वत:ची फसवणूक करून घेतात.' र. धों. चं असं स्पष्ट मत होतं.

कामसुखात पाप किंवा त्याचं मुख्य प्रयोजन फक्त पुनरुत्पादन असं मानणाऱ्या संस्कृतीत कामक्रीडांची श्रेणीबद्ध विभागणी होते. वैवाहिक कामसंबंध श्रेष्ठ, विवाहबाह्य कलंकित, हस्तमैथुन, समलिंगी संबंध दुय्यम, स्व किंवा परपीडानांसारख्या लैंगिकक्रिया नीच म्हणून विकृत ठरवल्या जातात. त्यामुळे व्यक्तीच्या लैंगिक सहजप्रेरणांचं दमन होतं. समाजमान्य नसल्यामुळे अनेकदा अशा लैंगिक सहजप्रेरणा वेड्या-वाकड्या मार्गाने बाहेर पडतात आणि त्यातून लैंगिक गुन्ह्यांचं प्रमाण वाढतं त्यात स्त्रिया सर्वाधिक भरडल्या जातात असं मानलं जात होतं. मात्र आता हिजडे, लिंगबदल केलेले, समलिंगी, क्विअर आदी समूहाचं पण शोषण कसं होतं हे उजेडात येऊ लागलं आहे.

काम हा पुरुषार्थ स्त्री-पुरुषांच्या (आणि आता इतरही) संप्रयोगाधीन (संस्काराधीन) असल्यामुळे त्यांना 'काम'विषयीचं ज्ञान देणं आवश्यक आहे. माणसांत परस्परांविषयी प्रेम वाटणं आवश्यक असतं व ते संपादन करण्याचे उपाय सांगणारं शास्त्र निर्माण करणं त्यामुळे आवश्यक आहे. 'काम हाच मनुष्याच्या ठिकाणी अर्थ-अनर्थ, सुख-दु:ख, जय-पराजय निर्माण करतो.' गृहस्थाश्रमी स्त्री-पुरुषांची संसार यात्रा सुखाची व्हावी यासाठी कामसूत्रम हा ग्रंथ वात्स्यायनाने लिहिला, कामवासना अधिक भडकावी म्हणून नव्हे हे प्रथम लक्षात घ्यायला हवं. स्त्रीची कामवासना व प्रतिसाद पुरुषापेक्षा कमी किंवा जास्त असतो असं म्हणण्याऐवजी तो वेगळा असतो असंच म्हटलं पाहिजे. तो पुरुषाप्रमाणे जननेंद्रियात केंद्रीभूत झालेला नसून सर्व शरीरभर पसरलेला असतो व त्यामुळे स्त्रीला प्रत्यक्ष समागमापेक्षा चुंबनालिंगनादी बाह्यप्रकार अधिक प्रिय असतात. त्वचा हा सर्वांत महत्त्वाचा लैंगिक आनंद देणारा अवयव आहे. मुख्य म्हणजे लैंगिकता दोन मांड्यांत-जननेंद्रियात नसते तर मेंदूत असते हे लक्षात घेण्याचा आग्रह स्त्रीचळवळीने धरला आहे.

कामसुख घेणं हा अपराध नाही त्यामुळे त्या संदर्भातला अपराधगंड प्रथम काढून टाकायला हवा. त्यामुळे स्त्री-पुरुष आणि इतर यांच्यातले नातेसंबंध निकोप व्हायला मदत होईल. वात्स्यायनाने सांगितलेल्या अनेक मुद्द्यांवर आता आधुनिक तज्ज्ञमंडळीही सहमती दर्शवत आहेत. उदाहरणार्थ, कामसुखाचे शिखर गाठण्यासाठी शरीर सुदृढ असणं, मन आनंदी असणं, एकमेकांवर प्रेम असणं व परिसर स्वच्छ असणं आवश्यक आहे. संभोगापेक्षा प्रेम व कामक्रीडेला अधिक महत्त्व दिलं जावं.

स्त्रीची कामतृप्ती आधी होऊ द्यावी. वात्स्यायन म्हणतो लग्नानंतरच्या पहिल्या तीन रात्री वधूवरांनी ब्रह्मचर्य पाळावं, त्यानंतर आठवडाभर एकांतात रोज रात्री एकमेकांशी मृदु संभाषण करावं, चुंबन घ्यावं पण ब्रह्मचर्य भंग होऊ देऊ नये. परस्परांचा परिचय, आदर, विश्वास निर्माण झाल्याशिवाय व भीती नाहीशी झाल्याशिवाय समागम सुखावह होणार नाही.


दुसऱ्याच्या सुखासाठी झटणं हे कामशास्त्राचं मुख्य नीतीतत्त्व आहे. त्याकडे लक्ष वेधून स्त्रीच्या सुखांवर समागमाचे नियम बसवणाऱ्या वात्स्यायनासारख्या प्राचीन पौर्वात्य विचारवंताचा र. धों. नी गौरव केला कारण लॅटिन व ग्रीक भाषेत या संदर्भात लेखन करणाऱ्या पाश्चिमात्य तज्ज्ञांनी केवळ पुरुषाच्या सुखासच महत्त्व

दिलं. कामभावनांच्या आविष्काराला संयम आणि विवेकाची जोड हवी. विवेकी आचरण आत्मकेंद्रित नसतं तर आपल्याबरोबर दुसऱ्यांच्या भावनांचा, सुखाचा आदर करतं. विवेकवादात माणसाचं हित व प्रतिष्ठा आचरणाच्या केंद्रस्थानी असते. धार्मिक श्रद्धेची जागा घेणारं हे तत्त्वज्ञान आहे. मानवी सुखी जीवनासाठीचं हे तत्त्वज्ञान केवळ भौतिक सुख सांगणारं नाही तर नैतिक, भावनिक-बौद्धिक, विवेकशील सुखाचा आग्रह धरतं.

धर्मव्यवस्थेने मानवी लैंगिकतेला नीतिमत्तेच्या, पाप-पुण्याच्या, पवित्र-अपवित्रतेच्या चौकटी बहाल केल्या आणि पितृसत्ताक पुरुषप्रधान व्यवस्थेने पुरुषकेंद्री, पुरुषांचे हितसंबंध सांभाळणाऱ्या नियमांवर आधारलेल्या मानवी लैंगिकतेचा स्वीकार केला. भिन्नलिंगी लग्नांतर्गतच प्रजननावर भर असलेल्या, स्त्रीच्या एकतर्फी एकनिष्ठेवर आधारलेल्या पुरुषकेंद्री नियमांच्या जटिल विळख्यात स्त्रीची लैंगिकता अडकवली गेली. मातृत्व ही स्त्रीची निसर्गदत्त अलौकिक शक्ती आहे पण मातृत्वाला विवाहाच्या दावणीला बांधल्यामुळे योनिशुचिता, बलात्कार, पतिव्रता, सती आदी पुरुषप्रधानतेचे आविष्कार समाजात जागोजागी दिसतात. लैंगिकतेसंदर्भातल्या दुटप्पी नैतिकतेने स्त्रीप्रश्न गहन, गंभीर झाला आहे याचं भान स्त्रीचळवळीने जागं केलं.

लिंग जन्माने मिळतं आणि लिंगभाव म्हणजे बाईपणा, पुरुषपणा आणि इतरपणा सर्व सामाजिक, सांस्कृतिक रचित आहे. म्हणजे बाई, योनी आहे म्हणून पण बाईपणा म्हणजे बाईने नाजूक सुंदर दिसावं, भावनाप्रधान, संवेदनशील, प्रेमळपणे नातेसंबंध जोपसण्याला प्राधान्य द्यावं, लग्न-मुलं-कुटुंब याला अग्रक्रम द्यावा. ती दुबळी असते त्यामुळे तिला संरक्षक कुणीतरी असावा - वडील, भाऊ, नवरा, मुलगा इत्यादी इत्यादी हे समाज आणि संस्कृतीनं ठरवलेलं तिनं मान्य करावं. याउलट पुरुष म्हणजे लिंग असणारा पण पुरुषपणा म्हणजे मर्द गडी, बलदंड, तार्किक, असंवेदनशील, कर्ता-धर्ता, कमावता, संरक्षण करणारा कुटुंबाचा मालक! लैंगिकतेचं पितृसत्ताक पुरुषप्रधान राजकारण बाईपणा, पुरुषपणा आणि इतरपणाचे घट्ट साचे अशा प्रकारे तयार करून व्यक्तींना माणूसपणाला पारखं करतं. याविरुद्ध स्त्रीचळवळ गेली अनेक दशकं संघर्ष करत आहे.

माणसाच्या नैतिक भावनेचा उगम धर्मात वा दैवीशक्तीत नाही. मनुष्य स्वभावाच्या उत्क्रांतीमध्ये विकसित झालेली, जीवनधारणेला उपयुक्त ठरणारी नैसर्गिक प्रवृत्ती असं नैतिक भावनेकडे बघायला हवं. कोणत्याही नैसर्गिक प्रवृत्तीला वाव मिळाला तर मनुष्याला समाधान वाटतं, तर परपीडनाने दु:ख! नैतिकतेचा पाया असणारी सद्सद्विवेकी बुद्धी ही दैवी देणगी वगैरे नाही तर नैसर्गिक उत्क्रांतीत निर्माण झालेली व व्यक्तीचं जीवन यशस्वी व समाधानी करणारी ती एक मन:प्रवृत्ती आहे. हे लक्षात घेतलं की नैतिकता ही लिंगातीत, जातीतीत, धर्मातीत आहे असंच आकलन होणं सोपं जातं. याचा अर्थ अनैतिकतेची बीजं शोषणात म्हणजे पर्यायाने विषमतेत असतात हे गृहीतक आहे. जिथे जिथे विषमता-शोषण तिथे तिथे अनैतिकता असं मान्य केलं की विवाहसंस्थेतल्या पर्यायानं कुटुंबातल्या विषमताधिष्ठित अनैतिकतेला रोखठोकपणे प्रश्न विचारण्याचं बळ स्त्रियांना येणं आवश्यक आहे. त्यातून जबरदस्तीने पत्नीशी लैंगिक संबंध ठेवणारा नवरापण दोषी ठरतो कारण ते संबंध अनैतिक आहेत. प्रस्थापित व्यवस्थेत विवाहांतर्गत सर्व संबंध पवित्र-नैतिक मानले जातात आणि विवाहबाह्य यच्चयावत संबंध अनैतिक यातून मातृत्वाचं अमानुष वर्गीकरण करून विवाहांतर्गत मातृत्व पवित्र आणि विवाहबाह्य मातृत्व अपवित्र-अकुलीन. वेश्येकडे जाऊन लैंगिकसुख घेणारे पुरुष उजळ माथ्याने राहतात. मात्र वेश्या स्वत: अनैतिक, कलंकित स्त्री समजली जाते. याविरुद्ध स्त्रीचळवळीने आवाज उठवला.



स्त्रियांविरुद्ध तसंच हिजडे, समलिंगी संबंध असणाऱ्या व्यक्ती, ट्रान्सजेंडर आदी समूहांवरही लैंगिक अत्याचार मोठ्या प्रमाणावर होताना दिसतात. याचं मुख्य कारण म्हणजे लैंगिकतेकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन. लैंगिक गुन्ह्याचं प्रमाण कमी होण्यासाठी हा नकारात्मक दृष्टिकोन बदलून तो सकारात्मक व्हायला हवा. लैंगिकतेला पितृसत्ताक पुरुषप्रधान व्यवस्थेच्या नैतिक चौकटीतून मोकळं करायला हवं. कारण जास्तीत जास्त ढोंगीपणा समाजात लैंगिक गोष्टीत आढळतो. लैंगिकतेकडे सकारात्मक दृष्टीने बघण्यासाठी सेक्स पॉझिटिव्ह हे विल्यम रीज यांचं तत्त्वज्ञान मदतीचा हात देऊ शकेल. सेक्स पॉझिटिव्ह हे एक सांस्कृतिक तत्त्वज्ञान आहे. खरं तर लैंगिकता हे सृष्टीतलं मूलभूत तत्त्व आहे. फुलं बहरणं, वृक्ष फळा-फुलांनी लगडणं, पक्ष्यांचं कूजन हे सर्व लैंगिकतेचे मनोहारी-लोभस आविष्कार आहेत. मग माणसांच्या बाबतीतच हा अपवाद का? म्हणजे लैंगिकतेचा

आविष्कार गलिच्छ, घाण, अश्लील असं का मानायचं? असा प्रश्न हे तत्त्वज्ञान विचारतं. लैंगिक हिंसाचाराचं, गुन्ह्याचं मूळ कारण पोर्नोग्राफी नाही, तर त्याला बंदी घालून प्रचंड प्रमाणात कामेच्छेचं होणारं दमन हे आहे. नग्नता व लैंगिकता यांचं जवळचं नातं अहे. सत्य नग्न असतं. सत्य म्हणजे विशुद्ध नैतिकता! तिच्या शोधात व्यक्तीला आणि समूहाला काय श्रेयस्कर, काय योग्य याचा उलगडा होतो. सर्व मानवांच्या प्रती प्रेमभावना ही सत्याच्या शोधासाठी पूर्वअट आहे. सत्याच्या शोधाच्या मार्गात कोणत्याही प्रकारची हिंसा वर्ज्य आहे. हे लक्षात घेऊन लैंगिकतेचा शोध घेणं माणसाचं आयुष्य उन्नत करणारं असेल हा विश्वास ठेवत लैंगिकतेवर मनमोकळी चर्चा व्हायला हवी. लैंगिकतेविषयीचा दांभिकपणा, ढोंग यातून गळून पडेल आणि समाजाची लैंगिकतेसंदर्भात निकोप मानसिकता तयार व्हायला मदत होईल.

समाजाची मानसिकता बदलण्यासाठी तथाकथित मुख्य प्रवाहात LGBTIQA समुदायांना सन्मानाने सामावून घ्यायला हवं. यासंदर्भात ३ जून २०१८ला पुण्यात जंगली महाराज रस्त्यावरच्या संभाजी पार्कपासून आयोजित केलेल्या 'प्राइड परेड' या आनंद सोहळ्यातला माझा अनुभव सांगायला हवा. पुण्यातल्या 'समपथिक' या संस्थेचे संस्थापक डॉ. बिंदूमाधव खिरे यांच्या पुढाकाराने LGBTIQ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि त्यांना साथ देणाऱ्या सर्वांसाठी ही 'प्राइड परेड' आयोजित केली होती. L- म्हणजे लेस्बियन - समलैंगिक संबंध असणाऱ्या स्त्रिया, G- गे - समलैंगिक संबंध असणारे, B- उभयलिंगी संबंध असणाऱ्या व्यक्ती, T - ट्रान्सजेंडर शरीरानं पुरुष असूनही ज्याचं मन आपण स्त्री म्हणून जगावं असं उत्कटपणे सांगत असतं किंवा उलट शरीरानं स्त्री असूनही मनानं पुरुष म्हणून जगावं असं वाटून आपण पुरुषच आहोत म्हणजे ज्या व्यक्ती असं खूप सारं वैविध्य लैंगिकतेच्या आवडी आणि ओळखीसंदर्भात आहे. आपण मात्र भिन्नलिंगी शरीरसंबंध असणाऱ्या स्त्री-पुरुषांनाच 'नॉर्मल' मानतो अणि बाकीच्यांना बाद करतो, त्यांना 'अबनॉर्मल' मानतो. ही आपली घोडचूक आहे हे प्रत्ययकारीपणे या प्राइड परेडमध्ये चालताना लक्षात आलं. घराबाहेर कुठेच 'स्त्री' म्हणून आनंदाने मोकळेपणाने वावरू शकणाऱ्या पुरुषांनी सुरेख साड्या नेसून दागदागिने घातले होते. हसत-नाचत 'प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं सेम असतं, आय ॲम गे. दॅट्स ओके!', 'आय ॲम लेस्बियन. दॅट्स ओके!' कौनसा कानून सबसे बद्तर, तीन सौ सत्हत्तर, तीन सौ सत्हत्तर!' असे घोषणाफलक हातात घेऊन ही मंडळी मुक्तपणे आनंदानं घोषणा देत होते. या सर्व मंडळींच्या घरात आणि घराबाहेर बहुतांश वेळेला अपमान, उपेक्षा आणि छळ होतो हे कटू-विखारी वास्तव आहे. ते बदलण्याची 'प्राइड परेड' ही महत्त्वाची कृती आहे. आम्ही आहोत तुमच्याबरोबर हे सांगताना मन भरून येत होतं.

लैंगिकतेचा संबंध लिंगभावाशी आहे. लिंगभावाचा संबंध भांडवलशाही, धर्म, जात, वर्ग यांच्याशी आहे कारण लिंगभाव सामाजिक, सांस्कृतिक रचित आहे. हे बदलण्यासाठी 'मिळून साऱ्याजणी' मासिकाने 'स्त्रियांनी आणि पुरुषांनी स्वत:शी आणि परस्परांशी नव्याने संवाद साधावा यासाठी...' ही मासिकाची टॅगलाईन तिसाव्या वर्षात बदलली. 'ती, तो आणि त्यापलीकडचे सर्व ते यांचा स्वत:शी आणि परस्परांशी नव्यानं संवाद साधावा यासाठी...' अशी नवी टॅगलाईन केली. ती अनेकांना आवडली. मात्र साऱ्याजणीचे सल्लागार जमीर कांबळे जे स्वत: गे आहेत त्यांना ही टॅगलाईन खटकली. ती, तो, ते या प्राधान्यक्रमाबरोबरच त्यांनी टॅगलाईनमधल्या 'पलीकडचे' या शब्दाला आक्षेप नोंदवला. आता मिळून साऱ्याजणी मासिकाची नवीन टॅगलाईन आहे 'ती', 'ते' आणि 'तो' यांचा स्वत:शी आणि परस्परांशी नव्यानं संवाद... मासिक नव्हे चळवळ!

आजवर आपण माणसांकडे स्त्री आणि पुरुष या दोनच भिंगातून पाहण्याची चूक केली. ही चूक सर्व पातळ्यांवर सर्वांनीच लवकरात लवकर सुधारायला हवी. आणि यासाठी विशेष प्रयत्न करायला हवेत म्हणून 'साऱ्याजणी' मासिकाने तिसाव्या वाढदिवसाला प्रसिद्ध अभिनेत्री, दिग्दर्शक नंदिता दास बरोबरीने ट्रान्सजेंडर सोनाली दळवी यांच्या हस्ते मासिकाचं प्रकाशन केलं. ट्रान्सजेंडरसाठी काम करणाऱ्या, एका प्रथितयश माहिती तंत्रज्ञान कंपनीत एचआर विभागात काम करणाऱ्या सोनाली दळवींचं पारदर्शी, प्रामाणिक मनोगत संपूर्ण सभागृहाचं मन हेलावून सोडणारं होतं.

त्या साऱ्याजणीबरोबर जोडलेल्या आहेत. मिसा सामाजिक पालकत्वासाठी त्या काम करत आहेत. त्यांच्या लैंगिकतेच्या इंद्रधनुवाल्या बँडशी साऱ्याजणी मासिक आता मनानी आणि विचाराने जोडलं गेलं आहे. लैंगिकतेसंदर्भात असलेली 'अळी मिळी गूप चिळी' तोडून लैंगिकतेवर मनमोकळी, सघन चर्चा व्हावी, संवाद घडावा यासाठी मिळून साऱ्याजणी मासिकात सप्टेंबर २०२१ पासून हॅश टॅग लैंगिकता हा विशेष विभाग जमीर कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केला आहे. यात आपण सर्व सहभागी होऊन लिंगभाव, लैंगिकता आणि नैतिकता यासंदर्भात बोलते, लिहिते होऊयात ना? यातून लैंगिकतेसंदर्भातलं ढोंग, चोरटेपणाचं मळभ दूर होऊन आपला समाज निकोप, अहिंसक, निरामय व्हायला मदत होईल असा विश्वास वाटतो. तुम्हाला काय वाटतं, कळवाल?


सोन्याहून सोनेरी
हिऱ्याहून तेजस्वी
यंदाची दिवाळी
अनोखी दिवाळी
॥ शुभ दीपावली ॥
PNG JEWELLERS
आनंदाचा जवळचा पत्ता
टोल फ्री नं: १८०० २३३ ५००५ (सकाळी ११ – संध्याकाळी ७)
www.pngjewellers.com
भारत । अमेरिका । दुबई



# संतांचा अद्वैत विचार

## एक व्यापक दृष्टिकोन

**अभिलाष चौधरी**
सामाजिक कार्यकर्ता

मानवी जीवनप्रवाहाच्या उत्क्रांतमय प्रवासात मानवाच्या एकूण नैसर्गिक गुणधर्मांमध्ये जे जे बदल घडत गेले आहेत त्या बदलांमुळे मानवाने आपली एक विशिष्ट अशी जीवनपद्धती तयार केली आहे ज्याला त्याने संस्कृती असे नाव दिले. याच संस्कृतीतून पुढे अनेक अशा सृजनात्मक घटना घडत गेल्या. ज्यात नवनवीन भाषा, वेशभूषा, कला, साहित्य, उपासना पद्धती इत्यादींचा समावेश होतो. परंतु हे सर्व घडत असतानाच पितृसत्ताक विचारधारेने प्रेरित झालेल्या समाजातील विशिष्ट घटकाने यात पुरुषी वर्चस्व प्रस्थापित केले, परिणामस्वरूप मानवी समाजात लिंगभेद व त्यातूनच लिंगभाव भेदाचा जन्म झाला. पितृसत्ताक समाजपद्धतीनुसार स्त्रीसुलभ भावनांचा पुरुषांनी अंगीकार केल्यास, त्यांस सामाजिक मानहानी व तुच्छतेला सामोरे जावे लागले. समाजात मर्दानगीचे थैमान इतके वाढले की, हिंसेशिवाय राज्याचा कारभार होणे अशक्य आहे असे येथील राज्यकर्त्यांना वाटू लागले.

भारतातील तसेच जगभरातील राजा-महाराजांच्या क्रूर युद्धांचा इतिहास (अपवाद वगळता) हा जणू हिंसा, अराजकतेनेच बरबटलेला आहे की काय असे आपल्याला वाटते. पुरुषप्रधान संस्कृतीने या मर्दानगीच्या बळावर मानवी जीवनपद्धती आणि त्यातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य जणू नष्ट केले होते असे प्रतीत होते पण ही परिस्थिती कायम स्वरूपाची नव्हती.

भारतात प्रामुख्याने अवैदिक म्हणवणाऱ्या घटकांमध्ये जैन, बौद्ध आणि भक्तीमार्गी संतांनी आपल्या शाश्वत तत्त्वज्ञानाने, आध्यात्मिक विचारांनी या अराजक समाजावर शांती, संयम, उदारता, समता आणि अहिंसा इत्यादीचे संस्कार केले. ज्यात स्त्री-पुरुष समानतेला प्राधान्य दिले. पुढे या समतेच्या चळवळीत अनेक भक्तीमार्गी संतांनी यात प्रमुख भूमिका बजावली होती. लिंगभाव समतेच्या दिशेने वाटचाल करत असताना इस्लामी संतांनी आणि भारतीय संतांनी विशेषतः वारकरी, वैष्णव आणि सूफी संतांनी आपल्या अद्वैताचा डंका संपूर्ण भारतभर पिटला आणि स्त्री-पुरुष हे भिन्न नसून प्रत्येक स्त्रीच्या ठायी पुरुषत्व आणि प्रत्येक पुरुषामध्ये स्त्रीत्वाचे गुण असतात असे आपल्या अमोघ वाणीतून आणि रसाळ शब्दांतून वर्णन केले व त्याची जाणीव समाजातील प्रत्येक घटकाला करून दिली.

**सूफी पंथाची दृष्टी :**

इस्लाममध्ये शिया आणि सुन्नी पंथांप्रमाणे सूफी ही एक स्वतंत्र शाखा व पंथ समजला जातो. उदारता, समता, लोकाभिमुखता तसेच मध्यस्थविना ईश्वर उपासना हे या पंथाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. ईश्वर हा निर्गुण निराकार आहे, तो माझा पिता वा माता नसून ईश्वर ही माझी प्रेयसी वा प्रियकर आहे हा नवा विचार घेऊन सूफी संतांनी भक्तीमार्गाला एक शृंगारिकता प्राप्त करून दिली. या भक्तीभावनेतून सूफी संतांनी अनेक अशी काव्ये रचली. सूफी तत्त्वज्ञानामुळे समाजातील सामान्य लोकांच्या भावविश्वात नवी भर पडली. ईश्वर हा स्त्री-पुरुषांमध्ये कुठलाच भेद करीत नाही, मी परमेश्वराची प्रेयसी आणि तो माझा प्रियकर हा भावानुबंध सूफी संप्रदायातील संतांनी समाजात प्रस्थापित केला. हे तत्त्वज्ञान तृतीयपंथी समुदायाला त्यांच्या भावविश्वात जगण्यासाठी उपयोगी ठरेल.

**भारतीय संतांची दृष्टी :**

भारतीय संस्कृतीत विशेषतः सामाजिक आणि सांस्कृतिक जगतात भक्तीमार्गी संतांनी अमूल्य योगदान दिले आहे. इस्लामी संतांप्रमाणे भारतातील वारकरी, वैष्णव, सूफी इत्यादी संप्रदायातील संतांनी आपल्या अमोघ वाणीतून ज्ञान, भक्ती, समता, अहिंसा, वात्सल्य इत्यादी गुणांची शिकवण दिली आहे. याखेरीज आपल्या शृंगारिक काव्यातून मधूर अशी भक्ती परंपरा त्यांनी सुरू केली. त्यांच्या या भक्तीमार्गाला मधुराद्वैत भक्ती असे संबोधले जाऊ लागले. या भक्ती परंपरेमध्ये श्री मध्वाचार्य हे या संप्रदायाचे संस्थापक होते. लिंग विपर्यासाच्या पुढे जाऊन परमेश्वर हा माझा प्रियकर आणि भक्ती म्हणजे त्याची प्रेयसी अशा मधूर भावनेतून मधुराद्वैत भक्तीचा उदय झाला.

भागवत धर्मामध्ये श्री कृष्ण ही आराध्य देवता मानली आहे. मधुराद्वैत संप्रदाय ही भागवत धर्माशी संलग्न असल्याने या शाखेमध्ये कृष्णाला सगुण साकार स्वरूपात पूजले जाते. भारतात वैष्णव, गौडवैष्णव, वारकरी, सूफी संप्रदायातील संतांनी आपल्या अनेक भक्तीमय रचना श्री कृष्णासाठीच रचलेल्या दिसून येतात. या रचनांमध्ये हे संत कृष्णभक्ती करताना स्वतःला श्री कृष्णाच्या गौळणी संबोधून सखी या भावनेतून आपले भाव व्यक्त करताना निदर्शनास येते.

**संतांच्या अलौकिक काव्यरचना :**

संतांची ओळख ही भक्तीपुरती मर्यादित नसून कवी आणि साहित्यिक म्हणूनदेखील त्यांची विशेष ओळख आहे. संतांनी आपल्या शब्दसामर्थ्यातून विपुल अशा वाङ्मयीन रचना केल्या आहेत. संतांच्या काही काव्यरचना या इतक्या शृंगारपूर्ण आहेत की ते वाचत असताना जणू हा भक्त आणि परमेश्वर यांच्यातील संवाद नसून प्रेयसीने प्रियकरासाठी केलेली आर्तता आहे असे वाटते.

> **या सगळ्या विराण्या, गवळणी, भारूड, दोहे लक्षात घेता आपल्या असे निदर्शनास येते की, या सर्व संत मंडळींनी लिंगभाव भेदाभेदाला दूर सारून अंतःकरणातील संवेदनशीलतेला, सोज्वळ भावनांना आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला प्राधान्य दिले. कुठल्याही सामाजिक रूढी, बंधने, पारंपरिक धारणा जसे की पौरुषत्व, जाळ्यात न अडकता खुलेपणाने आपल्या भावनांना प्रकट केले.**

मराठी वाङ्मयात संत ज्ञानेश्वर हे मुकुटमणी मानले जातात. वैराग्य मूर्ती आणि संन्यस्त वृत्तीचे ज्ञानेश्वर जेव्हा कवी म्हणून व्यक्त होतात तेव्हा ज्ञानेश्वर हे ज्ञानेश्वर राहत नसून आपल्या प्रियकराच्या भेटीसाठी तडफडणारी स्त्री असते अशा विरहिणीच्या करुण शब्दांत ज्ञानेश्वर आपल्या परमेश्वरासवे संवाद साधतात. ज्ञानेश्वरांच्या काही निवडक विराण्यांमधून ते स्वतःला प्रेयसीच्या रूपात व्यक्त करताना दिसतात.

*घनु वाजे घुणघुणा । वारा वाहे रुणझुणा ।*
*भवतारकु हा कान्हा । वेगीं भेटवा कां ॥१॥*
*चंदनाची चोळी । माझे सर्व अंग पोळी ।*
*कान्हो वनमाळी । वेगीं भेटवा कां ॥३॥*
*दर्पणी पाहतां । रूप न दिसे वो आपलें ।*
*बाप रखुमादेवीवरें । मज ऐसें केलें ॥६॥*

प्रस्तुत ओवीत कवी ज्ञानेश्वर म्हणतात घनु म्हणजे घुंगरू, घुंगराचा आवाज घुणघुणतो, वारा सोसाट्याने वाहू लागतो हे बघून प्रेयसीला तिच्या प्रियकराला श्रीकृष्णाला वेळ न घालवता भेटावेसे वाटतेय. कवी म्हणतो की, माझ्या अंगावर जी चोळी आहे चंदनाची आहे, पण चंदनदेखील अंतःकरणातला दाह शांत करू शकत नाही तो कान्होवनमाळी मज लवकर भेटवा हो. आणि काव्याच्या शेवटी कवी म्हणतो की मी आरशात जेव्हा माझे प्रतिबिंब बघायला गेले तेव्हा मला तेथे बाप रखुमादेविवराचेच रूप दिसते आहे.

प्रस्तुत काव्यातील या निवडक ओव्यांचा सारांश बघता आपणाला हे निदर्शनास येते की संत ज्ञानेश्वर हे आपल्या भक्तीपर रचनांमध्ये विरहिणीच्या रूपाने आपल्या भावना प्रकट करताना दिसतात. हे ज्ञानेश्वरांच्या काव्याचे वेगळेपण आहे. यासारख्या कित्येक विराण्या ज्ञानेश्वर माऊलींनी रचल्या आहेत ज्यात हळुवारता, सोज्वळता, विरह, माधुर्य अशा अनेक सूक्ष्म भावनांचा अंतर्भाव केलेला दिसून येतो. संत ज्ञानेश्वर यांनी आपल्या विराण्यांमधून गृहिणी, प्रेयसी इत्यादी रूपक वापरून या विराण्यांची रचना केली आहे.

***पडिलें दूरदेशी । मज आठवे मानसीं ॥१॥***
***नको हा वियोग । कष्ट होतात जिवासी ॥२॥***
***दिनु तैसी रजनी । मज जाली गे माये ॥३॥***
***अवस्था लावुनि गेला । अजुनी कां न ये ॥४॥***
***गरुड-वाहना गंभीरा । येईं गा दातारा ॥५॥***
***बाप रखुमादेवी-वरा । श्रीविठ्ठला ॥६॥***

प्रस्तुत विराणीमध्ये कवी ज्ञानेश्वर आपल्या मनातील व्यथा व्यक्त करताना प्रियकरापासून दूर असलेल्या प्रेयसीच्या अंत:करणातील भावना तसेच तिच्या वेदना अत्यंत सूक्ष्म रीतीने हेरून ते काव्य स्वरूपात रेखाटतात.

महाराष्ट्रीय संतमंडळींमध्ये संत नामदेव आणि संत एकनाथ महाराज यांच्या गौळणी, भारुडे प्रसिद्ध आहेत. या भारुडांच्या माध्यमातून या संतांनी समाजातील दांभिकतेवर ताशेरे ओढले आणि समाजाला सन्मार्गाची शिकवण दिली.

संत एकनाथ महाराज आपल्या एका भारुडामध्ये म्हणतात की,

***या शेजारणीनं बरं नाही केलं ग बया ।***
***मला पंढरीला नेलं ग बया ॥***
***पंढरीची वाट लय अवघड ।***
***काय सांगू जीवाची परवड ॥***
***एका जनार्दनी पंढरीची वारी ।***
***वारी नं केली तारांबळ भारी ॥***

प्रस्तुत भारुडामध्ये एकनाथ महाराज हे स्वत:ला स्त्री संबोधतात आणि आपली व्यथा मांडताना एका काल्पनिक महिलेचे पात्र उभे करून हे भारूड रचतात, असे आपल्या लक्षात येते.

संत एकनाथ महाराजांनी अशा अनेक भारुडांची रचना केली आहे ज्यात ते स्वत:ला स्त्री संबोधताना दिसतात.

उदाहरणार्थ,

***दादला नको ग बाई ।***
***मला नवरा नको ग बाई ॥***
***मोडकंच घर, तुटकंच छप्पर ।***
***अवं मोडकंच घर अन् तुटकंच छप्पर ॥***
***अवं पन ऱ्हायला घरंच नाही ।***
***दादला नको ग बाई ।***
***एका जनार्दनी समरस झाले ।***
***पण तो रस येथे न्हाई ।***
***मला दादला नको ग बाई ॥***

या भारुडामध्ये एकनाथ महाराज हे नवविवाहित स्त्रीच्या भावना व्यक्त करताना दिसतात.

मराठी संतांप्रमाणे हिंदी आणि उर्दू संतदेखील परमेश्वराशी संवाद साधत असताना स्वत:ला प्रियकर आणि आपल्या ख्वाजाला प्रेयसीच्या रूपात बघून आपले भाव प्रकट करताना दिसतात.

हिंदी भाषेतील प्रसिद्ध कवी तसेच उर्दू भाषेतील ज्येष्ठ शाहीर अमीर खुसरो हे भारतातील सूफी संप्रदायातील चिश्ती पंथाचे अनुयायी होते. भारतातील चिश्ती पंथाचे संस्थापक ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांनीदेखील भक्तीमार्गाला माधुर्य, बेधुंदी आणि वेदनेची जोड देऊन प्रेम आणि अध्यात्माचा सुंदर समन्वय साधला. ख्वाजा अमीर खुसरो हे याच चिश्तिया पंथाचे पायिक होते, त्यांनी आपले गुरू (उस्ताद) मेहबूब-ए-इलाही ख्वाजा निजामुद्दीन औलिया यांच्या निधनाच्यावेळी त्यांच्या प्रित्यर्थ एक काव्य रचले ज्यात ते आपला शोक व्यक्त करीत असताना म्हणतात,

***गोरी सोवे सेज पर, मुख पर डारे केस***
***चल खुसरो घर आपने, सांझ भई चहु देस***

प्रस्तुत रचनेमध्ये कवी अमीर खुसरो हे आपल्या उस्ताद (गुरू) ख्वाजा निजामुद्दीन औलिया यांच्या निधनाने शोकाकुल होऊन म्हणतात की शेजवर चेहऱ्यावर केस ठेवून प्रेयसी झोपली आहे चल खुसरो चल घरी संध्याकाळ झाली आहे.

काव्याच्या या पंक्तींचा अर्थ लक्षात घेता आपणांस जाणवते की येथे भक्त हा प्रियकर आहे आणि परमेश्वरासमान असणारे ख्वाजा प्रेयसीच्या ठिकाणी आहेत. अशा अनेक काव्य रचना ख्वाजा अमीर खुसरो यांनी रचल्या आहेत ज्यात ते स्वत:ला स्त्री समजून आपल्या ख्वाजा निजामुद्दीन औलिया यांच्यावर काव्य (कव्वाली) रचतात.

कवी अमीर खुसरो यांनी रचलेले काव्य अत्यंत प्रसिद्ध आणि गाजलेले आहे. त्या काव्यात अमीर खुसरो यांनी स्वत:ला माहेरवाशीण संबोधून ख्वाजा निजामुद्दीन औलिया यांना प्रियकर म्हणून संबोधले आहे. या काव्यातील काही ओव्या पुढे लिहिल्या आहेत.

*छाप तिलक सब छीनी रे, मोसे नैना मिलईके,*
*नैना मिलईके, मोसे सैना मिलईके,*
*बात अधम कह दिनी रे, मोसे नैना मिलईके ॥*
*छाप तिलक सब छीनी रे, मोसे नैना मिलईके,*
*प्रेम भक्ति का, मदवा पिलाई के,*
*मदवा पिलई के श्याम, मदवा पिलई के*
*प्रेम भक्ति का, मदवा पिलाई के,*
*मतवारी कर दिनी रे, मोसे नैना मिलईके ॥*
*हरी हरी चूड़ियाँ गोरी गोरी बईया,*
*गोरी गोरी बईया, कलैया पकड़ धर लिनी रे,*
*मोसे नैना मिलईके ॥*
*छाप तिलक सब छीनी रे, मोसे नैना मिलईके,*
*श्याम नाम की, मेहंदी रचई के,*
*मेहंदी रचई के,*
*मोहे सुहागन किनी रे, मोसे नैना मिलईके ॥*
*छाप तिलक सब छीनी रे, मोसे नैना मिलईके,*
*नैना मिलईके, मोसे नैना मिलईके,*
*बात अधम कह दिनी रे, मोसे नैना मिलईके,*
*छाप तिलक सब छिनी रे, मोसे नैना मिलईके ॥*

प्रस्तुत काव्य कवी अमीर खुसरो यांनी प्रेयसीच्या अंत:करणातील भाव तसेच भक्तीला शृंगारिकतेची जोड देऊन रचले आहे.

प्रेयसीच्या मनातील भावना आपला प्रियकर घरी आल्यावर तिच्या मनातले ते सूक्ष्म भाव कवी अमीर खुसरो यांनी आपल्या पुढील काव्यात व्यक्त केले आहेत. येथेही कवी स्वत:ला प्रेयसी आणि परमेश्वर हा तिचा प्रियकर आहे हा आशय व्यक्त करतो. अतिशय मोहक, सुंदर आणि संवेदनशील रीतीने कवीने प्रेयसीच्या मनातील प्रेमभाव टिपला आहे. वाटते, सर्व सुखाची प्राप्ती जणू प्रियकराच्या येण्यानेच झाली, असे भाव प्रकट करणारी ही कवी अमीर खुसरो यांची रचना

*मोरे पिया घर आए*
*ऐ री सखी मोरे पिया घर आए*
*भाग लगे इस आँगन को*
*बल-बल जाऊँ मैं अपने पिया के*
*चरण लगायो निर्धन को*
*मैं तो खडी थी आस लगाए*
*मेहंदी कजरा माँग सजाए*
*देख सुरतिया अपने पिया की*
*हार गई मैं तन-मन को*
*जिसका पिया संग बीते सावन*
*उस दुल्हन की रैन सुहागन*
*जिस सावन में पिया घर नाहि*
*आग लगे उस सावन को*
*अपने पिया को मैं किस विध पाऊँ*
*लाज की मारी मैं तो डूबी डूबी जाऊँ*
*तुम ही जतन करो ऐ री सखी री*
*मैं मन भाऊँ साजन को*

या काव्यात कवी खुसरो यांनी भक्ती, शृंगार, तसेच समरस होऊन जाण्याची भावना प्रकट केली आहे. येथे कवीला वाटते की, ती एक विवाहित स्त्री आहे. ती आपल्या नवऱ्याला भेटायला किती आतुर झाली आहे! त्याचे वर्णन करताना, ती विविध रूपके वापरून आपल्या मनातला विरह व्यक्त करते आहे असे जाणवते.

या सगळ्या विराण्या, गवळणी, भारूड, दोहे लक्षात घेता आपल्या असे निदर्शनास येते की, या सर्व संत मंडळींनी लिंगभाव भेदाभेदाला दूर सारून अंत:करणातील संवेदनशीलतेला, सोज्वळ भावनांना आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला प्राधान्य दिले. कुठल्याही सामाजिक रूढी, बंधने, पारंपरिक धारणा जसे की पौरुषत्व, जाळ्यात न अडकता खुलेपणाने आपल्या भावनांना प्रकट केले. सत्ता, संपत्तीचा मोह न बाळगता त्यांनी निष्काम कर्मयोगी वृत्तीने आपल्या साहित्याची निर्मिती केली. ही मंडळी ज्या काळात होऊन गेली तो काळ अत्यंत कठीण होता. समाज हा जातिभेद, स्पृश्य-अस्पृश्यता, सरंजामशाही, अराजकता, गुलामगिरी, दांभिकता इत्यादी सामाजिक समस्यांना तोंड देत असताना या संत मंडळींनी लिंगभाव भेदाभेद निरपेक्ष भावनेने स्वत:च्या भावनांना व्यक्त केले आहे. यात मानवाची बंधनातून मुक्ती ही उदार दृष्टी होती. हे खरे तर आजच्या अत्याधुनिक समाजाला प्रेरकच ठरणारे आहे. सारांश हाच की, आपण आज २१व्या शतकात आधुनिक युगात पदार्पण करूनसुद्धा जर पितृसत्ताक मर्दानगीचाच विचार करीत असू, आणि आपल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला तिलांजली देत असू, तर हे सर्वस्वी आपल्यासाठी अन्यायकारक ठरेल कारण मानव जन्माला येतो तेव्हा तो जैविक दृष्टीने लिंग / योनी / द्विलिंगी म्हणून जन्माला येतो पण स्वत:चा लिंगभाव ठरविण्याचा अधिकार सर्वस्वी त्याचा आहे. निसर्गाने त्याला जसे घडवले तसेच जगण्याचा त्याला पूर्ण अधिकार आहे. आपल्या नैसर्गिक भावनांचा समाजात स्वीकार व्हावा एवढीच अपेक्षा समुदायाची आहे आणि त्या अधिकाराचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपली आहे.

# अस्तित्व


भावा बहिणींनो
नजर सतत सांगतेय तुमची
मी नाहीये तुमच्यातला
दिसतंच तुमच्या चेहऱ्यावर
आसपास ही नकोय मी तुम्हाला
रात्र खूप भावतेय आम्हास
हा काळाकुट्ट अंधार घेतो कवेत
आणि घालतो पांघरूण
आमच्या अस्तित्वावर काही तासांपुरता
सूर्य नकोच वाटतो
हा प्रकाश आयुष्यातला अंधार दाट करतो
पोट मात्र जागं करतं
अनिच्छेने सजावं लागतं
अन हसऱ्या चेहऱ्याने
सामोरं जातो रोज तुमच्या
छळणाऱ्या कुत्सित नजरांना
किती मागे सरलंय
अगदी नजरेआड गेलंय
ते हक्काचं घर हिसकावलंय
नातं प्रेम समाज
हरवलंय सगळंच
हरवलोय आम्ही तुमच्या या भीषण गर्दीत
हिरावून घेतलंय तुम्ही
आमचं नाव, ओळख
पत्ता आणि अस्तित्वही
जग बदलतं आहे
असल्या कराल घोषणा तुम्ही
सिग्नल वर
दुकानांच्या ओळीत
बाजार पेठेत
वाजणाऱ्या टाळ्या मात्र
कानावर पडत राहतील
वसुधैव कुटुंबकमच्या आड
दडलेल्या माणुसकीच्या थडग्यांना
चिरे पाडत राहतील

**प्रशांत डोळे**
***मुख्य प्रबंधक, विधी विभाग***
***सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पुणे***

# भूमाता

जमीन माझी माता
आकाश माझे पिता
ती कडकडणारी वीज म्हणजे किन्नरसारखी देवता
माता-पित्याचे प्रेम नाही कोण समजेल आम्हाला
वाट वाकडी आमची अशी
जाऊन मिळे पाताळगंगेला
गंगेची गरज भासते या सर्व प्राणीमात्राला
आमच्यासारख्या किन्नर समाजाला
कोणीजवळ करेल का हो आता...!

**दामिनी रेगडे**
***ट्रान्सवुमन***



# घुसमट

ए आई मला पावसात जाऊ दे ना।
नको नको बाळा तुला सर्दी होईल॥
ए आई मला साडी घालू दे ना।
नको नको बाबा तुला मारतील॥
ए आई मला भातुकलीचा खेळ खेळू दे ना।
नको नको मला तुला ताई ओरडेल॥
ए आई मला झगा घालून नाचू दे ना।
नको नको तुला भाऊचे मित्र हसतील॥
ए आई मला माझ्या मनासारखं जगू दे ना
नको नको तू तिथेच मरशील

**दामिनी रेगडे**

# तृतीयपंथी
## गैरसमजात अडकलेला समुदाय



**वीरेंद्र मिश्रा**
आयपीएस
*अनुवाद :* डॉ. उज्ज्वला बर्वे

तृतीयपंथी समुदायाबद्दल आपल्या समाजात सगळ्यात जास्त गैरसमज आहेत. दुर्दैवाने या समाजाला समजून घेण्याचा प्रयत्नदेखील फार कुणी केला नाही. त्याची कारणे अर्थात सर्वज्ञात आहेत. ते कुणीतरी परके, वेगळे आहेत; त्यांच्याबरोबर बोलताना कसेतरीच वाटते या भावनेमुळे त्यांना समजून घेण्यात समाज कमी पडतो. तृतीयपंथीयांना आपण समाजाच्या मुख्य प्रवाहापासून इतके दूर लोटले आहे की त्यांनी स्वत:सुद्धा आपण वेगळे आहोत हे मान्य केले आहे, आणि पिळवणूक करून घेण्यावाचून आपल्यासमोर दुसरा पर्याय नाही अशी खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली आहे. प्रश्न असा आहे की फार पूर्वीपासून त्यांना अशी वागणूक मिळत आली आहे की त्यांच्या बाबतीत होणारा भेदभाव ही अलीकडच्या काळात सुरू झालेली गोष्ट आहे? त्यासाठी अर्थातच इतिहासात डोकावून पाहावे लागेल आणि काळाच्या ओघात काही काही गोष्टी कशा बदलल्या ते समजून घ्यायला लागेल.

कोणत्या काळात काय परिस्थिती होती त्यावर एक नजर टाकू या. फार प्राचीन इतिहासाकडे पाहिले तर लक्षात येते की तेव्हा तृतीयपंथीयांना सन्मानाने वागवले जायचे. फक्त भारतातच नव्हे, तर जगात सर्वत्र. एवढेच नव्हे, तर जगाच्या वेगवेगळ्या भागांतील आदिम मूल निवासी जमातींमध्ये तृतीयपंथी पूज्य मानले जायचे. देवालयांमध्ये पुजारी म्हणून ते काम करायचे, त्यांच्याकडे असलेल्या विशेष शक्तींमुळे ते आजार बरा करू शकतात, त्यांचा आशीर्वाद फळतो अशी लोकांची श्रद्धा होती असे उल्लेख ग्रंथांमध्ये सापडतात. त्यांना मिळालेल्या ईश्वरी देणगीमुळे ते वेगळे आहेत असेदेखील लोक मानत असत.

### प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील तृतीयपंथीयांची परिस्थिती :

भारतात प्राचीन काळातील तृतीयपंथीयांना महत्त्वाचे स्थान दिले जायचे. हिंदू संस्कृतीतील महाकाव्यांमध्ये तृतीयपंथ आणि तृतीयपंथी यांविषयी अनेक गोष्टी आढळतात. तृतीयपंथ हा शब्द जरी तेव्हा वापरला जात नसला तरी काही जणांची अशी शारीरिक जडणघडण तशी असते हे तेव्हाही माहीत होते. त्यातल्या काही गोष्टींची उजळणी केली तर ते सहज लक्षात येते.

त्यातील सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे त्रेतायुगातील. विवाहसमारंभानंतर, लहान मुलाच्या जन्मानंतर त्यांना बोलावून त्यांचे आशीर्वाद का घेतले जातात ते त्या गोष्टीवरून लक्षात येते. भगवान राम जेव्हा वनवासाला निघाले तेव्हा राज्याच्या सीमेपर्यंत त्यांना निरोप द्यायला आलेल्या स्त्री-पुरुषांना त्यांनी, 'तुम्ही आता राज्यात परत जा आणि मी येईपर्यंत राज्याची सेवा करा, राज्याची काळजी घ्या' असे आवाहन केले. भगवान राम वनवास संपून अयोध्येत परत आले तेव्हा त्यांना सीमेवर काही लोक पाले टाकून राहत असल्याचे दिसले. आपण सगळ्यांना राज्यात परत जाण्याचा आदेश दिला होता, तो त्यांनी पाळला का नाही अशी विचारणा रामाने या लोकांकडे केली तेव्हा त्यांनी बिचकत बिचकत सांगितले की रामाने फक्त स्त्री-पुरुषांना परत जाण्याचा आदेश दिला होता. ते त्या दोन्हींपैकी नाहीत. त्यांना काही विशिष्ट सूचना नसल्यामुळे त्यांना काय करावे ते कळले नाही. म्हणून ते तिथेच राहिले. ते ऐकून भगवान राम त्यांच्यावर प्रसन्न झाले आणि त्यांनी 'शुभप्रसंगी तुमचे आशीर्वाद घेतले जातील' असा वर त्यांना दिला. म्हणजे या समुदायाबद्दल साक्षात भगवान रामांनाही किती आस्था होती ते लक्षात येते.

द्वापार युगात घडणाऱ्या महाभारतात तर अनेक प्रसंगांत तृतीयपंथीयांचे दर्शन घडते. विशेष म्हणजे या सगळ्या प्रसंगांत खुद्द

परमेश्वर किंवा मुख्य व्यक्तिरेखा त्या प्रसंगात सहभागी आहे.

त्यातील एक गोष्ट आहे इरावण किंवा अरावण याविषयीची. युद्ध जिंकण्यासाठी एखाद्या सैनिकाचा बळी देणे आवश्यक होते. अरावण हा अर्जुनाला नाग वंशातील उलुपी या पत्नीपासून झालेला मुलगा होता. बळी जाण्यापूर्वी आपले लग्न व्हावे अशी इच्छा अरावणने व्यक्त केली. लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी आपण विधवा होणार हे माहीत असल्याने एकही मुलगी अरावणशी लग्न करायला तयार होईना. अरावणची इच्छा पूर्ण करण्यासाठी स्वत: भगवान श्रीकृष्णांनी मोहिनी नावाच्या लावण्यवती तरुणीचे रूप धारण केले. त्या काळात पतीच्या निधनानंतर विधवा जी कर्मकांडे करत असत ती सगळी अरावणच्या मृत्यूनंतर मोहिनीने केली. दक्षिण भारतात तामिळनाडूमध्ये विल्लीपुरम जिल्ह्यातल्या कूवगम गावात कूतांदवर कोविल या नावाचे देऊळ आहे. स्वत:त शारीरिक बदल घडवून आणणे, जननक्षमता नाहीशी करणे म्हणजे शौर्य या भावनेने तृतीयपंथी या देवळात त्या गोष्टींचा उत्सव साजरा करतात.

महाभारत युद्धाचे स्वरूप पालटवून टाकणाऱ्या शिखंडीची कथा तर सर्वश्रुतच आहे. शिखंडी मुलगी म्हणून जन्माला आली होती, पण तिला मुलगा म्हणून वाढवले गेले. शिखंडीचे एका मुलीशी लग्न लावून देण्यात आले, पण त्या मुलीला अर्थातच लग्नातून शारीरिक सुख मिळत नव्हते. तिने जेव्हा शिखंडीविरुद्ध स्वत:च्या वडिलांकडे तक्रार केली तेव्हा त्यांनी शिखंडीलाच तू माझ्या मुलीला सुख देऊ शकला नाहीस तर त्याचे गंभीर परिणाम होतील असा इशारा दिला. स्थून नावाच्या एका यक्षाला शिखंडीची दया आली. त्याने ज्या दिवशी शिखंडीच्या बायकोच्या माहेरची माणसे विचारपूस करायला येणार होती त्या एका दिवसापुरते शिखंडीला पुरुष बनवले. त्यामुळे त्यांचे लग्न टिकू शकले. युद्धाच्या दरम्यान भीष्मांनी शिखंडीचे स्त्रीरूप ओळखले. स्त्रीवर बाण चालवायचा नाही अशी प्रतिज्ञा त्यांनी घेतली असल्याने शिखंडी त्यांच्यासमोर आल्यावर त्यांनी शस्त्रे खाली ठेवली. तेवढ्या वेळात अर्जुनाने भीष्मांवर शरसंधान केले आणि भीष्म खाली पडले. ज्यांच्या पराक्रमामुळे कौरवांना युद्ध जिंकणे शक्य होते ते भीष्मच पडल्याने युद्धाचा नूरच पालटला. त्याला कारणीभूत शिखंडी. दुसऱ्या एका गोष्टीत अज्ञातवासात असताना अर्जुनाने बृहन्नडेचे रूप घेतले होते असा उल्लेख आहे. बृहन्नडेचे रूप घेतल्याने अर्जुनाला पूर्वी मिळालेला एक शापदेखील पूर्ण करता आला.

अशा बदलणाऱ्या लैंगिक भूमिकांमुळे पांडवांना कौरवांवर कसा विजय मिळवता आला ते या विविध प्रसंगांमधून दिसते. सात हजार वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या रामायणातदेखील तसे उल्लेख सापडतात याचा उल्लेख आधी आलाच आहे. यांपैकी कोणत्याही ग्रंथात तृतीयपंथीयांविषयी तिरस्काराची, घृणेची भावना दिसत नाही.

अर्धनारीश्वर हे तर एकाच देहात वसणाऱ्या स्त्री आणि पुरुष तत्त्वाचे प्रतीक आहे. ते तृतीयपंथाचे प्रतिनिधित्व करते असे म्हणायला हरकत नाही. मॅककोमास टेलर यांनी त्यांच्या पुस्तकात या उभयलिंगी रूपाचा उल्लेख केला आहे. स्त्री आणि पुरुष यांचे सम्मीलन त्यातून दिसते.

गुजरातमधल्या मेहसाणा जिल्ह्यातल्या बेचराजी गावातल्या बहुचरा मातेची कथा सांगितली जाते. खच्चीकरण करणे अथवा लिंग काढून टाकणे या कृतीला तिथे निर्वाण समारंभ असे म्हटले जाते. त्याचा संबंध बहुचरा माता या देवतेशी आहे.

भगवान शंकरांना भगवान श्रीकृष्णांच्या रासलीलेमध्ये सहभागी व्हायचे होते हे दर्शवणारे गोपेश्वर महाराज मंदिर मथुरेत आहे. त्या मंदिरात शिवलिंगाला गोपीप्रमाणे वस्त्रे घातली आहेत. त्यावरून लिंगभाव किती अस्थायी आहे, लैंगिक पसंती आणि लिंगभाव यांत काय फरक आहे हे तेव्हाही लक्षात घेतले जात होते असे दिसून येते. तृतीयपंथी व्यक्तिरेखा असलेल्या अशा अनेक दंतकथा प्रचलित आहेत.

मुघलांनी सोळाव्या शतकात हिजडा हा उर्दू शब्द प्रचलित केला. सध्याच्या काळात तृतीयपंथीयांसाठी तोच शब्द वापरला जातो. मुघलांच्या राजवटीत तृतीयपंथीयांना विविध जबाबदाऱ्या दिल्या जात. राजे, त्यांचे कुटुंबीय यांचा त्यांच्यावर विश्वास असायचा. घराची, जनानखान्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली जायची. राजांबरोबरच्या त्यांच्या जवळीकीमुळे हिजड्यांनी बरीच संपत्ती गोळा केली होती. सेनापती, दरबारी, शिक्षक, राजकीय सल्लागार अशी अनेक मानाची पदे त्यांना मिळाली होती. उपलब्ध पुराव्यांनुसार हिजडा समुदाय प्रेषित महंमदाच्या कबरीचा आणि मक्केतल्या 'काबा'चा राखणदार होता असे दिसते. मराठा राज्यकर्त्यांनी त्यांना मान्यता दिली होती आणि काही वतनेदेखील त्यांच्या नावे केली होती. मराठ्यांच्या काळात हिजडा समुदायाचे लोक आचारी म्हणून काम करत, सैन्यात नोकरी करत.

इंग्रजांच्या अमलाखाली परिस्थिती बदलली. सगळ्यात प्रथम हिजड्यांना मराठा राज्यकर्त्यांनी दिलेले अधिकार इंग्रजांनी रद्दबातल केले. त्यामुळे तृतीयपंथीयांना भीक मागणे, वेश्याव्यवसाय करणे याखेरीज दुसरा मार्गच उरला नाही. जातीय व्यवस्थेत ते सगळ्यात तळाला ढकलले गेले, आणि भेदभाव, अपमान, पिळवणूक या गोष्टी त्यांच्या वाट्याला येऊ लागल्या. १८७१च्या गुन्हेगारी जमाती कायद्यान्वये त्यांची गुन्हेगारी जमात अशी नोंद झाली आणि त्यांची परिस्थिती अगदीच बिकट होऊन बसली. त्यांच्या रक्तातच गुन्हेगारी आहे असा जणू काही शिक्का त्यांच्यावर मारला गेला. त्यामुळे त्यांच्या समाजात वावरण्यावर असंख्य बंधने आली,

समाजातील इतर घटकांपासून ते आणखी आणखी लांब फेकले गेले. तोवर त्यांना समाजात असलेले स्थान एका झटक्यात पुसले गेले, आणि तिथून पुढे परिस्थिती आणखी चिघळत गेली.

तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहातून असे दूर ढकलल्याने सर्व संधींची दारे त्यांना बंद झाली, न्याय मिळण्याची शक्यता राहिली नाही. अशा व्यक्तींच्या बालपणातच त्यांना वेगळी वागणूक मिळायला सुरुवात होते. ते जन्मत:च उभयलिंगी असले तर तेव्हापासूनच किंवा काही वर्षांनी जेव्हा त्यांना आपण फक्त एका लिंगाचे नाही असे जाणवायला लागते तेव्हापासून त्यांच्यातील वेगळेपण सर्वांच्या नजरेत भरते. शाळेत इतर मुलांकडून वाट्याला येणारे अपमान, मानसिक, शारीरिक त्रास, टीका, टिंगलटवाळी यांमुळे ते शाळा सोडून देतात. आई-वडिलांनादेखील आसपासच्या लोकांकडून टोमणे ऐकायला लागले, वाळीत टाकले जाण्याची भीती वाटायला लागली की अशी मुले नको होतात. घरातल्यांकडून, नातेवाइकांकडून या मुलांवर सतत ‘एक तर बाईसारखा वाग, नाहीतर पुरुषासारखा वाग’ असे दडपण टाकले जाऊ लागते. कधी कधी त्या मुली आहेत हे दाखवण्यासाठी त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात, किंवा ते मुलगा असतील तर त्यांच्या बायकी वागण्यामुळे त्यांच्याशी अनैसर्गिक शरीरसंबंध ठेवले जातात. सर्व बाजूंनी त्यांची कोंडी होते, पिळवणूक होते; आणि त्यांचे वय वाढेल तशी परिस्थिती आणखीच बिकट होत जाते.

किशोरावस्थेत येईपर्यंत त्यांना इतके काही सहन करावे लागते की कुणाचा थोडाफार तरी आधार मिळावा म्हणून घर सोडून त्यांच्यासारख्या लोकांच्या समुदायात सामील होण्याखेरीज दुसरा पर्याय त्यांच्यासमोर राहत नाही. परंतु त्यांच्या समाजाचा पाठिंबा, आधार स्वीकारायचा म्हणजे जमेल त्या मार्गांनी पैसे कमावून समाजाला द्यायचे हा अलिखित नियम स्वीकारावा लागतो. मात्र, त्यांच्याकडे पैसे कमावण्याचे मार्गदेखील मोजकेच असतात. लग्न, बारसे या वेळी मिळणारी बधाई, देहविक्रय किंवा भीक हेच त्यांतील मुख्य मार्ग. ज्यांना कुटुंबांचा आधार असतो असे काही मोजके नशीबवान जीवच फक्त अशा अडचणींपासून दूर राहू शकतात.

**समूहशक्तीचा प्रभाव :**

तृतीयपंथीयांनी लेस्बियन, गे, बाय-सेक्शुअल आणि क्वीअर (एलजीबीटीक्यू) या समुदायाबरोबर स्वत:ला जोडून घेतले आहे. सर्वोच्च न्यायालयाचा २०१४चा नालसा निकाल म्हणजे त्यांच्या संघर्षाला मिळालेले एक यश म्हणावे लागेल. न्यायालयाच्या आदेशामुळे त्यांना प्रथमच स्वत:ची अशी ओळख मिळाली. या निकालाची परिणती तृतीयपंथी व्यक्ती (हक्कसंरक्षण) कायदा २०१९ व नियम २०२० मध्ये झाली. हा अत्यंत प्रगतशील कायदा आहे व त्याच्या नऊ प्रकरणांत तृतीयपंथीयांशी संबंधित जवळपास सर्व मुद्द्यांचा ऊहापोह करण्यात आला आहे. त्यांना ओळखपत्रे मिळवून देणे, समजा त्यांनी शस्त्रक्रिया करून घेतली तर स्त्री म्हणून की पुरुष म्हणून ओळखपत्र मागायचे ते ठरवण्याचे स्वातंत्र्य त्यांना देण्यात आले आहे. ही प्रक्रिया सोपी करण्यासाठी सरकारने एक पोर्टल तयार केले आहे व जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्यांना ओळखपत्रे देण्याचे अधिकार दिले आहेत. कामाचे ठिकाण, शिक्षण, सार्वजनिक सुविधांचा वापर या ठिकाणी त्यांच्या बाबतीत भेदभाव होऊ नये म्हणून विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. या व्यक्तींना निवाऱ्याचा हक्क आहे आणि कुटुंबीयांनी त्यांना घराबाहेर काढता कामा नये अशीही तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. आवश्यकता भासल्यास त्यांच्यासाठी स्वतंत्र निवारागृहे बांधण्याची सूचना करण्यात आली आहे. त्यांच्यावर अत्याचार व हिंसा करणाऱ्यांना शिक्षा सुनावण्याची कलमे कायद्यात अंतर्भूत आहेत. या कायद्यामध्ये केंद्र आणि राज्य सरकारांसाठी सांगितलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये तृतीयपंथीयांच्या कल्याणासाठी करण्याच्या उपाययोजना स्पष्ट करण्यात आल्या आहेत. त्यात कल्याण मंडळाची स्थापना, लिंगबदल शस्त्रक्रियांसाठी साह्य यांसारख्या उपायांचा समावेश आहे. केंद्र सरकारने राष्ट्रीय परिषदेची स्थापना करावी, त्याच्या अध्यक्षपदी सामाजिक न्याय व सक्षमीकरण खात्याचे मंत्री असावेत, व त्याचे कार्यालय राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा संस्थेमध्ये असावे असे आदेश केंद्र सरकारला देण्यात आले आहेत.

तृतीयपंथी कायद्यामुळे त्यांच्या कल्याणासाठीच्या उपाययोजनांना गती मिळाली आहे. ज्या वेगाने या क्षेत्रात बदल घडून येत आहेत ते पाहून समाधान वाटते. बिहार, छत्तीसगढ यांसारख्या राज्यांनी पोलीस दलात तृतीयपंथीयांना नोकऱ्या द्यायला सुरुवात केली आहे. काही राज्यांत मेट्रो वाहतुकीच्या क्षेत्रात त्यांना कामे मिळत आहेत. तृतीयपंथी कायद्याची ओळख सर्वांना व्हावी यासाठी राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा संस्था विविध संस्था-संघटनांसाठी चर्चासत्रे, परिसंवाद आयोजित करत आहे. तृतीयपंथी कलाकारांना पद्मश्री सन्मान देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे. अनेकांना चित्रपटांत प्रमुख भूमिका मिळतात. फॅशन उद्योगात त्यांना सहज सामावून घेतले जात आहे. एकंदरीत सगळीकडे खूप सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. एवढे बदल आजवर झाले असले तरी अजून खूप काही होणे बाकी आहे. रस्त्यावर राहणाऱ्या, ज्यांच्यापर्यंत यंत्रणा, स्वयंसेवी संस्था अद्याप पोचलेल्या नाहीत अशांची पिळवणूक थांबवण्यासाठी आणखी जोमाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याकरता सरकारबरोबरच स्वयंसेवी संस्थांनी अधिक जोमाने कंबर कसली पाहिजे. तृतीयपंथीयांच्या संस्थांनीसुद्धा त्यांच्या समुदायाच्या उत्थानासाठी चाललेल्या या प्रयत्नांना सक्रिय साथ दिली पाहिजे.



# किन्नर समाज

**सुषमा देशपांडे**
**नाट्यलेखिका, दिग्दर्शिका**

किन्नर समाजावर दिवाळी अंकासाठी लिहिणार का? या प्रश्नावर खरे तर मी काहीशी गप्पच झाले. मला प्रश्न पडला, मला असे लिहिण्याचा अधिकार आहे का? लिहायचे असा निर्णय झाल्यावर प्रश्न पडला, नेमकी कुठून सुरुवात करावी! मुंबईत, रेल्वेत, काही चौकात डोक्यावर आशीर्वादपर हात ठेवून खूप आक्रमक पद्धतीने, विशिष्ट प्रकारे टाळ्या वाजवत पैसे मागणारे हे लोक, आपल्या मनात रुजलेले चित्र इतकेच. प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर मुंबईत या मंडळींना पाहिले होते, तोवर यांचा मी फारसा विचारही केला नव्हता. या समाजाच्या आक्रमक पद्धतीमुळे कित्येक जण त्यांना घाबरत, तर एक मित्र रिक्षा सोडून पैसे मागणाऱ्या एकाच्या मागे धावत सुटला आणि किन्नर पुढे आणि हा मित्र मागे असे विचित्र चित्र अनेकांनी पाहिले. दुसरा एक मित्र मात्र म्हणायचा, ''भीक देण्याच्या मी पूर्ण विरोधात असलो तरी हिजडा समाजाला मी भरपूर पैसे देतो कारण आपण त्यांना काम देत नाही तर ते काय करणार!'' त्याच्या या म्हणण्याने खरंचच मी प्रथम या समाजाचा विचार केला.

तेव्हा किन्नर समाजाला 'हिजडा' म्हणूनच संबोधित. तेव्हा 'हिजडा' हा एक पंथ आहे, हिजडा म्हणून ते मूल जन्माला येत नाही. ट्रान्सजेंडर म्हणून जन्माला आलेले मूल वयाच्या एका टप्प्यावर 'हिजडा' हा पंथ स्वीकारते, याचे भान मला नव्हते.

माझी आणि किन्नर समाजातील काहींची प्रथम भेट २००८ साली झाली. मी सांगलीत व्हेम्प आणि संग्राम संस्थेचे नाटक बसवायला गेले होते. 'सेक्स वर्क' करणाऱ्या स्त्रियांच्या नाटकात काही किन्नर होते. 'धंदा करून' ते पोट भरत होते. ते नाटकात काम करत होते. स्थानिक पोलीस त्यांना खूप त्रास देत, वापरत. या घटना नाटकात होत्या. या मुलांचा आणि व्हेम्प संस्थेतील स्त्रियांचा रोजचा संपर्क होता. नाटकात ही मुले खूप नटून, मेकअप करून उभी राहत. का हे इतके नटतात? हा तेव्हा मला प्रश्न पडला. त्याचे नेमके उत्तर तेव्हा कोणी दिले नव्हते. मात्र या मुलांना होणाऱ्या त्रासाची नोंद तेव्हा डोक्यात झाली.

संग्राम संस्थेने तेव्हाच 'मुस्कान' नावाने एक संस्था सुरू केली होती ज्यात 'LGBTQ' समाजातील लोकांसाठी काम केले जात होते. त्यांना स्वत:ची ओळख करून देणे, 'तू एकटाच असा नाही आहेस' याचे भान देणे, त्याला मदतीचा हात देण्याचे तसेच त्याच्या घरच्या लोकांना समजवण्याचे महत्त्वपूर्ण काम ही संस्था करत होती.

काही दिवसांनी मला माझी अमेरिकन मैत्रीण बेटी बर्नाड

**शंकराने केलेले Castration ची गोष्ट वाचली जाते, मात्र ही गोष्ट पुराणात का निर्माण झाली असेल याचा विचार केला जात नाही. अर्धनारीनटेश्वराला वाकून नमस्कार केला जातो पण हे रूप का निर्माण झाले असेल, हा विचार आपण करतो का? अर्जुन बृहन्नडा म्हणून वर्षभर लपून राहिला, ही महाभारतातील गोष्ट आपल्याला माहीत असते, पण आपल्याला त्यात काही खटकत नाही. या आणि अशा अनेक कथा आपल्याला ग्रंथात मिळतात. आपण त्या कथा वाचतो. त्याचे कौतुक करतो मात्र असे मूल नको म्हणतो. का?**

हिने ''तू 'LGBTQ' गटासह नाटक करशील का? मला त्यावर Documentation film करायला आवडेल'', अशी विनंती केली. हे नाटक पुण्यात करायचे ठरले. या नाटकाच्या निमित्ताने 'LGBTQ' समूहातील मंडळींच्या भेटीगाठी सुरू झाल्या. एक वेगळेच जग उलगडत जाऊ लागले. या जगातले वेगळे प्रश्न अंतर्मुख करू लागले. गे, लेस्बियन, बाय-सेक्शुअल, ट्रान्सजेंडर सगळेच 'LGBTQ' या गटात सामील असतील तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील फरक जाणवू लागले. हे नाटक करताना जमीर कांबळे या मित्राचे मी सहकार्य घेतले. सोबत आम्ही नाटक केले.

'LGBTQ' समूहातील गे, लेस्बियन, बाय-सेक्शुअल अशी व्यक्तिमत्त्वे आपल्याला भेटली तर आपल्याला त्यांच्या 'sexuality' चा अंदाज येतोच असे नाही. (असे अंदाज करूच नाही. जजमेंटल नसावेच. पुढचा ट्रान्सजेंडर मुलांचा मुद्दा स्पष्ट होण्यासाठी मी हे म्हटले आहे.) ट्रान्सजेंडर मुले मात्र किशोरवयापासून लगेच लक्षात येऊ लागतात की हे मूल वेगळे आहे. एका वयापर्यंत मोठ्या बहिणीचा किंवा कोणाचाही फ्रॉक घालावासा वाटतो, कानात काही घालावेसे वाटते हे मर्यादित असते. मात्र एका वयात आवाज फाटतो आणि ट्रान्स व्यक्तिमत्त्वाचे आवाज वेगळे ओळखू येतात. अर्थात हा मुलगा वेगळाच आहे हे जाणवते. ते लपून राहत नाही. शाळेत या मुलांना एक अवघडलेपण येते. बरोबरीच्या मुलांपेक्षा आपण फारच वेगळे आहोत हे जाणवते. कित्येकांच्या घरातही 'नीट वाग' दटावले जाते. घरातील वातावरणात गोंधळ, शाळेतही गोंधळ यातून विचित्र एकाकीपण येते. आपण एकटेच असे वेगळे आहोत असे वाटू लागते.

'मुलगा म्हणून जन्माला आलेल्यास आतून आपण मुलगी आहोत असे वाटत असते.' 'का आहे मला हे पुरुषाचे लिंग?' हा स्वत:शीच झगडा असतो. तसेच मुलगी म्हणून जन्माला आलेल्या अशा मुलींना मी मुलगी का आहे? हा प्रश्न असतो. 'माझा नसायलाच हवा, असा हा अवयव आपल्याला चिकटून आला आहे.' या त्रासाचा अंदाज बांधणेही अवघड आहे. आपल्याच शरीराचा भाग असलेल्या अवयवाबद्दल या मुलांना होणारे क्लेश आपल्याला न समजणारे आहेत. Castration करण्याची तीव्र इच्छा इथे मूळ धरते. ज्यांच्याकडे पैसा आहे ती मुले, उत्तम प्रकारे अशा ठिकाणी castration करतात. ज्यांच्याकडे पैसे नाहीत, मात्र castration करणे मानसिक पातळीवर आवश्यच होते, त्या मुलांचे हाल होतात. घरच्यांना न सांगता castration करून घेतात. गुरू भाऊ आणि चेले अर्थात हिजडा पंथातले स्नेही मदत करतात. लिंग कापल्यावरची जागा, castration नंतर ज्या गोष्टींना ही मुले सामोरी जात असतात त्यासाठी त्यांची मानसिक अवस्था लक्षात घेऊन त्यांना काही मदत दिली जाते का? हा मोठा प्रश्न आहे. तसेच castration होणाऱ्या मुलाच्या घरच्यांची, आजूबाजूच्यांची मानसिकता याबाबत काही मदत दिली जाते का? ही मुले कशाकशाला सामोरी जातात, याचाही अभ्यास व्हायला हवा आणि ट्रान्स मुलांच्या या काळातील मदतीसाठी काही यंत्रणा उभी राहायला हवी.

पुण्यात नाटक करताना, नाटकात काम करणाऱ्याने आपला अनुभव सगळ्यांना मोकळेपणाने सांगितला तरी 'तोच अनुभव पुन्हा नाटकात अभिनित करावासा वाटत नाही' अशी भूमिका घेतली. 'ज्या त्रासातून आपण गेलो, ते पुन्हा पुन्हा मला नाही उगाळायचे', या म्हणण्यावर तो अनुभव नाटकात मांडण्याचा वेगळा मार्ग शोधावा लागला. एकूणच इतर समाज ट्रान्सजेंडर मुलांबाबत किती सहज आपली मते बनवतो असे वाटू लागले. त्यांचे त्रास आपल्या विचारापल्याड आहेत.

कुटुंबाने स्वीकारलेली ट्रान्सजेंडर मुलेही मला भेटली. त्याहून खूप मोठ्या प्रमाणावर कुटुंबाने नाकारलेली मुले आढळून येतात. जी ट्रान्सजेंडर मुले घराने स्वीकारली आहेत, त्या घरातील आर्थिक गणिते त्या मुलामुलींवर अवलंबून आहेत, असे अनेकदा ध्यानात येते. आपल्याच घरात जन्माला आलेले मूल, सर्वसाधारण मुलांहून वेगळे आहे म्हणून नाकारले जाणे याहून भयानक गोष्ट नाही. एकूणच 'LGBTQ' समूहात आपल्याच रक्ताच्या नात्याच्या माणसांकडून,



तसेच समाजाकडून नाकारले जाण्याच्या दु:खाला या मुलांना लहान वयातच सामोरे जावे लागते ही खूप खोल परिणाम करणारी गोष्ट आहे. ट्रान्सजेंडर अनेक मुले 'हिजडा' पंथात सामील होतात, याचे हे एक महत्त्वाचे कारण असते असे मला वाटते. हिजडा पंथात एक ठरावीक रचना असते. तिथे एकमेकांचा आधार बनतात ही मुले. या रचनेअंतर्गत अनेक प्रश्नही आहेत, मात्र रक्ताच्या नात्यातील माणसांनी नाकारल्यावर एका वेगळ्या रचनेचा भाग बनणे ही गरज असेल का या मुलांची?

याआधी सांगलीत नाटक बसवताना खूप नटणाऱ्या मुलांचा उल्लेख मी केला आहे आणि हेच प्रमाण थोड्याफार फरकाने इतरत्र पाहायला मिळते. पुण्यात नाटक बसवताना मी पुन्हा तोच मुद्दा उपस्थित केला, 'इतके तुम्ही का नटता?' त्यावरचे उत्तर विचार करायला लावणारे होते. ते असे, 'आम्ही खूप नटतो आणि तुम्ही स्त्रिया तशा नटत नाही याचे कारण तुम्हाला 'आम्ही स्त्री आहोत हे प्रूव्ह नसते करायचे. आम्हाला मात्र समाजाने स्त्री म्हणून स्वीकारावे असे वाटते म्हणून आम्ही भडक लिपस्टिक लावतो. आम्हाला स्त्रियांना आहे तशी छाती असायला हवी असे वाटते. भडक मेकअपमुळे आमच्याकडे तुम्ही पाहता.' मला आठवते, सांगलीत 'मुस्कान'च्या एका मीटिंगमध्ये चर्चिला गेलेला विषय होता, 'आम्हाला छाती येईल का?' छातीचा आकार हा अनेक ट्रान्सजेंडर मुलांना खूप हळवा बनवणारा मुद्दा आहे. छातीचा आकार वाढण्यासाठी हार्मोन्स वाढणारी इंजेक्शन्स घेतली जातात.

Castration वरून एक मुद्दा मांडावासा वाटतो. पुरुषाचे लिंग घेऊन जन्माला आलेल्या मुलाचे castration केले जाते, तेव्हा लिंगासह टेस्टीज काढल्या जातात. शरीरसंबंधाची गरज (drive) निर्माण करणारे अवयव काढले जातात. अर्थात, सेक्सच्या गरजांवर परिणाम होतो. मी याबाबत काहींशी बोलले तेव्हा त्यांचे म्हणणे होते, 'आपलेपणाचा स्पर्श हवासा असतो. बस.'

ट्रान्स मुले कामे मिळत नाहीत म्हणून 'मंगती' करतात, पैसे मागून जगतात त्यांच्या आक्रमक वृत्तीवर, भडकपणावर खूप बोलले जाते. माझ्या अनुभवावरून माझ्या मते कमालीची साधी आणि हळवी असतात ही मुले.

जगाला सामोरे जाताना आवश्यक म्हणून आक्रमक होतात बहुधा. जोरजोरात टाळ्या वाजवून पैसे मागतात हे सत्य आहे. माझी अशीच एक सखी एका संस्थेत नोकरी करायची, तिला 'टॅली' हे अकाउंटसाठी वापरले जाणारे पॅकेज वापरता यायचे. संस्थेचा प्रोजेक्ट संपला, काम संपले. दुसरीकडे काम मिळेना. काय करणार? ती मंगतीकडे वळली. एका दुकानाच्या लाईनवर ती पैसे मागायची. एकदा दुकानदार दाराकडे पाठ करून बसला होता. कॉम्प्युटरवर 'टॅलीत' काम करत होता. त्याच्या पाठीवरून तिला कॉम्प्युटर दिसत होता. स्क्रीनवर तो जे पाहत होता त्यावरून दुकानदार कुठे अडकला आहे हे तिच्या लक्षात आले. तिने त्या संदर्भात त्याला सूचना दिल्या. तो चक्रावला. ती मला म्हणाली की, 'मला टॅली येते याचा फायदा काय झाला? दुकानदाराने मला २०० रुपये मंगती दिली, बस. नोकरी नाही दिली.' अशा मुलांना नोकरी हा प्रश्न असतोच. अगदी ही संस्थेत नोकरी करत होती तेव्हाही सी.ए. तिच्या कामावर खूश असायचा, पण तिला कार्यालयात पाठवू नका अशी विनंती करायचा. लोकांच्या प्रश्नांना सामोरे जायची आपली तयारीच नसते. 'या मुलांना नोकऱ्या मिळायला हव्यात' या वांझोट्या चर्चा आपण करणार. वातावरण बदलत आहे असे सध्या बोलले जाते, पण हे बदल टक्केवारीत मोजले तर ते प्रमाण अत्यल्प असेल हे मी खात्रीने म्हणू शकते. गंमत म्हणून सांगते, या सखीने मात्र मला त्यांची टाळी वाजवायला शिकवले.

शंकराने केलेले castration ची गोष्ट वाचली जाते, मात्र ही गोष्ट पुराणात का निर्माण झाली असेल याचा विचार केला जात नाही. अर्धनारीनटेश्वराला वाकून नमस्कार केला जातो पण हे रूप का निर्माण झाले असेल, हा विचार आपण करतो का? अर्जुन बृहन्नडा म्हणून वर्षभर लपून राहिला, ही महाभारतातील गोष्ट आपल्याला माहीत असते, पण आपल्याला त्यात काही खटकत नाही. या आणि अशा अनेक कथा आपल्याला ग्रंथात मिळतात. आपण त्या कथा वाचतो. त्याचे कौतुक करतो मात्र असे मूल नको म्हणतो. का? जन्माला येणाऱ्या मुलाने आपली लैंगिकता ठरवलेली नसते. निसर्गत: जे मिळते ते निभावण्याचा प्रयत्न ते करत असताना, त्या मुलाची काहीच चूक नसताना आपण त्यालाच टोकतो. नको करून सोडतो. त्याचा दोष तरी काय? अशा ट्रान्सजेण्डर मुलांसह उभे राहायची ताकद आपल्याला असायला नको का?

Diwali Greetings

## With Warm Greetings and Best Wishes
## on the Ocassion of Publication of Diwali Issue On Movment of Positivity
## by Dnyaneshwar Mulay Foundation.

Many congratulations for commencing 'Movement of Positivity'. This kind of Social activity will be connecting wonderful persons for noble social cause and for spreading peace and happiness amongst our Indian society. This social connect will support to synchronise the social harmony in diversified practices and culture adopted in our country. We strongly believe that it is very positive, forward and progressive initiative taken by Dr. Dnyaneshwar Mulay Foundation for preserving the liberty, equality and fraternity of the democratic system , provided in the Constitution of our beloved country. We highly appreciate the most genuine subject 'Transgender' chosen for this Diwali Anka 2021, which will definately help in bringing a positive transformation in the society. We trust these efforts which will help to bridge the gap of gender inequality, social and economic discrimination and will help to promote the value of human rights, reflected in the emergence of responsible and compassionate citizenry in India resulting in creation of a strong India.

*With Best wishes and Regards*



**Shri. Prakash Gunjyal**
(Chairman)



**Shri. Avinash Bansode**
(President)



**Shri. Ravi Giriraj**
(General Secretary)



**Mrs. Ruby Waikar**
(Treasurer)

**All India Central Bank SC/ ST /OBC/ Welfare Federation (New Delhi),**
**M.P. Unit at Bhopal.**

**And**

**Madhya Pradesh Central Bank SC/ ST/ OBC Karmchari Kalyan Sangh,**
**Bhopal Zone.**

# ओळख स्वत:ची



**डॉ. श्रीरंग पंडित**
**प्लॅस्टिक सर्जन, पुणे**

जनुकांच्या रचनांमुळे गर्भाला पुरुष अथवा स्त्रीलिंग प्राप्त होते. XX आणि XY या गुणसूत्रांमुळे हे घडते, असे विज्ञान सांगते. सुरुवातीला एकाच पद्धतीने गर्भाची वाढ होत असते. नंतर काही महिन्यांत जननेंद्रियांची निर्मिती होते आणि पुरुष किंवा स्त्री असे लिंग गर्भाला मिळते.

Transsexual किंवा इंटरसेक्स किंवा ट्रान्सजेंडर म्हटल्याबरोबर आपल्या डोळ्यांसमोर उभे राहतात ते रस्त्यावर सिग्नलजवळ विशिष्ट हावभाव करत वावरणारे तृतीयपंथी अथवा हिजडे. लोकांना, विशेष करून तरुण मुलांना त्रास देऊन पैसे उकळणारे लोक. बारसे, लग्न, गर्भधारणा या प्रसंगी आशीर्वाद देण्यासाठी आलेले तृतीयपंथी आपण पाहतो.

परंतु स्त्री आणि पुरुष या स्पष्ट लिंगविभागणीच्या दोन टोकांमध्ये अनेक शारीरिक आणि मानसिकरीत्या वेगळ्या व्यक्ती आढळतात. भाषेमध्ये स्त्रीलिंग, पुल्लिंग आणि नपुंसकलिंग यांच्याशी आपण चांगले परिचित आहोत. आपल्या पुराणात तृतीयपंथीयांची अनेक उदाहरणे आहेत. महाभारतात शिखंडीनी ही मुलगी म्हणून जन्माला आली. द्रुपद राजाने तिला मुलासारखे वाढविले. तिच्या लग्नाच्या वेळी ही गोष्ट लक्षात आली. तेव्हा एका यक्षाने आपले पुरुषलिंग तिला देऊन शिखंडी बनविले. हाच शिखंडी पुढे भीष्मांच्या मृत्युला कारण ठरला. स्त्रीचा पुरुष होण्याचे हे पहिले उदाहरण असावे.

उर्वशी या अप्सरेच्या शापामुळे अर्जुनाला बृहन्नडा नावाच्या हिजड्याचे रूप घेऊन राहावे लागले होते. अर्धनारीनटेश्वर, हे महादेवाचे रूप आपणा सर्वांना परिचित आहे. स्त्री आणि पुरुष एकाच देहामध्ये असणारी ही देवता पूजनीय आहे.

महादेवाच्या लिंगाची म्हणजे शिवलिंगाची पूजा आपण करतो. अशा या शिवलिंगावर अभिषेक केला जातो. ही शरीरापासून वेगळ्या झालेल्या लिंगांची प्रतिमा हे प्रजननक्षमतेचे अतिशय शक्तिमान असे प्रतीक मानले जाते.

पूर्वी मुस्लिम जनानखाना सांभाळण्यासाठी तगड्या हिजड्यांची फौज असे. एक गुलाम जो पुरुषाचे काम करेल पण मालकाच्या लैंगिक साम्राज्याला आणि वर्चस्वाला आव्हान देणार नाही याची खात्री करण्याचा हा मार्ग होता.

हिजडे हे जन्मत: पुरुष असतात. त्यांचे लिंग आणि अंडकोश कापून टाकण्यात येतात व त्यांना स्त्रीप्रमाणे वाढवण्यात येते. स्त्रीचा आत्मा असलेला पुरुष अशी त्यांची

ओळख सांगितली जाते. ते स्वत:ला भगवान शंकराचे अनुयायी समजतात. आपल्या पुल्लिंगाचा आणि संभोग सुखाचा त्याग केल्याने आपल्याला मोठी शक्ती मिळते आणि त्यामुळे आपण दिलेले आशीर्वाद खरे ठरतात अशी त्यांची धारणा असते.

लग्न समारंभ, बारसे, बालकाचा जन्म या वेळेस त्यांना बोलावले जाते. त्यांचा आशीर्वाद प्रजनन संबंधित सर्व समारंभात घेतला जातो. या वर्गामध्ये एक गुरू आणि त्याचे चेले असा संबंध असतो.

बहुचरा माता आणि बोधराज या त्यांच्या देवता मानतात. आपल्या चेल्याची संपूर्ण काळजी घेण्याची जबाबदारी गुरूची असते. अनेक जण विशिष्ट हिजरा फारसी भाषा बोलतात. ही समजण्यास फारच अवघड असते. अनेक जण समलिंगी संबंध, वेश्याव्यवसाय, भीक मागून उदरनिर्वाह करतात.

काही मुली आणि काही मुलांमध्ये आपल्या निसर्गदत्त लिंग ओळखीच्या विरुद्ध राहण्याची अतीतीव्र इच्छा असते. मुलीला मुलगा, मुलाला मुलीसारखे आयुष्य जगावेसे वाटते. निसर्गदत्त लिंगदेहामध्ये त्यांची अपरिमित घुसमट होते. पराकोटीच्या मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. समाजामध्ये या विचार आणि आचाराला यत्किंचितही थारा नसल्याने अनेकदा या व्यक्ती सैरभैर होतात. फारच थोडे पालक या निष्पाप मुलांना मनापासून आधार देतात. हे निर्णय घेणे अतिशय अवघड काम असते. कठोर समाजमूल्यांशी वर्षानुवर्षे लढणे सोपे नाही.

या विकाराचे मूळ मानसिक विकृती मानली जाते. सर्वच बाधित व्यक्ती या टोकाचा विचार करत नाहीत. काही आपले आयुष्य दु:खात पण निमूटपणे जगतात. तर काहींना हा विरोधाभास असह्य होतो आणि मग ते वैद्यकीय चिकित्सेचा आधार घेऊन लिंगबदल अथवा sex change शस्त्रक्रियेचा मार्ग निवडतात.

पुरुष आणि स्त्री शरीरामध्ये असंख्य फरक असतात. वेगवेगळी संप्रेरके असतात. प्रजोत्पादनसाठी आणि गर्भधारणेसाठी विशिष्ट अवयव असतात. या व्यक्ती जिवाचा आटापिटा करून आपले नैसर्गिक शरीर बदलू इच्छितात.

स्त्रीचा पुरुष आणि पुरुषाची स्त्री अशी चिकित्सेची दिशा असते. यालाच FTM or Female to Male / MTF or Male to Female असे म्हणतात.

शस्त्रक्रियेपूर्वी दोन मानसोपचार तज्ज्ञांचे लिखित मत घेतले जाते. या शस्त्रक्रिया करणे गरजेचे आहे, असा अभिप्राय आला तरच पुढचा विचार केला जातो. Female to Male या प्रकारात वक्षस्थळ, योनीमार्ग, गर्भाशय, स्त्रीबीजकोश काढून टाकतात. Testosterone सारखी संप्रेरके आयुष्यभर द्यावी लागतात. याने आवाज बदलतो. अंगावर केस येतात. दाढी-मिश्या येतात.

पुरुषाचे लिंग तयार करणे, त्याला संभोगक्षम बनविणे, त्यामध्ये नवीन मूत्रमार्ग तयार करणे हा शस्त्रक्रियेतील सर्वांत अवघड भाग असतो. अनेक वेळा खर्चिक शस्त्रक्रियांची गरज पडते. आयुष्यातील अनेक वर्षे वाया जाऊ शकतात. चेहऱ्यामध्ये आणि कमरेच्या ठेवणीमध्ये बदल करता येतो.

पुरुषाची स्त्री करण्यासाठी सिलिकॉन इन्प्लांट करून स्तन करतात. पुल्लिंग व अंडकोश काढतात. योनीमार्ग बनवण्यासाठी अनेक पद्धतीने शस्त्रक्रिया करतात. आतडे किंवा मांडीची त्वचा यासाठी उपयुक्त ठरते. शरीरावरील अनावश्यक केस लेसरच्या सहाय्याने काढले जातात. कपाळ आणि जबड्याची ठेवण बदलता येते. यासाठी हाडांचा आकार कायमचा बदलावा लागतो. इस्ट्रोजेनसारखी संप्रेरके आयुष्यभर घेणे गरजेचे असते.

मायक्रोसर्जरी वापरून अनेक नवनवीन पर्याय योनीमार्ग तयार करण्यासाठी उपलब्ध होत आहेत. या ऑपरेशनला gender re-assignment surgery म्हटले जाते. लिंग पुनर्नियुक्ती शस्त्रक्रिया असे संबोधता येईल. ही चिकित्साप्रणाली खूप वेळ घेते. अनेक वेळा ऑपरेशन्स करावी लागतात. यामध्ये खर्च खूप लागू शकतो. हे सर्व केल्यावरही आपल्याला सर्व प्रकारे समाधानकारक फायदा मिळेल याची खात्री नसते. हा एक-दिशा मार्ग असतो. परत पहिल्यासारखे कधीच होता येत नाही. अशक्यप्राय परिस्थितीतच हा पर्याय वापरावा.

खरे नपुंसक किंवा ज्यांच्यामध्ये स्त्री आणि पुरुष अशी दोन्ही जननेंद्रिये, योनी आणि शिश्न अशी दोनही बाह्य जननेंद्रिये असणाऱ्यांची संख्या अत्यल्प असते.

मानसिक आणि शारीरिक परिस्थितीच्या अतिशय खडतर मार्गावरून या विशिष्ट व्यक्तींचा जीवनप्रवास सुरू असतो. समाजाचा या व्यक्तींकडे पाहण्याचा दृष्टिकोन अनेक पूर्वग्रहांनी कलुषित झालेला असतो. समाजसंमत अशा स्त्री-पुरुष या लिंगसंकल्पनेमध्ये न बसणाऱ्या अतिशय प्रखर अशा मानसिक द्वंद्वाला आयुष्यभर सामोरे जाणाऱ्या या वेगळ्या माणसांना सहानुभूतीची, सहकार्याची नितांत गरज असते.

# माणसाने माणसाशी माणसासम वागणे



## महामंडलेश्वर लक्ष्मी त्रिपाठी यांची मुलाखत

*मुलाखतकार व शब्दांकन :*
**सौ. अश्विनी दरेकर**
**चित्रपट निर्मात्या व सामाजिक कार्यकर्त्या**

आपल्यापैकी बऱ्याच जणांनी लक्ष्मी त्रिपाठी यांच्याबद्दल वाचन केलेलं आहे. त्यांचं आत्मचरित्र वाचलंही आहे. त्यामुळे त्यांनी केलेला संघर्ष हा मी नव्याने सांगण्याची गरज नाही. मात्र नशिबाचे, समाजाचे अनेक घाव सहन करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला जी चकाकी, जो धारदारपणा आला आहे ते तेज, ती ऊर्जा व्यक्तिशः मला अनुभवण्याचा, पाहण्याचा योग आला. ही गोष्ट माझ्यासाठी अतिशय उत्साहपूर्ण व आनंददायी होती.

शून्यातून सुरुवात करणाऱ्या लक्ष्मीताईंचा हा प्रवास मला अचंबित करणारा वाटतो आणि आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडतो.

We are not taught to love ourselves

रोजच्या सवयीनुसार मी त्या दिवशी सकाळी मोबाइलवर बातम्या स्कॅन करत होते, एक पॉप अप Notification आली. बघितलं तर एक लेख होता. त्या लेखाचा मथळा होता, We are not taught to love ourselves. तो लेख होता लक्ष्मी त्रिपाठी यांचा. इंडियन एक्सप्रेसमधला. आमच्या झिपऱ्या सिनेमाच्या वेळीच लक्ष्मीताईंना आम्ही भेटणार होतो पण काही कारणास्तव ती भेट होऊ शकली नाही... त्या वेळी निसटून गेलेल्या भेटीची रुखरुख मनात होती. इंडियन एक्सप्रेसमधला लेख वाचल्यावर त्यांना खूपच भेटायची इच्छा होत होती... पण त्यांच्या व्यस्त दिनक्रमामुळे काही योगच येईना... आमची सारखीच चुकामूक होत होती... आणि अखेरीस तो योग आला... आणि अचानक माझी आणि लक्ष्मीताईंची भेट ठरली. तीही १६ सप्टेंबर २०२१ रोजी माझ्या घरीच.

मला नवीन लोकं, नवीन प्रदेश बघायला, जाणून घ्यायला खूप आवडतं... आणि आता तर लक्ष्मीताई थेट माझ्या घरी आल्या, त्यामुळे मला एक व्यक्ती, एक मैत्रीण, समाजातील अविभाज्य भाग असूनदेखील त्यांना नाकारलेलं स्थान असं त्यांच्याविषयी बरंच काही समजून घ्यायला मिळणार होतं. एकाच वेळी अनेक प्रश्नाचं काहूर माझ्या मनात सुरू होतं... आणि जाणवत होतं की किती ऊर्जा आहे या व्यक्तिमत्त्वामध्ये! अशा या व्यक्तीबरोबर जिनं आपलं पूर्ण आयुष्य एका वेगळ्याच कामाला वाहून घेतलंय, ती व्यक्ती जी तिच्या मोलाच्या कामामुळे आयुष्यातील प्रसिद्धीच्या उत्तुंग शिखरावर असूनही माझ्याबरोबर बसून तितक्याच साधेपणाने, आपुलकीने गप्पागोष्टी करतीये यातच तिचं मोठेपण अनुभवायला मिळत होतं. मी तर तिच्या व्यक्तिमत्त्वाने अक्षरशः भारावून गेले होते... असं जाणवतच नव्हतं की आम्ही पहिल्यांदा भेटतोय कारण मी या व्यक्तीच्या समाजातील अनेक जणींना लहानपणापासून आपल्या आजूबाजूला बघत भेटत आले आहे... शाळेत जाताना, मंदिराच्या बाहेर पैसे मागताना आणि मठात बाबांना साखरेचा प्रसाद देणारी ती... माझ्या घरी लहानपणी आई त्यांना जेवायला बोलवायची. माझी आई त्यांना खूप छान वागणूक द्यायची पण सोसायटीमधील इतर मंडळी मात्र त्यांना जी हीन वागणूक द्यायचे, त्यांना जे हिडीसफिडीस करायचे ते मला खूप खटकायचं... तेव्हाही मनात सतत एकच प्रश्न पडायचा. तो प्रश्न भंडावून सोडायचा. त्याबद्दल आईला विचारलं की आई एवढंच म्हणायची तो आपल्यासारखाच माणूस आहे ना, मग आपण नीट वागायचं, आदराने... जसं इतर माणसासारखं वागतो अगदी तसंच.

पुढे माझ्या वाचनात नामदेव ढसाळांची 'माणसाने' ही कविता आली... किती समर्पक आणि नेमक्या शब्दांत माणुसकीची अपेक्षा मांडली आहे त्यांनी...

*...नंतर उरल्यासुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये, लुटू नये*
*काळा गोरा म्हणू नये*
*तू ब्राह्मण, तू क्षत्रिय, तू वैश्य, तू शुद्र असे हिणवू नये*
*आभाळाला आजोबा आणि जमिनीला आजी मानून*
*त्यांच्या कुशीत गुण्यागोविंद्याने राहावे*
*चंद्र सूर्य फिके पडतील असे सचेत कार्य करावे*
*एक तीळ सर्वांनी कांडून खावा*
*माणसावरच सुक्त रचावे*
*माणसाचेच गाणे गावे माणसाने....*

त्या घरात आल्या देवघरातल्या देवांना नमन करूनच. एक हाडामासाची लक्ष्मी माझ्या घरातील लक्ष्मीसमोर नतमस्तक होताना पाहून मीच भारावून गेले.

मी कशाने सुरुवात करू काहीच कळत नव्हतं. काय बोलू... काय विचारू... विचार सैरभैर फिरत होते... अजूनही विश्वास होत नव्हता की लक्ष्मीताई माझ्या समोर बसल्यात... अगदी नेहमीसारखी सुरुवात करू या का? मनालाच प्रश्न विचारात होते मी. या अशा क्षुल्लक विचारात किती वेळ गेला मला स्वतःलाच कळत नव्हतं. काय प्रश्न विचारूयात? याच आणि अशा अनेक प्रश्नांच्या गर्तेत अडकले होते मी... 'काय विचार करते आहेस अश्विनी तू?' या त्यांच्याच प्रश्नाने मी भानावर आले... 'अं... काही नाही, कशी सुरुवात करू काहीच समजत नाहीये...' लक्ष्मीताई माझ्या बोलण्यावर निरागस हसल्या... 'विचार की... मोकळी हो... मुळीच संकोच बाळगू नकोस. तू मला माझ्या लहान बहिणीसारखीच तर आहेस...' किती थोडक्या शब्दांत तिने मला विश्वासाने आपलंसं केलं. त्या सहजतेने माझी हक्काची मोठी बहीणच त्या क्षणी मला मिळाली जणू... ती बोलली 'आज तू मला आधी सांग ही चांगुलपणाची चळवळ आणि हा interview कशासाठी?' तेव्हा मी तिला आपल्या या चळवळीविषयी समजावून सांगितलं आणि म्हटलं 'तुम्ही जे काम करताय, जो चांगुलपणा समाजात पेरताय.. आमच्यासाठी तीच चांगुलपणाची चळवळ आहे. कारण तुम्ही कितीतरी पटीने मोठं काम आधीपासूनच करताय.. आमच्या चांगुलपणाच्या चळवळीचे प्रणेते आहेत श्री. ज्ञानेश्वर मुळे, माजी प्रशासकीय अधिकारी, परराष्ट्र खात्यातील मोठं नाव. आता ते मानवाधिकार आयोगाचे सदस्य आहेत. आणि खूप मोलाचं काम मनापासून करतायेत.' त्यावर ती प्रफुल्लित झाली आणि म्हणाली, 'मी पण मानवाधिकार आयोगाची कोअर कमिटी मेंबर आहे.'

मी म्हटलं, 'मला तुमच्याविषयी जाणून घ्यायचंय... इतके दिवस ठरवलं होतं, तुम्ही भेटल्यावर मी कोणत्या आणि कुठल्या गोष्टी तुमच्याकडून ऐकेन, तुम्हाला आणि तुमच्या कामाला समजून घेईन कारण तुमचं कार्य खरंच खूप मोठं आणि अतिशय महत्त्वाचं आहे. एक व्यक्ती म्हणून सगळ्याच फ्रंटवर तुम्ही मोठ्या आहात.'

खरं तर लक्ष्मीताई आल्यापासून माझ्या घरात वातावरण पूर्ण बदलून गेलं. माझा नवरा रणजीत, मुलगी दिविजा, आमचा श्वानराज बुझोदेखील भारावलेले होते... एक वेगळीच ऊर्मी आणि ऊर्जा त्या वेळी घरात जाणवत होती... सगळ्यांच्या नजरेत घरातील या पाहुण्यांचा वावर, त्यांच्याबद्दलची उत्सुकता स्पष्टपणे जाणवत होती. घड्याळची टिक टिक जणू लक्ष्मीताईच्या तालावार नाचत होती. मला तर वाटत होतं वेळ पुढे जाऊच नये. टिक टिक थांबावी आणि लक्ष्मीताई अशीच माझ्याबरोबर झोपाळ्यावर बसून गप्पा मारत राहावी.

**आणि आमचा संवाद सुरू झाला.**

**मी :** ताई, तू लहान असताना तुझ्या मनावर काय परिणाम होत होता? मी काही संस्थांसाठी काम करत असताना नेहमीच माझ्या मनात घोंगावणारा हा प्रश्न आहे म्हणून विचारतीये... तू लहान, बाल्यावस्थेत असताना तुझी मानसिकता, ते आज त्या सगळ्यावर मात करत तू इथपर्यंत पोहचलीस... हीच जिद्द कशी आणि कुठे तयार होते मला जाणून घ्यायचं आहे.

**लक्ष्मीताई :** जिद्द... एक कारण पुरे होतं त्यासाठी... तुम्ही नेहमीच एखादे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवता आणि पुढे मग... जिद्दी लोकांची एक आणि एकच कहाणी आहे... माझी काही त्याच्यापेक्षा वेगळी नाही...

माझ्या मनामध्ये त्या लेखातील ओळ सतत घुटमळत होती... We are not taught to love ourselves. असं का म्हणाली असेल लक्ष्मीताई? काय वेगळं आहे यांच्यामध्ये... आपल्यासारख्याच नॉर्मल आहेत. बोलणं, बुद्धी, शिक्षण सगळं, पण समाज का समजून नाही घेत.. का यांना इतरांपेक्षा वेगळं समजतात? यात यांचा काय दोष... एखाद्याची जन्मापासूनच घडण अशीच असेल तर का यांना स्वतःवर प्रेम करू देत नाहीत? खरंच एवढा बाऊ करण्यासारखा विषय आहे का हा... आता जरा समाजाची विचारसरणी बदलतीये. पण लक्ष्मीताई ज्या दशकात वाढलीये तेव्हा होते का हे प्रगल्भ विचार? त्या काळात जगणं आणि मोठं होणं हे अवघडच होतं की.

प्रश्न...प्रश्न... आणि फक्त प्रश्न... खरं तर मला काही प्रश्नांची उत्तरं हवी होती, पण काय आणि किती विचारणार?... खरंच, लक्ष्मीताईच्या सुरुवातीच्या आयुष्यात खूप काही चांगलंही होतं. चांगली आई, जी तिला समजून घेत होती, तिला आहे तसं स्वीकारून मनापासून प्रेम करणारी, मात्र आजूबाजूचा

समाज तिच्यातील निसर्गाने केलेले बदल समजून घेत नव्हता... पण मग बदललं तिने सगळं स्वतःसाठी... आज ती जुन्या आखाड्याशी संलग्न आचार्य महामंडलेश्वरची गादी सांभाळतीये... धर्मकारणातदेखील आता ती सक्रिय आहे. आपल्या हक्कांची लढाई जशी सामाजिक असते तशी धार्मिकसुद्धा असतेच की, आणि ही लढाई सोपी नव्हती आणि नाही. जी तिने इतिहासात पहिल्यांदा या पदाची स्थापना करवून घेऊन, कुंभमेळ्यात किन्नर आखाड्यातून शाहीस्नानाचा मान मिळवण्यासाठी दिली आहे. तिच्यासाठी हासुद्धा एक वेगळाच आत्मिक, तितकाच गुंतागुंतीचा आणि नाजूक विषय.

अजूनही हिजडा पंथाचे प्रश्न संपले नाहीयेत, त्यासाठी ती अजूनही लढतीच आहे. तिच्यासारख्या हजारो लोकांसाठी, ज्यांना स्वतःच्याच घरच्यांनी बाहेर काढलं आहे, बेदखल केलं आहे, देशोधडीला लावलं आहे. लक्ष्मीताईबरोबर बोलून तिचे विचार ऐकून मनात येत होतं की बदल घडायला हवा आणि तो घडवायलाही हवा. हिजडा पंथ हा समाजात प्रत्येक ठिकाणी तितक्याच सन्मानाच्या स्थानी असायला हवा... माणूस म्हणून त्यांना माणसांनी आपलं म्हणून स्वीकारायला हवं. हीच मानवता, चांगुलपणा आणि नैतिकतेची ओळख मानता येईल. मी पुढचा प्रश्न विचारला, 'हिजडा पंथ म्हणून आपल्या काय अपेक्षा आहेत?'

**लक्ष्मीताई :** अपेक्षा अशा काही नाहीत, हक्क हवेत, आम्ही लढतोय... आणि त्याला यशदेखील मिळत आहे. २०१४ मध्ये सुप्रीम कोर्टाने आम्हाला भारतीय म्हणून स्थान दिलं.

**मी :** भारतीय म्हणून स्थान?

आपल्याला भारतात जन्मल्यानंतर लगेचच इथलंच नागरिकत्व मिळतं, पण हिजडा समाजाला तेच नागरिकत्व मिळवण्यासाठी लढावं लागलं... असे कितीतरी मुद्दे आहेत जे आपल्या कल्पनेपलीकडले आहेत... आजदेखील समाजात जगण्यासाठी आणि आत्मसन्मानासाठी, त्यांना पदोपदी झगडावं लागतं... क्षणोक्षणी अपमान सहन करावा लागतो. याचा आपण सगळ्यांनीच एक सजग नागरिक आणि माणुसकी जपणारा माणूस म्हणून विचार करायला हवा..

सामाजिक काम करत असताना काही विषय मनाला लागून जातात. त्याविषयी काम करण्याची माझी मनोमन इच्छा असते... विविध प्रश्न हाताळताना आपण मानसिकरीत्या नाउमेद होत असतो... पण आज जी व्यक्ती माझ्याबरोबर चर्चा करतीये ती कोणत्या मानसिक हिंदोळ्यातून, कोणत्या वावटळीतून मार्ग शोधत, आचार्य महामंडलेश्वर पदावर पोहचलीये हे ती आणि तीच समजू



शकते... तुमच्या आणि माझ्यासारख्या लोकांना हे समजणं तितकंच कठीण आहे. किंबहुना थोडं अवघडच आहे. सामाजिक प्रतिष्ठा, पारंपरिक विचारसरणी, आपापले हस्तिदंती मनोरे आणि कम्फर्ट झोन अशा एक ना अनेक चौकटी आपल्याभोवती असतातच ना? आपल्या लक्ष्मीचा प्रवास हा स्वतःबरोबरच हिजडा पंथालासुद्धा माणूस म्हणून गणलं गेलं पाहिजे याकरता होता आणि हे मोठं लक्ष्य, कार्य ती एकटीने पार पाडण्याचा प्रामाणिक प्रयत्न अजूनही मनोभावे करत आहे. मला त्यांची मानसिक घालमेल समजून घ्यायची होती म्हणून मी विचारलं,

'स्वतःला स्वीकारणं, समजून घेणं हा प्रवास हिजडा पंथासाठी कसा असतो? कोणत्या स्थितीतून ते जात असतात?'

**लक्ष्मीताई :** काय वेगळे आहोत आम्ही? आम्हीपण आईच्या गर्भातूनच बाहेर आलो ना अगदी तुमच्यासारखेच? देवाने सर्वांनाच बनवलं. जन्माची सुरुवातच हिजडा म्हणून झाल्यावर कोणत्या मानसिकतेचा विचार करू शकतो आपण? लहान वयातच एक लेबल चिकटवल्यावर कोण खचणार नाही... समाजातील सुदृढ लोकं जगताना किंवा तू मघाशी म्हणालीस तुझं समाजकार्य करतानासुद्धा किंवा दररोजच्या दिनचर्येमध्ये, छोट्या छोट्या अनुभवात, प्रसंगात कधी कधी खच्चीकरण होतच असतं ना? सगळं सुरळीत असतानाही लोक खचून जातात. अगदी नॉर्मल आयुष्य जगताना... कारण लोक स्वतःचा दोष झाकून ठेवतात... इथे तर... काय बोलणार... टाकून दिल्यानंतर काय होत असेल... मन किंवा चित्त स्थिर राहू शकेल का? सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत किन्नर, हिजडा, तृतीयपंथ अशा अनेक नावाने वावरताना हिणवणारे कशा समजू शकतील आमच्या भावना? आम्हीदेखील माणूसच आहोत हे दाखवावं लागतं?... समाजाचा एक कटाक्ष असतो आमच्यावर... कटाक्ष हा शब्द महत्त्वाचा. कारण तो कटाक्ष आम्हाला सांगून जातो तुम्ही आमच्याकडे कशा नजरेने पाहताय

ते.. काय लागतं या हिजडा पंथातल्या लोकांना? तुमचं एक smile... पण smile पोट कसं भरू शकेल का गं?... म्हणूनच मी सरकारला आणि समाजाला विचारतीये, की जेव्हा हिजडा पंथातल्या पात्रता (calibre) असलेल्या लोकांना प्रत्येक क्षेत्रात मनाने आणि मानाने सरकार, समाज केव्हा स्वीकारेल. कोणतंही क्षेत्र असो... scientist असो, ब्यूरोक्रसी, फिल्म डायरेक्टर, पॉलिटिक्स... प्रत्येक क्षेत्रात, profession मध्ये ट्रान्सजेंडर हवाय...

Productivity has to be seen not gender.. तेव्हाच मी हा समाज सुधारला असं म्हणू शकेन.

परिवर्तन घडायलाच हवं हे वाक्य बोलताना तिच्या डोळ्यातलं चमचमणारं पाणी तेवढं माझ्या नजरेतून सुटू शकलं नाही.

मी म्हणाले, 'असं काय होतंय... कुठे चुकतंय समाजाचं? लहान मुलींवरचेही अत्याचार वाढलेत?'

**लक्ष्मीताई :** एक आम्हा हिजड्यांची फौज तयार करा त्यांना विशेष अधिकार द्या आणि बघा मग असे बलात्कार होतात का?

जेव्हा लहान मुलींवर बलात्कार होतात तेव्हा जेवढा त्रास आम्हा स्त्रियांना एक पालक म्हणून होतो ना तेवढाच तिलापण होतो.

लक्ष्मीताई हे वाक्य उच्चरताना तिच्या करारी चेहऱ्यावरून स्पष्ट होत होतं की, शारीरिक अत्याचार, बलात्कार हे लक्ष्मीच्या पंथातील लोकांच्या अक्षरशः पाचवीला पुजलेले, त्यांच्याइतकी या विषयावर संवेदना कोण समजून घेऊ शकेल? जेव्हा, मी त्यांना सामान्य स्त्रिया आणि तृतीयपंथी यांच्यातील समस्या याबाबत विचारणा केली तेव्हा ताईने मोठ्या खेदाने सांगितलं की, आपल्याकडे निर्भयासारखी प्रकरणं घडतात. त्यासाठी मोर्चे आंदोलने होतात, मेणबत्त्या पेटवल्या जातात. त्यांना न्याय मिळतो, न मिळतो हा न्यायालयीन भाग आहे. मात्र, आमच्यात अशा हजारो निर्भया आहेत, की ज्यांच्यावर रोज अत्याचार होतात. मात्र, दुर्दैवाने आमच्यासाठी कोणी रस्त्यावर येत नाही, ना कोणी मेणबत्त्या पेटवून आमच्यासाठी आदर व्यक्त करतो. तिने असमान वागणुकीबाबतची ही खंत बोलून दाखवली. मला कवी अनिल कांबळे यांची

*त्या कोवळ्या फुलांचा बाजार पाहिला*
*पैशात भावनेचा व्यापार पाहिला मी*
*अंधार वेदनांनी आक्रंदतो तरीही*
*नजरेत वासनेचा श्रृंगार पाहिला मी*
*रस्ते उन्हात न्हाले, सगळीकडे परंतु*
*वस्तीतूनी दिव्यांच्या अंधार पाहिला मी*
*थोडा उजेड ज्याला मागावयास गेलो*
*तो सूर्य ही जरासा लाचार पाहिला मी*

ही कविता आठवत होती.

लक्ष्मीताई पुढे म्हणाली, 'सामाजिक मानसिकता आम्हाला बदलायची आहे. आजकाल लहान लहान मुलींवर अत्याचार होतात. त्यासाठी पोलीस पथक कुचकामी ठरत आहे. मात्र, आमच्या तृतीय पंथीयांची अशीच एक टीम पोलीस खात्यात घ्या आणि त्यांना अधिकार द्या. पहा, समाजात एकही निर्भया प्रकरण घडणार नाही आणि एकाही नराधमाची अशा प्रकारचे कृत्य करण्याची हिंमत होणार नाही.'

लक्ष्मी त्रिपाठी, ही अशीच एखाद्या खळाळत्या नदीसारखी, तर कधी शांत निश्चिन्त तर कधी भरपावसाळी नदीसारखी प्रवाही असते. जेव्हा स्त्रियांच्या प्रश्नांवर ती बोलते तेव्हा ठामपणे स्त्रियांनी कसं असायला हवं हे ती खूप सोप्या संवादी शब्दांत छान सांगते.

जर तुम्हा नॉर्मल स्त्रियांची ही अवस्था तर आमचं तर स्थानच नाकारण्यात आलं होतं... पण मला लढा द्यायचा होता माझ्या हक्कांसाठी आणि मी पेटून उठले आणि माझ्यासोबत माझा समूह सामील होता. आणि त्यामुळे आम्हाला यश आलं हे ती याच कॅनव्हासवर पुन्हा स्पष्ट करून सांगते. आज परिस्थिती बदलली आहे, समाज बदलत आहे, आम्हाला कुठेतरी स्थान मिळू लागलंय. मी स्वतः मानवाधिकार आयोगाच्या core team मध्ये कार्यरत आहे.

जगभरातील अनेक संस्थांसोबत ती सतत काम करतेय. युनायटेड नेशन्स असो की जागतिक आरोग्य संघटना, सगळ्यांसोबत लक्ष्मीताईने सहभाग नोंदवून हक्कांची लढाई ग्लोबली लढली आहे.

मला नारायण सुर्वे यांच्या ओळी आठवत होत्या

*थोडे राहिलेले, पाहिलेले, जोखिलेले आहे*
*माझ्या जगाची एक गंधवेणाहि त्यात आहे*
*केव्हा चुकलो, मुकलो, नवे शिकलोही आहे*
*जसा जगत आहे मी तसाच शब्दांत आहे.*
*रोटी प्यारी खरी आणखी काही हवे आहे*
*याचसाठी माझे जग राजमुद्रा घडवीत आहे*
*इथूनच शब्दांच्या हाती फुलं ठेवीत आहे*
*इथूनच शब्दांच्या हाती खड्‌गे मी देत आहे.*
*एकटाच आलो नाही युगाचीही साथ आहे*
*सावध असा तुफानाची हीच सुरुवात आहे*
*कामगार आहे मी तळपती तलवार आहे.*

**लक्ष्मी त्रिपाठी ह्यांचा कार्य परिचय :**

१) DAI वेलफेअर सोसायटी या NGO च्या त्या अध्यक्षा आहेत.
२) 'अस्तित्व' या नावाने त्यांनी एक संस्था सुरू केली आहे. ही संस्था लैंगिक अल्पसंख्याकांचे कल्याण, त्यांचे सहकार्य आणि विकासास प्रोत्साहन देण्यासाठी कार्य करते.
३) २००८मध्ये संयुक्त राष्ट्रात आशिया पॅसिफिकचे प्रतिनिधित्व करणाऱ्या त्या पहिल्या ट्रान्सजेंडर व्यक्ती आहेत.
४) लक्ष्मीजींनी त्यांचे चरित्र Red Lipstick, पूजा ह्यांच्यासोबत लिहिलेले हे चरित्र लेखन २०१६ मध्ये पेंग्विनने प्रकाशित केले.
५) त्या आचार्य महामंडलेश्वर आहेत.
६) त्या LGBTQ कोअर ग्रुप सदस्या आहेत.
७) त्या सामाजिक न्याय मंत्रालयाच्या कौन्सिल सदस्या आहेत.

*सारस्वतांनो! थोडासा गुन्हा घडणार आहे ।*

लक्ष्मीताई हे सगळं खड्या आवाजात मांडत होती आणि माझी मुलगी दीविजा आणि तिची मैत्रीण सेजल हे ऐकत होत्या.. अनुभवत होत्या. शेवटी त्यांनीही लक्ष्मी मावशीला प्रश्न विचारला,

'आम्ही काय करायला हवं असं तुम्हाला वाटतं? म्हणजे आमच्या पिढीच्या मुलींनी?'

**लक्ष्मीताई** : मुलींनी कधीच कुठलीच आणि कुणाचीही चुकीची गोष्ट मान्य करू नये. बंडखोरी करावी, स्वतःशी आणि समाजाशी, स्वतःच्या आत्मसन्मानाची लढाई ही हरप्रकारे लढलीच पाहिजे, त्यासाठी कुठलेच compromise करू नका. कधी कधी get a little spoilt, कधी कधी naughty व्हा.

The Whole Movement of Life is Learning.. हा जे. कृष्णमूर्ती ह्यांनी शाळांना लिहिलेल्या पत्रांमध्ये मांडलेला चांगुलपणाचा मौलिक संदेश आमच्या मुलींवरही पेरला जात होता.

सरतेशेवटी माझ्याकडून कोरोनाचा विषय निघाला, एव्हाना आमच्या गप्पा सुरू झाल्या होत्या. प्रश्न-उत्तर-मुलाखत अशी मांडणीसुद्धा विस्कटली होती. लक्ष्मीताई डोळ्यात डोळे रोखून तर कधी समोर आकाशात रोखून बोलत होती माझ्याशी... 'अश्विनी तुला सांगते, खरं तर, कोरोनाने या देशातील लोकांना खूप काही धडे दिले आहेत. या काळात आमच्या तृतीयपंथीयांचे काय हाल झाले हे शब्दांत सांगता येत नाही. तेव्हा खऱ्या अर्थाने देशात कशाची गरज आहे हे प्रकर्षाने माझ्या लक्षात आलं. तेव्हा तर काही मेडिकल क्षेत्रातील लोकांनी आणि डॉक्टरांनी सेवा कमी पण अक्षरशः बिझनेस केल्याचं पाहायला मिळालं. हजारो रुपयांच्या गोळ्या आणि एक रेमडिसिविर लाख लाख रुपयांना विकले जात होते. याला अपवाद होते पण खूप कमी. त्यामुळे ज्या सुविधा जनतेसाठी उभ्या केल्या आहेत, त्यांच्यावर सरकारने लक्ष ठेवायला पाहिजे. कारण कोरोनाच्या काळात औषधे, इंजेक्शन्स आणि ऑक्सिजन यांचा अक्षरशः बाजार मांडलेला दिसून आला. यातपण, सामान्य माणूस अक्षरशः होरपळून गेला होता. त्यात तुम्ही सामान्य माणसाशी तृतीयपंथ्यांची तुलना करून पहा. त्यांना कोण वाली होता? त्यांच्यासाठी औषधे, रेमडिसिविर, टॉसिलीझुमॅब ही इंजेक्शन्स आणि ऑक्सिजन आम्ही कोठून आणणार आणि कशी विकत घेणार होतो? त्यामुळेच आता यापुढे आम्हाला अधिक सक्षम व्हावे लागणार आहे,' लक्ष्मीताई शून्यात रोखून बोलत होती.

*जहाँ माँ के आँचल में सिमट के रह गए,*
*इस पुरुष प्रधान समाज के आगे।*
*और उनके कोख के बच्चों को*
*घर के बाहर का रास्ता दिखा दिया...*
*या मजबूर कर दिया की घर छोड़ना है।*
*वही बच्चे हम ट्रान्सजेंडर थे*
*कभी एक रोटी के लिए बदन बेचना पड़ा,*
*कभी सिग्नल पे भीक मांगनी पड़ी,*
*और कभी दूसरों की बधाई पे जाना पड़ा...*
*वही बच्चे हम ट्रान्सजेंडर थे*

एका पॉज नंतर भानावर येऊन पुन्हा ती सुरूच...

'काळ झपाट्याने बदलतोय, आम्हा तृतीयपंथीयांचे पूर्वीचे आणि आजचे दिवस यात फार जमीन-आसमानचा फरक आहे. तेव्हा आमच्या व्यक्तींना अन्यायाची जाणीव होऊनदेखील त्याविरुद्ध बंड पुकारण्याची हिंमत होत नव्हती. त्या तुलनेत आज फार प्रगती झाली आहे. आज आमची गरिमा चांगली झाली आहे. लोक आमचा सन्मान करायला लागले आहेत. प्रशासनात स्थान मिळाले आहे. इतकेच काय! न्याय व्यवस्थेतदेखील प्रतिनिधित्व प्राप्त करण्यात आमच्या भगिनी कमी नाहीत. पूर्वी जो काही अन्याय सोसला जात होता, आता त्यावर बंड पुकारण्याचे सामर्थ्य त्यांच्यात मोठ्या प्रमाणात आले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आमच्या अस्तित्वाचा लढा

अधिक बळकट करून एक दिवस आमचादेखील मुख्यमंत्री असला पाहिजे, आमचेदेखील डॉक्टर, वकील, इंजिनिअर्स झाले पाहिजे अशी प्रबळ इच्छा आहे. प्रत्येक क्षेत्रात आम्ही गुणवत्तेने स्वत:ला सिद्ध करू असे सामर्थ्य आमच्यात निर्माण करायचं आहे. जेणेकरून येणाऱ्या काळात आमच्या पिढीला हा असला मूलभूत संघर्ष करायला लागू नये! इतक्या उंचीचं ध्येय आम्हाला गाठायचं आहे. लक्ष्मीताई जणू तिच्या आवडत्या संघर्षयात्रेत वर्तमान ते भविष्य अशी भटकत बोलत होती, स्वत:शी बोलताना ती मर्यादित नाही तर अखिल मानवजातीसाठी बोलत होती.

खूप बोलायचं होतं. लक्ष्मीताई पण अगदी मनमोकळ्या गप्पा मारत होती. मध्येच एखाद्या गंभीर वाक्यात अभ्यासपूर्ण समाज आणि राजकीय टिप्पणी यायची. अध्यात्म, पॉलिटिक्स, सायन्स, ग्लोबल पॉलिटिकल अजेंडा, अफगाणिस्तानमधल्या स्त्रियांच्या, लहान मुलांविषयीची तिची ममता... काय नाही तिच्याकडे... कोणत्याही विषयावर ती तासन्‌तास बोलू शकते. त्या विदुषीमधला चांगुलपणा हा हिजडा पंथासाठीच नाही तर तुमच्या आमच्यासाठी मोलाचा आहे... तिच्यातला चांगुलपणा हा कोणत्याही धर्मापेक्षा, कोणत्याही जातीपेक्षा मोठाच आहे. ट्रान्सजेंडर वेगळे नाहीत. ते परग्रहवासी एलियन्स नाहीत. ते आपल्याच समाजाचा अविभाज्य भाग आहेत. त्यांचाही सर्वांप्रमाणेच समान हक्क आहे. मला मनातच वाटून गेलं की तिच्याकडून घेण्यासारखं खूप आहे... पण देण्यासाठी आपल्याकडे काही नाही. बहिणाबाई चौधरींची

*मानसा मानसा,*
*कधीं व्हशीन मानूस*
*लोभासाठी झाला मानसाचा रे कानूस!*

ही खंत त्या वेळेस मला जाणवत होती... राहून राहून तिच्या त्या लेखाचीच आठवण होत होती....

We are not taught to love ourselves...



# तृतीयपंथी उपेक्षितांचे वास्तव आणि अंतरंग



**ॲड. दिलशाद मुजावर**
सदस्या, महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी कल्याण महामंडळ
सदस्या, कोल्हापूर जिल्हा बालकल्याण समिती

खरं तर तृतीयपंथीयांबद्दल समाजामध्ये अजूनही खूप संमिश्र भावना आहेत. पण प्रत्येकाला त्यांचं विश्व जाणून घ्यायचं असतं. प्रत्येकाला समजून घ्यायचं असतं की तृतीयपंथी म्हणजे नेमकं काय?

पण तसं बघायला गेलं तर तृतीयपंथी असणं हे त्या व्यक्तीच्या हातातली गोष्ट नाही. काही विशिष्ट गोष्टींमुळे, हार्मोनल चेंजेसमुळे अशा पद्धतीचे लोक आपल्याला बघायला मिळतात.

एक संवेदनशील लहान मुलाचं अख्खं विश्व बदलून जातं. 'तो' चा 'ती' होते. 'ती' चा 'तो' होतो. आणि मग त्यांच्या आयुष्यात घालमेल सुरू होते.

काहीच समजत नाही. काहीच उमजत नाही. काही समजण्याच्या, काही उमजण्याच्या त्या कालखंडामध्ये बऱ्याच अशा गोष्टी अमानुषपणे कळत-नकळत त्यांच्या आयुष्यात घडत असतात. 'श्यामचा शामली' होणं ही खरं तर खूप शोकांतिका आहे आणि हे घडताना आपण बघत असतो. या लोकांचं समाजामध्ये फिरणं आपल्याला नेहमीच कुतूहलाचं वाटत असतं. आपण आपल्यापरीने त्यांना समजून घेण्याचा, त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न हा नेहमीच करत असतो. तर अशा ह्या तृतीयपंथी समाजाबद्दल जर विचार करायचा झाला तर असं लक्षात येतं की जगण्यासाठीचा संघर्ष हा नेहमीच तृतीयपंथीयांना करावा लागतो. आज स्वातंत्र्याला ७५ वर्षं पूर्ण झाली तरीदेखील 'आसवेच स्वातंत्र्याची आम्हाला मिळाली, अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली'. पुन्हा आपल्याला यांच्यासाठी संघर्ष करावा लागतोय! एका जिवंत माणसाच्या जगण्याचा संघर्ष. त्यांचं सगळं जीवन म्हणजे त्यांच्या अस्तित्वासाठीचा लढा आहे. आम्हाला माणूस म्हणून जगू द्या, आम्हाला मान्य करा, आम्हाला स्वीकारा म्हणून ते तडफडत आहेत.

मग अशा परिस्थितीमध्ये प्रश्न निर्माण होतात -

तृतीयपंथी कोण आहेत? त्यांचा जन्म कसा होतो? त्यांना कुटुंब स्वीकारतं का? समाज स्वीकारतो का? संविधान काय सांगतं? कायदा काय सांगतो?

नालसा जजमेंटनी काय दिलं? समाजाच्या प्रवाहात येण्यासाठी आपण समाज म्हणून काय केलं पाहिजे? असे अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे राहतात. मग आता प्रश्न असा येतो की तृतीयपंथी म्हणजे नेमके कोण? यांच्यामध्ये बरेच मतप्रवाह आहेत.

आता बघा, आपल्या समाजामध्ये स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या शरीररचनेमध्ये फरक आहे. समाजामध्ये स्त्री आणि पुरुष ह्यामध्ये भेदभाव हा नेहमीच केला जातो. ह्याचं कारण आपल्याला त्यांच्या शारीरिक फरकामध्ये सापडेल असं नाही कारण 'लिंग हे शारीरिक आहे तर लिंगभाव हा समाज घडवतो'.

आपण कसं वागावं? आपण काय कपडे घालावेत? स्त्रीने काय कपडे घालायचे? पुरुषाने काय कपडे घालायचे? हे आपण ठरवतो आणि मग याच्यामुळे आज समाजामध्ये विषमता दिसून येते. तृतीयपंथीयांच्या बाबतीत आपल्याला हा फरक जाणवतो.

त्यांचं जगणं, त्यांचा स्वीकार करणं, तोही आपल्यातला एक घटक आहे, त्याचा विचार होऊन तो विचार समजावून घेणं, हे गरजेचं असताना ते घडताना दिसत नाही. उलट थर्ड जेंडर म्हणून हिणवणं हेच नशिबी येतं.

रामायण आणि महाभारत यामध्येसुद्धा किंवा मोगल राजवटीमध्येसुद्धा याचा उल्लेख आपल्याला आढळतो. मोगल

राजवटीमध्ये राणीच्या रक्षणाची जबाबदारी तृतीयपंथीयांवर होती. आज समाजामध्ये जशी भाषा दर कोसाला बदलते तशी तृतीयपंथीयांना नावाने बोलण्याचासुद्धा फरक पडतो. उदाहरण सांगायचं झालं तर, त्यांना आपण हिजडा, छक्का, पवया, खोजे, खोती, फवडा, देवडा या अनेक नावाने ओळखतो.

एखादी व्यक्ती जन्मतः नैसर्गिकरीत्या लैंगिक विकृती घेऊन जन्मास येते आणि अशा वेळेला ती स्त्रीलिंग आहे की पुल्लिंग आहे हे स्पष्ट होत नाही. म्हणजेच तो नर आहे की मादी हे स्पष्ट होत नाही.

तृतीयपंथी ही अशी व्यक्ती असते की ती जन्माच्या वेळेस तिचं लिंग वेगळं असतं, नंतर ती व्यक्ती स्वत:ला वेगळ्या लिंगाची समजते आणि तिला ट्रान्सजेंडर म्हणतात. आता हे ट्रान्सजेंडर औषध, ऑपरेशन, हार्मोनल रिप्लेसमेंट थेरपी आणि सेक्स सर्जरीने लिंग बदलून घेतात. त्यांना ट्रान्सफर Sexual म्हटलं जातं.

ही मंडळी निसर्गाने आपल्याला दिलेल्या शरीराबद्दल कायम असंतुष्ट असतात आणि समाजाने आपल्याला विरुद्ध लिंगी म्हणूनच ओळखावं अशी त्यांची इच्छा असते. असंही होतं की काही पुरुषांना आपण पुरुष आहोत हे मान्यच नसतं. त्यांना सारखं वाटतं की माझा आत्मा स्त्रीचाच आहे. त्यांच्यावर कितीही उपचार केले तरी फरक पडत नाही, मग हे लोक ऑपरेशन करून घेतात.

आताच्या काळात विचार करायचा झाला तर तृतीयपंथी यांचा जन्मच NALSA Judgement ने झाला असं म्हणता येईल. १४ एप्रिल २०१४ रोजी नालसा जजमेंट आलं. म्हणजे नॅशनल लीगल सर्व्हिस ॲथोरिटीने एक निकाल दिला. या निकालाद्वारे तृतीयपंथीयांना समाजामध्ये माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला.

तृतीयपंथीयांबद्दल NALSAने सांगितलं की तृतीयपंथीयांचा विषय हा वैद्यकीय किंवा सामाजिक विषय नसून मानवी हक्काचा विषय आहे. त्यांना समान दर्जा दिला पाहिजे, समान माणूस म्हणून जगायचा अधिकार त्यांना दिला पाहिजे. संविधानामध्ये सर्वांना समान दर्जा दिला पाहिजे. यांच्यासाठीसुद्धा आपण विचार करणं गरजेचं आहे.

नालसा जजमेंट अनुसार त्यांना त्यांची लिंग ओळख देण्याचा अधिकार आहे. नालसा निकाल हा त्यांच्यासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असा निकाल आहे. यामध्ये असं म्हटलं आहे की –

१) हिजडे, यूनक यांना स्त्री किंवा पुरुष अशा द्वैत विभागणीपेक्षा तृतीयपंथी किंवा तृतीय लिंगभाव ट्रान्सजेंडर म्हणून भारतीय संविधानाच्या विभाग ३ नुसार आणि संसद आणि राज्य विधानसभेने वेळोवेळी पारित केलेल्या कायद्यानुसार मानण्यात यावे.

२) तृतीयपंथीयांचा लिंगभाव, जेंडर त्यांनी स्वत: सांगितल्याप्रमाणे मांडला जाईल आणि त्यानुसार त्यांची नोंद स्त्री, पुरुष किंवा तृतीय लिंग म्हणून डिझाइन करावी. राज्य आणि केंद्र सरकारने त्याची काळजी घ्यावी.

३) केंद्र आणि राज्य सरकार यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, तृतीयपंथींना सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशापासून सरकारी भरती करण्यात यावी आणि आरक्षण देण्यात यावे. ओबीसी म्हणून त्यांना मान्यता देण्यात यावी. ट्रान्सजेंडरसाठी वेगळी siro सर्व्हिस सेंटर चालवले जावेत कारण त्यांना सर्वांत जास्त लैंगिक आरोग्याचे प्रश्न भेडसावतात. अशा पद्धतीचे हॉस्पिटल पश्चिम बंगालमध्ये आहे.

४) त्यांना ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते जसे की भीती, स्वत:च्या लिंगभाव, जेंडरविषयी अस्वस्थता, सामाजिक दबाव, मानसिक ताणतणाव, आत्महत्येचे विचार, सामाजिक कलंक असल्याची भावना या सर्व बाबींकडे केंद्र आणि राज्य सरकारने गांभीर्याने बघावे आणि एखाद्याला लिंग जाहीर करण्यासाठी शस्त्रक्रियेचा आग्रह धरला जाणे हे बेकायदेशीर आणि अनैतिक समजले जाईल.

सार्वजनिक ठिकाणी त्यांच्यासाठी वेगळी शौचालये उपलब्ध करावीत.

५) केंद्र सरकारने सामाजिक कल्याणासाठी वेगवेगळ्या योजना राबवाव्यात. राज्य आणि केंद्र सरकारने अशा सामाजिक जाणिवांच्या योजना आखाव्यात जेणेकरून तृतीयपंथींना आपणदेखील एक महत्त्वाचे समाजाचे घटक आहोत याचा विश्वास वाटेल. त्यांना त्यांचे सामाजिक आणि सांस्कृतिक स्थान परत मिळवून द्यावे.

आता ह्या सगळ्या गोष्टी आपण बघत असताना तृतीयपंथीयांसाठी अलीकडेच २०१९ मध्ये ट्रान्सजेंडर व्यक्ती संरक्षण आणि अधिकार कायदा अस्तित्वात आला. या कायद्यामध्ये काही अटी या तृतीयपंथीयांच्यावर लादण्यात आल्या. त्यांनी विरोध केला असूनही तरीही आपल्या संविधानातील समतावादी ट्रान्सजेंडर जनसमुदायाला आपले मूलभूत अधिकार पुरेसे प्रमाणात आपण देऊ शकले नाही




आणि ही शोकांतिका आहे. सामान्य माणसांसारखं उपजीविकेचं साधन तृतीयपंथीयांना उपलब्ध नाही. भीक मागणं, सेक्सवर्क करणं, गाणी म्हणणं, मोठ्या शुभकार्यात सहभागी होऊन तिथे गाणी म्हणून पैसे मिळवणं, हा आजही त्यांचा व्यवसाय आहे.

त्यांच्यासमोर बरीच आव्हानं आहेत. कायदेशीररीत्या त्यांना मूल दत्तक घेण्याचा अधिकार नाही. तसंच संपत्ती खरेदी करताना जेंडरचा प्रश्न येतो. हॉस्पिटल असोत, पोलीस स्टेशन असोत, सगळीकडे त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जाते. नोकरीच्या ठिकाणी इतर सहकारी कर्मचारी भेदभाव करतात.

लग्न केलं तर कायदेशीररीत्या विवाह नोंदणी केली जात नाही. हे सगळं बघता मला असं वाटतं की शालेय स्तरावर जेंडर sensitization होणं गरजेचं आहे. मुलाला लहानपणीच ह्या गोष्टीची माहिती दिली तर मोठेपणी कदाचित त्याच्यामध्ये नक्कीच बदल होऊ शकतो.

बऱ्याचदा अशा लोकांना या सगळ्या गोष्टींमुळे कुटुंब सोडावं लागतं. जगताना बऱ्याच गोष्टींना सामोरं जावं लागतं. याच्यामध्ये सगळ्यात महत्त्वाची गुरू-शिष्य परंपरा आहे. त्यानंतर शिक्षणाचा अभाव आहे. त्यांचं शिक्षण नसल्यामुळे त्यांचं शोषण केलं जातं. आज महामंडळाची स्थापना झाली आहे. महाराष्ट्रामध्ये अद्याप त्यांच्या कामकाजाची म्हणावी तशी सुरुवात झाली नाही.

आज बरेच जण शिक्षणाच्या प्रवाहात येत आहेत, शिकत आहेत. त्यांच्यामध्ये काही आमदार आहेत, ग्रामपंचायत सदस्य आहेत. परवाच औरंगाबादचा हायकोर्ट निकाल घेऊन अंजली पाटीलने निवडणूक लढवली.

परिवर्तन होत आहे, समाजाची मानसिकता बदलतीये. दोन पावलं त्यांनीसुद्धा बदलण्याची गरज आहे. भीक मागणं हे मनुष्य म्हणून जन्माला आल्यानंतर योग्य नाही. काम करण्याची तयारी ठेवावी लागते. स्वाभिमानाने जगता आलं पाहिजे! आणि हे सगळं बघताना मी असा विचार केला की, मी ह्यांच्यासाठी काय करू शकते?

आणि मग मी इचलकरंजीमधील तृतीयपंथींना एकत्र करून त्यांना आधार कार्ड असेल, रेशन कार्ड असेल, मतदार ओळखपत्र असेल ते त्यांना मिळवून दिलं! त्यानंतर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून त्यांच्यासाठी बऱ्याच गोष्टी केल्या. त्यानंतर स्टँडवर त्यांच्यासाठी टॉयलेटची स्वतंत्र सोय केली. त्याचप्रमाणे इचलकरंजी नगरपालिका ही भारतातील पहिली नगरपालिका असेल जिथे त्यांच्या वार्षिक बजेटमध्ये तृतीयपंथीयांसाठी २५ लाखाची तरतूद केलेली आहे.

त्याचप्रमाणे त्यांना स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी बचत गट काढून दिले की जेणेकरून ते स्वतःचा व्यवसाय सुरू करतील. सगळ्या गोष्टी होत असताना शासनाकडून खूप मोठ्या गोष्टी होणं गरजेचं आहे.

ए) तृतीयपंथीयांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी कला अकादमीची स्थापना करणं.

बी) समाजातील मुख्य प्रवाहात त्यांना आणण्यासाठी, त्यांना उदरनिर्वाहासाठी योग्य ती साधनं उपलब्ध करणं,

लिंगाधारित जनगणना होणं गरजेचं आहे.

सी) आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र देणं. ज्यांच्याकडे काही संपत्ती नाही त्यांना घरकुल योजनेतून किंवा पडीक जमिनीचा वापर करून डोक्यावर छत देण्यासाठी प्रयत्न करणं.

डी) त्यांच्यासाठी विद्यापीठांतर्गत अभ्यासक्रम तयार करणं.

ई) शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांचा आर्थिक आणि सामाजिक विकास घडवून आणण्याकरता प्रयत्न करणं.

एफ) उपजीविकेची शाश्वती नसल्याने तृतीयपंथी समुदायाला वेश्यावृत्ती, भिक्षा मागणं, धार्मिक समारंभप्रसंगी आशीर्वाद देणं आदी कार्यक्रमांचा, मार्गांचा आश्रय घ्यावा लागतो. त्यांच्यासाठी भरीव कामाची योजना आखणं.

जी) अत्याचाराबाबत कुठेही दाद घेतली जात नाही व दखलपात्र गुन्हा म्हणून नोंद केली जाते.

एच) आरोग्य, निवारा, शिक्षण, माणूस म्हणून जगण्याची हमी जे भारतीय संविधानाच्या कलम १४, १५ ते २१ मध्ये सांगितले आहे, त्याची पायमल्ली होताना दिसते. नो डिस्क्रिमिनेशन म्हणत असताना आपण यांच्यामध्ये भेदभाव करत असतो.

आज कोरोनाच्या काळामध्ये खरं तर या समाजाला स्वत:चं अस्तित्व टिकवून ठेवणं, जगणं फार अवघड झालेलं आहे. आणि अशा समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून, माणूस म्हणून सन्मानाने जगण्याची संधी देणं हे सुजाण नागरिकाचं पहिलं कर्तव्य आहे.

चला तर मग एक पाऊल आपण उचलुयात आणि दुसरं पाऊल त्यांना उचलायला लावुयात. या प्रगतीपथावरची वाटचाल आपण या तृतीयपंथीयांसमवेत करूयात. चला तर प्रगतीसाठी, राष्ट्राच्या भवितव्यासाठी या समाजाला आपल्यामध्ये सामील करून घेऊयात. मैत्रीचा, बंधुत्वाचा, मायेचा हात त्यांना देऊयात.


दऱ्याखोऱ्या झाडे फुले
पक्षी माणसे
पृथ्वी नटलेली

नक्षीदार आकाशानेही
पृथ्वी वर शालू आच्छादलेला

धरती प्रेमाने आयुष्य जोपासते
आकाशाला साद घालत
अन्न जल व्यवस्था लावते
सगळ्याना एक सारखे मानते

तृतीयपंथी बांधवाना
का अस्पृश्याची वागणूक मिळते?

दिवाळी शुभेच्छा

आम्ही संविधानास साक्षी ठेऊन तृतीयपंथी बांधवाना न्याय हक्क मिळावे या करीता आपल्या संस्थेमार्फत केल्या जाणाऱ्या सार्थक प्रयत्नांना भरघोस यश मिळो अशी सद्भावना व्यक्त करतो. शेवटचा माणूस हा जर संविधानाचा केंद्रबिंदू असेल तर तृतीयपंथीय बांधवाना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दमदार पावले उचलली जावीत हीच सदिच्छा...

शुभेच्छुक

आर. सी. नंदेश्वर — वरिष्ठ अध्यक्ष | प्रशांत डोळे — अध्यक्ष | संजय कोकने — सचिव | सुनिल हुमणे — उपाध्यक्ष | मेघनाथ कांबळे — प्रभारी चेअरमन

आणि

'सेंट्रल बँक एस सी एस टी ओ बी सी एम्प्लॉईज वेलफेअर असोसिएशन पुणे'चे सर्व सन्माननीय पदाधिकारी





# जोगवा माणुसकीचा, जोगवा समानतेचा

**मुलाखत : उपेंद्र लिमये**
**मुलाखतकार : शुभांगी मुळे**

साहित्य, कला, संस्कृती हे सर्व घटक आपलं जीवन समृद्ध बनवतात. यामुळे परिपक्व विचारांची शिदोरी आपल्याला मिळते. अनेक आत्मचरित्र, काव्यसंग्रह, अनेक चित्रपट, नाटकं, कलाकृतींचे आविष्कार या सगळ्या गोष्टींमुळे आपलं व्यक्तिमत्त्व खुलतं, बहरतं आणि यामुळे आपला समाजदेखील कळत-नकळत संस्कारित होतो.

आता चित्रपटांचंच बघा ना, असे अनेक चित्रपट आहेत जे आपल्या मनात कायम घर करून आहेत. चित्रपटातला संदेश, त्यातील कलाकारांचा अभिनय अशा अनेक गोष्टी आपल्याला अंतर्मुख होऊन विचार करायला लावतात. त्यातलाच एक चित्रपट म्हणजे जोगवा. श्रीपाल मोराखिया निर्मित, राजीव पाटील दिग्दर्शित चित्रपट जोगवा २५ सप्टेंबर २००९ रोजी प्रदर्शित झाला. २००९चा राष्ट्रीय पुरस्कार विजेता हा मराठी चित्रपट. या चित्रपटात उपेंद्र लिमये, मुक्ता बर्वे, प्रिया बेर्डे, विनय आपटे आणि किशोर कदम यांच्या मुख्य भूमिका आहेत. पटकथा संजय कृष्णाजी पाटील व संगीत अजय-अतुल यांचं आहे. चित्रपटाची कथा ही डॉ. राजन गवस यांच्या चौंडक आणि भंडार भोग, तसेच चारुता सागर यांच्या दर्शन या कादंबऱ्यांवर आधारित आहे.

कर्नाटकमधील यल्लम्मादेवीला मुले-मुली सोडण्याची अनिष्ट रूढी अजूनही समाजात काही अंशी प्रचलित आहे. या मुलांना 'जोगता' तर मुलींना 'जोगतीन' म्हणतात. यांचं हृदयद्रावक असं जीवन, समाजातील दुय्यम स्थान, त्यांचं लैंगिक शोषण, भावनिक ओढाताण अशा अनेक गोष्टी दिग्दर्शक राजीव पाटील यांनी अतिशय साधेपणाने पण वास्तवतेने मांडल्या आहेत. समाज जागृतीचे काम या चित्रपटाने केलं आहे आणि योगायोग म्हणजे या चित्रपटात तय्यप्पांची भूमिका करणारे उपेंद्र लिमये यांच्याशी माझ्या गप्पा झाल्या आणि या गप्पा इतक्या रंगल्या की त्यांचा एकूण या चित्रपटात अभिनय करतानाचा विचार, केलेला अभ्यास, घेतलेली मेहनत अशा सर्व गोष्टी खूप मनमोकळपणाने त्यांनी मला सांगितल्या. तर सुप्रसिद्ध अभिनेते उपेंद्र लिमये यांच्याबरोबर मी साधलेला संवाद -

**प्रश्न : एखाद्या कलाकाराला कुठलीही भूमिका करताना कशा पद्धतीचा अभ्यास करावा लागतो?**

**उत्तर :** मुळात असं आहे की पूर्वतयारी करण्याएवढ्या भूमिका तुमच्या वाट्याला तुमच्या करिअरमध्ये मोजक्याच येतात. आणि माझ्या बाबतीत जर का बोलायचं झालं तर माझी पहिली आठ ते दहा वर्षं ही प्रायोगिक रंगभूमीवर काम करण्यात गेली. त्यामुळे जर माझे चित्रपट तुम्ही बघितले तर तुमच्या लक्षात येईल की जास्तीत जास्त socio political किंवा content oriented, hard hitting अशा पद्धतीने विषय मी स्वत: निवडलेले आहेत. डॉक्टर जब्बार पटेल यांच्या 'मुक्ता' या चित्रपटापासून माझ्या करिअरची सुरुवात झाली. मग बनगरवाडी असेल, ट्रॅफिक सिग्नल असेल, जोगवा असेल, खग असेल, असे सगळे ऑफ बीट मी माझ्या करिअरमध्ये केले जे समाजातल्या काही घटनांविषयी स्टेटमेंट करू शकतात. त्यामुळे भूमिकेची अभ्यास करण्याची गरज अशा पद्धतीच्या चित्रपटांमधून तुम्हाला मिळू शकते.

'खग'मध्ये स्मशानभूमीत काम करणारा एखादा माणूस



असेल किंवा 'जोगवा'मधला जोगता अशा भूमिकांचा अभ्यास करताना जी संहिता आहे तिचा अभ्यास मी पहिले करतो आणि संहितेतून व्यक्तिरेखेबद्दलचे संस्कार तुमच्यावर होत जातात. माझ्या बाबतीत जर बोलायचं झालं तर मी व्यक्तिरेखेची इनर पर्सनॅलिटी आणि आउटर पर्सनॅलिटीचा अभ्यास करतो. म्हणजे त्या व्यक्तिरेखेचे अंतर्मन आणि त्या व्यक्तिरेखेचं बाह्यरूप या दोन गोष्टींचा अभ्यास करावा लागतो. बाह्यरूप तशा अर्थाने सोपं असतं. तिथे तुम्हाला मेकअपचा आधार असतो, वेशभूषेचा आधार असतो. पण त्या व्यक्तिरेखेचं अंतर्मन समजून घेणं हे सर्वस्वी, तो कलाकार त्या व्यक्तिरेखेला किती शरण जातो यावर अवलंबून असतं. आणि त्याप्रमाणे कलाकार त्या व्यक्तिरेखेच्या जवळपास जाऊ शकतो.

**प्रश्न : जोगवामध्ये तय्यप्पाची भूमिका करत असताना तुम्हाला पूर्वतयारी काय करावी लागली?**

**उत्तर :** जेव्हा जोगवासारखा चित्रपट मला मिळाला तेव्हा मी इतर कुठलीही कामं घेतली नाहीत. मला आठवतं त्याप्रमाणे तीन-चार महिने आधीपासून या चित्रपटावर लक्ष केंद्रित केलं होतं आणि दुसरं काहीही काम करत नव्हतो. या तीन-चार महिन्यांत मला माझे केस वाढवायचे होते. तय्यप्पाची बॉडी लँग्वेज शिकणं गरजेचं होतं, त्याच्यानंतर त्या साडीमधला तो वावर माझ्यासाठी महत्त्वाचा होता. मेकअप केल्यावर, साडी नेसल्यानंतर आरशात स्वत:ला बघितल्यावर तय्यप्पामध्ये आपल्याला उपेंद्र लिमये दिसतोय का, तो शोधण्याचा प्रयत्न करणे, त्या व्यक्तिरेखेच्या जवळपास जाण्यासाठी काय करता येईल याचा विचार मी करत होतो. शुटिंगच्या अगोदर मी चंदू नावाच्या एका जोगत्याला ज्याचं तय्यप्पासारखंच झालेलं होतं, मी त्याच्याशी मैत्री केली, त्याच्याशी गप्पा मारल्या. त्या भूमिकेचा अभ्यास करण्यासाठी एक खऱ्याखुऱ्या जोगत्याची मानसिकता समजून घ्यायची होती मला. गडहिंग्लज भागामध्ये चंदू जोगता राहत होता. चंदू जोगत्याकडून मला त्या व्यक्तिरेखेच्या अंतर्मनाची ओळख पटली आणि जास्तीत जास्त व्यक्तिरेखेच्या जवळ जाऊ शकलो. जोगवाचं यश हे कलाकार म्हणून जरी तय्यप्पा हा व्यक्तिरेखेला राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित म्हणून असलं तरी त्याचं पहिलं श्रेय लेखकाला जातं. त्याने ती व्यक्तिरेखा इतक्या सशक्तपणे मांडली आहे. त्याच्यानंतर दिग्दर्शकाकडे त्याचं श्रेय जातं. कारण त्याने अख्खा चित्रपट बघितलेला असतो आणि प्रत्येक व्यक्तिरेखा चित्रपटामध्ये कशी दिसेल याचा विचार त्याने केलेला असतो. अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे दिग्दर्शक आणि अभिनेता यांच्यामधली केमिस्ट्री जमणं खूप महत्त्वाचं असतं. राजू पाटील माझा अत्यंत जवळचा मित्र होता आणि त्याच्या पहिल्या चित्रपटापासून मी त्याच्याबरोबर काम करतोय. दुर्दैवाने तो आता आपल्यामध्ये नाहीये. पण त्याच्या अनेक कलाकृतींमधून तो कायम जिवंत राहणार आहे.

राजीव मला कायम असं म्हणायचा की 'उपेंद्र तुला मी अशी भूमिका देणार आहे की ज्याने तुझ्यातल्या कलाकाराचा खऱ्या अर्थाने कस लागेल आणि हे माझं स्वप्न आहे.' आणि जेव्हा त्याने जोगवा करायचं ठरवलं, 'आज मी हा चित्रपट फायनल केला आहे आणि तय्यप्पाची भूमिका तू करतोयस आणि भूमिकेत तुझा खरा कस लागणार आहे.'

**प्रश्न : अशी ही आव्हानात्मक भूमिका की ज्यामध्ये तुम्हाला स्त्रीचा वेष कायम धारण करावा लागणार होता. अशी भूमिका करावी की नाही असा तुम्हाला प्रश्न पडला का?**

**उत्तर :** जेव्हा ही भूमिका माझ्याकडे आली तेव्हा माझे काही सहकलाकार मित्रांनी सांगितलं होतं की 'उपेंद्र ही भूमिका तू करू नकोस.' कारण ही भूमिका फसण्याची दाट शक्यता होती. आणि ही जर भूमिका माझी फसली असती तर त्याचा परिणाम माझ्या करिअरवर झाला असता. परंतु मी स्वत:ला असं म्हणालो की मी प्रायोगिक रंगभूमीवर काम करून आलेलो आहे जिथे मला प्रयोग करण्याची सवय आहे. आमचे अनेक प्रयोग फसलेले आहेत आणि प्रयोग फसल्यानंतर स्वत:ला क्रॉसचेक करून त्याच्यातून स्वत:मध्ये सुधारणा करून नवीन प्रयोग करून बघितले आहेत. म्हणजे एखादा प्रयोग फसला म्हणून जर का मी प्रयोग करणंच थांबवलं तर हे फारच फालतूपणाचं लक्षण आहे. आणि मग तुम्ही स्वत:ला अधिक विकसित कसं करणार? स्वत:मध्ये सुधारणा करताना जर तुम्ही पडलात तर परत उभं राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मागच्या वेळेस कशामुळे पडला होतात याचा विचार करून ती चूक परत होणार नाही हे बघितलं पाहिजे. तुम्ही दर वेळेस नवीन चूक करा, हरकत नाही. Don't repeat the same mistake असं मी म्हणतो कायम. वेगवेगळ्या प्रॉब्लेम्सना तोंड देत पुढे जा आणि मग फाइन ट्युनिंग करत जा, अशा मानसिकतेतून मी वाटचाल करत आलेलो आहे. आणि त्यामुळेच जोगवामधली ही भूमिका मी एक आव्हानात्मक भूमिका म्हणून स्वीकारली. आणि मी या भूमिकेला संपूर्णपणे शरण जायचं ठरवलं.

**प्रश्न : उपेंद्रजी, तुम्ही जोगता आणि जोगती याबद्दल काय सांगू इच्छिता?**



**उत्तर :** मुळामध्ये अंधश्रद्धेतून, दारिद्र्यातून निर्माण झालेली ही एक प्रथा आहे. या प्रथेला अनेक कंगोरे आहेत. यल्लमा देवीला बोललेले वेगवेगळे नवस आणि त्या नवसापोटी जो मुलगा देवीला वाहिला जातो त्याला जोगता असे म्हणतात आणि नवसापोटी वाहिलेली जी मुलगी असते तिला जोगती असं म्हणतात. त्यांना लहानपणीच देवीला वाहिलं जातं, म्हणजे देवीशी लग्न केलं जातं आणि आपल्याकडे जसा मुंजीचा कार्यक्रम असतो तसा वयात आल्यानंतर यांचा देवीशी लग्न लावून देण्याचा कार्यक्रम असतो. जोगवा चित्रपट जर तुम्ही बघितला असेल तर त्यामध्ये माझ्या एन्ट्रीचे जे दृश्य आहे त्यामध्ये एका बाजूला सुलीचे लग्नाचे विधी पार पडले जातायेत आणि दुसऱ्या बाजूला तय्यप्पाचे लग्नाचे विधी पडतायेत असं आपल्याला दिसतं. या जोगता आणि जोगतीने काय करायचं तर आयुष्यभर देवीची सेवा करायची. आणि हे देवीचे भक्त म्हणून मान मिळेल असं होत नाही तर त्यांची पिळवणूकच होते. त्यांच्याकडून भंडारा लावून घेणं हा एवढा त्यांना मान दिल्यासारखं करायचं पण त्यांचं जेवढं वेगवेगळ्या पद्धतीने शोषण करता येईल तेवढं करायचं. आपण जोगवा चित्रपट जर बघितला असेल तर, एका दृश्यामध्ये मी तय्यप्पाच्या भूमिकेतून असं म्हणतो की, 'मी व्यवस्थित होतो, माझं सगळं बरं चाललं होतं. मी इचलकरंजीच्या एका कापड गिरणीत कामाला होतो आणि मध्येच मला बरं वाटेनासं झालं. मी चक्कर येऊन दोन-तीन वेळा पडलो, माझ्या लघवीतून रक्त गेलं आणि याचा अर्थ माझी मासिक पाळी चालू झाली असं गृहीत धरून मला बळजबरीनं जोगता केलं गेलं.' सुलीच्या केसांमध्ये जट झाली, म्हणजे जट केसांमध्ये निर्माण होणं हे देवीचा सांगावा असल्यासारखा संकेत ही मंडळी घेतात. जे खरं तर स्वच्छतेशी संबंधित आहे, म्हणजे अस्वच्छतेतूनच ही जट निर्माण होते. पण त्या जटेला चीक लावून ती आणखी घट्ट करून, सुटणार नाही याची व्यवस्था करून, तिला देवीचा संदेश आलाय आणि संकेत दिलाय असं समजून सुलीला जोगती करतात. आणि मग चित्रपटात पुढे तय्यप्पा आणि सुलीची प्रेम कहाणी बघायला मिळते.

**प्रश्न : उपेंद्रजी, या चित्रपटातल्या तुमच्या भूमिकेबद्दल जाणून घेत असताना मला असे विचारायचे की तुम्ही तरुण पिढीला काय संदेश देऊ इच्छिता?**

**उत्तर :** आता तर मुळात स्पर्धेचं युग आहे. प्रत्येक टप्प्यावर स्पर्धा आहे. मूल जन्माला आल्यापासून, जसं की माझं बाळ जोरात रडतं का शेजारणीचं बाळ जोरात रडतं, इथपासून स्पर्धेला सुरुवात होते ते मृत्यूपर्यंत ती स्पर्धा पाचवीला पुजलेली असते. पण एक मुद्दा नक्की आहे की जी गोष्ट तुम्हाला मनापासून आवडते त्या गोष्टीत तुम्ही स्वत:ला वाहून घ्या, त्या क्षेत्रामध्ये तुम्ही काम करा आणि मग तुम्हाला संघर्षाचं, धावपळीचं, उपाशीपोटी काम करण्याचं काहीच वाटणार नाही. जेव्हा तुम्ही आपल्या आवडत्या क्षेत्रात संघर्ष करता तेव्हा त्याचा त्रास वाटत नाही, तुम्ही झोकून देऊन काम करता, निखळ आनंद मिळवता आणि अतिशय वाखाणण्यासारखा असा निकाल लागतो.

संदेश देण्याएवढा मी मोठा नाही. मला फक्त एवढं वाटतं की कोणी कुठे जन्म घ्यायचा हे काही आपल्या हाती नसतं. मुळातच निसर्गाच्या या नियमानुसार आपण वेगवेगळ्या स्थळांवर असतो आणि हे मुळात आपलं कर्तृत्व नाही. भोगल्या जाणाऱ्या स्थळांमध्ये ज्यांचा जन्म झालेला आहे त्यात सगळ्यांनी अगदी कणखर वृत्तीने परिस्थितीला भिडावं आणि आयुष्याला झुकवावं. सकारात्मक दृष्टी ठेवावी आणि आत्मविश्वासाने पुढे जावं.

**प्रश्न : समाजाने या ट्रान्सजेंडरकडे कसं बघावं?**

**उत्तर :** मंडळी, जोगवा चित्रपटामध्ये आपण बघितलं की, तय्यप्पाला पुरुष असूनसुद्धा एका स्त्रीसारखं वागावं लागतं आणि याचा त्याला खूप त्रास होतो. पण त्याच्यातला पुरुष हा कायम जागा असतो आणि नंतर तो सुलीच्या प्रेमात पडल्यावर तिला म्हणतोसुद्धा, 'काय ग मी एमल्या आहे का?' तर ती म्हणते की 'नाही तू पक्का पुरुष आहेस'. आणि या चित्रपटातला क्लायमॅक्स म्हणजे तय्यप्पा आपली वेशभूषा बदलून पुरुषाच्या वेषात आपल्यासमोर येतो. म्हणजे तसं हे बंडखोर पात्र आहे. ज्याप्रमाणे त्याची स्त्रीवेशात राहून घुसमट होते, तसंच काहीसं तृतीयपंथीयांचं होत असेल नाही का. म्हणजे आत्मा स्त्रीचा पण लादलं गेलं आहे पुरुषत्व. तर माझ्या मते जोगत्याची आणि तृतीयपंथीयांची घुसमट ही एकच आहे. समाजव्यवस्था आणि नैसर्गिक आलेल्या काही गोष्टी याच्या कचाट्यात सापडलेला हा तृतीयपंथी / ट्रान्सजेंडर समाज.

आज माझा ट्रान्सजेंडर मित्र इथे नैसर्गिक वेगळ्या परिस्थितीत आहे. यामध्ये त्याची चूक नाहीये. आणि आज मी त्याच्या ठिकाणी नाही यात कोणाचं काही कर्तृत्व नाही. हा फक्त निसर्ग आहे आणि निसर्गाच्या या नियमावर माझ्यासारख्यांनी माज करू नये. माज फक्त त्याच गोष्टींवर करावा ज्यातून स्वत:चे कर्तृत्व दिसेल. आणि सर्वांना बरोबर घेऊन जर आपण पुढे गेलो तरच आपला अभिमान वाटावा असं आपलं वागणं ठरेल. तेव्हा मंडळी, कोणालाही कमी लेखू नये आणि सर्वांनी एकत्र पुढे जावं.

*छायाचित्रे स्रोत : इंटरनेटवरून साभार*

श्री रवळनाथ को-ऑप.
हौसिंग फायनान्स सोसायटी लि.,आजरा
(मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - डॉक्टर्स कॉलनी,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

Silver Jubilee

आम्ही साकारतो तुमचे गृहस्वप्न...

वैशिष्ट्ये

गृहकर्ज @ ८.७५%

ठेवी ३२५ कोटी

- महिला व सैनिकांसाठी व्याजदरात 0.२५% सवलत.
- घर बांधणी व N.A. प्लॉट खरेदीसाठी १.५0 कोटी पर्यंत कर्ज सुविधा.
- गृह कर्जाच्या मुद्दल व व्याजास आयकरात सवलत.
- कर्ज हस्तांतरणाची सुविधा.
- कर्जासाठी प्रॉपर्टी व विमा पॉलिसी तारण आणि पगारातून वसुली असल्याने ठेवी १00% सुरक्षित.
- मोफत RTGS / NEFT सुविधा आणि स्वतंत्र IFSC Code.
- मायक्रो ATM, डेबिट कार्ड व लॉकर सुविधा.
- मोबाईल बँकिंग सुविधा लवकरच कार्यान्वीत करीत आहोत.
- वीज बील भरण्याची सुविधा.
- गंभीर आजारी व वयोवृद्ध ग्राहकांना घरपोच सेवा.

ठेवींना आकर्षक व्याज

प्रा. व्ही. के. मायदेव
उपाध्यक्ष

श्री. एम. एल. चौगुले
संस्थापक अध्यक्ष

प्रधान कार्यालय संचालक मंडळ

• प्राचार्य डॉ. रामचंद्र निळपणकर • प्रा. डॉ. किरण पोतदार • प्रा. विजयकुमार घुगरे • श्री. सुशांत करोशे • प्रा. विजय आरबोळे • डॉ. संजय चौगुले • प्रा. डॉ. दत्तात्रय पाटील • श्री. महेश मजती • सौ. मीना रिंगणे • श्रीमती. उमा तोरगल्ली • प्रा. डॉ. मनोहर पुजारी • प्राचार्य शंकर देसाई • सौ. रेखा पोतदार • श्री. दत्तात्रय मायदेव (सी.ई.ओ.)

अधिक माहितीसाठी समक्ष भेटा

प्रधान कार्यालय
डॉक्टर्स कॉलनी, गडहिंग्लज, फोन: (0२३२७) २२२४२५,२२२२४२
Website: www.ravalnathhousingfin.com Email:ravalnath_branchgadhinglaj@rediffmail.com

आमच्या शाखा : आजरा | गडहिंग्लज | चंदगड | नेसरी | कोल्हापूर | जयसिंगपूर | बेळगांव | निपाणी | कुडाळ



# एक पाऊल उचलावं लागतं... खंबीरपणे!

ॲड. ऋचा मायी
लेखिका

"समिधा, ही शिक्षा नाही. जगात अनेक शारीरिक अवस्था घेऊन मुलं जन्माला येतात. हजारो मुलांना आयुष्यभर परावलंबित्व स्वीकारावं लागतं. आपलं बाळ थोडी वेगळी शरीरावस्था घेऊन जन्मलं आहे. कदाचित समाजमान्यता नसलेलं असेल, पण ह्या समाजाने झिडकारलं म्हणून आपण झिडकारायचं? आपल्या भरवशावर पाठवलंय देवाने त्याला. आई-वडिलांनीच पाठ फिरवली तर कोणाच्या तोंडाकडे बघायचं बाळाने?

प्रसिद्ध व्यावसायिक विराज देसले आणि समिधा देसले आज लग्नाचा दहावा वाढदिवस साजरा करत होते. खूप मोठी पार्टी ठेवली होती. विराज खूप आनंदात होता. येणारा प्रत्येक माणूस त्यांचे ऐश्वर्य, सुबत्ता बघून अचंबित होत होता.

अगदी शून्यापासून सुरुवात केलेला व्यवसाय आज करोडो रुपयांची उलाढाल तर करतच होता, पण उत्तम दर्जा आणि प्रामाणिकपणा यामुळे एक वेगळेपण त्यांनी खास जपले होते. आवर्जून प्रत्येक जण त्यांचे अभिनंदन करत होता.

"आता एवढा मोठा डोलारा सांभाळायला कोणीतरी हवं", असं सासूबाईंच्या मैत्रिणी नेहमीप्रमाणे म्हणाल्या. तसा समिधाचा चेहरा खाडकन उतरला.

जगातला एकही उपास सोडला नव्हता समिधानी; आणि दोघांमध्ये वैद्यकीय कमतरता नाही हे डॉक्टरांनी सांगितले होते. पण म्हणतात ना, काही लोकांना देव वाट बघायलाच लावतो. जेव्हा सायन्सकडे काहीच उत्तर शिल्लक नसते तेव्हा तिथेच अडतो माणूस. एक शक्ती आहे अजूनही सर्वांच्या वरचढ हे मान्य करावेच लागते.

समिधाचा खंतावलेला चेहरा इतक्या गर्दीतूनसुद्धा विराजने टिपला होता. आता पार्टीमध्ये त्याचेही मन लागत नव्हते. पण तो आज यजमान होता. आपले दु:ख बाजूला ठेवून आलेल्या माणसांचे मनापासून स्वागत करायचे हे तत्त्वच त्याला आज या उंचीवर घेऊन आले होते. रात्रीचे बारा वाजले होते, लोकं गेली होती. बंगल्याचा हॉल आत परत एकटा वाटायला लागला होता. विराजचे आई-बाबा वरच्या खोलीत झोपायला गेले.

आई-बाबांचे पान हलायचे नाही विराज-समिधाशिवाय. खूप जीव होता त्यांचा दोघांवर. सगळ्यांना खंत एकच, गोंडस

बाळ हवे होते घरात. ''मुलगा-मुलगी काहीही चालेल पण पाळणा हलू दे ईश्वरा,'' घरात विराजची आई रोज दिवा लावताना देवाला सांगायची. ''बाकी काही नको, डोळे मिटण्याआधी तेवढं सुख दे म्हाताऱ्यांच्या डोळ्याला.''

थोडी आवराआवर करून समिधा आणि विराज खोलीत आले. ''सगळं ठीक आहे आपल्या दोघांमध्ये, मग देव का आपल्याला बाळाचं सुख देत नसेल? किती किती मनोभावे पूजा करते मी, मग काय चुकत असेल?'' समिधा पाणवलेल्या डोळ्यांनी विराजच्या खांद्यावर डोके ठेवून रडत होती.

''समिधा, फक्त मूल होण्यासाठी लग्न केलं का आपण? किती प्रेम केलंय आपण एकमेकांवर! आपण ठरवलं होतं ना, आयुष्यात काहीही झालं तरी आपण दुःखी राहायचं नाही? मग कोणी काही म्हणू दे, आपण सुखी आहोत ना एकमेकांबरोबर? तुला बाळाशिवाय अपूर्ण वाटत असेल तर जगात कित्येक अनाथ मुलं आहेत त्यांचे आई-बाबा बनू. पण मी परत सांगतो, मूल नाही झालं तरी काहीही फरक पडत नाही. काय माहीत देवाला कदाचित काहीतरी वेगळं करून घ्यायचं असेल आपल्या हातून?'' विराज तळमळीने समजावत होता.

''नाही विराज, दत्तक नको मला! आपलं बाळ हवं आहे. आपला अंश हवा त्यात, कितीही ठरवलं तरी मी नाही प्रेम करू शकणार त्याच्यावर आपल्या बाळासारखं. करणारे करत असतील पण मला नाही वाटत मला जमेल ते. मी देवाला सांगणार आहे. कसंही दे, गोरे, काळे, उंच, बुटके, मुलगा, मुलगी काहीही चालेल मला, पण माझ्या मायेचा कोपरा मला कोरडा नको आहे.'' समिधा नेहमीच अस्वस्थ व्हायची, लोकांच्या प्रश्नांना, शंकांना उत्तर देताना तिच्यातली आई कासावीस व्हायची.

विराजनी नेहमीच तिच्या मनाचा विचार केला होता. त्याच्यासाठी तिचा आनंद अत्यंत महत्त्वाचा होता, नाहीतर मूल होऊ न शकणे ही काही विशेष गोष्ट त्याला कधीच वाटली नव्हती. कित्येक जोडपी ठरवून मूल न होऊ देण्याचा निर्णय घेतात, अगदी आनंदाने राहतात. त्यांना कोणाशी काही घेणेदेणे नसते. मग ज्यांना काही कारणाने संतती होऊ शकत नसेल तर, एवढ्या एका गोष्टीचे का अवडंबर माजवले जावे?

मूल जन्माला घालणे या एकाच कामासाठी लग्नसंस्था अस्तित्वात आली असेल तर जन्माला आलेली ती सगळी मुले स्वतःच्या अस्तित्वासाठी पालकांचे ऋणी का नसतात?

विराज अत्यंत प्रॅक्टिकल माणूस होता. प्रेमाला, नात्यांना महत्त्व देणारा, आपल्या माणसांसाठी वाट्टेल ते करणारा.

आज त्याने त्याचा फारसा विश्वास नसताना फक्त समिधाचे मन शांत व्हावे म्हणून तिच्यासाठी देवाला साकडे घातले. ''मला माझ्या समिधाच्या सुखासाठी एक बाळ दे देवा, त्यानंतर काहीच कधीच मागणार नाही मी.''

मनापासून मागणे मागून रडून रडून गाढ झोपलेल्या समिधाच्या डोक्यावर हात फिरवत विराजपण झोपून गेला.

दुसऱ्या दिवशी उठल्यावर समिधा जरा सावरली होती. वेदनेबरोबर जगायची सवय होतेच माणसाला हळूहळू.

आज सकाळी सासूबाई-सासरे लेकीकडे जाणार होते. त्यांचा डबा बनवण्यासाठी समिधा लगबगीने उठली. बाबांना आणि समिधाला आल्याचा चहा आवडायचा. सासूबाईंना आणि विराजला वेलची घालून. दोन पातेलीपण वेगळी ठरलेली असायची.

''कशा आई-बाबांच्या आवडीनिवडी मुलांमध्ये वारशाने येतात? असं होईल का दत्तक मूल घेतलं तर?'' विराजला चहा देताना हळूच पुटपुटली ती.

''तू तर सून बनून आलीस माझ्या बाबांची, दत्तकपण नाही, तरी तुझ्या आणि त्यांच्या आवडीनिवडी जुळतात ना? उगाच काहीतरी कुठेही जोडून मनाला त्रास देतेस तू तुझ्याच,'' विराज परखड बोलला पण समिधाला तो हिशोब समजला होता.

हातातला आल्याचा चहा बाबांच्या हातात दिला आणि स्वतःचा चहा घेऊन बसणार तेवढ्यात त्या आल्याच्या वासाने एकदम मळमळले समिधाला.

हे असे आधी कधीच झाले नव्हते. आल्याचा चहा म्हणजे दिवसाची पहिली आवडीची गोष्ट असायची.

सासूबाई म्हणाल्या, ''काल दगदग झाली आणि वेडंवाकडं खाणं, त्याने होत असेल. आम्ही आज नाही जात, तुला बरं वाटलं की जाऊ.''

त्या दिवसापासून जवळपास रोजच सकाळी चहाच्या वेळेला तोच प्रकार व्हायला लागला.

हळूहळू वरणाचा वास नकोसा व्हायला लागला. मग दोन-तीन वेळेला उलटीपण झाली. साधारण दहा दिवस सतत हेच घडल्यावर विराजने आपली चुलत बहीण डॉक्टर मीनाला फोन केला, काहीतरी औषध विचारायला. तसे मीनाताई पटकन म्हणाली, ''अरे प्रेग्नंट असेल समिधा. तिला क्लिनिकला घेऊन ये, मी बघून घेते. मग वाटलं तर एक अल्ट्रा साऊंड करून घेऊ.'' विराजने एकदम 'काय?' म्हणून फोन ठेवला.

पण लगेच स्वतःला सावरून समिधाला म्हणाला, ''ताईने क्लिनिकला बोलावले आहे. 'चेक केल्याशिवाय सांगता येणार नाही म्हणाली', चल जाऊन येऊ.''

''आत्ता? संध्याकाळी जाऊ, तुला आत्ता कंपनीत नाही

जायचं का?'' समिधाने शांतपणे विचारले.

''सारखे प्रश्न नको गं... चल जरा पटकन.'' विराज पहिल्यांदाच असा अधीरपणे बोलला. पटकन गाडी काढत निघत आईला म्हणाला, ''आम्ही जाऊन येतो. देवाची पूजा आटोपून घे तोपर्यंत.''

''देवपूजा? का हो विराज देवपूजा करून घे म्हणाला? परीक्षेला जाताना मी बळजबरी केल्यावर मुश्किलीने हात जोडणारा मुलगा हा आज देवपूजा का सांगून गेला? मीनाने काही धोका सांगितला असेल का?'' आईला आश्चर्याचा धक्काच बसला होता.

''अगं कशाला उलटा विचार? सहज काहीतरी आले असेल डोक्यात त्याच्या.'' बाबा तितकेच थंड होते.

इकडे जमेल तितके सांभाळून विराज गाडी चालवत होता. समिधाची अजूनच काळजी घेत होता.

''पंधरा मिनिटांच्या अंतरावर असलेल्या दवाखान्यात पोहोचायला चाळीस मिनिटं लागली आहेत विराज आपल्याला. काय चालू आहे तुझ्या मनात?''

समिधाला आता शंका यायला लागली.

''अगं काही नाही, गाडी थोडा मेंटेनन्स मागते आहे बहुतेक, उद्या देऊन येतो सर्व्हिसिंगला.''

मीनाताईने खात्रीशीररीत्या काही सांगितल्याशिवाय समिधाला कुठलीही आशा लावून ठेवायची नव्हती त्याला. तब्बल दहा वर्षांनी तिचे स्वप्न पूर्ण होण्याचे संकेत मिळाले होते. उगाच एक खोटी आशा ठरू नये ती, अशी मनोमन देवाला प्रार्थना करत होता तो.

दवाखान्याच्या आत मीनाताई आधीचा पेशंट बघेपर्यंत फारतर दहाच मिनिटे वाट बघावी लागली असेल. विराज सतत बाजूच्या लाकडी खुर्चीवर टकटक करत होता. समिधाने हातावर हात ठेवून थांबल्यावर त्याच्या लक्षात आले. त्या रिसेप्शनिस्टने गप्प बसा म्हणून केलेली खूण त्याने पाहिलीच नव्हती. समिधाचे लक्ष होते त्यामुळे तिने थांबवले.

मीनाताईने आत बोलावले एकदाचे तसा लगेच विराज म्हणाला, ''अल्ट्रा साऊंड केली म्हणजे खात्रीशीर कळेल ना? थेट तेच करून टाक.''

''राजे आमचे काम आम्हाला करू द्या, गरज पडली तर करेन मी.'' काही जुजबी प्रश्न, शेवटची पाळीची तारीख विचारली. तसे दीड महिना झाला आपल्याला पाळी आली नाही हे लक्षात आले तिच्या... इतकी वर्षे चातकासारखी या क्षणाची वाट बघणारे आपण कशी काय ही गोष्ट विसरलो, समिधाच्या मनात आले.

समिधाची बाकी सगळी लक्षणे बघून मीनाताईच्या अनुभवी नजरेने ओळखले होते गुड न्यूज आहे. पण खूप वर्षांनंतर हे सगळे घडत होते त्यामुळे अल्ट्रा साऊंड करून तिने खात्री करून घेतली.

पर्समधून एक चॉकलेट काढून त्याचे दोन तुकडे करून विराजच्या आणि समिधाच्या तोंडात भरवत म्हणाली, ''तयारी करा आई-बाबा, मोठी जबाबदारी घ्यायची आहे आता अंगावर, अभिनंदन!''

''काय? ताई खरं आहे का हे? मी तर पूर्ण आशा सोडली होती. कितीदा पाळी चुकली म्हणून धावत जाऊन टेस्ट करणारी मी यावेळी पहिल्यांदा विसरले आणि देवाने...''

समिधाच्या डोळ्यांतले आनंदाश्रू थांबत नव्हते. विराज मनातल्या मनात म्हणाला, 'आज वाटत आहे आईच्या धाकाने का होईना, देवासमोर हात जोडायचो पण काहीतरी मागितलं दहाच दिवसांपूर्वी रात्री पहिल्यांदा, तर देवाने आधीच माझ्या मनातलं ओळखलं म्हणजे...'

विराजला घट्ट मिठी मारताना आज समोर मीनाताई आहे याचे भान राहिले नाही समिधाला. ताईला पण त्यांच्या त्या आनंदाचा पूर थांबवावासाच वाटत नव्हता. पण बाहेर पेशंट वाट बघत होते. मग ताई हसून म्हणाली, ''आता जेमतेम एक महिना झाला आहे. पुढचे आठ महिने जरा जपून. विराज, आता समिधा एकटी नाही. घरी सुखरूप घेऊन जा तिला, सांगितलेली सगळी काळजी घेत रहा.''

एकदम भानावर आलेले ते दोघे डोक्यावरून मणामणाचे ओझे उतरल्यासारखे घरी पोहोचले. आज पहिल्यांदाच समिधाला अपराधी भावनेतून मुक्तता मिळाली होती. कितीही कोणी म्हणाले तरी समाजाच्या नजरा बोचतात, तेव्हा होणारी जखम दाखवता येत नसली तरी भयंकर रुतणारी असते.

तो दिवस सुवर्णाक्षरात लिहून ठेवण्यासारखा होता समिधा-विराजसाठी.

घरी आई-बाबा वाटच बघत होते, पुसटशीदेखील कल्पना नव्हती त्यांना येणाऱ्या शुभवार्तेची. घरी आल्या आल्या विराजने थेट देव्हारा गाठला, आता सगळे सुखरूप करायची जबाबदारी टाकायची होती त्या परमेश्वरावर. कितीही म्हटले तरी देवाने इच्छा पूर्ण केली होती त्याची. येताना आठवणीने आणलेला पेढ्यांचा पुडा देवासमोर ठेवून लगेचच त्यातला पेढा आईच्या तोंडात भरवला. समिधा तर आल्यापासून नुसती रडत होती. किती वर्षांनी डोळ्यांतून वाहणारे अश्रूंचे कारण आनंद होते.

बाबा म्हणाले, ''अरे, आता सांगता का म्हाताऱ्याला काय झालं आहे?''

तसे विराज म्हणाला, ''बाबा, आता म्हातारं होऊन चालणार नाही. आता तयारीला लागा, लवकरच नातवंडाशी खेळायचं आहे.''

''काय सांगतोस? वाह वाह, देव पावला म्हणायचा की! मला खात्री होती, डोळे मिटायच्या आधी हे सुख नक्की दाखवणार परमेश्वर मला,'' आई आनंदाने उद्गारली.

घरी येणाऱ्या तान्हुल्याची नुसती चाहूल घरात आनंदाचे वातावरण निर्माण करत होती.

लाडाकोडात कसे दिवस गेले कळलेच नाही. समिधाला नववा महिना लागलासुद्धा.

मोठ्या थाटामाटात समिधाचे डोहाळेजेवण केले सासूबाईंनी. अमेरिकेहून दादाच्या संसारात बुडालेले समिधाचे आई-बाबा खास डोहाळेजेवणासाठी आले होते. लेकीचा आनंद बघून तिच्या आईच्या डोळ्यांतले पाणी थांबत नव्हते. आज पहिलाच दिवस होता नवव्या महिन्याचा. सगळा कार्यक्रम पार पडला आणि समिधाच्या कळा सुरू झाल्या. बाळंतपणासाठी माहेरी न जाता मीनाताई डिलिव्हरी करणार हे आधीच ठरलेले होते. कुठलाही धोका पत्करायचा नव्हता.

''इतक्या लवकर कशा काय कळा?'' विराजने घाबरून विचारले. तसे मीनाताई म्हणाली, ''होऊ शकतं असं. बाळाला काही धोका नाही, नववा लागला आहे.''

मीनाताईने अगदी सुखरूप डिलिव्हरी पार पाडली होती. बाळाचा खणखणीत रडण्याचा आवाज ऐकून मुलगा असेल की मुलगी? बाहेर उत्कंठा शिगेला पोहोचली होती. दोन्ही आजी-आजोबा आणि विराज बाहेर आपापले कयास बांधत होते.

मीनाताई बाहेर आली तसा विराज धावत गेला आणि म्हणाला, ''ताई, समिधा ठीक आहे ना? आणि बाळ? काय आहे मुलगा की मुलगी? सांग की पटकन.''

मीनाताईने सांगितले, ''बाळ-बाळंतीण सुखरूप आहेत पण बाळाच्या काही टेस्ट कराव्या लागतील. विराज, तू जरा माझ्या केबिनमध्ये ये.'' असे म्हणून ताई आत गेली आणि मागोमाग विराज.

''काय झालं ताई? बाळाला काही धोका? मुलगा की मुलगी तरी सांग ना पटकन.'' विराजला धीर धरवत नव्हता.

''तेच तर समजत नाहीये, विराज. काय सांगू? बाळाचं लिंग ठरवता येत नाही आहे. काही टेस्ट करून हे ठरवावं लागेल की बाळाला मुलगी म्हणून वाढवणं सोपं जाईल की मुलगा?''
''ताई, काय बोलते आहेस? ठरवता काय येत नाही? डॉक्टर आहेस ना तू? शेंबडं पोरसुद्धा सांगू शकतं मुलगा आहे की मुलगी!'' विराज भयंकर अस्वस्थ झाला होता.

नक्की काय बोलते आहे मीनाताई? हे कळायला मार्गच नव्हता. मग ताईने बाळ विराजला दाखवले. मनात चुकूनसुद्धा आली नव्हती ती बाळाची अवस्था तो प्रत्यक्षात बघत होता.

''ताई, काय चूक झाली आमची? का असं घडलं?'' विराज काकुळतीला आला होता. समिधाला आणि दोन्ही आजी-आजोबांना काय सांगायचे? हा यक्ष प्रश्न आता समोर उभा ठाकला होता. मीनाताईने त्याला धीर दिला आणि म्हणाली, ''चूक कोणाचीच काही नाही, पालकांची तर अजिबातच नाही. अगदी कोणाच्याही घरात घडू शकतं हे. पाप-पुण्य, वैद्यकशास्त्र कशाचीही ही परिणती नाही. निव्वळ क्रोमोसोमचं चुकलेलं गणित आहे.

''तुला हवं असेल तर लपवून ठेवू आपण समाजापासून, नाही कळू देणार कोणालाही मी. माझ्या जिवात जीव असेपर्यंत. शब्द आहे माझा.''

आता जरा विराज भानावर आला होता. धक्का मोठाच होता पण समाजाला काय वाटेल? म्हणून नुकत्याच जन्माला आलेल्या त्या जिवाला असे लपवाछपवीचे आयुष्य द्यायचे नाही हे त्याच्यातल्या नुकत्याच जन्मलेल्या वडिलांनी ठाम ठरवले. समोर आलेल्या प्रत्येक गोष्टीला सामोरे जायचे. त्यातून मार्ग काढायचा हे आयुष्यातले तत्त्व त्याला एक यशस्वी उद्योजक बनवायला कारणीभूत होते.

तो ताईला म्हणाला, ''नाही ताई, तूच म्हणालीस ना यात कोणाची काहीच चूक नाही, मग कर नाही त्याला डर कशाची? मी हे मूल तितक्याच सन्मानाने वाढवणार आणि समाजालाही ते करायला भाग पाडणार. कोणाचीही चूक नसताना जन्मलेलं माझं बाळ आयुष्यभर यातना भोगणार नाही. वेगवेगळ्या स्वभावाच्या, शारीरिक-मानसिक जडणघडणीच्या मनुष्यप्राण्यांनी बनवलेला समूह म्हणजे समाज. मग त्याच समाजाचा भाग हे मूल असायला हवं. का वेगळं काढायचं त्याला?''

''भावनेच्या भरात बोलतो आहेस. इथून बाहेर निघ आणि नऊ महिने बाळाची वेड्यासारखी वाट बघणारी ती आजी-आजोबा लोकं तरी स्वीकारतात का बघ बाळाला...''

विराज तडक खोलीच्या बाहेर आला आणि दोन्ही आई-बाबांना म्हणाला, ''कोणाला मुलगा तर कोणाला मुलगी हवी होती ना? देवाने सगळ्यांचं मन राखलं आहे.''

''जुळी झाली?'' कुतूहलाने प्रश्न आला.

''नाही. माझ्या एकाच बाळात दोन्ही आहे,'' विराज अत्यंत खंबीरपणे बोलला.



असेल आपल्याला?'' हमसून हमसून रडत विराजला विचारत होती.

''समिधा, ही शिक्षा नाही. जगात अनेक शारीरिक अवस्था घेऊन मुलं जन्माला येतात. हजारो मुलांना आयुष्यभर परावलंबित्व स्वीकारावं लागतं. आपलं बाळ थोडी वेगळी शरीरावस्था घेऊन जन्मलं आहे. कदाचित समाजमान्यता नसलेलं असेल, पण ह्या समाजाने झिडकारलं म्हणून आपण झिडकारायचं? आपल्या भरवशावर पाठवलंय देवाने त्याला. आई-वडिलांनीच पाठ फिरवली तर कोणाच्या तोंडाकडे बघायचं बाळाने? नऊ महिने ज्याच्या स्वागतासाठी उतावीळ होतीस त्याला प्रेमाने जवळ घ्यायची वेळ आहे ही. चाकोरीबद्ध कोणीही जगेल, खळखळून वाहणारा प्रवाह वळवून आपल्याला हवी ती दिशा देण्यातच खरं कर्तृत्व आहे.''

''नाही विराज हे शक्य नाही. कसं जाऊ जगासमोर? लोक काय म्हणतील? तुला माहीत नाही, समाज पापी ठरवेल आपल्याला. जगणं मुश्किल होऊन जाईल आपलं.

''ती नर्स म्हणाली, किन्नर समाजातील लोक सांभाळतील बाळाला, त्यांना देऊन टाका आणि लाजिरवाणे जगण्यातून सुटका करून घ्या. मी नाही नेणार या बाळाला घरी. मला खूप भीती वाटते आहे. तू सोडून ये बाळाला आत्ताच्या आत्ता. मला माफ कर मी नाही देऊ शकले तुला एक नॉर्मल बाळ.''

समिधा रडून रडून अत्यंत हताश होऊन बोलत होती.

''तुला काहीच वाटत नाही बाळाला सोडून ये म्हणताना? ज्या लोकांना ओळखतही नाहीस ते सांभाळतील आपल्या बाळाला या विश्वासावर? दत्तक मूल घेतलं तर त्याच्यावर आपल्या बाळासारखं प्रेम करू शकणार नव्हतीस ना तू? मग इतर लोक ते करतील याची एवढी खात्री कशी? का तो समाज जो मूल नाही म्हणून तुला जगू देत नव्हता त्याच्यासाठी आपल्या हाडामासाचे, केवळ आपल्या आधारावर, विश्वासावर अवलंबून असणारं बाळ तू किन्नर समाजाला देऊन टाकायला तयार झालीस? एक आई इतकी स्वार्थी कशी होऊ शकते?

''का तर आपलं बाळ वेगळं आहे म्हणून? मला त्याची काहीही लाज नाही. आणि तूसुद्धा ती ठेवायची नाहीस. आपल्या बाळाचा आपण सन्मान केला तर

''डोकं ठिकाणावर आहे का? त्याला समाजात काय म्हणतात माहीत आहे का?'' विराजचे बाबा संतापून बोलले.

''समाज काहीही म्हणू दे. आजपासून माझी मुलगी म्हणून सन्मानाने जगेल ती आणि तिला तो सन्मान देऊ शकणारा प्रत्येक जण माझ्या आयुष्याचा हिस्सा असेल. ज्याला यामध्ये काहीही अडचण असेल त्याला माझ्या समाजाकडून मुक्त करतो मी.'' विराज आज काहीतरी वेगळेच धैर्य एकवटून उभा होता.

अचानक बसलेला धक्का सहन न झालेले दोन्ही आई-बाबा बाळाला, समिधाला न भेटता निघून गेले.

बाहेर घडलेला सगळा प्रकार सगळ्या हॉस्पिटलने पाहिला होता. त्यातल्याच एका नर्सने ते सगळे समिधाला येऊन सांगितले.

दहा वर्षे दिवस-रात्र बाळाचा ध्यास घेतलेल्या समिधाला तो धक्का सहनच झाला नाही. ती प्रक्षुब्ध झाली होती, झालेला प्रकार मान्यच करू शकत नव्हती. ''देवाने कसली शिक्षा दिली

त्याच्याकडे वाकडी नजर करून बघायची कोणाचीच हिंमत होणार नाही. मी माझी जबाबदारी झटकणार नाही आणि तुलाही ती स्वीकारायची आहे, समिधा.''

समिधाच्या प्रत्येक गोष्टीत तिची साथ देणारा विराज आज फक्त एक बाप झाला होता. अगदी खंबीर, कुठल्याही बाळाला अभिमान वाटावा असा.

''अरे आपण लाख ठेवू बाळाला आपल्याकडे, पण ती किन्नर समाजाची लोक बळजबरी घेऊन जातात असं मी ऐकलं आहे.'' समिधा थोडी स्थिरावली होती. ''मुळीच नाही, विनाकरण त्यांना बदनाम केलं गेलं आहे. आपल्यासारखीच अत्यंत प्रेमळ माणसं असतात ती. जर त्यांना लक्षात आलं की आपण इतका सन्मान देत आहोत या बाळाला तर ते का असं करतील? आपल्या मुलांचा आनंदाने स्वीकार करणाऱ्या पालकांचा वानवा झाला म्हणून त्यांना वेगळा समूह करावा लागतोय. चूक आपली झाली आहे. आई आहेस ना तू त्याची, आणि मी वडील. ती चूक आपण करणार नाही. माझा सगळा पैसा पणाला लावेन पण या बाळाला समाजात मानाचं स्थान मिळवून देईन.'' निक्षून सांगितले विराजने.

विराजला थांबवणे शक्य नाही, हे दिसत होते समिधाला. समाजाची भीती आणि पोटच्या बाळाशी निर्माण झालेले नाते यात तिची कुचंबणा होत होती.

विराज बाळाला एक क्षणसुद्धा सोडत नव्हता. समिधा थोडी घाबरून, थोडी मनाविरुद्ध, पण बाळाला अधूनमधून घेत होती. या बाळाला यापुढे मुलीसारखे वाढवणे सोयीचे असेल हे सोनोग्राफी आणि इतर टेस्टमुळे नक्की ठरले होते. नुसती समिधाला मळमळ झाली म्हणून लेकीकडे जायचा कार्यक्रम रद्द करून थांबलेले विराजचे आई-बाबा तिथून तडक निघून थेट लेकीकडे गेले होते.

समिधाचे आई-वडील अमेरिकेहून दोन महिन्यांसाठी आले होते तेसुद्धा ताबडतोब निघून गेले. मीनाताईशिवाय आपले असे कोणीच यापुढे नसणार यासाठी मनाची तयारी करूनच आज बाळाला घरी आणले. व्यवस्थित ओवाळून घरातल्या काम करणाऱ्या मावशीने स्वागत केले बाळाचे. घडलेला सर्व प्रकार अजून घरातल्या स्टाफला माहीत नव्हता. सगळ्यांना एक हजार एक रुपये पाकिटात घालून विराजने आनंद साजरा केला. पहिल्याच दिवशी बाळाच्या अंघोळीसाठी आलेल्या मावशींना सगळे खरे सांगून चौपट पैसे द्यायची तयारी दाखवल्यावर त्या मावशी थोडे आढेवेढे घेत चक्क तयार झाल्या. क्षणात बाळ किन्नर आहे ही बातमी घरात आणि आजूबाजूला पसरली. चर्चा होणारच होती, पण आपण डगमगून न जाता ते हाताळायचे हे विराजने ठरवले होते. त्याच्या नावाचा दबदबा असा होता की तोंडावर काही बोलायची हिंमत कोणाचीच नव्हती. पैसा आणि ताकद माणसाला काय देऊ शकते हे दोघांना जाणवत होते. अपेक्षेप्रमाणे किन्नर समाजाला बातमी पोहोचताच ते बाळाला घ्यायला आले. ते दारात आल्यावर समिधा प्रचंड घाबरली. पण विराज शांतपणे म्हणाला, ''मी माझ्या बाळाचा स्वत: सांभाळ करणार. तिला शिकवणार. मानसन्मान मिळवून देणार. कुठेही जाणार नाही ती.''

त्या दोघी पटकन म्हणाल्या, ''ही शिकणार कारण तुम्ही मोठी लोकं, बाकीच्या लेकरांचं काय साहेब? शाळेत काय काय सहन करावं लागतंय तुम्हाला नाही समजायचं. मग नंतर कंटाळून आमच्याकडे येतात ही पोरं, नाहीतर कुठल्यातरी रस्त्याच्या कडेला बेवारशी पडलेली घेऊन येतो आम्ही. नका मोठेपणा दाखवू उगाच, सोपं नाहीये हे मूल सांभाळणं. आणा आमच्याकडे.''

बाकीची पोरं काय करणार? या तिच्या प्रश्नाने विराजमधला हुशार व्यावसायिक एकदम जागा झाला आणि नकळत बोलून गेला, ''माझ्या शाळेत शिकतील सर्व मुलं एकत्र माझ्या मुलीबरोबर. मी शाळा सुरू करेन अगदी अद्ययावत सुविधांसकट, मग तर तुमची हरकत नाही?''

त्या दोघी हसल्या आणि म्हणाल्या, ''साहेब, तुम्हाला माहीत तरी आहे का काय अडचणी येतात आम्हाला? मुलांच्या बाथरूममध्ये जायचे की मुलींच्या, इतक्या साध्या गोष्टीवरून टर उडवली जाते आमची, काय काय करणार तुम्ही? त्यापेक्षा द्या ते पोर आमच्याकडे सुखाने रहा तुम्ही, उगाच जग बदलायच्या मोठ्या मोठ्या बाता मारू नका.''

''मला माहीत नाही काही, पण तुम्हाला तर माहीत आहेत ना तुमच्या अडचणी? मग मी जर चाकोरी मोडायला तयार आहे, भले माझी मुलगी हा माझा त्यातला स्वार्थ असेल तर तुम्ही तुमच्या लोकांसाठी मला मदत करा.

''माझी शाळा अजून कागदावरच आहे. माझी मुलगी शाळेत जायच्या वयापर्यंत ती बांधायची आहे. त्याचा संपूर्ण नकाशा तुमच्या अडचणी लक्षात घेऊन बनवला जाईल, पण तुम्ही त्यासाठी तयार हवे.

समाजाने तुम्हाला स्वीकारायला हवं असेल तर त्यासाठी पावलं तुमच्याकडून पण उचलली जायला हवी. एक शारीरिक वेगळी अवस्था सोडली तर काहीही अशक्य नाही. बदल घडवायचा तर तळापासून हलवा समाजाला.

जसा अमृतकुंभ काढण्यासाठी खुद्द समुद्राला घुसळून काढावे लागले होते.'' विराज कमालीचा आत्मविश्वासाने बोलत होता.

त्या दोन्ही किन्नरांना त्याचा खरेपणा भावला होता. आपल्याला कोणीतरी समाजाच्या मुख्य प्रवाहात मनापासून आणायची इच्छा दाखवत आहे, हे फार समाधानकारक होते त्यांच्यासाठी. बाकी परिवाराशी बोलून सांगतो, असे सांगून त्या दोघी निघाल्या. संध्याकाळीच त्यांच्या गुरूंना घेऊन त्या परत आल्या आणि काय आश्चर्य, शाळेच्या बांधकामात पूर्ण मदत करण्याचे आश्वासन देऊन गेल्या.

समिधा स्तब्धपणे विराजकडे बघत होती. मूल नसले तर काय झाले? हा सहज विचार असणारा विराज आज झालेल्या बाळाला त्याच्या वेगळेपणासकटही किती सहज स्वीकारत होता. क्षणभर आपण या बाळाला नाकारत होतो हे आठवून स्वतःचीच घृणा वाटली तिला. युद्धपातळीवर विराजने शाळेचे काम सुरू केले. पैसा, लागणारी ओळख, सगळेच व्यवसायातील त्याच्या घवघवीत यशामुळे उपलब्ध होते. आज बाळाला घरी आणून तीन महिने झाले होते. बारसे ठरवले होते. साडेतीनशे लोक आमंत्रित केले होते. नातेवाइकांनी येणे खास टाळले होते. बाकी सारे व्यावसायिक झाडून हजर होते. किन्नर समाजाला खास आमंत्रण होते.

आलेल्या लोकांमध्ये कुजबुज सुरूच होती. कार्यक्रमाला आलेल्यांपैकी बहुतांश लोक कुतूहलानेच आले होते, तर काही टर उडवायला मिळेल म्हणून. सगळ्यांचा अंदाज समिधा आणि विराजला होताच. अत्यंत कौतुकाने बाळाचे नाव आकांक्षा ठेवले. दहा वर्षांची पोकळी भरून काढली होती तिने. त्याच दिवशी मोठ्या दिमाखात विराजने आकांक्षा विद्यालयाची घोषणा केली. या शाळेत ॲडमिशन देताना बाळाचे लिंग, जात काहीही विचारले जाणार नाही आणि त्यांचे त्यावाचून काही अडणार नाही याची पूर्ण खबरदारी घेतली जाईल हे आवर्जून सांगितले.

या घटनेला अठरा वर्षे उलटून गेली. असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागले पण विराज आणि आता समिधापण ठाम उभे होते आकांक्षाच्या मागे. पाण्यासारखा पैसा ओतला विराजने. खूप सेवाभावी संस्थांनी आर्थिक मदत केली. सरकारी मदतसुद्धा सढळ हाताने झाली. कोणीतरी फक्त एक पाऊल उचलयाला हवे होते. बदल होणारच होता. एका बापाने विडा उचलला होता. समाजाचा कुठलाही वार आकांक्षापर्यंत पोहोचायच्याआधी एक वडिलांची ढाल मध्ये यायची.

आकांक्षा विद्यालयाच्या आज प्रत्येक शहरात शाखा आहेत. मुलगा, मुलगी, किन्नर कोणीही इथे अभिमानाने शिकू शकतेय. थोडासुद्धा अपमान किन्नर समाजाचा इथे झाला तर थेट बाहेरचा रस्ता दाखवला जातो. कुठल्याही मोठेपणासाठी नाही, तर आपल्या पोटच्या पोराला न्याय मिळवून देण्यासाठी ती वास्तू अस्तित्वात आली होती. कुठलाही भेदभाव, भ्रष्टाचार याला थाराच नव्हता तिथे.

विराजने आपला शब्द पाळला होता.

इतर मुलांबरोबर शिकायला मिळाल्याने आकांक्षाला आणि तिच्याबरोबर शिकणाऱ्या असंख्य किन्नरांना आता लपवा-छपवीचे आयुष्य जगायची गरज नव्हती. आज आकांक्षाचा बारावीचा निकाल होता. समिधा डोळे मिटून देवासमोर बसली होती. संपूर्ण राज्यात आकांक्षा पहिली आली होती. आईच्या त्यागाचे आणि वडिलांच्या प्रचंड आत्मविश्वासाने भरलेल्या प्रेमाचे तिने ऋण फेडले होते.

''बाबा, मी आर्किटेक्ट होणार आणि आकांक्षा विद्यालयाला आपण देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवायचे आहे. एकही किन्नर आता रस्त्यावर नसेल, तर उत्तम शिकून समाजाच्या खांद्याला खांदा लावून सन्मानाने जगेल.'' आकांक्षा बाबाच्या गळ्यात पडून बोलत होती.

''आकांक्षा अगदी तुझ्यासारखी बोलते रे विराज, कसे येतात ना जीन्स आपोआप... आकांक्षा, आज एवढं यश मिळालं आहे, काय बनवू तुझ्यासाठी?'' समिधा कौतुकाने लेकीला म्हणाली.

''आई, तुझ्या हातचा आल्याचा चहा! अहाहा!... अमृत आहे ते! तोच कर आधी.''

आकांक्षा खोलीत निघून गेली.


विराज समिधाला जवळ घेत म्हणाला, ''हे मात्र तुझे जीन्स आले हां... एवढा लढलो मी हिच्यासाठी पण पठ्ठी काही वेलचीचा चहा पीत नाही.

''माझी आई इथून सोडून निघून गेल्यापासून मला कंपनीच नाही वेलचीच्या चहाला. आकांक्षाला बघ कसा हवा आल्याचा चहा, तिच्या आईसारखाच.''

*(सदर कथेत नमूद केलेल्या योग्य वैद्यकीय माहितीसाठी माननीय डॉ. अंजली टेंपे (Director Professor, Dept. of Gynaecology & Obstetrics, MAMC Delhi) आणि माननीय डॉ. रवींद्र शिवदे (Gynaecology & Obstetrics, Nashik) यांचे विशेष आभार)*

# सांसार कार्य

राहुल शिंदे
लेखक, शिक्षक



आश्रमात प्रवेश केल्या केल्या चाळिशी ओलांडलेला सुमित संथपणे जे नजरेस दिसतंय ते डोळ्यांत साठवून घेऊ लागला. परिसर अगदीच निसर्गरम्य होता. फाटकातून प्रवेश केल्यावर मोठं अंगण होतं आणि ते अनेक झाडांनी सजलं होतं. अगदी पहिल्यांदा इथे येऊनही सुमितला त्या परिसराशी नातं असल्यासारखं जाणवत होतं. सगळं काही डोळ्यांत साठवत तो कार्यालयापर्यंत गेला.

कार्यालयात गेल्यावर संचालक बाहेर कामासाठी गेले आहेत आणि थोड्या वेळात येतील असं त्याला सांगण्यात आलं. तोपर्यंत त्याला कार्यालयात बसण्याची विनंती करण्यात आली. आजूबाजूची दृश्यं न्याहाळत तो वाट पाहत बसला.

खिडकीतून बाहेर तिथला सुंदर परिसर पाहत असताना मनोमन तो या जागेची तुलना आपल्या कॉलेजच्या परिसराशी करू लागला. त्याचा कॉलेजचा परिसरही अशाच सुंदर पद्धतीने नटला होता. बाहेर तल्लीन होऊन पाहता पाहता त्याचं मन त्याला कॉलेजच्या दिवसांत घेऊन गेलं.

सुमितने एमबीए पोस्टग्रॅज्युएशन अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला तो कॉलेजचा आतला परिसर अतिशय सुटसुटीत, मोठा आणि वेगवेगळ्या झाडांनी नटलेला होता.

कॉलेज सुरू होऊन पंधरा दिवस झाले होते. प्राध्यापक अजून वर्गात आले नव्हते. सगळ्यांची आपापसात बऱ्यापैकी ओळख झाली होती, त्यामुळे आता वर्गात गोंधळ चालू होता. अशातच वर्गात एका नवीन विद्यार्थिनीने प्रवेश केला आणि उपस्थित असलेल्या सगळ्यांच्या नजरा तिच्यावर पडल्या. गोंधळ थांबून आता काहींमध्ये कुजबुज सुरू झाली. ती विद्यार्थिनी बाकावर जाऊन बसली.

तिचा पोशाख तसा साधाच, पण तिच्या चेहऱ्यावरचा मेकअप बघून अनेकांच्या नजरेत एक अवघडलेपण आलं. तिच्या चेहऱ्याकडे बघून तिचं वेगळेपण दिसून येत होतं. मात्र डोळ्यांत स्थिरता होती, चेहऱ्यावर शांतता होती.

''आयला, कॉलेजमध्ये आता यांचीच कमी होती वाटतं.'' सुमितच्या शेजारी बसलेला त्याचा मित्र माधव म्हणाला आणि अनेक जण मोठ्याने हसायला लागले, तशी तिने मागे वळून नजर त्या तरुणावर रोखली आणि म्हणाली,

''कमी हाय म्हणूनच आलेय ती भरून काढायला.''

''फी भरलीयस का? की टाळ्या वाजवत त्यात सूट मिळवून तशीच भरती झाली आहेस.'' दुसरा एक जण म्हणाला.

''टाळी फक्त एका हाताने वाजत नसते, माझ्याबद्दलचा तुझा गैरसमज दूर करायला आवडेल, आता करू की नंतर?'' अगदी शांतपणे ती म्हणाली.

''आत्ताच कर दूर.'' वर्गात येत प्राध्यापक तिला म्हणाले, तसा वर्गातला गोंधळ शांत झाला. प्राध्यापक पुढे म्हणाले,

''तुझे ॲडमिशन उशिरा झालं आहे हे कळलं मला. आत्ताच तुझ्याबद्दल सांग, तुझी ओळख करून दे सर्वांना.''

''मी मीना... खरं तर लय पैशांची जुळवाजुळव करत आणि अडचणींवर मात करत मी या कोर्सला प्रवेश घेऊ शकले. माझ्या शिक्षणामध्ये अंतर पडल्यामुळे मी बाकीच्यांपेक्षा काही वर्षं मोठीच असेन. सर, मला सगळ्यांना एक महत्त्वाचं सांगावंसं वाटतंय. मी ट्रान्सजेंडर असले तरी माणूस हाय. ते ध्यानात

ठेऊन तुम्ही माझा स्वीकार केला, समजून घेतलं तर सोपं जाईल.'' मीनाच्या या बोलण्याने सुमित मंत्रमुग्ध झाला. आता अनेक जण बऱ्यापैकी तिच्या बाबतीत संवेदनशील झाले.

त्या दिवसापासून विद्यार्थ्यांमध्ये आणि सर्व कॉलेजमध्येच ती चर्चेचा विषय बनली. तिने लिंगपरिवर्तनाचं ऑपरेशन करून ती पुरुषदेहांतून स्त्री बनली होती. ट्रान्सजेंडर असल्यामुळे तिच्याबद्दल अनेक चुकीच्या समजुती आणि कुतूहल काहींच्या मनात होतंच.

तिच्या वर्गातल्या मुलामुलींना मात्र हळूहळू तिच्यासोबत वागण्या-बोलण्यात अगदी सहजपणा वाटू लागला. सुमितचीही तिच्याशी ओळख झाली. प्रात्यक्षिकांची त्यांची एकच बॅच असल्याने त्यांचा संवाद होऊ लागला. सर्वांत पहिल्यांदा ते एकत्र कॅन्टीनमध्ये गेले तेव्हा सुमितने त्याच्या सोबतच्या गँगशी - श्रावणी, अनिश, माधव आणि अश्विनीशी मीनाची ओळख करून दिली. त्या दिवशी सर्वांची ओळख झाल्यावर तीसुद्धा गँगचा एक भाग झाली.

एकदा दिवसाचं शेवटचं प्रॅक्टिकल चालू असताना माधवने लॅबच्या बाहेरूनच खुणेने अनिश आणि अश्विनीला बाहेर येण्यास सांगितलं. माधवचा घाबरलेला आणि रडवेला चेहरा बघून त्यांनी कारण काढून लॅबच्या बाहेर पळ काढला. बाजूला बोलावून माधव म्हणाला,

''चला पटकन... कॉम्प्युटर लॅबच्या आठव्या मजल्यावर... सुमित तिथून उडी मारायचा प्रयत्न करत होता.'' दोघेही हादरलेच.

''काय? त्याला काही झालं नाही ना?'' अश्विनीने विचारलं.

''इथे नाही काही बोलत. आधी तिकडे चला.''

तिघेही वाऱ्याच्या वेगासारखे धावत शेवटच्या मजल्यावरच्या टेरेसकडे गेले. तिथे सुमित आणि मीना होते. सुमित उद्ध्वस्त झाल्यासारखा दिसत होता. त्याला पाहून सगळ्यांच्या जिवात जीव आला.

''मीनाने त्याला तिकडे जाताना पाहिलं. तिने त्याचा पाठलाग करून नेमक्या वेळी त्याला रोखलं. त्यामुळे अनर्थ टळला.'' माधव, अनिश आणि अश्विनीला म्हणाला.

सगळे तिथून निघून झाडाखाली जाऊन बसले. अंधार पडू लागला होता.

''अभ्यास झेपत नाही, पुढचा रस्ता दिसत नाही, एवढ्या कारणासाठी हतबल होणं ठीक आहे. पण म्हणून आत्महत्या?'' अनिश सुमितच्या पाठीवर हात फिरवत म्हणाला.

''हे खरं तर एक कारण झालं, पण याहीपेक्षा काहीतरी महत्त्वाचं कारण घडलं आहे.'' सुमितने एक निःश्वास टाकला आणि म्हणाला, ''आपल्या वर्गातील श्रावणी... चार वर्षांपासून आम्ही रिलेशनशिपमध्ये होतो. आता ते संपुष्टात येत आहे. आता तिचं दुसऱ्यावर प्रेम आहे... म्हणतेय, तिला माझ्यासोबत भविष्य दिसत नाही, स्टॅबिलिटी वाटत नाही. मला वाटायचं मी तिला अंतर्बाह्य ओळखत होतो. पण आता वाटतंय तिचं माझ्यावर खरं प्रेम नव्हतंच.'' सुमितची नजर शून्यात गेली.

''गेले काही दिवस काहीतरी कारण सांगून श्रावणी आपल्यासोबत कॅन्टीनमध्ये, इतरत्र येण्यास का टाळाटाळ करत होती हे आता समजलं.'' अश्विनी नाराजीने म्हणाली.

''आता कशातच अर्थ वाटत नाही. सगळं संपल्यासारखं वाटतंय.''

''सगळं संपल्यासारखं वाटलं तरीही स्वतःला संपवणं हा पर्याय न्हाय... वाट बदलते, पण रस्ता फुटतोच कुठेतरी.'' मीनाचे आधाराचे शब्द ऐकून सुमित तिच्याकडे बघू लागला. ती पुढे म्हणाली, ''आता माझी काय गोष्ट सांगू? पुरुष म्हणून जन्माला आले, मग पुरुषासारखं चालणं, बोलणं व्हावं म्हणून बारकी असल्यापासनं बापाच्या लाथा खायची. स्वतःची सख्खी आई, माझं हातवारं खटकलं की मला चटकं द्यायची.'' मीनाच्या डोळ्यांत पाणी आलं. तिने हातावरचे चटके दाखवले.

''पण हे तू मुद्दाम कुठे करायचीस?'' अनिश म्हणाला.

''हे त्यास्नी कुठं कळायचं. पण एक दिवस असं कसं पोर जन्माला आलं म्हणून आईने बदडायला चालू केलं. त्याच दिवशी या त्रासाला कंटाळून घराबाहेर पडले. सतरा वर्षांची होते. मला माझी गुरू भेटली. भीक मागायला लागले. बाहेरच्या जगातलं काही कळत नव्हतं, पण घरात भीतीत जगण्यापेक्षा ते बरं वाटू लागलं... तरी भीक मागणं पसंत नव्हतं, सन्मानाने जगायचं होतं. तिथल्या बाकीच्यांसनी हे मान्य नव्हतं... सुदैवानं एकदा सुरेखा नावाची ट्रान्सजेंडर भेटली. ती स्वतःच्या पायावर उभी होती. तिची ट्रस्ट होती, भीक मागणं सोडून तिथे काम करू लागले. तेव्हाच ग्रॅज्युएशन करायला लागले.''

''आणि मग लिंगबदलाचं ऑपरेशन कधी केलं?'' माधवने विचारलं.

''तिकडे काम करू लागल्यावर पैसे जमू लागले. काही उसने घेतले आणि मग केलं ऑपरेशन. एक मोठं स्वप्न पूर्ण झाल्यासारखं वाटलं. आता मागे वळून बघितलं की वाटतं जे झालं ते चांगल्यासाठीच.''

''या सगळ्यात गोंधळली नाहीस तू? म्हणजे जन्माला पुरुष म्हणून आलीस, आणि ऑपरेशन करणं हाच उपाय वाटला?''

"गोंधळाच्या लय रात्री जागून काढल्या की... स्त्री होणं हाच मार्ग का? मग देवाने पुरुष म्हणून का जन्माला घातलं?

"स्त्री झाले की मग सगळे प्रश्न सुटणार की पुन्हा नवीन गुंता समोर येणार... मनाच्या शांत अवस्थेत मग कायतरी सापडायचं. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे मदतीसाठी आजूबाजूला बरंच काही सापडेल, पण थेट उत्तर कुठंच नसतं. अशा वेळी आपल्या आतला कुठलातरी भाग आपल्याला ठाम संदेश पोचवतो... अंग थरथरतं, शांत वाटतं, किमान त्या वेळेस तरी हाच संदेश आणि हाच मार्ग हाय वाटतं. बास... तेच... आणि मग तेव्हा वाटतं आपला आत्माच हा संदेश आपल्याला देत असतो." मीना बोलत होती आणि सगळे अगदी तल्लीन होऊन ऐकत होते.

त्या रात्री सुमितने डोळे बंद केले तरी तिचाच चेहरा समोर दिसू लागला.

गेले कित्येक दिवस तो स्वत:च्या त्रासात होता. मात्र मन आज स्वत:चा विचार न करता तिचा विचार करत होतं. किती अवघड होता तिचा प्रवास? तिचं काय भविष्य आहे? आजही तिचा पूर्णपणे सामाजिक स्वीकार नाही, जोडीदार मिळणं कठीण.

दुसऱ्या दिवशी सुमित आणि मीनाची भेट झाली तेव्हा त्याला आज एक वेगळी मीना समोर आल्यासारखी वाटत होती.

आतापर्यंत त्याला तिचं फक्त एक बाह्य स्वरूप माहीत होतं, पण काल एक व्यक्ती म्हणून प्रवास उलगडल्यामुळे समोर कुणीतरी एक आदर्श, एक प्रेरणा उभी असल्याचा भास त्याला होत होता.

एके दिवशी प्रात्यक्षिक संपल्यावर मीना आणि सुमित कॅम्पसमधल्या चहाच्या टपरीवर चहा घेत होते.

"तू कधी प्रेम केलंस का?" तिच्यावर नजर रोखत सुमितने विचारलं. यावर तिने स्मितहास्य केलं.

"प्रेम केलं की, पण त्यात गोंधळच होता. शाळेत असताना तर मी म्हणजे सगळ्यांचा गमतीचा विषय. छक्का, हिजडा म्हणून हिणवून मानसिक त्रास द्यायची मला. अकरावीत असताना एक जण आवडायचा, पण त्याला सांगायला भीती वाटायची. एक दिवस धाडस करून सांगितलं त्याला... 'तुला मी तुझ्यासारखा छक्का वाटलो का?' म्हणून त्याने दोन मुस्काटात देऊन अपमान केला माझा." सांगताना तिच्या डोळ्यांत आसवं आली.

पहिल्या वर्षीचा शेवटचा पेपर झाल्यावर सुमित, अश्विनी अनिश, मीना आणि माधवने एकत्र मिळून चित्रपट पाहिला. त्यानंतर सुमित आणि मीना शहरातल्या बागेत फिरायला गेले.

"जे झालं ते कधी झालं, मलाही कळलं नाही." सुमित म्हणाला.

"खरंय की, बघता बघता एक वर्ष संपलं न्हाय?" मीना म्हणाली. यावर सुमित हलकेच हसला.

"का... काय झालं?" मीनाने विचारलं.

"मी त्याच्याबद्दल नव्हतो बोलत."

"मग कशाबद्दल?" मीनाने थांबून विचारलं.

"तुला खरंच नाही कळालं?" क्षणभर सुमित थांबला. आपल्या छातीची धडधड वाढत असल्याचं त्याला जाणवलं.

"अगं... तुझ्यावरती प्रेम कधी बसलं हे माझ्या लक्षात नाही आलं." सुमित म्हणाला. सुमित काय बोलतोय ते मीनापर्यंत पोचायला वेळ गेला. नंतर तिला अनपेक्षित हादरा बसला. शरीरात कुठल्या भावभावनांचा खेळ चालू झाला हे तिचं तिलाही कळेना. थोड्या वेळाने तिच्या डोळ्यांतून पाणी यायला लागलं. सुमित गोंधळला. तिच्या या प्रतिसादाचा अर्थ काय आहे, हे त्याला कळेना.

"मी तुझ्यावर प्रेम करू शकत न्हाय...!" अश्रूंनी भरलेले डोळे सुमितवर रोखत ती म्हणाली. पुढे तिला तिथे थांबणं शक्य होईना. तिथून ती पळत निघू लागली. सुमित तिच्याकडे गोंधळलेल्या अवस्थेत पुतळा बनून पाहत बसला.

○ ○ ○

दुसरं वर्ष चालू झाल्यावर एकदा कॉलेजमध्ये सुमितने मीनाला भेटून विचारलं, "थांब, का टाळतेयस मला?"

**तेच मला नको होतं... त्या दिवशी तू विश्वास दिलास. माझ्या थरथरत्या हातांना आधार दिलास. लय विचार केला तेव्हा. निर्णय घ्यायच्या आधीची रात्र लय तळमळत काढली मी... मनावर दगड ठेऊन ठरवलं. जे बरोबर वाटलं ते ठरवून तिथून तुला न सांगता निघाले. माझी स्वप्नं मोठी होती, त्यात तू मला साथ दिली असतीस हेही मला माहीत हाय, पण माझ्यामुळे तुझी फरफट होऊ नये म्हणून मी हे सगळं केलं...**

ती काहीच बोलली नाही. सुमितने प्रपोज केल्याच्या दिवसापासून ती सुमितला टाळत होती.

"आवडत नसेल तर तसं सांग ना स्पष्ट... मला तुझं हे वागणं नाही समजत."

"मी कुठे म्हणाले तू मला आवडत न्हाय म्हणून... उलट पहिल्यांदा माझ्यावर कोणीतरी खरं प्रेम केलं म्हणून मी भारावून गेले हाय." अगदी शांतपणे ती सुमितकडे डोळ्यांत बघत म्हणाली. सुमितही शांत झाला.

"मग काय म्हणून तू माझ्यापासून दूर पळतेयस?" सौम्यपणे सुमितने विचारलं.

"ते प्रेम मी स्वीकारू शकत न्हाय म्हणून... माझी स्वप्नं वेगळी हायत." काहीतरी गूढ लपवत असल्यासारखं तिच्या डोळ्यांत अश्रू आले.

"त्या स्वप्नात मी बसू शकत नाही? मी भागीदार होऊ शकत नाही?" या बोलण्यावर तिने सुमितची नजर टाळली.



"हे सगळं तू इमोशनल होऊन बोलतोयस, म्हणून तुला सत्य परिस्थिती लक्षात येत नाहीये."

"काय म्हणायचंय तुला? तू ट्रान्सजेंडर असल्याने आपल्याला अडचणी येतील? समाज तुझ्यामुळे मलाही स्वीकारणार नाही, की आपल्याला मूल होणार नाही? हे बघ, या सगळ्याला तू घाबरून पुढे जायला नकार देत असशील तर मी सगळ्यांचा विचार करून ठेवला आहे, माझी सगळ्या गोष्टींना..."

तोही समजावीत तिला म्हणत असतानाच त्याचं बोलणं तोडत ती म्हणाली,

"नको रे इतकं गुंतवून ठेवू..." पुढे ती काही बोलणार इतक्यात त्याने तिचा हात हातात घेतला. तिच्या हाताची थरथर त्याला जाणवू लागली. तिच्या मनाची द्विधा परिस्थिती झाली होती.

"काही बोलू नको पुढे. फक्त विश्वास ठेव." त्याच्या विश्वासाने तिचा श्वास स्थिर झाला.

मीनाच्या त्या शब्दाविनाच्या होकाराने तो खुलून गेला. छातीत प्रेमाची हवीहवीशी धडधड जाणवत राहिली. दिवस हिरवाईने नटलेले वाटत होते. तो मीनाच्या प्रेमात बुडाला होता. मात्र एके दिवशी त्याला मीनाशी खूप काही बोलायचं असताना त्याचा मीनाशी संपर्क झाला नाही. तो दिवस बेचैनीत गेला. 'काहीतरी अडचण असेल, नंतर होईल संपर्क' असं म्हणून माधवने त्याची समजूत काढली. त्यानंतरचे दोन दिवस तिचा काहीच संपर्क नाही म्हणून तो अस्वस्थ झाला. शेवटी तो तिच्या खोलीवर गेला. एका मुलीने दार उघडलं.

"मीना...?" सुमितने विचारलं.

"तू... सुमित?" सुमितने मानेनेच होकार दिला. तिने सुमितला आत बोलावलं.

"तू इथे आलास तर मीनाने तुला एक निरोप द्यायला सांगितला होता. एक मिनिट आलेच." ती उठून आतून एक चिठ्ठी घेऊन आली.

"ही चिठ्ठी... तुझ्यासाठी." हृदयाच्या धडधडत्या ठोक्यांसहित त्याने मीनाची चिठ्ठी उघडली.

'आपले रस्ते एकत्र येऊ शकत न्हायत. आपण प्रेमात असताना पण एक भीती कायम माझ्या पाठीमागे असते. तुझं माझ्यावर जे प्रेम हाय, त्याचा मी आदर करते. त्या प्रेमाखातर एकच वचन मागते, मला शोधू नकोस... माझा प्रवास वेगळा

हाय.'

स्तब्ध अवस्थेत त्याच्या हातून ती चिठ्ठी गळून पडली. त्याला आश्चर्य वाटलं, त्याचबरोबर अचानक त्याच्या मनात अनेक प्रश्नांचं काहूर माजलं.

० ० ०

आश्रमात खिडकीबाहेर पाहताना कॉलेजमधल्या प्रवासात रमून सुमितचे डोळे स्थिर झाले होते.

"नमस्कार, आपण मला भेटायला आला आहात ना?" स्थिर डोळ्यांनी आठवणीत हरवलेला सुमित एका तरुण मुलाच्या वाक्याने भानावर आला.

"हो... आपणच?..." सुमितने त्याला विचारलं.

"मीच या संस्थेचा संचालक... अर्जुन..." नाव ऐकताच सुमितच्या चेहऱ्यावर हलकं हसू उमटलं.

"मला... मीनाला भेटायचं आहे..." अर्जुन स्तब्धपणे सुमितकडे बघू लागला.

मीनाने कोर्स मध्येच का सोडला, ती कुठे गेली, याचं उत्तर कोणालाच माहीत नव्हतं. कॉलेज संपल्यावर सुमितचे मित्र-मैत्रिणी आपापल्या मार्गाला लागले. कोणी नोकरी, तर कोणी व्यवसायात स्थिर होऊ पाहत होता. सुमितने मीनाचा शोध न घेण्याचं वचन पाळलं होतं... एके दिवशी त्याला फोन आला.

"हॅलो, सुमित ना?"

"हो, बोलतोय..."

"मी मीना..." जवळपास ७-८ वर्षानंतर तिचा आवाज आणि नाव ऐकून त्याचं सर्वांग थरथरू लागलं. दोन क्षण काही प्रतिसादच देता आला नाही.

"मीना..." याव्यतिरिक्त कुठलेच शब्द निघाले नाहीत. अचानक आपल्याला हुंदका येत असल्याचं त्याला जाणवलं.

"सुमित, मला तुला भेटायचं आहे..." सुमित तिच्या या शब्दांनी भानावर आला.

परक्या गावात मीनाला भेटायला जाताना त्याच्या हृदयातून पुन्हा प्रेम बहरत होतं. इतक्या वर्षांतून पुन्हा काहीतरी नवा अर्थ सापडल्याचं त्याला जाणवत होतं. त्याच्या मनात अनेक प्रश्न होते, पण त्याहीपेक्षा मीनाला भेटायचं कुतूहलही होतं.

दरवाजा उघडला गेला. मीना आणि सुमित समोरासमोर आले. इतक्या वर्षांनी तिला पाहिल्यावर जो आनंद त्याला व्हायला हवा होता, त्या जागी मात्र त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य दाटलं. मीनाची ढासळलेली प्रकृती त्याला दिसली. तिच्या चेहऱ्यावर थकवा जाणवत होता आणि वजन घटलेलं.

"मीना, तू बरी आहेस ना? काय हाल करून घेतले आहेस..." इतक्या वर्षांतील अबोलपणाचं अंतर विसरून सुमित तिच्याजवळ जात काळजीने म्हणाला.

"अजूनही तू बदलला न्हायस, अगदी तसाच हायस." मीना अगदी प्रेमभरल्या नजरेने त्याच्याकडे बघत म्हणाली. मीनाने त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

"सगळे प्रश्न मनात आहेत... का सोडून गेलीस मला... का शब्दांत अडकवलंस?" सुमितने विचारलं.

"सगळं सांगेन आज... काही ठेवणार नाही..." शांतपणे सुमितला आश्वस्त करत ती म्हणाली.

"सुमित, आजची आपली भेट खास हाय... मी जाण्याआधी मला तुला एकदा बघायचं होतं, भेटायचं होतं आणि तुझ्या उत्तर न मिळालेल्या प्रश्नांची उत्तरं द्यायची होती." तिचं शेवटचं वाक्य सुमितपर्यंत पोचायला एक दोन क्षण गेले.

"काय बोलतेयस तू... कुठे जाण्याआधी?" दोन्ही हात हातात घेत विचारताना त्याचा आवाज जड झाला होता.

"हे जग सोडून जाण्याआधी..." शब्द सुमितच्या काळजाच्या आत गेले आणि त्याच्या देहाची पुतळ्यासारखी अवस्था झाली.

"मी एचआयव्ही पॉझिटिव्ह हाय. एका टप्प्यावर पोटाचा प्रश्न होता तेव्हा दुसरा काहीच पर्याय नव्हता. घरातून बाहेर पडले तेव्हा भीक मागताना मलाही बाहेरचा रस्ता दिसत नव्हताच. मग कोणीही गळ्यात पडलं की त्याला जवळ केलं. त्यातून हे... कॉलेजमध्ये असतानाच मला हे कळालं होतं... तेव्हा तो मी धक्का पचवला. पण..." तिचं वाक्य पूर्ण होण्याआधीच सुमित एकदम धक्क्याने खालीच बसला.

० ० ०

सुमित आणि मीना एकमेकांच्या जवळ हातात हात घेऊन बसले होते. सुमितचं डोकं मीनाच्या खांद्यावरच होतं. नजर शून्यात होती.

"एक पार्टनर मिळावा हे स्वप्न होतं... तू विचारलंस, मला प्रपोज केलंस, अगदी त्याच्याच काही दिवस आधी मला माझ्या एचआयव्हीबद्दल समजलं होतं... वाटायला लागलं, हातात मोजकी वर्षं हायत. माझं दुसरं स्वप्न मला पूर्ण करायचं होतं. त्या स्वप्नात मी वाहवून घेतलं. ट्रान्सजेंडरसाठी काम सुरू केलं."

"पण तुझ्या आजाराबद्दल तू मला तेव्हाच का नाही सांगितलंस? मी त्यातही तुझी सोबत केली असती."

मीनाने सुमितचं डोकं उचललं. त्याच्यासमोर डोळ्यांत बघत म्हणाली,

"तेच मला नको होतं... त्या दिवशी तू विश्वास दिलास. माझ्या थरथरत्या हातांना आधार दिलास. लय विचार केला

तेव्हा. निर्णय घ्यायच्या आधीची रात्र लय तळमळत काढली मी... मनावर दगड ठेऊन ठरवलं. जे बरोबर वाटलं ते ठरवून तिथून तुला न सांगता निघाले. माझी स्वप्नं मोठी होती, त्यात तू मला साथ दिली असतीस हेही मला माहीत हाय, पण माझ्यामुळे तुझी फरफट होऊ नये म्हणून मी हे सगळं केलं... आपला संसार सुरू झाला असता, पण जोडीदार म्हणून मी काही तुला कायमसाठी पुरणार होते का, हे माहीत नव्हतं.''

''आणि मी तुला विसरून नवीन आयुष्य सुरू करावं म्हणून तू मला तुला न शोधण्याचं वचन मागितलंस...'' सुमितचे डोळे पाणावून गेले होते.

काही क्षण मीना थांबली आणि ओघळत्या अश्रूंनी म्हणाली,

''सुमित, सापडलं ना नवं प्रेम? संसार सुरू केलास?'' सुमित मीनाच्या डोळ्यांत बघू लागला. काहीच बोलला नाही.

तिला उत्तर मिळालं. ती सुमितचा हात दाबत म्हणाली, ''आठवणींच्या हिंदोळ्या सुख देणाऱ्या वाटत असतील तुला... पण फक्त आठवणींवर आयुष्य न्हाय काढता येत... कुणीतरी हाय तुझीही वाट बघणारं... त्यासाठी तुझे डोळे उघडे ठेव...'' सुमितच्या डोळ्यांतून अश्रू चालू झाले होते. काहीसं ठामपणे ती म्हणाली, ''ही आपली शेवटची भेट...'' तिच्या या पुन्हा असं वचन घालण्याचा अर्थ सुमितपर्यंत पोचला. काही क्षण नुसतीच शांतता होती.

''तुला कधी भेटावंसं वाटलं, बोलावंसं वाटलं, तर?'' सुमितने तिला प्रश्न विचारला.

''भेटेन मी... माझा संसार थाटलाय मी... सुरुवातीला ट्रान्सजेंडरसाठी काम चालू केलं. पण नंतर एका अनाथ मुलाला दत्तक घेतलं आणि जगण्याला अजून एक वळण आलं. अनेक मोठी स्वप्नं पूर्ण झाल्यासारखी वाटली. जे ट्रान्सजेंडर स्वत:च्या पायावर उभे राहिले, त्यांचाच पुन्हा लय हातभार लागला... आणि मग आम्ही एक आश्रम काढलाय... तिथे फक्त ट्रान्सजेंडर न्हाय, तर आता अनाथ मुलं आणि वृद्धांसाठी पण काम वाढवायचं हाय...'' अश्रूंनी भरलेल्या सुमितच्या डोळ्यांत हे ऐकताना अभिमान दाटला होता. मीना बोलता बोलता थांबली.

''मी जेव्हा या जगात नसेन ना... तेव्हा तिथे माझ्या आश्रमात भेटेन मी... तोच माझा संसार हाय... आता अर्जुन, माझा दत्तक मुलगा मोठा होतोय, तो हळूहळू आश्रम सांभाळतोय... माझ्या ट्रान्सजेंडर मैत्रिणीपण आहेतच...''

मीना पुन्हा शांत झाली आणि म्हणाली, ''पण तिकडे भेटायला येण्याची एक अट हाय...''

० ० ०

''मला खरं तर मीनाला भेटायचं आहे...'' आश्रमात अर्जुन स्तब्धपणे सुमितकडे बघू लागला.

''आपण सुमित ना...?'' अर्जुनने दिलेल्या या ओळखीने सुमित आणि अर्जुन एकमेकांकडे बघू लागले.

''हो, पण तुम्हाला... तुम्ही मला ओळखता?'' सुमितने विचारलं.

''आईने सांगितलं होतं तुमच्याबद्दल... तुम्ही तिला इकडे नक्की भेटायला याल हेही सांगितलं होतं... पण इतक्या वर्षांनंतर?'' यावर सुमितने हलकं स्मितहास्य केलं.

''हो, मीनाने, तुझ्या आईने अट घातली होती... जर मी नव्या आयुष्याला, नव्या जोडीदारासोबत संसाराला सुरुवात केली तरच मी इकडे येऊ शकतो.''

''ती अट आता पूर्ण झाली मग?'' अर्जुनच्या या प्रश्नावर सुमितचे डोळे स्थिर झाले, श्वास संथ झाला.

''मीनाने तिच्यात अडकून न राहता, तिला विसरून मी नव्या जीवनाला सुरुवात करावी म्हणून खूप काही केलं. अगदी कॉलेजनंतर काही वर्षांच्या भेटीतही तिने मला परत कधीही न भेटण्याची अट घातली... शेवटी इथे भेटायला येण्यासाठीही तिने मला तीच अट घातली... इतकी वर्षं मी घालवली... जवळच्या माणसांना दुखावलं... मनाच्या खोलात गेलो... अनेक अवस्थांमधून प्रवास केला आणि आज इथे आलोय... अट इथेच पूर्ण करायला...'' सुमितच्या या बोलण्याचा अर्थ अर्जुनला कळला नाही. तो प्रश्नार्थकपणे सुमितकडे पाहू लागला. सुमित काही क्षण थांबला आणि म्हणाला,


''जिथे मीनाने संसार केला, त्याच आश्रमात मला माझ्या संसाराला सुरुवात करायची आहे... हा आश्रम हाच माझा संसार... तिने जो संसार थाटला, तेच संसार कार्य मला करायचं आहे...''

थिजल्यासारखं होऊन अर्जुन सुमितकडे पाहू लागला. त्याच्या डोळ्यांत अश्रू दाटले. सुमितचा चेहरा उजळून गेल्यासारखा भासत होता.

''चला, आईला भेटू या ना?'' अर्जुनने सुमितला विचारलं, तसा सुमितच्या अंगावर शहारा आला.

सुमित आणि अर्जुन दोघेही मीनाची भेट घेऊ लागले... तिथल्या अनाथ मुलांत... वृद्धांकडे पाहून... ट्रान्सजेंडरना भेटून... तिथल्या मातीत सुमितला मीना भेटत होती...

शेवटी दमून-भागून ते पुन्हा कार्यालयात आले. मीनाच्या फोटोसमोर ते उभे राहिले आणि सुमितने डोळे भरून मीनाची भेट घेतली.




## कादंबरी

# नदीष्ट

**लेखक :**
**मनोज बोरगावकर**
नांदेड

आस्वादक समीक्षा :
**नंदिनी देशमुख**
लेखिका

नदी आपल्या धुंदीत वाहते. वाटेत तिला गावे भेटत जातात. निरनिराळी, वेगवेगळ्या स्वभावांची. त्यांची नदीशी सलगी होते... मैत्री होते, घट्ट बिलगावे अशी. नदीत पाय सोडून बसल्यावर जाणवते की नदी त्यांची आप्त, इष्ट नात्याची होऊन गेली आहे. नदीच्या पोटात अनंत माया आहे. तशी काही गुपितेही आहेत. कधीतरी भरल्या मायेपोटी ती बाहेर येतात. त्या समयाची वाट पाहावी लागत नाही. ते आपोआप घडून येते, नकळत... अचानक. नदीवर पूल असतो. त्याचे पायसुद्धा नदीतच बुडलेले असतात. तोही नदीला समजून घेत असतो. तिच्या डोहात असलेली जीवघेणी घुसमट त्यालाही थोडीफार चाटून गेलेली असते. पुलाचे पाय खूप खोलवर जाऊ नाही शकत. पण त्यांना दूरवरून दिसते, नदीतल्या भोवऱ्याची भोवंडून गेलेली गर्द नशा... त्यांचे काळीज गलबलते, मन डहुळते. जागच्या जागीच डगमगतात ते, नंतर पुन्हा स्थिरावतात.

अशीच काही मायाळू माणसे, ती त्यांच्या अद्‌भूत विश्वात जगणारी असून केव्हातरी अकस्मात आपल्याशी आगळा अनुबंध जोडतात. अशीच एक व्यक्ती म्हणजे 'सगुणा'. सगुणाचे काठोकाठ भरलेले अंत:करण खुले होते, नदीच्या आश्वासक लाटांच्या मनसोक्त हुंकारांमुळे. भरून आलेले मन मोकळे होऊन जाते. समोरच्या व्यक्तीच्या प्रामाणिक प्रतिसादाच्या खात्रीने. या जगात फक्त दोनच प्रकारच्या माणसांना जगण्याची मुभा दिली जाते. पुरुष आणि स्त्री. त्याशिवाय वेगळे असणारे अस्तित्वच नाकारले जाते. तोंड लपवून किडामुंगीपेक्षा वाईट जगणे वाट्याला येते. साधारण मनुष्याप्रमाणे भर गर्दीत सन्मानाने तर जाऊ द्या, एखाद्या झुरळासारखे उडून जाऊन टाळताही येत नाही. आपले असणे एखाद्या कळकट गाठोड्यासारखे वागवावे लागते. धड फेकूनही देता येत नाही, तसेच काखोटीला मारणेही नको वाटते. कसातरी मार्ग काढत पाय ओढत जावे लागते.

भिकाजीचे जीवन असते अतिसामान्य माणसासारखे. पण एका अनपेक्षित, अघटित प्रसंगामुळे ते जीवन त्याच्यासाठी गुन्हेगाराचे दु:सह, अपराधी जगणे होऊन जाते. त्याला स्वत:लाही तोंड दाखवता येत नाही, त्याविषयी दुसऱ्यांना काय सांगणार? अशा अनेक 'वाउगेचि ओझे' बाळगून जगत राहणाऱ्या जिवांची जड झालेली आयुष्ये या नदीच्या पुढ्यात

पडून राहिलेली आहेत. त्यांचे गाऱ्हाणे नदी ऐकते, क्वचित त्यांची समजूतही घालते. पुन्हा वाहू लागते, तिचा प्रवाह अडून राहत नाही. त्या प्रवाहपतितांना अंत:करणात सामावून घेत ती पुढचा प्रवास चालू ठेवते. पाणी वाहत पुढे जात राहते, तरीही नदीचे पात्र त्याच जागी खिळून आहे असे आपल्याला दिसत राहते. आयुष्य पुढे जात असले तरी अनुभूती मात्र एकाच ठिकाणी साचून राहिलेल्या असतात.

जिवाची पर्वा न करता साप, नाग यांना शिकस्तीने धरून ठेवणारा, युक्तीने व चपळाईने त्यांना आपल्या जिवाची बाजी लावून पकडणारा प्रसाद आपल्या मनात ठिय्या देऊन बसतो. प्रसंगी जिवाशी खेळून सापाला घट्ट दाबून ठेवत, सोडून जाऊ न देता हुलकावणी देत, चकवत, बरणीत बंद करणारा प्रसाद... त्याचे जगणे किती अनिश्चित, एखाद्या सापासारखेच सळसळत क्षणात नाहीसे होऊ शकणारे. अशा एकेक विलक्षण मानवी जगातल्या विचित्र घडामोडींच्या आयुष्यांचे ताळेबंद काढायला जावे तर आपले डोके सुन्न होऊन थांबेल. अशा हकिकती अख्ख्या जन्मात कधी ऐकल्या पाहिल्या नसतील, त्या वाचताना मेंदू बधीर तरी होतो किंवा साक्षात झिणझिण्या येतात. अशीही माणसे, असेही जगणे असते?

पांढरपेशांना लहानपणीच आयुष्याची शिकवण देणे सुरू होते. शिक्षण, नोकरी, लग्न, मुलेबाळे, घर, संसार, मुलांचा अभ्यास, खेळ, छंद, सिनेमा, फिरणे, खादाडी, मुलांची लग्ने, नोकऱ्या, परदेशप्रवास, म्हातारपण या सगळ्यांची पाहूनच सवय झालेली असते तरी मोठ्यांचे ऐकून घ्यावे, जाणावे, समजावे, पचवावे, तसेच वागावे... यासाठी सतत शिकवणे चालत असते. सगुणा, भिकाजी किंवा प्रसाद या माणसांची आयुष्ये अशा कोणाच्या शिकवण्या-सांगण्याने सरळमार्गी होतील? त्यांची तेच वाट शोधत, धडपडत, ठेचकाळत, कुठल्या तरी रस्त्याला लागतात. जशी वेळ येईल, प्रसंग सामोरा येईल तसे तोंड देत जगतात... चूक का बरोबर हा मुद्दाच नसतो तिथे, सुचेल ते ओढून नेतात. ना आई-वडिलांचा सहवास, ना भावंडांची सोबत, ना कुणी जोडीदाराची साथसंगत, ना मार्गदर्शकांचा पाठिंबा. जगण्याला थेटच भिडतात आणि त्यातूनच एकेक वाटा त्यांना सापडत जातात. सुख, दु:ख, वेदना, आनंद या सगळ्या भावना जिरून जातात जगताना. त्यांचे अनुभव कसे खटकन पुढे येऊन ठाकल्यासारखे अंगावर येतात.

जसे काही अनवट पथ, निराळ्या अर्थी चाकोरीबाहेरची जीवने मराठी साहित्यात चितारलेली कधी माहीत नाहीत. लेखकाने हे आगळ्या व्यक्तींचे अनुभव स्वत: नक्कीच जवळून पाहिले असावेत असे वाटण्यासारखी चित्रमय वर्णने लिहिलेली आहेत. त्यांची कासाविशी, व्याकुळता स्वत:लाच जाळून काढल्याइतकी खरीखुरी वाटावी इतकी कादंबरीची भाषा विदारक अनुभूती देऊन जाते. लेखकाने हा मनोव्यापारांचा प्रवास हळूहळू उलगडत आणला आहे आणि आपल्यापाशी त्याचे हृद्गत तो मुक्तपणे मांडत आहे. ओघवत्या भाषेतले त्याचे मुक्तछंदातले दीर्घ लेखन आपल्यातल्या मानवतेला झटका आणि फटका देणारे आहे.

लेखकाप्रमाणे वाचकही पुरा त्यात अडकून जातो. तोही सगुणाला स्वत:चीच दोस्त मानायला लागतो, कारण तीही नदीष्ट असते. सगुणाच्या घरच्यांना भेटून सगुणाचे हालहवाल सांगावे असे लेखकाबरोबर आपल्यालाही वाटायला लागते. पण मग भीतीही मनात येते. घरच्यांनी ओळख दाखवली नाही तर? आपले ऐकून घेतले नाही तर? हाकलून दिले तर? समाज सगुणाला माणूस का नाही समजत? सगुणालाही पोट आहे, तिचे शरीर माणसाचेच आहे. पोट भरण्यासाठी हातपाय चालवण्याचा हक्क सगुणालाही आहे, मग का नाही वापरायचा तिने तो? समाजात सन्मानाने का जगता येत नाही अशा अनेक सगुणांना? त्यांच्यावर देशभर हिंडायची वेळ का येते? ठरावीक गावांमधल्या विशिष्ट ठिकाणीच त्यांची वस्ती का असते? स्वाभिमान सोडून भीक मागत का फिरावे लागते त्यांना? स्वत:चा स्वतंत्र चेहरा का नसावा त्यांना? अपंगांना जसे मदत करून वा सवलती देऊन समाजात सामावून घेतले जाते, तसे या तृतीयपंथीयांना का नाही? तेही आपल्या सर्वसामान्यांसारखे आयुष्य का जगू नाही शकत?

एवढे भारंभार प्रश्न लेखक मनोज बोरगावकर यांच्या लेखनामुळे वाचकाच्या मनात उत्पन्न होतात, त्याला भंडावून सोडतात, त्याचा पिच्छा पुरवतात. नदीपाशी येऊन तिच्या कुशीत शिरूनही उत्तरे पुढ्यात येत नाहीत. नियती, नशीब, दैव, दुर्भाग्य या सगळ्या माणसाने शोधलेल्या सबबी आहेत. मनात आणले तर माणूस इकडचे जग तिकडे करू शकेल. त्याची इच्छाशक्ती सगुणा, प्रसाद किंवा भिकाजी यांच्यासाठी कार्यरत झाली तर तसे होईलही. माणूस इतर माणसांना स्वत:सारखे कधी समजेल? माणसाने माणसाशी माणसासम वागणे, हे प्रत्यक्षात कधी दिसेल? प्रत्येकाच्या आत्म्यात चेतनातत्त्व एकच असूनही हे असे बाह्य / शारीरिक भेदाभेद महत्त्वाचे का गणले जातात? लेखनातले हे अध्याहृत असलेले मुद्दे वाचकाच्या मनात घोंगावत राहतात, अस्वस्थता निर्माण करतात. लेखकाच्या साध्यासरळ कथनशैलीतून वाचकाला जबरदस्त आणि बिनतोड अशी चमत्कारिक निरुत्तरता प्रत्ययाला येते. वाचक त्या प्रश्नांपासून धड पळूनही जाऊ शकत नाही, ते प्रश्न त्याचा पाठलाग करतच राहतात. निसर्गाची किमया माणूस का ओलांडू धजत नाही?

काही देशांमध्ये तृतीयपंथीयांना कायद्यांद्वारे सुरक्षित व सुखी जीवन जगण्याची तरतूद असते, तशी भारतानेही केली असली तरी भारतीय जनतेची मानसिकता अशी विचित्र आहे की ती या निरागस जिवांना शांततेने जगू देत नाही. त्यांचा असा काय अपराध असतो की साधेसोपे जिणे त्यांना दुश्वार झालेले असते? अत्यंत संवेदनशील मनाच्या या निवेदकाला त्यांच्याबद्दलची काळजी नेहमी वेढून राहिलेली असते. प्रसाद आणि भिकाजी यांच्यासारखे जीव कसेतरी तग धरून जगत असतात. भिकाजीच्या भूतकाळाचे सावट त्याच्या अख्ख्या आयुष्यावर पडलेले असते. प्रसादचा भविष्यकाळ त्याला भिववून सोडत असतो. आणि सगुणाचा वर्तमानकाळ एवढेच तिचे जगणे होऊन गेलेले असते. भूतकाळ आठवून सुखावण्याचीही तिला परवानगी नसते, भविष्यकाळाचा तर विचारही मनात आणवत नाही. आजचा दिवस कसाबसा जातोय, हेच उद्दिष्ट पार पाडल्यासारखे ती जगत असते. इतर साधारण मनुष्याप्रमाणे अनेकांच्या घोळक्यात राहून समूहजीवन जगणे प्राप्त असते. कुटुंबाने तिला हुडकून काढून घरी आणले असते, आधार दिला असता तर असे रस्त्यावरचे भटके जीवन जगायची वेळ तिच्यावर नक्कीच आली नसती. अशा सगुणांसाठी देशाने कायदे करण्याची, समाजाने समजून घेण्याची आणि कुटुंबाने तिचे मानसिक बळ वाढवण्याची गरज आहे.

पुस्तकाची लेखनशैली वरवर सरळ भासली तरी ती तितकी सरळ नाही. तिच्या रेषांच्या अधेमधे जे दिसते ते अंत:करणात करुणा जागवणारे व हरवलेले कितीतरी मोलाचे असे काही सापडू शकते. निवेदक नदीत पोहण्यासाठी रोजच पहाटे किंवा क्वचित संध्याकाळी येत असतो. तेव्हा सगुणा किंवा भिकाजी त्याला त्या जागी भेटतात. त्यांचे जगणे नदीच्या पाण्यासारखे स्वच्छ व वाहत नसल्याची त्यांना खंत असते, ती कायमच राहणार असते. त्याचे दु:ख निवेदकही बाळगून असतो. त्यासाठी काही करावे असे त्यालाही वाटत असते, पण काय ते मात्र समजत नसते. त्याची असमर्थता त्याला आणखी दुखवत असते, पण याला काही इलाज नसतो. निवेदक त्यांच्या दु:खात डुंबल्यासारखा नदीत डुंबतो आणि काही वेळानंतर नाइलाजाने त्याला बाहेर यावेच लागते. जणू काही त्यांचा हताशपणा आणि दौर्बल्य नदीत मिसळून गेले आहे, नदीबरोबर तेही वाहत जात आहे. ते संपत नाही, तात्पुरते दृष्टिआड होते आहे. पुन्हा नंतर कधी ते भेटेलच, सतत ते असल्याची जाणीव मात्र अखंड होत राहणार आहे.

रोज नदीजवळ आल्यावर सगुणाला आठवणे हा दिनक्रमच होऊन गेलेला आहे. सगुणाची निवेदकाशी भेट तशी आगगाडीच्या डब्यात, चढता-उतरताना, फलाटावर ओझरती होत असे. पण सर्वांसमोर त्याला आपल्याशी बोलायची वेळ येऊ नये अशी काळजी सगुणाच घेत असे. स्वत:साठी त्याने समाजाचा त्रास का सहन करावा, या विचाराने सगुणाच 'नदीकडे भेट' हे हळूच सांगून दूर जात असे. आणि मग नदीजवळ अगदी मनभर बोलून मन मोकळे करत असे. भेटीची उत्सुकता निवेदकालाही असे. आज आणखी काय ते अचंबित करणारे ऐकायचे आहे, असे त्याला वाटत असे. स्वत:बद्दल निवेदक कधीही काहीही बोलत नाही. त्याच्या मनात नेहमीच नदी आणि केवळ तिथेच भेटणारी ही तीन असाधारण माणसे याबद्दलचे विचार सतत घोळत असतात. त्याची मती तिथेच कुंठित झाल्याप्रमाणे तोही पुन्हा पुन्हा नदीपात्राकडे धावत राहतो. नदीत भोवरे तयार होतात, तसेच त्याचे ते विचार भोवऱ्याप्रमाणे गरगरत राहतात. पोहताना नदीतल्या खोल डोहसदृश भागात निवेदकाने जाऊ नये, त्यात तो हरवून जाऊ नये यासाठी सगुणा सतर्क राहून त्याला काठावर येण्यासाठी विनवणी करत राहत असे. सगुणाच्या मनातली ही त्याच्या जपणुकीची जागरूकता त्याला भानावर आणत असे, प्रखर वास्तवात परत आणत असे. एका दृष्टीने सगुणामधल्या आत्मतत्त्वाची पोषकता निवेदकाला स्वत:च्या जिवंत प्रतिमेसाठी लाभदायी ठरत जाते, त्याचे आत्मतत्त्व त्यामुळे बलवान होत जाते.

या लेखनात हिंदी व उर्दू शब्द अनेक येतात. नांदेड जिल्ह्यातील बोली त्यात कित्येकदा वाचायला मिळते. कृत्रिम संवादांपेक्षा नितळ निवेदन स्वच्छपणे समजून घेता येते. तरुण मनाची स्पंदने कादंबरीभर विखुरलेली आहेतच. नदीच्या वाहत्या पाण्याच्या सान्निध्यातही निखळ सत्याचे दर्शन त्याच्या स्पष्ट प्रतिबिंबासह सामोरे येते. नदी हे या पुस्तकातले महत्त्वाचे पात्र तर आहेच, पण नदीकाठ हाही एक जिवंत व्यक्तिरेखेसमान असावा, इतके त्याचे चित्रदर्शी वर्णन प्रत्ययकारी आहे. जगण्यातले प्रवाहीपण नदी शिकवते. पुढे जाता जाता क्षणभर टेकून देवाणघेवाण करावी, हे नदीकाठ सांगतो. कोणीही आपल्यासाठी थांबत नाही, आपल्यालाही कोणासाठी थांबता येत नाही. दुरून साथ मिळाली तर त्यावर समाधान मानून चालत राहावे.

चालणे अखंड, जगणे अखंड... नदी वाहत राहते हे इष्ट, नदीसारखे पुढे जात राहावे हेच इष्ट! इती नदीष्ट!!

ग्रंथाली प्रकाशनाने बोरगावकरांसारख्या नवोदित लेखकाचे हे विलक्षण लेखन प्रकाशित केल्याबद्दल त्यांचे व लेखकाचेही आभार मानले पाहिजेत!!!

***प्रकाशक*** – ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

***आस्वादक समीक्षा*** – लेखिका नंदिनी देशमुख

# मित्र ट्रस्ट

**रुद्राणी छेत्री**
**संस्थापक : मित्र ट्रस्ट**



'मित्र ट्रस्ट' एक समुदाय द्वारा बनाया गया संघटन है, जिसकी स्थापना ७ जनवरी २००५ में हुई। मित्र ट्रस्ट का मुख्य उद्देश्य है कि वह सभी वर्ग के समलैंगिक व्यक्ति, ट्रान्सजेंडर और किन्नर को पूर्णता सक्षम कर दे जिससे वह अपना जीवन सरलता व समानता से जी सकें ।

'मित्र ट्रस्ट' एक ऐसे समाज को बनाने में भागीदार होना चाहता है जहाँ सभी व्यक्ति समानता से रह सकें चाहे वह किसी धर्म, जाति, समुदाय के हों।

**मिशन :**

हमारा मिशन सभी समलैंगिक व्यक्ति, ट्रान्सजेंडर और किन्नर को उनके मूलभूत अधिकार दिलाना है, जिनमें मुख्य हैं –

१. उनके मानव अधिकारों की व गरिमा सुरक्षा करना व उन्हें बढ़ावा देना।
२. उन्हें भेदभाव से, कलंकित जीवन से व हिंसा से बचाना व सुरक्षित रखना।
३. भारतीय नागरिक होते हुए उनको उनके नागरिक, राजनीतिक, सामाजिक, संवैधानिक अधिकार की प्राप्ती देना।
४. उनको बीमारियों व किसी भी संक्रमण से मुक्त जीवन देना।

**व्हिजन :**

ऐसे स्थान व समाज की रचना जहाँ समलैंगिक व्यक्ति, ट्रान्सजेंडर और किन्नर गरिमा, सामाजिक न्याय व अच्छे स्वास्थ्य के साथ रह सके।

**मित्र ट्रस्ट का उद्देश्य :**

१. सभी समलैंगिक व्यक्ति, ट्रान्सजेंडर और किन्नर को सक्षम बनाना व ऐसा समर्थन प्रणाली देना जिससे वह एच.आय.व्ही., एड्स और उसके जीवन में प्रभाव को समझ सके।
२. अन्य संस्था, समूह व व्यक्तियों के साथ मिलकर काम करना ताकि समलैंगिक व्यक्ति, ट्रान्सजेंडर और किन्नर से बेहतर बनाया जा सके।
३. समलैंगिक व्यक्ति, ट्रान्सजेंडर और किन्नर व्यक्तियों के सामाजिक न्याय व मानव अधिकार के लिए पैरवी करना।
४. समलैंगिक व्यक्ति, ट्रान्सजेंडर और किन्नर व्यक्ति के लिए यौन स्वास्थ्य सामग्री बनाना।
५. उन सभी अनुसंधान को करना या उनमें भागीदारी लेना जो समलैंगिक व्यक्ति, ट्रान्सजेंडर और किन्नर व्यक्तियों के कष्टों को खोजे और उनके उपाय हेतु कार्य करे, साथ ही ऐसे कार्यक्रमों को लाये जो उपाय हेतु हो।
६. उन सभी सामग्री, साधन, आर्थिक सहायता व तकनीकी सहायता को पहचानना व उनको समुदाय के बेहतर जीवन के लिए शामिल करना।

**मित्र ट्रस्ट के कार्य :**

'मित्र ट्रस्ट' समलैंगिक व्यक्ति, ट्रान्सजेंडर और किन्नर व्यक्तियों के लिए नई दिल्ली में एच.आय.व्ही. रोकथाम पर कार्य कर रही है । साथ ही 'मित्र ट्रस्ट' ट्रान्सजेंडर व किन्नर व्यक्ति के लिए आश्रय गृह का कार्यक्रम चला रही है।

**इन कार्यक्रमों में मुख्य सेवाएं हैं :**

- पक्षसमर्थन
- समुदाय की खोज
- ड्रॉप इन सेंटर
- प्रशिक्षण
- व्यवहार परिवर्तन
- कंडोम का वितरण
- सामुदायिक कार्यक्रम
- सहायता समूह का गठन
- एच.आय.व्ही. परामर्श व जांच
- संकट प्रतिक्रिया समूह



**रुद्राणी छेत्री**

'मित्र ट्रस्ट' के संस्थापक रुद्राणी छेत्री स्वयं एक ट्रान्सजेंडर महिला हैं।

'रुद्राणी' का जन्म दिल्ली के साधारण से घर में हुआ, उन्होंने दिल्ली से ही अपनी पढ़ाई करी और जनवरी २००५ में 'मित्र' की स्थापना करी।

उनका मानना है कि एल.जी.बी.टी.आय.क्यू. समुदाय का जीवन सामान्य परिस्थितयों से बहुत ही मुश्किल और संघर्षो भरा है और इसलिए समुदाय को सक्षम बनाना बहुत ही आवश्यक है। रुद्राणी पिछले २५ वर्षों से समुदाय से जुड़ी हुई हैं और अपना पूरा समय समुदाय के लिए देती हैं। वह अन्य कई सरकारी व गैरसरकारी राष्ट्रीय व राज्य के संघटनों से जुड़ी हुई हैं जो एल.जी.बी.टी.आय.क्यू. समुदाय के बेहतर भविष्य के लिए कार्य करते हैं।

इनमें एड्स, टी.बी. और मलेरिया निवारण के लिए वैश्विक फंड (Global Fund for AIDS, TB and Malaria - GFATM), राष्ट्रीय सबसे बड़ी एलजीबीटीआयक्यू + संघटन INFOSEM, NACO शोध व अनुसंधान आचार समिति, राष्ट्रीय मानवाधिकार एलजीबीटीआयक्यू + मुख्य समूह, ऐसी सभी महत्वपूर्ण राष्ट्रीय स्तर पर कार्य करने वाले संघटनों के समिति की रुद्राणी छेत्री सदस्य हैं।

रुद्राणी एक कलाकार भी हैं जिन्होंने फिल्मों में अभिनय किया है। साथ ही उन्होंने साल २०१५ में भारत की पहली ट्रान्सजेंडर मॉडलिंग एजेंसी की शुरुआत की।

'मित्र ट्रस्ट' से जुड़े हुए कुछ ट्रान्सजेंडर्स के विचार अब हम जान लेंगे।

**अनुराधा**

मैं अनुराधा स्वयं को एक Transwoman के रूप में देखती हूँ। मेरा जन्म हरियाणा के एक गाँव में एक लड़के के रूप में हुआ। मेरा नाम कृष्ण कुमार रखा गया परंतु मेरे जन्म के बाद से जितना भी मैं समझ सकी तो मेरी जीवनशैली एक लड़की की तरह ही थी तथा बचपन से ही मैं लड़कियों की तरह खेलना तथा सब रहन-सहन मेरा एक लड़की वाला था। मैंने स्कूल में जाना शुरू किया तो रास्ते में काफी लड़के मेरे साथ छेड़खानी करते थे, तथा मुझे बहुत परेशानी का सामना करना पड़ता था। क्लास के अन्दर भी मैं काफी अलग-थलग सा महसूस करती थी। जैसे तैसे करके मैंने अपनी पढ़ाई पूरी करने की कोशिश की जबकि मेरे Parents ने मेरी पढ़ाई रोकने को बोला। जब मैं दसवीं कक्षा में थी तो मेरे Parents ने मेरी पढ़ाई छुड़वाने का प्रयास किया। परंतु मैं हिम्मत नहीं हारी और मेरी मम्मी ने मेरा साथ दिया कि, आगे भी पढ़ाई कर सकते हो। इसके बाद मैंने कॉलेज से स्नातक किया परंतु कॉलेज में काफी छेड़खानियों का सामना करना पड़ता था। फिर भी मैंने सभी समस्याओं का सामना करके अपना स्नातक पूरा किया। स्नातक के बाद मैंने अपना डिप्लोमा एक प्रतिष्ठित होटल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट से किया और उसके बाद रोजगार की तलाश में प्रयास करती रही। मैंने रोजगार पाने के लिए काफी मेहनत की परंतु सभी कुछ निरर्थक रहा। काफी समय तक प्रयास के बाद रोजगार न मिलने पर मैं काफी हताश-निराश होकर अपने घर परिवार के साथ रहने लगी।

ज्यादा समय रहने तथा मेरे parents के आश्रित रहने पर मुझे काफी समस्याओं का सामना करना पड़ा। आये दिन मुझे ताने सुनने को मिलते थे। और मेरे घर वालों ने मुझे घर से निकाल दिया। मेरे पास कई दिन रहने को रास्ता नहीं था। तथा मुझे किसी दोस्त से गरिमा गृह शेल्टर होम का पता चला और मैं यहाँ आकर मैंने बात किया और शेल्टर होम में रहने की सुविधा मिली। यहाँ पर skills और आवास की काफी अच्छी व्यवस्था है। सब लोग रोजगार प्राप्त करने में काफी मदद करते हैं। भविष्य में मैं अपने अच्छे रोजगार प्राप्त करने की आशा रखती हूँ। धन्यवाद।

### शिव

मेरा नाम शिव है। मेरा जन्म एक लड़की की बॉडी में हुआ था। पर मैं बचपन से लड़का ही मानता था खुद को। लड़के की तरह ही रहता था और आज भी रहता हूँ। मैं खुद को कभी लड़की मानता नहीं था। बचपन से मुझे लड़कों वाले कपडे पहनाए गये। और मेरा बचपन बहुत अच्छा बीता। जब मैं बड़ा हुआ मेरा attraction लड़कियों की तरफ था और मुझे एक लड़की भी पसंद थी, जिसके साथ रिलेशनशिप रहा और आज भी हम दोनों रिलेशनशिप में हैं। जब मैं बी.ए. में था तो मैंने अपनी मम्मी को अपनी फिलिंग शेअर की। २० साल की उम्र में मुझे मम्मी ने accept किया पर मुझे financially support नहीं मिला, पढ़ाई भी मैंने खुद के दम पर पास की। और मेहनत करते-करते पता नहीं चला ज़िंदगी के कितने साल बीत गये। १२ वीं कक्षा में मैंने दो साल स्कूल में पढ़ाया था और खुद भी अपने पैसों से पढ़ाई की। मम्मी-पापा ने मुझे बस दसवीं कक्षा तक पढ़ाया। मैंने मेहनत करनी नहीं छोड़ी। आज मेरी उम्र २१ हो गयी है। As a transman मैं बहुत struggle कर रहा हूँ। मैंने फिर पॅथोलॉजी की लॅब मे जॉब की एक साल और बी.ए. के बाद पॅथोलॉजी लॅब में ज़िन्दगी दी। पर वहाँ भी एक लड़की ने मेरी पोस्ट छीन ली। फिर मैंने हार नहीं मानी और Easy Mall में जॉब स्टार्ट किया और २ साल निकाले। फिर मैंने tolltax में जॉब की सेक्युरिटी गार्ड, सायबर कॅफे स्टॉल भी लगाया, शादी में मार्केटिंग भी की, एम.आर. की जॉब भी की। पर मेरे जेंडर की वजह से मुझे जॉब छोड़नी पड़ी। क्योंकि मेरे साथ लड़कियों की तरह treat किया जाता था।

फिर मुझे गरिमा गृह का पता चला तो मैं यहाँ आया। ये कोरोना ने सभी की कमर तोड़ दी। यहाँ मेरी जॉब छूट गयी। एक साल तक मैं बेरोज़गार रहा पर अब मैं अच्छी जॉब चाहता हूँ जो मेरे जेंडर को accept करके दे। और मैं चाहता हूँ यहाँ मेरा एक छोटा सा घर हो। और मेरी real identity के साथ अपनी पार्टनर के साथ रहूँ। और मैं computer operator as like official joc करना चाहता हूँ।

### आदित्य

मेरा जन्म एक लड़की के शरीर में हुआ था। मेरा नाम आशनी था। पर मैं बचपन से ही फील करता था कि मैं एक लड़का हूँ। मेरी फिलिंग लड़कों वाली ही थी। लड़की की तरह रहना-उठना-बैठना सब लड़की वाला था। मैं लड़कों की तरह ही बात करता था। मैंने कभी भी अपने आपको लड़की नहीं माना। लड़के ही मेरे दोस्त होते थे। लड़के की तरह बात करना ही मुझको पसंद था। जब मैं कक्षा ५ में था, तो मेरा attraction लड़कियों की तरफ था। लड़कियों के साथ मेरा रिलेशनशिप भी रहा है। मुझे लड़कियां Attract करती थीं। मेरी फॅमिली मेरा लड़के की तरह रहने को accept नहीं करती है। मेरे अपनी फॅमिली को दसवीं कक्षा में बता दिया था, पर मैं बचपन से अपने बुआ जी के घर पर रहता था। मेरी बुआ जी को मैंने जब बताया, मैं लड़का बनना चाहता हूँ सर्जरी करवाकर, तो उन्होंने मुझे दो थप्पड़ मारे। तो मैंने उनको ज्यादा बताना नहीं चाहा जो लोग मेरी फिलिंग को नहीं समझते थे उन्हें मैंने समझाना नहीं चाहा। मैंने अपनी बारहवीं पास की और फिर एक साल तक जॉब की। As coordinator मुझे एक और opportunity मिली थी Recar दौड़ प्रतियोगिता में national level पर selection हुआ था जिसके लिए मुझे मेरे बुआ जी ने मना कर दिया। जब मैं सेल मार्केटिंग में जॉब करता था as coordinator तो मेरे जेंडर को लेकर मुझे बोलते थे। मीटिंग में मुझे बोला जाता था as female look में आया करो, जिसकी वजह से मैंने वो जॉब छोड़ दी। फिर मैंने दूसरी जॉब की as a junior accountant और फिर मेरा एक लड़के के साथ रिश्ता कर दिया। और मुझे जबरदस्ती बोलते थे, मैं उस लड़के से बात करूं, पर मैं खुद को लड़का मानता था। मैं उस लड़के से कैसे एक लड़की की तरह बात करूं। मैं खुद लड़का हूँ तो मैं उससे भी लड़की की तरह ही बात करता पर मुझे पसंद नहीं था उससे बात करना। एक महीने बाद मैंने अपने पापा को फोन किया और पापा से बहुत softly बोला मैं ये शादी नहीं कर सकता, आप ये रिश्ता टूटवा रहे हो या मैं सुसाइड कर लूं। मेरा उस लड़के से रिश्ता टूट गया। फिर मेरे पापा जी मुझे गाँव ले गये फिर मैं गाँव में स्कूल में जॉब करता था। पर मैंने अपने फॅमिली को नहीं बताया। मैं एक transman हूँ फिर मुझे लड़कियों की तरह treat करते थे जो मैं नहीं चाहता था। तो मैं घर

से भाग कर दिल्ली आया और मुझे मेरे दोस्त से transgender shelter home का पता चला। मैं यहाँ आया और यहाँ skill development कर रहा हूँ। मैं एक successful cusinessman बनना चाहता हूँ। मुझे sales marketing में भी interest है। और मैं अपने आपको as transman (Aditya Singa) identify करता हूँ।



**मेरी ज़िंदगी का सार**

मेरा नाम मोन्टी सिंह है। मैं एक ट्रान्समॅन हूँ। मेरा जन्म एक लड़की के शरीर में हुआ था।

लेकिन मैं अपने आप को एक लड़का मानता हूँ। मैं जब अपने आप को समझने लगा तब मैंने अपने आप को लड़के के रूप में पाया। मैंने खुद को कभी भी लड़की नही माना, मैंने खुद को हमेशा एक लड़का ही माना है और हमेशा मानूंगा। और मैं हमेशा यह चाहता था कि मेरे घर वाले भी मुझे एक लड़के की तरह treat करें, पर ऐसा नहीं हुआ। मेरे घर वालों ने मुझे ९ वी क्लास तक पढ़ाई करवाई और आगे बारहवीं क्लास तक मैंने खुद पढ़ाई की। बारहवीं क्लास करने के बाद मैं जॉब करने लगा क्योंकि घर पर मेरा मन नहीं लगता था। मेरे घर वाले, आस-पास के लोग मुझे लड़की की तरह treat करते थे। मुझे अच्छा नहीं लगता था। घुटन सी होती थी। मेरे इस तरह रहने से घर में रोज़ लड़ाई होती थी। मुझे घर छोड़े हुए आठ साल हो गए हैं। मैं पढ़ाई में इतना अच्छा तो नहीं हूँ पर चाहता हूँ की मैं एक अच्छी जॉब करूं। मैंने बहुत जगह जॉब किया है। पर मुझे कहीं भी अच्छी सॅलरी नहीं मिली। पर मैं चाहता हूँ मैं एक अच्छी जॉब करूं, एक अच्छी सॅलरी के साथ। मैं चाहता हूँ कि मैं बहुत जल्दी अपने आप को पूरी तरीके से चेंज कर लूं। क्योंकि मैंने घर छोड़ते वक्त अपने घर वालों को कहा था कि मैं एक पूरा लड़का बनकर दिखाऊँगा और कुछ कर दिखाऊँगा।

मैं नहीं चाहता कि जो मैंने फेस किया है वो कोई और भी करे। मैं चाहता हूँ कि मेरे जैसे जितने भी ट्रान्समॅन हैं या ट्रान्सगर्ल्स हैं मैं उनके लिए कुछ कर सकूं। मैं चाहता हूँ कि जो भी मेरी तरह हैं उन सब को एक अच्छी पहचान मिले।

मैंने इन ८ साल में बहुत कुछ देखा है। मैं नहीं चाहता कि कोई और भी मेरी तरह उन चीज़ों को फेस करे क्योंकि घर से बाहर रहना आसान नहीं है। पर मुझे खुद पर पूरा विश्वास था कि मैं चाहे छोटी-मोटी नौकरी कर लूँगा पर कभी भी कोई गलत कदम नहीं उठाऊँगा, पर दुनिया हम जैसे लोगों को नहीं समझती इसलिए मैंने घर छोड़ने के बाद बाहर किसी को नहीं बताया कि मैं एक लड़की हूँ या मेरी फिलिंग क्या है। क्योंकि बाहर कोई नहीं समझता।

लॉकडाऊन मे मेरी नौकरी चली गई थी। मैं बहुत परेशान रहने लगा। तभी मेरे एक दोस्त ने मुझे 'मित्र ट्रस्ट' के बारे में बताया। अब मुझे यहाँ रहते हुए एक महीना हो गया और मैं अब यहाँ से अपने पैर पर खड़ा होकर अपनी पहचान के साथ निकलुंगा।

धन्यवाद।

**अंजली**

मेरा नाम अंजली है। मैं १९ साल की हूँ। मैं अपने को ट्रान्सवुमन मानती हूँ। मेरी अपनी पढ़ाई सेकंड इयर दिल्ली युनिव्हर्सिटी से कर रही हूँ।

मैं अपने बारे में क्या बताऊं? मेरी ज़िंदगी में कभी खुशी आए कभी ग़म, कभी ऐसा लगा कि मैं अपनी ज़िंदगी ही खतम कर लूं। मैं जब छोटी सी थी तो मेरी ज़िंदगी में बहुत दुख आये। कुछ ऐसे पल जिसमें कोई मेरे पास नहीं था। कोई मेरे साथ नहीं था। वो पल याद हैं, मैं छोटी सी थी मुझे नहीं पता था कि मैं क्या थी, अनजान थी। मैं जब लड़की की तरह रहती थी, हरकतें भी लड़की की तरह होती तो घर वाले गुस्सा करते थे। पर मैं एक आजाद पंछी थी। किसी की बात नहीं मानती थी। अपनी मर्जी से ज़िंदगी जीती थी। पर धीरे-धीरे सब बदल गया। मेरी माँ जिसको मैं बहुत प्यार करती थी, अपनी जान से ज्यादा, वो छोड़के चली गई। बहुत दूर बहुत दूर, जो कभी वहाँ से वापस नहीं आ सकती! कभी नहीं! उसके बाद मेरी ज़िंदगी खतम हो गई, पर उसके बाद मेरी ज़िंदगी में कोई आता है ऐसा जो मुझे समझता है, जो मुझसे प्यार करता है। पर घर में मेरे पिता, मेरे भाई जो आज तक मुझे समझ नहीं पाये, शायद कभी तो समझेंगे, कभी तो!



# पाडू चला रे भिंत ही मध्ये आड येणारी, या मनामनातून बांधूया एक वाट जाणारी...

दीपा देशमुख
लेखिका आणि
सामाजिक कार्यकर्त्या

एक निरागस मुलगा, त्याला आपल्या हातात मुलींसारख्या बांगड्या घालाव्या वाटतात, कपाळावर टिकली लावावी वाटते. त्याचं चालणं, वागणं मुलीसारखंच असल्यामुळे त्याचे वडील वैतागून जातात आणि तो असं का वागतो, असं का करतो म्हणून त्याला अनेकदा अमानुषपणे मारहाण करतात. एवढ्यावरच त्यांचं समाधान होत नाही म्हणून की काय, पण ते त्याला घरातून हाकलून देतात. लक्ष्मीचं किन्नर असणं हा तिचा गुन्हा नसतानाही तिच्या वाट्याला तिरस्कार येतो, बेघर होणं येतं. जन्मदात्यानेच नाकारलं तर दाद कुठे आणि कोणाजवळ मागायची? एका मुलाला आकाशात भरारी मारण्यासाठी पालकच प्रोत्साहित करतात, पण त्याच पालकांनी त्याला कोसळण्यास



भाग पाडलं तर तक्रार कोणाजवळ करायची? अपमानित झालेला, दु:खी झालेला आणि भुकेने व्याकूळ झालेला मुलगा जेव्हा याच समाजातल्या लोकांजवळ घासभर अन्नासाठी याचना करतो, तेव्हा त्याला झिडकारलं जातं. अशा वेळी माणुसकी असलेला अब्दुल त्या मुलाला जवळ करतो. त्याचं पालकत्व घेतो. त्याला राहायला आसरा देतो. या लक्ष्मण शर्मा नावाच्या मुलाचं नामकरण तो लक्ष्मी करतो. इतकंच नाही तर त्याच्यातील कमीपणाची, न्यूनत्वाची भावना काढायला मदत करतो. किन्नर, हिजडा, छक्का, तृतीयपंथी अशा अनेक नावांनी संबोधल्या गेलेल्या व्यक्ती म्हणजे परमेश्वरांनी निर्माण केलेलं एक रूप असं अब्दुल म्हणतो.

अब्दुलच्या घरी आसरा मिळाल्यानंतर लक्ष्मीबरोबर गीता नावाची एक किन्नरही येते. तीही या घरात राहू लागते. ती लक्ष्मीला आपल्या आईच्या रूपात बघते. याच अब्दुलचा मतिमंद मुलगाही लक्ष्मी आणि गीता यांच्याबरोबर मोठा होतो. लक्ष्मी सचोटीच्या मार्गाने चालत थोडी जमीन खरेदी करते. गीताही मोठी होऊन तृतीयपंथी लोकांसाठी शाळा उभारणी आणि इतर विकासाची कामं करायला लागते. मात्र तिथला एक बिल्डर लक्ष्मीची जमीन हडप करतो आणि लक्ष्मी जेव्हा त्याला जाब विचारायला जाते, तेव्हा लक्ष्मी, अब्दुल, अब्दुलचा मुलगा या साऱ्यांना ठार मारतो. त्याची बायको आणि मुलगाही त्याला साथ देतात. कोणालाही सुगावा लागू नये यासाठी लक्ष्मीच्याच जमिनीत या तिघांची प्रेतं दफन केली जातात.

लक्ष्मीचा आत्मा आसिफ नावाच्या एका तरुणामध्ये शिरतो आणि त्या तरुणाच्या माध्यमातून लक्ष्मी आपला बदला घेते. अंगावर थरार आणणारी ही गोष्ट 'लक्ष्मी बॉंब' या चित्रपटातली असून अक्षय कुमारने आसिफची भूमिका साकारली आहे. सुरुवातीला आसिफ जेव्हा स्त्री असल्यासारखा वागतो, तेव्हा हे सगळे प्रसंग प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हसू पेरतात. विशेषत: साडीच्या दुकानात आसिफ लाल रंगाच्या साड्या निवडून एक साडी तर चक्क दुकानातच नेसून उभा राहतो. मात्र हळूहळू आसिफमध्ये प्रवेश केलेल्या लक्ष्मीची गोष्ट जेव्हा उलगडली जाते, तेव्हा करुणा, प्रेम, राग, संताप, चीड अशा सगळ्या भावना मनात दाटून येतात. लक्ष्मीवरचा अन्याय दूर होण्यासाठी मनाची तगमग वाढते.

शरद केळकरने लक्ष्मीची भूमिका अतिशय समर्थपणे साकारली आहे. गीताच्या सत्कारासाठी जेव्हा एका सभेचं आयोजन केलं जातं, त्या वेळी गीता ही लक्ष्मीला व्यासपीठावर बोलावते. लक्ष्मीचं पात्र रंगवणारा शरद केळकर अक्षरश: त्याची भूमिका जगलाय. लक्ष्मीने अब्दुलप्रती कृतज्ञता व्यक्त करणं प्रेक्षकांच्या डोळ्यांत अश्रू आणतं. हीच लक्ष्मी बिल्डरला जाब विचारायला त्याच्या घरी जाते, तेव्हा तिचा आवेश, तिचा संताप, तिच्यातला बंडखोरपणा, शरद केळकरने अतिशय अप्रतिमरीत्या साकारलाय.

'लक्ष्मी बॉंब' या चित्रपटाचं वैशिष्ट्य म्हणजे किन्नर म्हणून विनोद किंवा भीती या भावनेतून बघण्याऐवजी माणूस म्हणून बघण्याची दृष्टी हा चित्रपट देतो. खरं तर समाजात जागरूकता आणण्यासाठी, सामाजिक संदेश देण्यासाठी, चांगली मूल्यं ठसवण्यासाठी चित्रपटासारखं प्रभावी माध्यम दुसरं नाही. या चित्रपटासाठी अक्षय कुमार असो की शरद केळकर यांनी खूप मेहनत घेतल्याचं लक्षात येतं. लक्ष्मी बॉंब या चित्रपटासाठी मुंबईतल्या विक्रोळी इथली 'किन्नर मा' एक सामाजिक संस्था आणि महाराष्ट्र स्टेट ट्रान्सजेंडर वेल्फेअर यांच्या अध्यक्षांनी साहाय्य केलं. या चित्रपटाच्या निमित्ताने तृतीयपंथीयांच्या समस्या, त्यांना मुख्य प्रवाहात सामील होता आलं पाहिजे याचा विचार करता येतो.

अगदी लहान असताना मेहमूद या हास्य अभिनेत्याचा 'कुँवारा बाप' हा १९७४ साली प्रदर्शित झालेला चित्रपट बघितला होता. टाकून दिलेल्या एका मुलाचा एक गरीब रिक्षावाला कशा रीतीने सांभाळ करतो याची अत्यंत हृदयस्पर्शी कहाणी या चित्रपटात होती. पोलियो होऊ नये म्हणून पालकांनी काय काळजी घ्यायला हवी हे सांगणारा हा चित्रपट होता. या चित्रपटात या मुलाला कोणीही सांभाळायला तयार होत नाही, पण मेहमूद या मुलासाठी लग्न न करण्याची शपथ घेतो आणि येणाऱ्या प्रत्येक अडचणींशी लढत राहतो. या मुलाला सांभाळताना तृतीयपंथी त्याच्या बाजूने उभे राहतात. या चित्रपटातलं 'सज रही गली मेरी माँ, सुनेरी गोटे में' हे गाणं अतिशय गाजलं होतं. खरं तर अनेक चित्रपटांतून तृतीयपंथीयांचा उल्लेख होतो, त्यांचं दर्शनही होतं. पण कधी ते खलनायकी भूमिकेत, तर कधी विनोद निर्मितीसाठी तर कधी सर्वसामान्यांना भीती, तिरस्कार वाटावा अशा रीतीने होतो.

तसंच आपल्यापैकी प्रत्येकाला लहानपणापासून दोन प्रकारचे लोक बघण्याची सवय होते आणि ते म्हणजे केस वाढवलेले असतील, साडी किंवा पंजाबी ड्रेस घातलेला असेल, हातात बांगड्या, कानात डूल, गळ्यात माळ आणि कपाळावर कुंकू / टिकली असली की ती बाई आणि शर्ट, पँट, धोतर, सदरा, पायजमा झब्बा, हातात घड्याळ किंवा कडं, ओठांवर मिश्या, अशा वेषातला तो पुरुष... आणि मग कळायला लागतं तसं वागणं, चालणं पुरुषी पण अंगात बाईचे कपडे चढवलेले किंवा कधी अंगात पुरुषी वेष पण वागणं, चालणं नाजूक एखाद्या

बाईसारखं, अशा व्यक्ती दिसायला लागतात. अशा व्यक्ती सहसा रस्त्यावर, कधी सिग्नलला तर कधी चौकात दिसतात तेव्हा भीतीबरोबरच मनात कुतूहलदेखील निर्माण होतं. समाजात तृतीयपंथीयांच्या हक्कांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी, त्यांना मुख्य प्रवाहात सामील करण्यासाठी चित्रपटांसारखं प्रभावी माध्यम दुसरं नाही.



हिंदी चित्रपटसृष्टीत किन्नर या पात्राचा समावेश अनेक चित्रपटांमधून केलेला आहे. कधी विनोद निर्मितीसाठी, तर कधी खलप्रवृत्ती चित्रित करण्यासाठी. मात्र लक्ष्मी बॉंब आणि अनेक चित्रपटांमधून तृतीयपंथीयांविषयी समाजाने मानवतेच्या दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे हे ठामपणे सांगितलं. अक्षय कुमार, शरद केळकर, निर्मल पांडे, सदाशिव अमरापूरकर, आरिफ झकारिया, महेश मांजरेकर, विजय राज, आशुतोष राणा, राजकुमार रावसह अनेक अभिनेत्यांनी तृतीयपंथीयांच्या भूमिकेला न्याय देण्याचं काम केलं.

**तृतीयपंथी व्यक्तींना समजून घेण्यासाठी चित्रपट, माहितीपट ही प्रभावी माध्यमं वापरलीच पाहिजेत. पण त्याचबरोबर हा प्रश्न मुळापासून जाणून घेतला पाहिजे. तृतीयपंथींना समजून घेत असताना एलजीबीटीक्यू म्हणजे काय हे यानिमित्ताने समजून घ्यायला हवं.**

तृतीयपंथीयांना मतदानाचा हक्क १९९४ सालापासून भारतात मान्य करण्यात आला. त्यातूनच शबनम बानो किंवा शबनम मौसी या नावाने ओळखली जाणारी किन्नर ही मध्य प्रदेशातल्या सोहागपूरमधून १९९८ ते २००३ या कालावधीत देशातली पहिली एमएलए म्हणून विधानसभेसाठी निवडून आली. भ्रष्टाचार, बेरोजगारी, गरिबी आणि भूक यांच्याविरोधात काम करायचं तिने ठरवलं. तसंच तृतीयपंथीयांच्या वाट्याला येणारी उपेक्षा दूर करून त्यांना मुख्य प्रवाहात सामील करण्यासाठी प्रयत्नशील राहायचा तिचा निर्धार होता. पुढे यातूनच प्रेरित होऊन २००३ मध्ये मध्य प्रदेशात जेजेपी म्हणजेच जीती जिताई पॉलिटिक्स नावाचा तृतीयपंथीयांचा राजकीय पक्ष स्थापन करण्यात आला. शबनम मौसी हिचं वैशिष्ट्य म्हणजे ती फक्त दोन वर्षं प्राथमिक शाळेत गेली, पण तरीही तिच्या प्रवासाने, तिच्या अनुभवाने तिला १२ भाषा आत्मसात करता आल्या. तिचे वडील पोलीस सुपरिटेंडेंट होते. पण आपल्यापोटी एका तृतीयपंथीयाने जन्म घेतलाय हे लोकांना कळलं तर समाज आपल्यावर हसेल या भीतीपोटी त्यांनी शबनमला दूर केलं. याच शबनमचं तृतीयपंथीयांच्या गटाने पालनपोषण केलं. तिच्यावर चांगले संस्कार केले. तिच्या अनुभवांनी तिला राजकारणाचा मार्ग दाखवला. तिच्या आयुष्यावर २००५ साली योगेश भारद्वाज या निर्मात्याने 'शबनम मौसी' याच नावाचा चित्रपट काढला. या चित्रपटात शबनम मौसीची भूमिका आशुतोष राणा या अभिनेत्याने साकारली. एका तृतीयपंथीयाच्या वाट्याला जन्मापासून उपेक्षा आणि तिरस्कार येऊनही तो मुख्य प्रवाहात येतो आणि आपल्यासारख्या अनेकांना त्यात आणण्यासाठी प्रयत्नशील राहतो हे या चित्रपटातून दाखवलं गेलं. आजही आपल्या खऱ्या जीवनात शबनम मौसी एचआयव्ही एड्स आणि लिंगभाव यासाठी काम करते.

१९९१ मध्ये संजय दत्त आणि पूजा भट्ट यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'सड़क' चित्रपट खूपच लोकप्रिय झाला होता. विशेष म्हणजे त्यातलं, 'तुम्हें अपना बनाने की कसम खायी है'

हे गाणं खूपच गाजलं. या गाण्याबरोबर यातली महाराणी ही तृतीयपंथीची भूमिका सदाशिव अमरापूर या मराठी अभिनेत्याने साकारून या चित्रपटाला चार चाँद लावले होते. हिंदी चित्रपटसृष्टीत अशा पद्धतीचा खलनायक पहिल्यांदाच साकारला गेला होता. असं म्हटलं जातं की संजय दत्तने मुंबईत महाराणीसारखं एक तृतीयपंथी पात्र बघितलं होतं आणि तसं पात्र आपल्या चित्रपटात असावं असं त्याने महेश भट्टला सुचवलं होतं. महेश भट्टने या भूमिकेसाठी शरद सक्सेना या अभिनेत्याचा विचार केला होता, पण 'अर्धसत्य' या चित्रपटातील सदाशिव अमरापूरकरची नकारात्मक भूमिका इतकी गाजली होती की त्यांना सदाशिव अमरापूरकरला या चित्रपटात घेण्याचा मोह आवरला नाही. सदाशिव अमरापूरकरने आपल्या महाविद्यालयीन जीवनात अशा प्रकारची भूमिका साकारली असल्याने त्याने महाराणीच्या पात्राचं आव्हान स्वीकारलं आणि ही भूमिका अतिशय अफलातून अशी साकारली. त्यानंतर कितीतरी वर्षांनी 'मर्डर-२' हा चित्रपट आला, तेव्हा अशाच प्रकारची भूमिका प्रशांत नारायणन याने साकारली, तर 'अप्पू' या तमीळ चित्रपटात प्रकाश राज याने महाराणीची भूमिका अतिशय ताकदीने उभी केली. अमोल पालेकर दिग्दर्शित 'दायरा' या चित्रपटात निर्मल पांडे याने तृतीयपंथीयाची भूमिका साकारून आपला वेगळाच ठसा उमटवला होता. त्या वेळी फ्रान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये पुरस्कार तर मिळालाच, पण टाईम्स या नियतकालिकामध्ये १९९६ मधल्या सर्वोत्कृष्ट चित्रपटांमध्ये दायराची नोंद झाली.

१९९७ साली 'तमन्ना' या चित्रपटात टिक्कू या पात्राची भूमिका परेश रावल या अभिनेत्याने साकारली. पूजा भट्ट आणि मनोज वाजपेयी यांच्या प्रमुख भूमिका असूनही या चित्रपटात परेश रावलला राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. परेशने या भूमिकेविषयी बोलताना सांगितलं होतं, की तृतीयपंथीयांना समाजात बरोबरीने मान्यता मिळायला हवी आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार असावा असं आपल्याला वाटतं.

१९९७ साली कल्पना लाजमी दिग्दर्शित 'दरमियाँ' या चित्रपटात किरण खेर, तब्बू आणि आरिफ झकारिया प्रमुख भूमिकेत होते. आरिफ झकारिया याने तृतीयपंथीयाची भूमिका साकारली होती. किरण खेर एक अभिनेत्री असते आणि ती जेव्हा मुलाला जन्म देते, तेव्हा ते मूल तृतीयपंथी असल्याचं समजतं. यानंतर सुरू होतो तो एक दीर्घ अशा उपेक्षेचा प्रवास. खरं तर या चित्रपटात शाहरूख खान याने तृतीयपंथीची भूमिका करायचं निश्चित करण्यात आलं होतं, पण नंतर आरिफ झकारियाच्या नावावर शिक्कामोर्तब झालं. आरिफ झकारियाने तृतीयपंथीयाची भूमिका अक्षरशः जिवंत केली आहे. हा चित्रपट बघताना तृतीयपंथी असणं हा गुन्हाच असावा अशा रीतीने समाज ज्या तऱ्हेने मरणयातना देतो ते बघून मन सुन्न होतं.

२०१० साली राजकुमार रावने कुठलाही वशिला / वारसा नसताना चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं आणि आपल्या अभिनयाच्या जोरावर आपलं स्थान मजबूत केलं. त्याने 'आमी सायरा बानो' या बंगाली चित्रपटात किन्नर म्हणून काम तर केलंच, पण आपली भूमिका साकारण्यासाठी कलकत्त्यामधल्या तृतीयपंथीयांच्या वस्तीत त्याने अनेक दिवस वास्तव्य केलं. २०११ मध्ये 'क्विन्स : डेस्टिनी ऑफ डान्स' या चित्रपटात तृतीयपंथीयांचं जगणं, त्यांच्या पद्धती आणि इतर मुद्द्यांवर बोलण्यासाठी या चित्रपटाची निर्मिती झाली. यात गुरूअम्मा आणि मुक्ता यांच्या प्रमुख भूमिकेत सीमा विश्वास आणि विनीत हे कलाकार होते. लॉस एंजेलिस इथे संपन्न झालेल्या मुव्ही ॲवॉर्ड्समध्ये या चित्रपटाने एकूण सहा पुरस्कार मिळवले हे विशेष! त्यातच सीमा विश्वासला सहाय्यक अभिनेत्रीच्या भूमिकेसाठी पुरस्कार देण्यात आला. राघव लॉरेन्स याने 'कांचना' या तेलगू भाषेतल्या चित्रपटात राघव ही भूमिका साकारली होती. या मुलाला एका भुताने पछाडलेलं असतं. त्यामुळे तो खूप विचित्र वागत असतो. हे भूत एका तृतीयपंथी स्त्रीचं असतं आणि तिला सूड घ्यायचा असतो. तसंच 'नागरकिर्तन' या कौशिक गांगुलीच्या चित्रपटात रिद्धी सेन हिने परिमल नावाच्या तृतीयपंथीची भूमिका साकारली होती. या भूमिकेबद्दल तिला राष्ट्रीय पुरस्काराने गौरवलं गेलं. वयाच्या अवघ्या १९व्या वर्षी तिने हा पुरस्कार मिळवला हे विशेष!

२०१३ साली 'रज्जो' या चित्रपटात महेश मांजरेकरनेदेखील बेगम हे तृतीयपंथीय पात्र रंगवलं. या भूमिकेचं प्रेक्षकांनी आणि समीक्षकांनी एकजात कौतुक केलं. सुरुवातीला लोकांनी या चित्रपटाचा खूप विरोध केला. पण ज्या वेळी चित्रपट प्रदर्शित झाला, त्या वेळी मात्र लोकांनी याच चित्रपटाची प्रशंसा केली. याच वर्षी टिंम्मांशू धुलिया दिग्दर्शित सैफ अली खान आणि सोनाक्षी सिन्हा यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'बुलेट राजा' या चित्रपटात भोजपुरी चित्रपटांमध्ये लोकप्रिय असलेला अभिनेता रवीकिशनने समर यादव या तृतीयपंथीची भूमिका अविस्मरणीय अशी साकारली होती. त्याच्या या भूमिकेचं टीकाकारांनीदेखील कौतुक केलं होतं. 'सुपर डिलक्स' या चित्रपटात शिल्पा या तृतीयपंथीची भूमिका विजय सेथुपथी याने केली होती. यात एका तृतीयपंथीचं आयुष्य, मोरॅलिटी, लिंगभाव, लग्न, राजकारण आणि अनेक सामाजिक समस्या यावर बोललं गेलं होतं.

तृतीयपंथी व्यक्तींना समजून घेण्यासाठी चित्रपट, माहितीपट ही प्रभावी माध्यमं वापरलीच पाहिजेत. पण त्याचबरोबर हा प्रश्न मुळापासून जाणून घेतला पाहिजे. तृतीयपंथींना समजून घेत असताना एलजीबीटीक्यू म्हणजे काय हे यानिमित्ताने समजून घ्यायला हवं. लेस्बियन म्हणजे एखाद्या स्त्रीला दुसऱ्या स्त्रीविषयी अशाच प्रकारचं प्रेम किंवा आकर्षण वाटत असेल आणि तिच्याशी आपले लैंगिक संबंध असावेत असं वाटत असेल तर या प्रकाराला लेस्बियन असं संबोधलं जातं. एखाद्या पुरुषाला दुसऱ्या पुरुषाविषयी अशाच प्रकारचं प्रेम किंवा आकर्षण वाटत असेल आणि त्याच्याशी आपले लैंगिक संबंध असावेत असं वाटत असेल तर त्यांना 'गे' असं म्हटलं जातं. त्यानंतर बायसेक्शुअल म्हणजेच लेस्बियन किंवा गे असतानाही विरुद्ध लिंगी संबंधाविषयी ज्यांची तक्रार नसते, असे. त्यानंतर क्वीर म्हणजेच अशा व्यक्तींना आपण नेमके कोण आहोत याची स्पष्टता कधी वयाच्या १६व्या वर्षांपासून येते, तर कधी येत नाही अशांना क्वीर म्हणतात. मात्र अशा व्यक्ती ज्या पुरुषही नाहीत आणि स्त्रीही नाहीत अशांना ट्रान्सजेंडर किंवा तृतीयपंथी, हिजडा असं म्हटलं जातं. त्यांच्याकडे बहुतांश समाज तिरस्कृत नजरेने बघतो. अशा लोकांना समाजासमोर वावरताना अनेक अडचणींशी सामना करत जगावं लागतं. तृतीयपंथी व्यक्तींना घरातूनही भेदभावाची आणि उपेक्षित अशी वागणूक मिळते. घरातल्या लोकांना अशा व्यक्ती आपल्या कुटुंबात आहेत याची लाज वाटत असते. तसंच हे सगळं निसर्गाच्या विरुद्ध आहे अशी समजूत असल्यामुळे या व्यक्तींच्यामध्ये दोष आहे किंवा विकृती आहे असे गैरसमज आणि अंधश्रद्धाही पसरलेल्या आहेत.

आज देशभर अनेक सामाजिक संस्था एलजीबीटीक्यू समूहासाठी लोकजागृतीचं काम मोठ्या प्रमाणावर करताहेत. २०१४ सालानंतर भारतामध्ये ट्रान्सजेंडर व्यक्तींना आपलं लिंग बदलण्यासाठी शस्त्रक्रिया करण्याची परवानगीदेखील देण्यात आली आणि त्यांना संविधानानुसार ट्रान्सजेंडर होण्याचा अधिकार देण्यात आला. १५ एप्रिल २०१४ या दिवशी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने शिक्षण क्षेत्र आणि रोजगार म्हणजेच नोकऱ्यांमध्ये तृतीयपंथी व्यक्तींना आरक्षणाचा अधिकार देण्यात आला आणि त्यांना सामाजिक आणि आर्थिक मागास वर्गात सामील करण्यात आलं. तसंच राज्यसरकारांना त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना, पेन्शन योजना, सरकारी इस्पितळात मोफत शस्त्रक्रिया अशा सुविधा देण्यात आल्या आहेत. लिंगाच्या आधाराने व्यक्तीव्यक्तीमध्ये भेदभाव करण्यावर न्यायालयाने प्रतिबंध लावला. पूर्वी पुरुषांसाठी 'एम', तर स्त्रियांसाठी 'एफ' असं आद्याक्षर वापरलं जात असे आणि इतरांसाठी 'ओ' वापरलं जात असे. मात्र आता सरकारी कागदपत्रांवर ज्यात मतदान पत्र असेल, पासपोर्ट असेल यावर एम, एफ बरोबर तिसरं लिंग टीजी किंवा टी असं रूढ करण्यात आलं आहे. अशा व्यक्तीचं शोषण आणि हिंसा रोखण्यासाठीदेखील नियम बनवले गेले आहेत. केंद्र आणि राज्य स्तरावर कल्याणकारी बोर्डाची जशी स्थापना केली आहेत, तशीच तृतीयपंथी व्यक्तींच्या अधिकारासाठी न्यायालयीन प्रावधान बनवलं गेलं. हे विधेयक २०१६-२०१७ मध्ये संसदेत सादर करण्यात आलं होतं. त्या वेळी तृतीयपंथी व्यक्तींनी त्याला विरोध दर्शवला कारण त्यात लग्न, दत्तक विधान, घटस्फोट अशा मुद्द्यांचा समावेश करण्यात आला नव्हता. न्यायालयानेसुद्धा लैंगिकता ही वैयक्तिक निवड असून तो प्रत्येकाचा मूलभूत अधिकार असल्याचं म्हटलं आहे.

अनेक पौराणिक कथांचा अभ्यास केला तर महाभारत काळात लिंगबदल झालेल्या व्यक्ती बघायला मिळतात. उदाहरणार्थ, शिखंडी ही व्यक्तिरेखा. शिखंडीने स्त्रीजन्म घेतला होता, पण तरीही तो पुरुष म्हणून ओळखला गेला. बहुचरा माता ही प्रजननाची देवी समजली जाते आणि हिजड्यांची ती संरक्षक म्हणूनही ओळखली जाते. बहुतांश तृतीयपंथी बहुचरा मातेची पूजा करतात. वात्स्यायनाने लिहिलेल्या कामसूत्र या ग्रंथातही तृतीयपंथींचे उल्लेख आढळतात. आजमितीला भारतातच ५० लाख लोक तृतीयपंथी प्रकारात येतात. आज नेदरलँड, बेल्जियम, कॅनडा, स्पेन, द. आफ्रिका, नॉर्वे, स्वीडन, मेक्सिको, आईसलँड, पोर्तुगाल, अर्जेंटिना, अमेरिका, फिनलँड, कोलंबिया, जर्मनी, माल्टा अशा अनेक देशांमध्ये एलजीबीटी संबंधांना मान्यता आहे. मात्र, जगाच्या पाठीवरच्या अनेक देशांत आणखी जागरूकता आणण्याची खूप गरज आहे.

तो, ती आणि ते अशा संबोधनांपेक्षा, असा भेद करण्यापेक्षा आपण हे सारं नष्ट करून 'आपण' हे एकच संबोधन ठेवू शकत नाही का? माणूस म्हणूनच सगळे लिंगभाव दूर सारून जगू शकत नाही का? म्हणूनच या भेदाभेदाच्या भिंती पाडून मनाला सांधणारी, मनाला जोडणारी, मनात जाणारी वाट तयार करूयात का?

***पाडू चला रे भिंत ही मध्ये आड येणारी ।***
***या मनामनातून बांधूया एक वाट जाणारी ॥***

*छायाचित्रे स्रोत : इंटरनेटवरून साभार*




## हे वचन आयुष्यभराचे..आनंदाने जगण्याचे!

बरेच वेळा एखाद्या गोष्टीचा शुभ आरंभच त्याच्या उज्ज्वल भविष्याबद्दल ठामपणे बोलत असतो. आणि गोष्ट जेव्हा कोहिनूर प्रकल्पात घर घेण्याची असते तेव्हा आयुष्यभराच्या समाधानाची आणि आनंदाची खात्रीच मिळते. कोहिनूर ग्रुप त्यांच्या प्रकल्पाच्या माध्यमातून गेल्या 37 वर्षांपासून, पुण्यातील 6000 हून अधिक परिवारांना सुखात ठेवण्याचे काम करतो आहे. कारण घर बांधण्यापासून ते आपल्या हाती सुपूर्त करेपर्यंतच आमचा संबंध असतो हे आम्हाला मान्य नाही. त्यासाठी आम्ही खरेदी पश्चात सेवेसाठी तयार केली आहे, 'सदा सुखी रहो' टीम. जी तुमच्या प्रत्येक अडीअडचणी सोडवायला तत्पर असते. म्हणूनच कोहिनूर ग्राहकांच्या चेहऱ्यावर असते नेहमीच हास्य आणि मनात आनंद!

**कोहिनूरची ठळक वैशिष्ट्ये**

प्रीमियम होम्स । ब्रँडेड स्पेसिफिकेशन्स । खरेदी पश्चात सेवेसाठी सदैव सज्ज 'सदा सुखी रहो' टीम
आधुनिक ॲमेनिटीज । 24×7 बहुस्तरीय सुरक्षा । पुण्यातील मोक्याच्या ठिकाणी असलेले प्रकल्प

**KOHINOOR®**
A KRISHNAKUMAR GOYAL ENTERPRISE

कोहिनूर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन
A-101 / 102, आयसीसी ट्रेड टॉवर,
एस. बी. रोड, पुणे 411016

**संपर्क: +91 20 6764 1852**
www.kohinoorpune.com


**आपणा सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा...**

# माणूस म्हणून जगायचंय हो आम्हाला



**श्रीगौरी सावंत**
ट्रान्सवुमन
*शब्दांकन : शुभांगी मुळे*

मंडळी, मी तुमच्याशी 'चांगुलपणाच्या चळवळीच्या' दिवाळी अंकामधल्या लेखाच्या माध्यमातून संवाद साधतीये याचा मला खूप आनंद होतोय. या दिवाळी अंकाच्या संपादिका शुभांगी मुळे यांच्याशी बोलून मी माझं मन मोकळं केलं आणि टाळीच्या पलीकडे जाऊन माझा आवाज तुमच्यापर्यंत पोहोचतोय याचं मला खूप समाधान वाटतंय.

मी मुलगा म्हणून जन्माला आले आणि माझं नाव ठेवलं गणेश. गणेश सुरेश सावंत ही माझी ओळख मला समाजात, शाळेत सांगायला लागत असे. माझा जन्म पुण्यामध्ये झाला. वडील पोलीस खात्यात होते. बहिणीच्या नंतर १० वर्षांनी, माझा जन्म झाला. खरं तर मी मुलगा म्हणून जन्माला आले पण माझा आत्मा मुलीचाच होता. लहानपणी मी भांडीकुंडी, घरघर खेळायचे. आईचा टॉवेल डोक्याला गुंडाळायचे आणि मुलीसारखं सगळं करायचे. खरं तर वयाच्या सातव्या वर्षापर्यंत मला माझ्यातल्या स्त्रीत्वाचा अंदाज नव्हता आला. पण नंतर हळूहळू माझ्या आवडीनिवडी, माझा कल हा बाईचा आहे हे उलगडत गेलं. मी माझ्या बालपणात रमत होते, बागडत होते आणि तितक्यात नियतीने माझा बालपणाचा आनंद हिरावून घेतला. माझ्या अगदी कोवळ्या वयातच माझ्या आईचं निधन झालं. आईच ती, मला सांभाळायची, माझं संरक्षण करायची. पण आई गेली आणि माझ्या आयुष्यात निराशेचे, एकटेपणाचे, अंधाराचे ढग दाटून आले. आई गेल्यावर वडिलांनी माझ्याशी बोलणं सोडलं.

सुरुवातीच्या काळात आम्ही पुण्याच्या भवानी पेठेतील पोलीस कॉलनीमध्ये राहायचो. मॉडर्न बेकरीच्या शेजारी ऑर्नेला स्कूल ही माझी शाळा होती. पुढे वडिलांची बदली गडचिरोलीला झाली. आणि काही काळानंतर वडिलांची म्हणजे दादांची बदली ठाणे ग्रामीणला झाली. तसं मी आणि दादा मुंबईला आलो. सोबत आईची आई, म्हणजे माझी आजी पण आली. मालाडला रहेजा कॉलनीत दादांनी घर घेतलं होतं. आजी स्वयंपाक करायची, देवाची पोथी वाचायची. दादा त्यांच्या कामात असायचे. वाढत्या वयाबरोबर माझं चालणं-बोलणं थोडं बायकी होऊ लागलं होतं. बायकांसारखे छान लांब केस, नितळ त्वचा आपलीही असायला हवी असं मला वाटायचं. या माझ्या बायकीपणामुळे दादा माझा तिरस्कार करू लागले. आमच्या दोघांमधलं संभाषण जवळजवळ संपलंच होतं. मी नववी-दहावीत असताना मला कळून चुकलं होतं की मी पूर्णपणे बाईच्या गुणांनी बनलेलो आहे. मला मुली नाही, तर मुलं आवडायची. मुलांचं आकर्षण वाटायचं मला. अशा मन:स्थितीत

मी दहावी उत्तीर्ण झालो. मला भाषा विषय खूप आवडायचे, इतिहास आवडायचा, भूमिती आवडायची. मी चांगल्या मार्कांनी दहावी पास झालो. इस्माईल युसुफ कॉलेजातून अकरावी-बारावी पूर्ण करून मी रूपारेल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. अनेक टक्केटोणपे खात गणेशने कॉलेज पूर्ण केलं. त्याच्या हातात पदवी होती. कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानाच माझा 'हमसफर ट्रस्टशी' संपर्क आला. सांताक्रुझला वाकोल्यात त्यांचं ऑफिस होतं. त्या काळात 'एचआयव्ही'बद्दल, त्याच्या धोक्याबद्दल समुदायात जागरूकता वाढवायची कामं सुरू होत होती. एलजीबीटी समुदायातल्या सेक्स वर्कर्सकडे जाऊन कंडोम वाटण्याचे काम माझ्याकडे दिलं. 'हमसफर'मध्ये मला चांगले मित्र मिळाले. हमसफरमध्ये नोकरी करत असताना मी बचत चांगल्या पद्धतीने केली. मी तेव्हा चारकोपला बैठ्या चाळीत राहायला गेलो. माझी ताई, जी माझ्याहून १० वर्षांनी मोठी आहे, तीदेखील याच कॉलनीत राहायला आली. त्या वेळेस मी केस वाढवायला सुरुवात केली होती. भुवया कोरणे, लिपस्टिक लावणे वगैरे मी करत होतो. या सर्व गोष्टी ताईला अजिबात आवडायच्या नाहीत. ती मला फटकून बोलायची. मला ताईबरोबरचा एक प्रसंग आठवतो. एकदा मी दुपारी एक ते दीडच्या सुमारास ताईच्या घरी गेलो. तिने दरवाजा उघडला आणि दारातच विचारलं, 'तू जेवायला आलायंस का?' हा तिचा प्रश्न मला खूपच बोचला. काहीही उत्तर न देता मी दारातूनच आल्या पावली परत गेलो. मला खरंच त्यावेळेस खूप भूक लागली होती आणि त्या दिवशी नेमकी स्वयंपाकाच्या बाईने दांडी मारली होती. पण त्या क्लेशदायी प्रसंगानंतर मी ताईकडे कधीही जेवलेलो नाही. मी त्या दिवशी सामोस्यावरच माझी भूक भागवली. अशा हळव्या क्षणांना कवेत घेऊन मी जीवनाचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करत होतो. हमसफर ट्रस्टमध्ये कंडोमवाटपासह एलजीबीटी समुदायातल्या लोकांना एचआयव्ही टेस्टिंगसाठी तयार करण्याचं काम माझ्याकडे दिलं होतं. दर महिन्याला मी किमान ६० लोकांना टेस्टिंगसाठी तयार करत असे. जेवढं जास्तीचं काम मी करायची तेवढी मला पगारवाढ मिळायची. त्यामुळे माझी हमसफरची नोकरी मजेत चालली होती. हमसफरमध्ये अनेक तृतीयपंथी यायचे. त्यात एक प्राध्यापक असलेली माझी मैत्रीणपण होती. तिने तृतीयपंथी व्हायचा निर्णय नुकताच घेतला होता आणि तिच्यातले सर्व बदल मी जवळून बघत होते. ते बाईसारखं होत जाणं मला मोहात पाडत होतं. आपल्याला स्त्री व्हायचंय या खूप लहानपणापासून दबून असलेल्या इच्छेने आता उचल खाल्ली होती. एक दिवस गणेशने टेस्टीज काढून टाकण्याचं ऑपरेशन केलं. ऑपरेशन व्यवस्थित पार पडलं. २४ वर्षं पुरुष म्हणून मिळालेली बाह्य ओळख तासाभराच्या ऑपरेशननंतर मिटून गेली होती. पुरुषत्वाचं चिन्हच मिटवून टाकलं होतं. माझं एक नवं आयुष्य सुरू झालं होतं. नव्या व्यक्तिमत्त्वाची नवी व्यक्ती घरी निघाली होती. माझी नवी ओळख मी समाजापुढे आणली होती. होय, मी 'गौरी सावंत' झाले त्या दिवशी. आता बाईपणाची सर्व लक्षणं लवकर दिसायला हवी असं मला वाटू लागलं. त्या दृष्टीने मी हार्मोन्सच्या गोळ्या व प्रभावी प्रोजेस्टेरोनची इंजेक्शन्स घेतली. हळूहळू माझ्या शरीरात बदल जाणवू लागले. माझा आवाज बदलला, जबड्याचा आकार वेगळा दिसू लागला, गाल वर आले. मी अगदी सुखावले.

यादरम्यान माझ्या आयुष्याला वेगळे फाटे फुटले. 'हमसफर'मध्ये काम करताना मला बेचैनी आली. अस्वस्थता आली आणि म्हणून मी हमसफरची नोकरी सोडली. पण मनात पक्की खूणगाठ बांधली होती की तृतीयपंथीयांसाठी काम करायचं. त्यावेळेस स्वतंत्रपणे त्यांच्यासाठी काम करणारं फारसं कोणी नव्हतं. माझ्या आयुष्यात एक प्रेरणादायी दिवस उजाडला. 'सखी चारचौघी' ट्रस्टची मी स्थापना केली. मालवणीमध्ये तृतीयपंथीयांची मोठी वस्ती आहे. तिथे दहा बाय दहाची खोली मी भाड्याने घेतली आणि अक्षरशः एक चटई अंथरली आणि सुरू केलं. दहा वर्षांहून अधिक काळ आता काम करता करता लोटला आहे. एचआयव्हीपासून तृतीयपंथीयांना दूर ठेवणं हा माझ्या कामाचा मुख्य भाग होता. त्यांना भीक मागण्यापासून, शरीरविक्रय करण्यापासून परावृत्त करण्यासाठी मी कायम प्रयत्न करत असते. माझा एक स्वयंसहाय्यता गट आहे. वेगवेगळ्या रोजगाराच्या संधी त्यातून मिळाव्यात हा माझा प्रयत्न असतो. दुसऱ्या बाजूला तृतीयपंथीयांच्या समुदायातले प्रश्न, त्यांची व्यसनाधिनता सोडवण्यासाठीदेखील मी वेळ देते. मला अभिमान वाटतो की एक चटईपासून सुरू केलेला प्रवास आज एका चांगल्या ऑफिसच्या सेटअपमध्ये स्टाफसमवेत, छोट्याशा कम्युनिटी सेंटरसारख्या जागेत रूपांतरित झालेला आहे. तृतीयपंथीयांसाठी काम करणाऱ्या, देशातल्या महत्त्वाच्या संस्थांमध्ये 'सखी चारचौघी'चं नाव घेतलं जातं. माझ्यासाठी आनंदाची गोष्ट म्हणजे तृतीयपंथीयांसंदर्भात आयोजित केलेल्या अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये मला सन्मानाने निमंत्रित केलं जातं. आणि मला मोकळेपणाने भारतीय तृतीयपंथीयांची बाजू मांडता येते.

मंडळी, तुम्हाला माहीत आहेच की मी अगदी साग्रसंगीत समुदायाच्या प्रथेप्रमाणे गुरू केले. माझे गुरू तमीळ ब्राह्मण असून पारंपरिक चालीरीती पाळणारे आहेत. आमचा समुदाय

आपल्या परंपरांबद्दल अतिशय कट्टर असतो. माझ्यासाठी ही सगळी तारेवरची कसरत असते.

मला सांगायला आवडेल की २०१४ मध्ये समलिंगी संबंधांना विरोध करणाऱ्या घटनेतील कलम ३७७ विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्यांमध्ये मी एक होते. आहो खरं तर ही समुदायाच्या हक्कांसाठी लढाई होती. पण त्यामुळे समुदायातील सदस्यांनी भीक मागू नये, काम करावं अशा साऱ्या चर्चांना सुरुवात झाली. सगळा समुदाय भयंकर संतापला होता. आमचं सगळं व्यवस्थित चाललं असताना तू त्यात विघ्न का आणतेस, अशा रोष समुदायाचा होता. पण या सगळ्या गोष्टींना मी खूप खंबीरपणे तोंड दिलं.

मी स्वत: गुरू आहे. पण मी माझ्या कोत्यांना अशा बंधनात ठेवत नाही. त्यांना स्वातंत्र्य देते. तरुण तृतीयपंथीयांना इझी मनी हवा असतो. भीक मागून वगैरे त्यांना भरपूर पैसा मिळतो. या मानसिकतेतून त्यांना बाहेर कसं काढायचं हा माझ्यापुढे प्रश्न आहे आणि तृतीयपंथीयांना सन्मानाने काम करता यावं म्हणून मी 'स्वयंसिद्धा' सुरू केलंय. तिथे सध्या कागदी पिशव्या बनवण्याचं काम चालतं. पण तिथेही प्रतिसाद कमीच आहे.

मी जीवनाचं सूत्र एक व्रत म्हणून तयार केलेलं आहे. सकाळी मी चार वाजता उठते, मस्त गरम गरम चहा पिते, मग माझे श्वान मल्हार, मॅगी, घन:श्याम यांना प्रभात फेरीसाठी घेऊन जाते. यानिमित्ताने माझा फेरफटका होतो. तोपर्यंत पाच वाजतात. मग घरी येऊन छान सर्व आवरून दिवसभराच्या कामांना वेळ देते. सध्या 'नानी का घर' या माझ्या केंद्राचं नवीन बांधकाम चालू आहे. त्यामुळे तिथे जाणं, सुपरव्हिजन करणं, जातीने पाणी मारणं यात वेळ जातो. तीन मजल्यांचं घर होतंय. पाणी मारण्याचा व सुपरव्हिजनचा उपक्रम संपल्यावर सकाळी मी परत चहा-बिस्किटं खाते, फ्रेश होते आणि सेक्स वर्कर्स बायकांबरोबर, एचआयव्ही पॉझिटिव्ह बायकांबरोबर मीटिंग करते, त्यांच्यासाठी काम करते. ती कोंबडी कशी आपल्या पंखाखाली पिल्लांना घेऊन असते तसं माझं असतं. मी दुपारी वरण-भात जेवून, थोडी विश्रांती घेऊन साधारण चार वाजता 'नानी का घर'मध्ये या बाळांना भेटायला जाते. तिथे कोणाला धम्मक लाडू दे, कोणाला फटके दे, कोणाला जवळ घे, असे सगळे 'आई प्रकार' माझे चालू असतात. मुलांनी खाल्लं का नाही, डीमार्टमधून सामान आलं का नाही, हिवाळ्याची सोय झाली का नाही, अशा सगळ्या गोष्टींचं व्यवस्थापन बघते.

मित्रांनो, तुम्हाला माहीत आहेच की 'नानी का घर'मध्ये सेक्स वर्कर्सच्या मुलांचा, युनीसेक्स बाळांचा आम्ही सांभाळ



करतो. वृद्ध तृतीयपंथीय जे आयुष्यभर मातृत्वाला आसुसलेले आहेत ती सर्व मंडळी या 'नानी का घर'मधल्या मुलांची काळजी घेतात. जशी पाळणाघर ही संकल्पना आहे ना तशीच इथे वापरतो. मुंबईमध्ये या सेक्स वर्कर्स आपल्या बाळाला बाजूला ठेवून शरीरविक्रयचं काम करतात. ऐकल्यावर काटा आला ना अंगावर! पण ही वस्तुस्थिती आहे. आहो पण मग ते बाळ कसं सुरक्षित राहणार? पुढे त्याचं काय भविष्य असेल? आणि या विचारातूनच 'नानी का घर' आम्ही सुरू केलं. त्या बायका आमच्याकडे निश्चिंत मनाने मुलांना देऊन निघून जातात. त्या म्हणतात, 'चार दिन रहने दे. ये चार दिन के कपडे.' मग ते कपडे आमच्याकडचे हिजडे गरम पाण्यात डेटोलमध्ये, सर्फमध्ये भिजवून ठेवतात, त्याच्यातून अर्धा किलो मळ निघतो. अशा पद्धतीने बाळाची आम्ही निगा राखतो. त्या बाळांना पुरणपोळी, शिरा, भजी.... असं हवं ते आम्ही देतो. ज्या सुखाला मी मुकले ते सुख मी या मुलांना द्यायचा प्रयत्न करते.

माझी मुलगी गायत्री आता मोठी झाली आहे. तिच्या पंखांमध्ये आता बळ आलंय. ती डेंटिस्ट आहे. आता यू.एस.ला गेली आहे. मला गायत्रीचा खूप अभिमान वाटतो. खरं सांगू, मी वैराग्याचं जीवन जगते. पण मला कायम अशी जाणीव असते की माझी काहीतरी खूप मोठी जबाबदारी आहे. मला कुठे पळूनही जाता येणार नाही अशी माझ्यावर जबाबदारी आहे. अनेक आव्हानांना आम्हाला तोंड द्यावं लागतं. आम्हाला नोकऱ्या नाहीत. ज्ञानामृत देणं, सल्ला देणं खूप सोप्पं असतं. टाळी वाजवू नका, भीक मागू नका हे सांगणं खूप सोप्पं आहे. अरे पण मग आम्हाला काम द्या ना! आम्हाला तुम्ही काम देत नाही, तर मग आम्ही करणार काय? सांगा ना, आणि किती वर्षं हेच रडगाणं गाऊ मी?

एका बाईला जे हक्क मिळतात ते सगळे हक्क आम्हाला द्या ना. अग बाई, तुला जे पाहिजे तेच मलापण पाहिजे ग! जे तुझ्या

लेकरांना पाहिजे तेच माझ्यापण लेकरांना पाहिजे. अन्न, वस्त्र, निवाराच्या जशा गरजा तुझ्या आहेत, तशाच माझ्या आहेत. मी वेगळी कुठे आहे. हो, फक्त मला दाढीमिशी येते म्हणून मी वेगळी का! अग मी माझ्यासाठी वेगळी शाळा, वेगळा डॉक्टर नाही मागितलाय. माझा रक्तगट एबी पॉझिटिव्ह आहे आणि मी आठ वेळा रक्तदान केलंय. मी समाजाकरता झटतीये आणि समाज माझ्यासाठी काय करतोय? माझ्यामुळे घरच्यांची गेली इज्जत, पण आहो माझं काय? माझं उभं आयुष्य वणव्यावर पेटलंय. तो जो निखारा मी जवळ ठेवलाय त्याचं काय? तुम्ही माझं चूक आणि बरोबर याचं गणित मांडताय, पण मला माणूस म्हणून जगायला का नाही देत? मला रडायला खांदादेखील नाहीये. तुम्हाला सांगते, एवढा कोरोनाचा काळ होता, पण या काळात एकही दिवस असा आला नाही की मला सहन करावा लागला असेल. कोरोनाची कुठलीच झळ मला व माझ्या परिवाराला सोसावी लागली नाही. आम्हाला धान्य आलं, इतर गोष्टी पण मिळाल्या. आम्ही धान्य वाटलंदेखील. मग ही शक्ती आली कुठून? सांगा बरं! अहो साईबाबांनीच ही शक्ती दिली असेल ना? मी साईबाबांची निस्सिम भक्त आहे. मी साईबाबांना म्हणते, 'बाबा, माझ्या पोरा-बाळांची, सर्वांची काळजी घ्या. सर्वांना आई-बापाचं प्रेम मिळावं साई!'

मी हिजड्यांचं जीवन खूप जवळून बघितलंय. त्यांना दवाखान्यात मरताना बघितलंय. बहीण, भावांच्या लग्नाला हिजड्यांनी पैसे पाठवले, पण त्यांना बोलावलं नाही. हेदेखील बघितलंय. ह्या सगळ्या गोष्टींमधून मी विचार करते की आयुष्य म्हणजे नेमकं काय? आयुष्य म्हणजे प्रेम, माया, एकमेकांचा स्वीकार. आई-वडिलांनी आपल्या हिजडा मुलांचा स्वीकार केला पाहिजे आणि तरच समाजदेखील स्वीकार करेल. ज्या आईच्या उदरी असं बाळ जन्माला येईल त्या आईने अतिशय खमकेपणाने त्या समाजाला तोंड देत बाळासाठी उभं राहिलं पाहिजे. त्याच्यावर संस्कार केले पाहिजेत. कारण एका आईने स्वीकारल्यावर वडिलांना स्वीकारण्यास बळ मिळतं आणि मग नातेवाईक, मित्र परिवार, इतर समाजातले घटक स्वीकारण्यास तयार होतात.

मला वाटतं आयुष्य म्हणजे समाधान, आयुष्य म्हणजे आत्मसुख आणि आत्मसुख हे सर्व समाजाला समतेच्या आनंदात, माणुसकीच्या उत्सवात बघणं हेच होय!

माझ्या टाळीचा आक्रोश ऐकण्यापेक्षा आपण उत्साहाच्या, आनंदाच्या टाळ्यांचा कडकडाट ऐकूयात. गुंफूया समतेची, माणुसकीची, आपुलकीची विजयपताका.

With Best Compliments From

ROCK TECH ENGINEERS

ROCKTECH ENGINEERS

249-A/1/77, "E" Ward, Gulmohar Residency,
Near Maharashtra Times Office,
Nagala Park, Kolhapur - 416003
Tel. : 0231-2659403 / 2659404 /2625805
Fax : 2659405

# जगण्याचा संघर्ष

## हवी साथ तुमची

**शमीभा पाटील**
ट्रान्सवुमन



**मी** तृतीयपंथी - एलजीबीटी समुदायाची एक प्रतिनिधी. एक संवेदनशील, सजग नागरिक म्हणून मला सांगावं वाटतंय की, माणूस म्हणून जगण्याच्या आमच्या संघर्षात, सर्वसमावेशक भारताच्या घडणीत आम्हाला साथ द्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या गेल्या सत्तर वर्षांत आमच्यासोबत बरंच काही घडलंय. चांगलं आणि खूप सारं वाईट. ते सारं मागे ठेवून आम्ही पुढे जातो आहोत. समानतेसाठीचा सुरू झालेला हा अथक लढा आता थांबणार नाहीच. मात्र, तुम्ही सगळे सोबत आलात तर तो अधिक व्यापक, मजबूत होईल. आमच्याही आयुष्यात ती पहाट लवकर उजाडेल जेव्हा आम्ही तुमच्यासारखे 'माणूस' असू. आम्हालाही सामान्य माणसासारखं सगळ्यांच्यात मिळून मिसळून जगता येईल. आर्थिक स्वातंत्र्यासाठी आम्हालाही तुमच्या खांद्याला खांदा लावून विकासाच्या वाटेवर चालता येईल आणि आम्हाला मिळेल तुमच्यासारख्यांचा स्नेह आणि आपलेपणा!

जगभरातील समाजव्यवस्थेचा विचार केला असता, ती पितृसत्तात्मक अशा रचनेतून उभी असल्याचं दिसतं. धर्माचे साचे बनवत असताना, त्यातही ती प्रकर्षाने डोकावते व लिंगाधारित दुय्यमत्व देणारी संरचना कायम कशी राहील, याचाच विचार या पुरुषप्रधानतेने केल्याचं दिसतं. मग धर्माची वा त्यावर आधारित समाजनियमांची निर्मिती असो, यात ही लिंगविषमताधारित मांडणी केल्याचं दिसतं. पण अलीकडच्या जगभरातील लोकशाही व्यवस्थेच्या निर्मितीमध्ये यात हळूहळू का होईना सामाजिक, कायदेशीर बदल होत असल्याचं सकारात्मक चित्र आहे. तृतीयपंथीय म्हणून माझा समुदाय भारतीय लोकशाहीमध्ये अद्यापही दुय्यम नागरिक आहे. यात संविधानिक तरतुदीचा कुठलाही भाग नाही. परंतु राजकीय सत्तासूत्रं ज्यांच्या हाती आहेत, ते पुरुषसत्ताक आहेत व त्यामुळे संविधानाला अपेक्षित 'व्यक्तीची प्रतिष्ठा' या भूमिकेला समजून न घेतल्यामुळे हा संघर्ष अद्यापही आहे.

भारतीय समाजव्यवस्थेचा विचार करता, आधीच ती प्रचंड गुंतागुंतीची, वर्ण, वर्ग, जाती-पोटजाती अशी आहे व त्यात लिंगाधारित दुय्यमत्व यात ती बाईलादेखील वर्णीय मनोऱ्यात व बीजशुद्धीच्या संकल्पनेत अडकवून शोषण कायम ठेवणारी आहे. मग त्यात तर मी व माझा समुदाय कुठेच बसत नाही, कारण संतती न होऊ शकणाऱ्या बाईलापण इथे किंमत नाही तर मग माझी काय ददात. असली ही व्यवस्था मग कायदा वा सामाजिक चौकटीत केवळ शोषण कायम करणारी आहे. त्यात एकतर देवत्व किंवा दानवत्व देऊन शोषण किंवा मग हिणवणं असं याचं स्वरूप आहे.

२००१ साली सर्वोच्च न्यायालयात नाझ फाउंडेशनने जनहित याचिका दाखल करून, भारतातील तृतीयपंथीय - समलैंगिकांच्या प्रश्नांकडे कायदाप्रणालीचं लक्ष आकर्षित केलं. त्यावर आधारित अशा नालसा प्राधिकरणाची विस्तृत जजमेंट येईपर्यंत भारतातील तृतीयपंथी समुदायाचे सामाजिक, राजकीय हक्क-अधिकारांचे प्रश्न यावर विचार करण्यासाठी २०१४ची वाट पाहावी लागली. त्यावर आधारित तृतीयपंथी हक्क, अधिकार संरक्षण विधेयक अद्यापही त्याच्या कार्यप्रवण होण्याची वाट बघते आहे. ६ सप्टेंबर २०१८ या दिवशी समलैंगिक संबंधांना गुन्हा ठरवणारं कलम ३७७ सर्वोच्च न्यायालयाने रद्द केलं. एलजीबीटी समुदायाला नैसर्गिक कायदेशीर अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य मिळालं. आत्मविश्वास वाढवणाऱ्या या निर्णयाने

आमच्या समुदायाला जणू नवजीवन मिळालं. तो स्वातंत्र्याचा क्षण आम्ही पुरेपूर उपभोगला, साजरा केला. मात्र लादलेला अपराधगंड, सामाजिक भीती व मानसिक दडपण झुगारत, नागरिकत्वावर हक्क सांगण्याचा संघर्ष सुरूच आहे. विविध स्तरांवर माझ्या समुदायाची कोंडी फुटण्याची सुरुवात झाल्याचं दिसू लागलं आहे. गेल्या वर्षभरात देशपातळीवर झालेले अनेक निर्णय, भूमिका एलजीबीटी समुदायाची प्रतिष्ठा आणि स्वीकार वाढवणाऱ्या ठरल्यात. अर्थात, हे घडलं २००१ ते २०१८ या अठरा वर्षांच्या अथक, सातत्याच्या संघर्षातून. या वर्षभरात काय काय विशेष प्रयत्न घडले ते पाहणं म्हणूनच महत्त्वाचं आहे.

मला बऱ्याचदा विचारला जाणारा प्रश्न, 'कायदा बदललाय, पण समाज बदलला का?' माझं उत्तर आहे, समाज बदलेल, त्याच्या बदलाचा वेग कमीच आहे. तो वाढवावा लागेल. येत्या काही वर्षांतच समुदायाचे लोक सामाजिक क्षेत्रापासून ते राजकीय, व्यावसायिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, माध्यमे आणि प्रशासन ते न्यायव्यवस्थेपर्यंत प्रत्येक पदावर नेतृत्व करताना दिसतील याची मला खात्री आहे. मात्र त्यासाठी सामाजिक बदलाला कायदेशीर बदलाचं पाठबळ कायम असणं आवश्यकच.

गेल्या पाच वर्षांपूर्वी मी स्वत:ची तृतीयपंथी ही लैंगिक ओळख सार्वजनिक केली. माझा कार्यकर्त्याचा पिंड मला स्वस्थ बसू देत नव्हता. मी एलजीबीटी समुदायाचा भाग आहे. संवाद-वाचन अशा माध्यमातून समलैंगिकता व त्याच्याशी निगडित बाबी मी समजून घेत होते. दरम्यान मला जाणवलं, की एलजीबीटी समुदायाचा भाग असले तरी मी समुदाय म्हणून मर्यादित राहणार-जगणार आहे. त्यातून बाहेर पडायचं असेल तर मला व माझ्या समुदायाला उपजीविका व इतर कारणांसाठी मुख्य प्रवाहातल्या समाज-समूहात वावरत राहणं भाग आहे. मुख्य प्रवाहातला सर्वसामान्य समाज आणि एलजीबीटी समुदाय यांच्यात 'संवादसेतू' बांधण्याची गरज मला वाटली. मग परिवर्तनवादी चळवळीत काम करणाऱ्या विविध कार्यकर्त्यांशी संपर्क साधला. 'एलजीबीटीक्यू स्क्वेअर' या नावाने ओळखली जाणारी समलिंगी समुदायाची चळवळ व्यापक समाजपरिवर्तनाच्या चळवळीचाच अविभाज्य भाग आहे. ही चळवळ 'ती पहाट उजाडेल स्वप्ननगरीची...' म्हणत आशावादी दृष्टीने शोषणविरहित, समताधिष्ठित समाजाचं स्वप्न पाहत आहे. म्हणूनच परिवर्तनाच्या विविध चळवळी आणि एलजीबीटी यांच्यातील अंतर कमी होण्याची गरज आहे, असं मला वाटलं.

एलजीबीटी घटकांविषयी संवादात्मक चर्चा कशा पद्धतीने होईल यासाठी मग विविध उपक्रम, परिसंवाद, लेखन, संस्थात्मक व व्यक्तिगत पातळीवर कशा पद्धतीने काम करता येईल यासंदर्भात त्या बैठकीमध्ये अतिशय सकारात्मक चर्चा होत आहेत. एलजीबीटी समुदायाचीही चळवळ व्यापक समाजपरिवर्तनाच्या चळवळीचा एक अविभाज्य भाग आहे. आम्ही सगळे सगळ्या मानवी समाजासाठी समताधिष्ठित समाजाचं स्वप्न पाहतो. म्हणून परिवर्तनाच्या विविध चळवळी, जनसामान्य आणि एलजीबीटी यांच्यातलं अंतर कमी होण्याची गरज आहे. या गरजेचं चर्चेत आणि चर्चेचं कृतीत रूपांतर होऊन महाराष्ट्रात सेतू संवादाचा हा प्रकल्प आता प्रभावीपणे आकार घेतोय. येत्या काळात कृती कार्यक्रम घेऊन राज्यभरातल्या ग्रामीण आणि निमशहरी भागात पोचायचं आहे.

याशिवाय बिहार, उत्तर प्रदेश व महाराष्ट्रातदेखील, तसेच काही दक्षिण भारतीय राज्यांमध्ये तृतीयपंथीयांसाठी खास महामंडळाची निर्मिती करणं, त्याद्वारे विविध उपक्रम राबवून त्यांच्या कौशल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न सुरू झाल्याचं दिसतं. शैक्षणिक, सार्वजनिक संस्थांची कागदपत्रं, उपक्रम यांमध्ये 'इतर'च्या ऐवजी 'तृतीयपंथी' शब्द लिहिणंही अनेक राज्यांनी सुरू केलं आहे. कुठल्याही प्रकारे अल्पसंख्याक असलेल्या घटकांसाठी आवश्यक अशा संधी-सोयीसुविधांची उपलब्धता करून देणं शासन-प्रशासन व्यवस्थेचं कर्तव्यच आहे. कलम ३७७ रद्द करण्याच्या प्रक्रियेदरम्यान देशभरात सुरू झालेल्या चर्चा, जनजागृती यामधून समलैंगिक समूहासह या चळवळीतले कार्यकर्ते, विचारवंत या सर्वांचं मनोबल अजूनच भक्कम झालंय, त्यांचा संघर्षासाठीचा हुरूप वाढलाय. गेल्या वर्षभरामध्ये केरळ राज्यात झालेले शैक्षणिक संस्थांमधील एलजीबीटी समूहाचे प्रवेश, बिहारमध्ये तृतीयपंथी समुदायाला शासकीय कोट्यातून मिळणारं आरोग्यविषयक आर्थिक अनुदान या बाबी उल्लेखनीय आहेत. तसेच एलजीबीटी समुदायातील व्यक्तींच्या शैक्षणिक-सामाजिक-आर्थिक स्वावलंबनासाठी वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून चालत असलेले प्रयत्न तर जुनेच आहेत. त्यांच्या प्रयत्नांतून कायदा व सामाजिक संवादाच्या माध्यमातून सामाजिक मनोभूमिका तयार करणं, एलजीबीटी समुदायासाठी भवतालाला अधिकाधिक अनुकूल करणं सुरू आहे. समुदायातल्या ज्येष्ठ कार्यकर्त्या गौरी सावंत असतील, 'वंचित बहुजन आघाडी'च्या प्रवक्ता, कविता व लेखनाद्वारे समुदायाचे प्रश्न मांडणाऱ्या दिशा पिंकी शेख, कविता व जनसंवादातून प्रबोधन करणाऱ्या सारंग पुणेकर, या सगळ्यांचे डोळस प्रयत्न केवळ समुदायच नाही, तर इतरही समाजाची गुणवत्ता वाढवणारे ठरत आहेत.



कृपाली बिडये आणि तिच्या सहकाऱ्यांनी 'अनाम प्रेम' संस्थेच्या माध्यमातून दीर्घकाळापासून चालवलेले प्रयत्न खूप प्रभावी ठरत आलेत. 'ट्रान्स एम्पावर मेला'च्या माध्यमातून 'अनाम प्रेम' दरवर्षी भारतभरातल्या तृतीयपंथीयांना एकत्र आणते. त्यांनी बनवलेल्या अनेकविध वस्तू, उत्पादनांची मेळ्याच्या काळात विक्री होते. समाजाच्या सर्व स्तरांतले लोक मेळ्यात खरेदी करायला येतात. यासोबतच 'फॅमिली मीट इनिशिएटिव्ह' हा संस्थेचा खास उपक्रम. यात तृतीयपंथी व्यक्ती अनेक जनसामान्यांच्या कुटुंबांमध्ये जाऊन राहतात. त्यातून गप्पा, संपर्काचा नैसर्गिक पूल बांधला जातो. तृतीयपंथीयांविषयीचं विकृत कुतूहल जाऊन तिथे मोकळा, निरोगी संवाद प्रस्थापित होतो.

समलैंगिक समुदायाचे प्रश्न, त्यांच्या विवंचना, व्यथा, स्वप्नं मांडणं, त्यांच्या सामाजिक स्वीकृतीसाठीची मनोभूमिका तयार करणं यासाठी चित्रपटासारख्या प्रभावी माध्यमाचाही उपयोग होत असल्याचे काही तुरळक प्रयत्न होताना दिसताहेत. 'एक लडकी को देखा तो ऐसा लगा'सारखा मुख्य धारेतला नामवंत कलावंतांचा चित्रपट, युट्यूबसारख्या माध्यमातून पोचणारे काही लघुपट, काही वेबसीरिजही असे प्रयत्न जाणीवपूर्वक करताना दिसत आहेत. बदलाला सुरुवात झालेली दिसते ती अशा काही उपक्रमांतून. ती आता थांबता कामा नये. तरच सामान्य आणि एलजीबीटीक्यू समुदायातील लोकांमधील दरी आपोआप दूर होईल. 'ट्रान्सव्हिजन' हे तृतीयपंथीयांच्या समस्यांविषयी बोलणारं, तृतीयपंथीयांनीच चालवलेलं भारतातलं पहिलं युट्यूब चॅनल. तिथल्या अँकर अंजली म्हणतात, 'तृतीयपंथीयांविषयी मुख्य प्रवाहातल्या समाजात आजही अज्ञान आणि अंधश्रद्धा घट्ट रुजलेल्या आहेत. त्या दूर झाल्या तर बऱ्याच प्रश्नांची तीव्रता कमी होईल.' समुदायाविषयीची वैज्ञानिक माहिती साध्यासोप्या शब्दांत पुरवणं हे चॅनलचं मुख्य उद्दिष्ट आहे. हे चॅनेल हैद्राबादमधील तृतीयपंथीय मैत्रिणींनी सुरू केलं आहे. अंजलीसोबत जान्हवी राय आणि सोनिया शेख 'ट्रान्सव्हिजन'साठी काम करतात.

निव्वळ कायदेशीर तरतुदी नव्हे तर सामाजिक संवादानेच प्रश्न सुटू शकतात. भारतीय समाजात जात, वर्ग, लिंगवास्तव एकमेकांच्या हातात हात घालून चालतं. समुदायाचे प्रश्न सोडवताना त्या प्रश्नांचा विचार या वास्तवासह झाला पाहिजे. कारण समुदायातील व्यक्तीही विविध स्तरांवर जात-वर्ग वास्तवाची बळी ठरत राहते. शोषणाची प्रक्रिया गावकुसाच्या शेवटच्या माणसापर्यंत झिरपलेली आहे. ही प्रक्रिया शेवटच्या घटकापासून उखडून काढली जात नाही, तोवर शोषण आणि शोषक हा संघर्ष सुरूच राहील. समुदायाला मान्यता मिळण्यासाठी पितृसत्ताक समाजव्यवस्था समूळ नष्ट झाली पाहिजे. कारण ही व्यवस्था सतत सांगत राहते की, केवळ वंश वाढवणारेच संबंध 'नैसर्गिक' असतात. मात्र यात अजिबातच तथ्य नाही.

खरं तर ३७७ सारखे अमानवीय कायदे जगभरात होते, काही ठिकाणी अजूनही आहेत. अनेक देशांमध्ये त्याविरोधात सामाजिक मनोभूमिकेचे निर्माण, राजकीय घडामोडी, कायद्यातील बदल हे सगळं खूप वेगाने झालं. परिणामी त्या-त्या देशातल्या एलजीबीटी समुदायाला त्याचे अधिकार मिळाले. आपल्याकडे एक तर 'विरोधाला विरोध' होतो किंवा आपण प्रत्येक गोष्ट 'निर्मितीक्षम' आहे का हेच जोखत राहतो. लैंगिकता हा प्रत्येक व्यक्तीचा 'कल' आहे, त्यात 'नैसर्गिक, 'अनैसर्गिक', 'विकृत' असं काहीच नाही हे सत्य आता विविध माध्यमांतून सतत सांगितलं गेलं पाहिजे. कागदावरचा कायदा सामाजिक स्तरावर येऊन तो जगण्याचा भाग झाला पाहिजे. माझ्या समुदायाचा कायदेशीर-वैधानिक संघर्ष एका दशकाहून जास्त काळ चालू आहे. आजतागायत 'आपण संख्येने कमी असू, मात्र चुकीचे नक्कीच नाही' या एका तत्त्वावरील अढळ विश्वासानेच हा संघर्ष कायम ठेवता आलाय. तत्त्ववेत्ता विक्टर ह्युगोने म्हटलं आहे, 'नथिंग इज स्ट्राँगर दॅन ॲन आयडिया हुज टाइम हॅज कम.' लैंगिक समानता, वर्गीय, जातीय, धार्मिक समानता, प्रांतिक-भाषिक समानता या गोष्टी हरेक समुदायाला मिळण्याची अनुकूल वेळ संघर्ष करूनच निर्माण करावी लागते. एलजीबीटी समुदाय भारतीय संविधानाच्या 'व्यक्ती प्रतिष्ठा' या सूत्राचा संदर्भ घेत सक्षमपणे उभा आहे. आपला संघर्ष सामाजिक स्तरापर्यंत पोहोचवणं, व्यक्ती व माणूस म्हणून समाजात मानाने जगता येणं यासाठी आम्ही कायम संघर्ष करत असू. द्युती चंद ही भारताची ओळख जागतिक स्तरावर नेलेली धावपटू. तिने ती समलिंगी असल्याचं काही काळापूर्वी सार्वजनिकरीत्या जाहीर केलं. 'सेलिब्रिटी' व्यक्तीचं हे धाडस बदलाच्या प्रक्रियेत उत्प्रेरक बनतं. आणि खात्री देतं की हा लढा आता चालूच राहणार, जोपर्यंत 'माणूस' म्हणून ओळख मिळत नाही तोपर्यंत...



# कहाणी एका तडफदार ट्रान्समॅनची

जयराज कारके
ट्रान्समॅन

माझे नाव जयराज कारके. माझे वय २४ वर्षे आहे. मी एक ट्रान्समॅन आहे. माझे शिक्षण बारावीपर्यंत झाले आहे. ट्रान्समॅन म्हणजे एक व्यक्ती जी स्त्रीच्या शरीरात जन्म घेते, पण त्या व्यक्तीचा आत्मा, भावना, आवड, इच्छा या पुरुषांप्रमाणे असतात. याला वैद्यकीय भाषेमध्ये Gender Dysphoria असे म्हणतात.

मी जन्मत: स्त्रीच्या शरीरात जन्म घेतला. मी एका सामान्य कुटुंबातून आहे. माझे वडील ड्रायव्हर, तर आई घरकाम करते.

माझा जन्म पुणे येथे झाला आहे. वयाच्या ८ ते ९ वर्षाच्या आधीचे दिवस खूप छान गेले. त्या वयापर्यंत मला तेवढी समज नव्हती. जसे मला वाटायचे, आवडायचे तसे मी वागत असे. उदा. जसे इतर मुले खेळतात तसेच मीही गोट्या, क्रिकेट, कबड्डी असे मुलांचे खेळ खेळायचो. मुलीही माझ्या मैत्रिणी होत्या. त्यांच्यासोबत खेळत असताना नेहमी मुलांचा रोल मी प्ले करायचो. वयाच्या ८ ते ९ वर्षापर्यंत या सर्व गोष्टी ठीक होत्या. त्या वेळी मला एवढी समज नव्हती की मी शरीराने एक मुलगी आहे आणि मी मुलींसारखे खेळ खेळले पाहिजे आणि मुलींसारखे राहिले पाहिजे, वागले पाहिजे. मला मोठा भाऊ असल्यामुळे आम्हा दोघांनाही सारखे कपडे खरेदी केले जायचे. मला मुलींचे कपडे आवडत नसत. मी नेहमी मुलांचेच कपडे घालायचो. अशा प्रकारे माझे बालपण गेले.

मी जसे वयात येत गेलो किंवा जसजसा मोठा होत गेलो, तसतसे मला माझ्या आयडेंटिटीविषयी प्रश्न निर्माण व्हायला लागले. माझे शरीर जरी स्त्रीचे असले तरी माझे मन, माझ्या भावना, इच्छा या पूर्णपणे पुरुषांप्रमाणे आहेत हे समजायला लागले. मी इतर मुलींप्रमाणे का नाही असे मला प्रश्न नेहमीच पडत असायचे. इतर मुलींप्रमाणे माझ्यातही शारीरिक बदल झाले, ते बदल मला नको वाटत होते. मुलींची शरीररचना मला नकोशी वाटत होती. जसे इतर मुलींना मुलांचे आकर्षण वाटते तसे माझे नव्हते. माझे उलटे होते. मला मुलींचे आकर्षण वाटायचे. यामुळे मी वेगळा आहे हे मला जाणवू लागले. पण हे असे माझ्या बाबतीत का आहे हे मला तेव्हा कळत नव्हते. या सर्व गोष्टी मी कधीच कोणाला सांगू शकलो नाही. म्हणून मी नेहमी एकटा आणि शांत राहत असे. ज्या वयात आनंदाने जगायचे होते, त्या वयात मी खूप विचार करायचो आणि कोणाला माझ्या या गोष्टीविषयी समजू नये असा प्रयत्न

**जीवनसाथी किंवा लाइफ पार्टनर हा प्रत्येक व्यक्तीला आयुष्यामध्ये हवा असतो. तसाच मलाही जीवनसाथीची गरज आहे. माझ्या आयुष्यातही इतरांसारखीच एक पार्टनर आहे आणि पुढे भविष्यात आम्ही लग्नही करणार आहोत. पार्टनर हा शरीराने किंवा त्याचे जेंडर हे काय आहे किंवा पूर्वी काय होते हे महत्त्वाचे नसून तो आयुष्यभर साथ देणारा आणि प्रेम देणारा असावा असे मला वाटते.**




करायचो. माझे हे वागणे चुकीचे आहे असे मला नेहमी वाटायचे. कारण Gender Dysphoria विषय मला तेव्हा काही माहीत नव्हता. भविष्यात पार्टनर म्हणून कोणी मुलगा माझ्या आयुष्यात असेल असा कधीच विचार तेव्हा मी केला नाही. तेव्हा हे नक्की होते की माझी पार्टनर एक मुलगीच असेल. त्या काळातली ही घुसमट मी कोणालाही सांगू शकत नव्हतो व कधी कोणाला सांगितलीही नाही.

मला पहिल्यापासूनच शाळेची आणि शिक्षणाची खूप आवड होती. माझे शिक्षण पुण्यामध्ये चौथीपर्यंत स्पायसर मराठी स्कूलमध्ये आणि पाचवी ते नववीपर्यंत श्री शिवाजी विद्यामंदिर, औंध येथे झाले. दहावीला मी शाळा ड्रॉप केली, कारण Gender Dysphoria मुळे मी शाळेचा गणवेश घालू शकत नव्हतो व सोबतच माझी आयडेंटिटी नक्की काय आहे या स्वत:विषयीच्या प्रश्नांमुळे शाळेत मन लागत नव्हते. पुढे दहावीची परीक्षा बाहेरून दिली. बारावीपण तशीच बाहेरून परीक्षा देऊन पूर्ण केली. आता अजूनही पुढे शिकण्याची आवड आहे आणि मी पुढे शिकणार आहे.

जेव्हा Gender Dysphoria विषयी माहीत झाले आणि मी एक ट्रान्समॅन आहे हे मला समजले तेव्हा सगळ्यात मोठे आव्हान होते स्वत: स्वत:चा स्वीकार करणे. त्यानंतर कुटुंब, आई-वडील, भाऊ-बहीण आणि इतर आजूबाजूची माणसे यांना कसे सांगणार? ते मुलगा म्हणून माझा स्वीकार करतील का? सगळे माझ्याविषयी काय विचार करतील असे खूप प्रश्न मला होते. मला शरीराने मुलगा होण्यासाठी शस्त्रक्रिया कराव्या लागतील आणि त्याचा खर्च मला झेपणारा नव्हता. शस्त्रक्रिया करायची होती, पण ती कशी? हा प्रश्न होता. पुढे जेव्हा मी Hormone Replacement Therapy चालू केली, त्यानंतर मी माझे गव्हर्मेंट आयडी कार्ड्स; उदाहरणार्थ, पॅन कार्ड, आधार कार्ड यावर नावात व लिंगबदल करून घेतले. त्यानंतर काम मिळवण्यासाठी खूप त्रास झाला, कारण शैक्षणिक कागदपत्रांमध्ये नावात बदल झाला नव्हता व अजूनही त्यामध्ये बदल करण्यासाठी गव्हर्मेंटकडून काही सोयी उपलब्ध नाहीत.

जीवनसाथी किंवा लाइफ पार्टनर हा प्रत्येक व्यक्तीला आयुष्यामध्ये हवा असतो. तसाच मलाही जीवनसाथीची गरज आहे. माझ्या आयुष्यातही इतरांसारखीच एक पार्टनर आहे आणि पुढे भविष्यात आम्ही लग्नही करणार आहोत. पार्टनर हा शरीराने किंवा त्याचे जेंडर हे काय आहे किंवा पूर्वी काय होते हे महत्त्वाचे नसून तो आयुष्यभर साथ देणारा आणि प्रेम देणारा असावा असे मला वाटते.

बहुतेक लोकांना वाटते तसे मलाही घर-संसार असावा असे वाटते. लग्नानंतर एखादे मूल हवे अशा विचाराने, ज्या बाळाला आई-वडिलांचे प्रेम नाही मिळाले त्या बाळाचा सांभाळ करून तसे प्रेम द्यावे असे ठरवले आहे.

तृतीयपंथीयांविषयी जे गैरसमज आहेत ते दूर करून समाजाने त्यांचा स्वीकार करून सन्मानाने वागवावे. आर्थिकदृष्ट्या विचार केला तर समाजाने त्यांचा एक माणूस म्हणून स्वीकार करून त्यांच्या हाताला काम द्यावे. तेव्हाच ते आर्थिकदृष्ट्या सक्षम व सन्मानाने जीवन जगतील. आपल्या समाजात त्यांच्याविषयी अंधश्रद्धाही खूप आहेत. जसे की, ते देवाचे अवतार आहेत. त्यांचा आशीर्वाद घेणे चांगले समजतात. आणि तेच लोक जेव्हा रस्त्यावर दिसतात तेव्हा त्यांना पैसे देऊन पुढे जायला सांगतात. कारण त्यांचा शाप वाईट समजला जातो. तृतीयपंथी लहान मुलांना पळवून नेतात असाही गैरसमज आहे. खरे तर समाजामुळेच त्यांच्यावर पैसे मागण्याची वेळ येते कारण लोक त्यांना काम देत नाहीत.

माझ्या जीवनात माझ्या मित्रपरिवाराची आणि माझ्या पार्टनरची खूप मदत झाली. माझ्या वाईट काळात आणि माझ्या शस्त्रक्रियेच्या वेळेस मला आर्थिक, भावनिक साथ त्यांनी दिली. तिथे घरातील कोणीही लोक माझ्या सपोर्टला नव्हते. तिथे मित्रपरिवार आणि माझी पार्टनर माझ्यासोबत होते. त्यांची साथ असल्यामुळेच मी माझी शस्त्रक्रिया करू शकलो आणि आता आनंदाने जगतो आहे. माझी पार्टनर ही माझ्यासोबत नेहमी

ठामपणे उभी राहिली. सर्व बाजूने आधार व साथ तिने दिली व भविष्यातही साथ देईल याची मला खात्री आहे. या सर्व लोकांच्या आधाराने आणि साथ मिळाल्याने मी त्या कैदखाना वाटणाऱ्या आयुष्यातून बाहेर पडलो आणि सकारात्मक विचारांनी जीवन जगतोय.

मी माझ्या जीवनाकडे खूप सकारात्मक दृष्टीने बघतो. मी लोकांचा व समाजाचा विचार न करता माझे आयुष्य हवे तसे मोकळेपणाने जीवन जगतो. जीवन जगत असताना प्रत्येक व्यक्तीने लिंग, भाषा, वर्ण, धर्म, जात याचा भेदभाव न करता सगळ्यांशी समानतेने वागावे असे माझे मत आहे.

माझे समाजाला एवढेच सांगणे आहे की तुम्ही तृतीयपंथीयांकडे फक्त एक माणूस म्हणून बघा. जसे स्त्री-पुरुष आहेत तसेच तृतीयपंथीयदेखील माणूसच आहेत. माणुसकीच्या नजरेने जर बघाल तर बाकी सर्व प्रश्नच नष्ट होतील. तृतीयपंथी हा आपल्याच समाजाचा एक हिस्सा आहे. त्यांनाही भावना आहेत. त्यामुळे त्यांच्याशी भेदभाव न करता त्यांना बरोबरीच्या अधिकाराने वागवावे असे माझे समाजाला सांगणे आहे.

तसेच तृतीयपंथीयांना माझे हे सांगणे आहे की, समाजाचा विचार न करता आयुष्य हे तुम्हाला हवे तसे जगा. तुमचे आयुष्य आहे, तुम्हालाही समानतेने जगण्याचा अधिकार आहे. शिक्षण आणि स्वत:चे करिअर यावर जास्त लक्ष केंद्रित करा.

सामाजिक जाणिवेतून विचार करून मीही समाजाचा एक हिस्सा आहे आणि माझीही समाजाविषयी काही कर्तव्ये आहेत या भावनेतून जे समाजात निराधार लोक आहेत, त्यांच्यासाठी राहण्याची सोय व शिक्षण, आरोग्य व इतर सर्व सुविधा यांमध्ये शक्य तेवढी मदत करण्याची माझी इच्छा आहे.

मी बार्कलेस कंपनीमध्ये काम करतोय. सध्या माझी ही नवीनच नोकरी आहे. मी एक ट्रान्समॅन आहे हे कळल्यानंतरही त्यांनी मला कामावर रुजू केले. कोणत्याच प्रकारचे भेदभाव (discrimination) कंपनीमध्ये होत नाही. अशाच पद्धतीने इतर कंपन्यांनी आणि समाजातील लोकांनी प्रत्येकाला Gender Equality ने वागवावे असे मला वाटते.

अशा पद्धतीने बऱ्याच चढ-उतारांना सामोरे जात त्या अडचणींवर मात करून मी आनंदाने व स्वच्छंदपणे जगतोय आणि पुढे जात राहीन.



# सन्मानाने जगायला शिका!



**प्रिया पाटील**
ट्रान्सवुमन
*शब्दांकन :* **नीना भेडसगांवकर**

मी प्रिया पाटील, एक सामाजिक कार्यकर्ती. सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करून मी आज स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. वर्तमानपत्रातून माझे फोटो परिचय छापून आले आहेत. माध्यमांनी माझ्या मुलाखती घेतल्या आहेत. हे जरी खरे असले तरी 'तृतीयपंथीय' म्हणून एकेकाळी घराने व समाजाने नाकारलेली, घराबाहेर हाकलून दिलेली, अक्षरशः रस्त्यावर आलेली, हालअपेष्टा सहन करून उपाशीपोटी दिवस कंठणारी व्यक्ती होते. एका चांगल्या घरातले 'मूल' होते.

आजच्या या पदापर्यंत मी कशी आले तो सारा इतिहास मला सांगायचा आहे. तो यासाठी की, माझ्यासारख्या दुःस्थितीत असलेल्या मुलालाही निराश न होता, स्वतःच स्वतःचे भविष्य घडवण्यासाठी प्रेरणा मिळावी.

माझ्या लहानपणाबद्दल सांगायचे झाले तर माझा जन्म १९८७मध्ये विरारला झाला. आई-वडील सुशिक्षित. वडील एका खाजगी कंपनीत नोकरीला होते. आई गृहिणी, माहेरची श्रीमंत घरातली पण माझे वडील नोकरदार. त्यामुळे आम्ही एका चाळीवजा पण चांगल्या घरात राहत होतो. मी विरारच्या 'सुभेदार वाडा' या शाळेत जात होतो.

खरे तर आई-वडील व मी, आमचे चिमुकले घर सुखी असायला काहीच हरकत नव्हती. पण माझ्या आईचा स्वभाव अत्यंत हट्टी व नको इतक्या कडक शिस्तीचा. मी चौथीत असेपर्यंत ती माझा अभ्यास घ्यायची. पण अभ्यासापेक्षा मारणेच जास्त.

एकदा मला आठवतेय, चाळीतल्या मुलांचे ऐकून मी कुणाला तरी शिवी दिली तर पळी तापवून तिने मला डाग दिला. आईच्या स्वभावाचा हा एक भाग; दुसरीकडे आमच्या चाळीतली शेजारच्या बिऱ्हाडातली तिची समवयस्क मैत्रीण, हिला आईने आमच्या घरात मुक्तप्रवेश ठेवला होता. त्या बाईशी तिची मैत्री म्हणजे इतकी पराकोटीची की, मला आणि माझ्या वडिलांना तिच्यापासून भयंकर त्रास होत असे. पण आईला त्याची पर्वा नव्हती. घरातल्या प्रत्येक व्यवहारात त्या बाईची लुडबुड असे.

माझे वडील संध्याकाळी कामावरून घरी आले तरी आमच्या घरातून ती हलत नसे. हळूहळू माझा अभ्यास घेणे हा विषय या बाईंनी स्वतःकडे घेतला. अभ्यास हे नुसते निमित्त. त्यानिमित्ताने मोठमोठ्याने आरडाओरड करून माझा अपमान करून टिंगल करून ती मला मारू लागली. एकदा तर धुण्याच्या काठीने तिने मला बडवून काढले. पण आई ढिम्म. आई हे का सहन करत असेल याचे उत्तर मला तेव्हाही मिळाले नाही व आजही मिळत नाही.

एकदा आई-वडिलांचे या बाईवरून खूप भांडण झाले. तेव्हा आईने वडिलांकडे हट्ट सुरू केला. इथे राहायला नको असेल तर फ्लॅट घ्या. मुंबईत फ्लॅट घेण्याइतके पैसे माझ्या वडिलांकडे नव्हते. आता तिने वडिलांशी वारंवार फ्लॅटचा हट्ट धरला. आणि व्हायचे तेच झाले, एका मध्यरात्री भांडणातूनच माझे वडील घर सोडून निघून गेले. सकाळी उठल्यावर मला हे कळले.

माझ्या जीवनात अंधार दाटला. दुसरीकडे मी चौथीत असताना एक वेगळीच गोष्ट घडली. मला स्वतःलाच असे जाणवू लागले की, माझ्या वर्गातल्या इतर मुलांपेक्षा मी वेगळा आहे. माझ्या सगळ्या हालचाली, बोलणे, चालणे, वागणे मुलींसारखे आहे. यातच वर्गातली मुले मला चिडवू लागली. आजूबाजूच्या लोकांनाही हा मुलगा असून मुलीसारखे वागतो हे विचित्र वाटू लागले.

माझे वय त्या वेळी आठ-नऊ वर्षांचे होते. मुलगा किंवा मुलगी याखेरीज तृतीयपंथी मूल असू शकते आणि ते तुमच्या-आमच्या घरात जन्माला येऊ शकते याची त्या वेळी समाजात कोणाला जाणीवच नव्हती की काय?

वडील घर सोडून गेल्यावर आई माझ्यावरच संतापली. 'तुझा बाप बेजबाबदार होता' म्हणून मला बोल लावू लागली. आणि आता तिने झोपेच्या गोळ्या खायला सुरुवात केली. वास्तविक धुण्याच्या काठीने मला चोपून काढणारी ती शेजारची स्त्री वडिलांना आमच्या

घरात नको होती. आणि आईचा फ्लॅटचा हट्ट पुरवण्याइतके पैसे वडिलांजवळ नव्हते. हे वडिलांच्या जाण्याचे कारण होते.

आजूबाजूच्या लोकांनी मला चिडवणे, डिवचणे, शाळेत मुलांनी टिंगल करणे यामुळे माझ्या आयुष्यातला अंधार वाढत होता. पण त्या सगळ्याकडे दुर्लक्ष करत मी अभ्यास करत होतो. आता मी आठवीत होतो. मार्कही चांगले पडत होते. बहुधा डोक्याने मी हुशार असावा. आणि विरारच्या या शाळेतूनच दहावीची परीक्षा पास व्हायचे मी ठरवले. पण नशिबाची पुन्हा उलथापालथ. माझे वडील घर सोडून गेलेत ते आता येत नाहीत हे पाहिल्यावर आमच्या त्या कुप्रसिद्ध शेजारणीने एक कारस्थान रचून आमच्यावर प्रचंड मोठा आघात केला. माझ्या वडिलांनी विकत घेतलेल्या आमच्या हक्काच्या घराची खोटी कागदपत्रे तयार करून या बाईने कोर्टातून आमचे घर स्वत:च्या नावावर करून घेतले. आता मामाकडे जाण्याशिवाय आम्हाला गत्यंतरच नव्हते. माझ्या मामांनाही आमच्या घरासाठी कोर्ट खटला करायला वेळ नसल्यामुळे ते मला व आईला वसईला त्याच्याकडे घेऊन गेले.

वसईला माझ्या शाळेची ॲडमिशन तिथल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाली. शाळा घरापासून लांब होती. रोज बसने जावे-यावे लागत असे. पुन्हा नवी मुले, नवे लोक. पण टिंगल करून अपमानित करण्याचा अनुभव तोच. टाळ्या वाजवून, छक्का म्हणून माझी टर उडवणारे सगळेच होते.

नैराश्याचे ढग माझ्याभोवती दाटून येऊ लागले. मन हतबल झाले. दु:खाने रडू येई. पण घरात कुणाला कसे काय सांगणार?

शाळेत काही मुलांचे वडील त्यांना न्यायला यायचे. मला वडिलांची खूप आठवण येत होती. त्याभरात मी मामांकडून काकांच्या घरी पळून गेलो. मनात होते वडिलांचा पत्ता त्यांना विचारून घ्यावा. त्यांना फोन करा असे म्हणावे. काकांनी मला ठेवून घेतले. मामांचीही काही हरकत नव्हती. दहावीची परीक्षा मी काकांच्या घरातून पास झालो. आठवीनंतरच्या सेमी इंग्लिश मीडियमची सवय नसूनही मी ६२% नी पास झालो.

२००२ला मी वडिलांचा पत्ता शोधून औरंगाबादला आलो. त्यांच्याकडे दीड महिना राहिलोही. पण माझे शिक्षण पूर्ण करायचे होते म्हणून वसईला परत आलो मामांकडे.

तिथे मला वर्तक कॉमर्स कॉलेजला ॲडमिशन मिळाली.

नव्या कॉलेजमध्येतरी या मुलाचे दु:ख, अडचण समजून घेण्याची मानसिकता कशी असणार? अर्थातच इथेही त्यांच्याकडून होणाऱ्या अपमानाचे लक्ष्य झालोच. मनातून अभ्यासाची ओढ होती. पण आजूबाजूच्या वातावरणामुळे अभ्यासाकडे लक्ष लागेना.

आता दिवसेंदिवस स्त्रीपणाकडे झुकणारे माझ्यातील बदलही खूप होत होते. पण मीही कोणाला सांगू शकत नव्हतो. खूप अस्वस्थ झालो. माझ्यातल्या स्त्रीसुलभ भावना मी जेवढ्या दडपून टाकत होतो तेवढ्या त्या उफाळून येत होत्या.

ममतेने डोक्यावर हात फिरवून 'बाबा तुला काही प्रॉब्लेम आहे का?' असे विचारणारे कोणीच नव्हते. आता मी मुलांऐवजी मुलींमध्येच वावरू लागलो. त्यांच्यासारखेच कपडे घालावे, मेकअप करावा असे अगदी आतून वाटत होते. मग मी कॉलेजच्या नावावर विनातिकीट इकडून तिकडे नुसता हिंडू लागलो. दोन महिने कॉलेजला गेलोच नाही आणि मग...

शाळेतून रिपोर्टकार्ड घरी आले. सहीसाठी ते आईकडे घेऊन जायची प्रचंड भीती वाटली म्हणून त्यावर खाडाखोड केली. ते पाहून तिने मला प्रचंड मारले. 'इथून कायमचा जा. परत कधीही तोंड दाखवू नकोस' म्हणून दरवाजा बंद करून घेतला. कोण जाणे हा राग कशाचा होता, की माझ्या अशा तृतीयपंथी दिसण्याचा होता.

बंद झालेल्या दारापुढून निघालो पण जाणार कुठे. चार दिवस बिल्डिंगच्या गच्चीवर, जिन्यात उपाशी राहून दिवस काढले. चार दिवसानंतर रडतखडत स्टेशन गाठले आणि विनातिकिट कशीतरी मुंबई गाठली. राहायचे कुठे, खायचे काय हे भलेमोठे प्रश्नचिन्ह जणू मलाच गिळू बघत होते. पण जिद्दीने माणूस वेडा वाकडा का होईना मार्ग काढतो. मग मी सुरत शटलमध्ये गाडीतच लपूनछपून मुक्काम केला. कुणी काही दिले तर खायचे आणि गाडीतच झोपायचे असे काही दिवस काढले. एकदा टी.सी.ने पकडले पण माझी अवस्था पाहून सोडून दिले. आणि त्यानंतर एका महाभयानक अनुभवाला मला तोंड द्यावे लागले.

एकदा भुकेने पोटात डोंब उसळला होता. एक माणूस मला काही खायला देईल असे वाटल्यावरून त्याच्याकडे खायला मागितले. त्याने खायला देतो म्हणून त्याच्या घरी नेले. त्याच्या घरी कोणीच नव्हते. त्याने रात्रभर माझा फायदा घेतला आणि सकाळी एक वडापाव मला दिला. त्या एका वडापावच्या बदल्यात माझे अख्खे शरीर मला वेदनेतून पणाला लावावे लागले. तेव्हापासून जग काय आहे त्याची मला कल्पना आली! त्यानंतर अत्यंत दीनवाण्या परिस्थितीत दिवस ढकलत होतो. जवळ ना छदाम. फक्त अंगावरचे कपडे होते. कल्याण स्टेशनवर पाण्याचा पाईप फुटला होता त्यात दुपारच्या वेळी अंघोळ करायची. अंगावरचे धुऊन वाळत टाकलेले कपडे थोडे सुकेपर्यंत उघडे-नागडे बसून राहायचे. असे दिवस रेटत असताना एकदा विरार स्टेशनवर चालत्या गाडीतून प्लॅटफॉर्मवर पडलो. फरशीवर वेगाने आदळलो. डाव्या पायाला मोठी जखम झाली. तिला ना औषध ना पाणी. ती जखम पँटला चिकटायची. ती चिघळून तिथे पॉयझन झाले. शेवटी किडे पडले. दुर्गंधी सुटली. चालता येत नव्हते. जखम ठणकत होती.

शेवटी हिंमत करून मामाच्या ऑफिसमध्ये गेलो. त्यांनी

वसईच्या एका हॉस्पिटलमध्ये मला दाखल केले. दहा-बारा दिवसांनी बरा झाल्यावर मामा आला. त्यांनी मला आईची माफी मागून घरी राहायला सांगितले. मी गेलो पण आईने मला स्वीकारले नाही. मामाचा नाइलाज झाला. पण मग त्यांनी मला वसईच्या एका ख्रिश्चन आश्रमात दाखल केले. त्या आश्रमाचा तो ट्रस्टी होता.

आता माझे आश्रमातले आयुष्य सुरू झाले. तिथे नुसते न राहता तिथल्या लहान मुलांचा मी अभ्यास घेऊ लागलो. पण कुत्र्याचे शेपूट वाकडे म्हणतात तसेच या समाजाचे आहे. आश्रमवासीयांनीही मला डिवचून डिवचून हैराण केले.

रोज रात्री मला खोटी आशा वाटत असे की, पश्चात्ताप होऊन आई माझ्या चौकशीला येईल. पण ते झाले नाही. मला काही सुचायचे नाही आणि अशाच अस्वस्थ अवस्थेत मी आश्रमातूनही संधी साधून पळ काढला.

ठाणे स्टेशनला आलो. तिथे जुन्या दिनक्रमाप्रमाणे राहत असताना काही तृतीयपंथी लोकांशी माझी ओळख झाली. विशेष गोष्ट अशी त्या लोकांनी मला जवळ केले. माझी प्रेमाने चौकशी केली. मला ते रोज खायला-प्यायलाही देत होते. त्यांच्यातल्या एका 'लाची' नावाच्या स्त्रीने अत्यंत मायेने माझ्या डोक्यावरून हात फिरवला. जगात माझी प्रेमाने चौकशी करणारी ही एकमेव वात्सल्यमूर्ती! आज ती स्त्री हयात नाही.

या सगळ्या तृतीयपंथीयांनी मला प्रेमाने सामावून घेतले. त्यांच्याप्रमाणे 'स्त्री'चा पोषाख त्यांनी मला घालायला दिला. मेकअपही केला. हे सारे केल्यावर जणू माझ्यातली मी मला सापडल्याचे समाधान मिळाले. चार-पाच महिने मैत्रिणींनी मला बसून खायला दिले. त्यानंतर मात्र मी त्यांच्याबरोबर कामाला म्हणजे 'मंगतीला' जाणे, लग्न, बारसे इत्यादी ठिकाणी बधाई, बस्तीला जाणे हे काम सुरू केले.

पण माझ्यावरची संकटे अद्याप संपली नव्हती. एकदा एका होळीच्या दिवशी अचानक दहा-बारा बाहेरचे लोक आले आणि त्यांनी माझ्यावर जबरदस्ती केली. मी बेशुद्ध पडले. माझ्या कोण्या परिचिताने मला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. तिथून बरी होऊन बाहेर पडताना मात्र मी मनाशी निश्चय केला की, 'बस् झालं आता हे आयुष्य, आपण शिक्षण घेऊन चांगलं आयुष्य जगायचं!'

पण शिक्षण घ्यायला पैसा कुठून आणणार? मी दहावी पास होते. कुठलेही शिक्षण घ्यायचे तरी पुस्तके , फॉर्म या गोष्टीसाठी तरी पैसा लागेल.

मला डान्स चांगला करता येत असे. त्या बळावर काही महिने डान्सबारमध्ये काम करून थोडे पैसे गाठीशी बांधले आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून बारावीची परीक्षा देण्यासाठी मी तयारी सुरू केली. बारावी आर्ट्सची परीक्षा पास केली. त्या




मार्कशीटमुळे मला 'किन्नर' या सामाजिक संस्थेत व्यवस्थापनाचे काम मिळाले. मी मनापासून काम करू लागले.

तृतीयपंथीयांच्या मागण्या, त्यांच्या आरोग्यविषयक समस्या, त्यांच्यासाठी आश्रमव्यवस्था इत्यादीच्या मंजुरीसाठीच्या कामात माझा सहभाग होता. इथूनच मला शिक्षणाची आणखी एक संधी मिळाली. 'निर्मला निकेतन कॉलेज ऑफ सोशल वर्क' या कॉलेजमधून समाजकार्याचा पॅराप्रोफेशनल हा सहा महिन्यांचा कोर्स मला करता आला.

हा कोर्स झाल्यावर मी कौन्सिलिंगचाही कोर्स पूर्ण केला. त्यामुळे 'प्रोफेशन' म्हणून सोशल फिल्डमध्ये हे काम मी चांगल्या प्रकारे करू लागले.

या काळात आम्ही काही जणांनी आमच्या 'तृतीयपंथी कम्युनिटी'साठी जनजागृतीचा एक कार्यक्रम एसएनडीटी कॉलेजला केला. एसएनडीटी ही गेल्या १०५ वर्षांहून अधिक काळ महिला शिक्षणाचे काम करणारी संस्था. आमचा कार्यक्रम पाहिल्यावर त्यांना तो इतका आवडला, पटला की, एसएनडीटीने जी.आर. (गव्हर्नमेंट रिझोल्यूशन) मिळवून तृतीयपंथीयांना कॉलेजमध्ये ॲडमिशनची परवानगी दिली आणि मला सांगायला आनंद व अभिमान वाटतो की, या कॉलेजची मी पहिली तृतीयपंथीय विद्यार्थिनी ठरले. प्रवेश परीक्षा देऊन मी एफ.वाय.चे वर्ष पूर्ण केले व पॉलिटिकल सायन्स व सायकॉलॉजी हे विषय घेऊन मी या कॉलेजमधून माझे पदवीचे शिक्षण पूर्ण करणार आहे. शिवाय दुसऱ्या बाजूने मी कॉम्प्युटरचेही काही कोर्स करत आहे.

हे सगळे करत असताना माझ्या असे लक्षात आले की एकट्या-दुकट्याने सामाजिक काम करण्याला खूप मर्यादा पडतील. राजकीय क्षेत्राच्या माध्यमातून हे काम अधिक प्रमाणावर करता येईल. शिवाय आमच्या कम्युनिटीच्या समस्या शासनापर्यंत नेता येतील. त्यामुळे सध्या मी एका राजकीय पक्षातून काम करते आहे.

२०१७ मध्ये मी महानगरपालिकेची निवडणूकही लढवली आहे. त्या वेळी मी 'अपक्ष' म्हणून आणि सर्वच गोष्टींसाठी नवीन असल्यामुळे निवडून येऊ शकले नाही, तरी मला खूप गोष्टी शिकता

आल्या. अनुभवाचे धन मिळाले. ही निवडणूक लढवणारी मी पहिली तृतीयपंथीय स्त्री होते.

निवडणुकीच्या निमित्ताने नॉमिनी फॉर्म भरणे, तहसीलदाराकडून आवश्यक ती कागदपत्रे मिळवणे, बीएमसीच्या ऑफिसमध्ये जाऊन माहिती घेणे, पोलिसांकडून नॉनक्रिमिनल दाखला मिळवणे, शौचालयाचा दाखला, मी सरकारी नोकर नसल्याचे सर्टिफिकेट अशी अनेक कागदपत्रे मिळवण्यासाठी त्या त्या कचेऱ्या शोधून काढून अधिकारी लोकांकडून केवळ ४-८ दिवसांच्या मुदतीत कामे करून घेणे, हे सर्व मी एकटीने कसे केले याचे माझे मलाच आश्चर्य वाटते. सर्व कचेऱ्यांतून तासन्‌तास थांबून शेवटी हवी ती कागदपत्रे मिळवणे या सगळ्यासाठीची धडपड मला माहीत झाली.

आणि अखेर अडचण अशी की सगळी फाईल शेवटावर आली आणि मी 'स्त्री' की 'पुरुष' या मुद्द्यावर अधिकारी गाडी अडवत होते. स्त्रियांना असलेली डिपॉझिटची सवलत मला मिळायला हवी होती. पण मला पुरुषांना भरावे लागते तेवढेच डिपॉझिट भरावे लागले. वास्तविक लिंग ओळख म्हणून 'स्त्री'-'पुरुष' किंवा 'अन्य' असे तीन भाग कायद्यात आहेत. रेल्वे रिझर्वेशनमध्येसुद्धा ते आहेत. पण या कायदेशीर गोष्टी मान्य झाल्या पाहिजेत ही आमची मागणी आहे.

एकूणच देशात जेव्हा 'तृतीयपंथीय' समुदाय म्हणून कायदेशीर बाबींचा मुद्दा येतो तेव्हा या समुदायाला वेळोवेळी संघर्षाला तोंड द्यावे लागते. समाजाच्या मुख्य प्रवाहात सर्वांसारखा एक माणूस म्हणून आमची गणना केव्हा होणार? त्यासाठीच मला काम करायचे आहे. अर्थात सर्वच सामाजिक समस्यांविषयीही काम करायचे आहे.

या निवडणुकीच्या निमित्ताने 'मीडियाने' मला चांगला प्रतिसाद दिला. तृतीयपंथी व्यक्ती निवडणूक लढू शकते हे लोकांना कळाले. 'प्रिया पाटील' म्हणून मला ओळख मिळाली. अमेरिकन एमबसीनेही माझी दखल घेतली आणि 'आयकॉन ऑफ करेज' हे ॲवॉर्डही मला दिले!

मुलाखतीत वैयक्तिक आयुष्याबद्दल विचारताना मला एक प्रश्न असतो. 'तुम्हाला जोडीदार, मूल दत्तक घेऊन कुटुंब करून राहणं याबद्दल काय वाटतं?' पण या प्रश्नाचे माझ्यापुरते उत्तर माझ्या बहिणींपेक्षा थोडे निराळे आहे की, या गोष्टीची मला जरूर वाटत नाही. कारण लहानपणापासून मला 'एकटेपणाची' सवय आहे; आणि 'चाणक्य' म्हणतो त्याप्रमाणे 'तुम्हाला जेव्हा एखादे मोठे ध्येय साध्य करायचे असेल तेव्हा वाटेतल्या छोट्या गोष्टींचे मोह तुम्हाला वगळता आले पाहिजेत.'

एक समाजसेवक म्हणून 'माझ्या समाजासाठी' माझा काय संदेश असेल असे विचारले जाते तेव्हा मी सांगते, 'सर्वांनाच समाजकार्य झेपेल किंवा आवडेल असे नाही. पण तुम्ही एवढे मात्र जरूर करा, परंपरेने आलेले जीवन – भिक्षा मागून जगणे ते तुम्ही करू नका. कष्ट करून पोट भरा.' समाजानेही एक सर्वसामान्य व्यक्ती म्हणून आम्हाला काम दिले पाहिजे. मुळात शिक्षण घ्या. सर्वांना शाळा-कॉलेजचे शिक्षण जमणार नाही पण शाळेत न जाताही एखादे व्यावसायिक शिक्षण, पाहून पाहून शिकून घ्या. कोणत्याही कामातले कौशल्य शिका आणि काम करून पोट भरा. सन्मानाने जगायला शिका.

काळाप्रमाणे स्वत:त बदल करायला शिका. तसेच पैसे मिळाल्यावर वृद्धापकाळासाठी चार पैसे शिल्लक ठेवा. नाहीतर कोणी विचारत नाही. शासनाकडून आपल्या कम्युनिटीसाठी काही मदत, रोजगार योजना येतीलही. त्यासाठी माझ्यासारखे कार्यकर्ते प्रयत्न करीतच आहेत. पण त्यावर अवलंबून राहून चालणार नाही.

'कष्ट' किंवा 'कौशल्य' या मार्गाने पैसे मिळवणे याला पर्याय नाही. आपल्या कम्युनिटीत व्यवसाय करणारे एक टक्कासुद्धा लोक नाहीत. स्वत:चा काही छोटा व्यवसाय करायचा प्रयत्न करा. स्वातंत्र्य मिळून आज ७० वर्षे झाली, पण 'किन्नर' किंवा 'हिजडा' समाजातील लोक स्वावलंबी व्हावेत असा प्रयत्न आजवर कोणीच केला नाही. लग्नात किंवा मुलाचे नाव ठेवताना शकून म्हणून आशीर्वादाला फक्त समाजाला आमची आठवण होते. पण एरवी जगण्यासाठी, पोट भरण्यासाठी आम्हाला काय संघर्ष करावा लागतो हे कोणाला कळत नाही. आम्हाला काम द्यावे, समाजात सामावून घ्यावे यासाठी आता आपणच प्रयत्न करायला हवेत. हळूहळू समाजमनातसुद्धा ही सुधारणा होईल अशी मला आशा नव्हे, खात्रीही आहे. पण आज आमच्या समुदायासाठी संघर्षाचाच काळ आहे, हे खरे.

'चांगुलपणाच्या चळवळी'ने आमची नोंद घेतली, आमच्या समस्या, आमचे जीवन समाजासमोर येण्यासाठी स्वतंत्र दिवाळी अंक काढला हे खूप महत्त्वाचे आहे. त्यासाठी आदरणीय ज्ञानेश्वरजी मुळे आणि त्यांचे सर्व सहकारी यांचे मी आमच्या कम्युनिटीच्या वतीने आभार मानते व सर्व वंचित समाजाला या चळवळीचा फायदा होवो, ही चळवळ जगभर पसरो अशी मी त्यांना शुभेच्छा देते.

यापुढे जाऊन चळवळीने आम्हाला समाजाच्या मुख्य प्रवाहात घेण्यासाठी सातत्याने विचार मांडावेत अशी मी चळवळीला नम्र विनंती करते व चळवळीच्या कामात आमचाही सहभाग राहील असे कम्युनिटीच्या वतीने वचन देते.

धन्यवाद!

जय महाराष्ट्र, जय भारत!



# आस प्रेमाची – ओढ आयुष्यभराच्या सोबतीची

**सोनाली दळवी**
ट्रान्सवुमन
*शब्दांकन* : सूरज राऊत

*"आयुष्याच्या या वाटेवर*
*कोणीतरी सोबती मलाही असावा*
*सर्वांसमोर त्याने अभिमानाने*
*माझ्या हातात हात घालावा."*

या वरच्या ओळीतून लक्षात आलेच असेल की मला अशा एका साथीदाराची गरज आहे ज्याला माझा तिरस्कार नसावा आणि मी त्याच्यासोबत असल्याचा अभिमान असावा. पण जशा या ओळी मी खूप सोप्या पद्धतीने लिहू शकले तेवढे सोप्या प्रकारे मला माझा साथीदार कधीच मिळणार नाही. माझ्या बोलण्यातून तुम्हाला वाटत असेल की मी एक स्त्री किंवा मुलगी असावी, पण तुम्हाला मी सांगू इच्छिते की हे असे काही नाहीये, मी माझी ओळख एक तृतीयपंथी म्हणून सांगते. मनापासून मला नेहमी स्त्री म्हणून ओळख मिळावी असे वाटते. पण शेवटी मनासारखेच झाले तर ते आयुष्य कसले? तृतीयपंथी नावातच सर्व काही, 'ना पुरुष ना स्त्री'. हिजडा शब्दाचा अर्थ असा आहे की नित्यक्रमापासून दूर 'Departure', पण या शब्दाला मी नेहमी शिवी म्हणूनच ऐकले आहे.

मी सोनाली दळवी – एक तृतीयपंथी समाजसेविका. माझा जन्म पुण्यात कसबा पेठेत झाला आणि आयुष्याचा वेगळा प्रवास अगदी लहान वयातच सुरू झाला असे म्हणायला काही हरकत नाही. लहान असताना कधीही क्रिकेट खेळायला आवडले नाही. नेहमीच भातुकली जवळची वाटायची. शाळेत जातानाही शर्ट कधीही आवडले नाहीत. नेहमी झगाच घालावासा वाटला. शाळेत नेहमीच माझ्या वागण्यामुळे मुलेमुली मला चिडवायची आणि शिक्षक घरी तक्रार करायचे. मी घरातला मोठा मुलगा आहे, असे सांगून कसे वागावे हे सांगण्यासाठी घरात नेहमीच वेगळी शाळा भरायची. पण त्या शाळेचा माझ्यावर काही परिणाम होईल असे कधीही वाटले नाही. मी मला जसे वाटायचे तसेच वागायचे. घरी कोणी नसताना आईची साडी नेसायचे, बांगड्या घालायचे, मस्त नटून बसायचे तेव्हा कुठे पूर्ण झाल्यासारखे वाटायचे. पण काही तासांपुरतेच. काही वेळा तर मी अशा अवतारात पकडली गेली आहे. त्यानंतर आईचा मार, बाबांचा मार, बाकीच्यांच्या शिव्या तर लोकांचा हशा असे सगळे सहन करावे लागले.

एकदा माझे मामा-मामी घरी आले होते आणि त्यांनी मला काहीतरी करून दाखवायला सांगितले. मी आतल्या खोलीत गेले, आईची ओढणी घेतली, बहिणीची लिपस्टिक लावली आणि त्यांच्यासमोर नाचू लागले. आई स्वयंपाकघरात होती, पण मामा-मामीच्या जोरजोराच्या हसण्याने ती बाहेर आली. पाहते, तर मी अगदी बिनधास्तपणे नाचत होते. मला कशाचेच भान नव्हते. इतकी प्रशंसा मला कधीच मिळाली नव्हती. माझे बालमन त्यांच्या हसण्याला प्रशंसा समजत होते आणि त्यामुळे मी आणखी स्फूर्तीने नाचायला लागले. अर्थातच नंतर मी आईचा आणि रात्री बाबांचा मार खाल्ला.

मी बारा वर्षांची असताना माझी आई वारली. हिंदू रीतिरिवाजाने तिची चिता पुण्याच्या वैकुंठधाममध्ये जाळली जात होती, तेव्हा मनात विचार आला की जाऊन त्या चितेवर बसावे आणि स्वत:चे आयुष्य संपवावे. कारण मी स्वत: कोण होते, कोणीच नाही. काही अस्तित्वच नव्हते माझे. जेव्हा आपण कुठेही फॉर्म भरतो तेव्हा तिथे आपले लिंग निवडावे लागते. पण मी लहान असताना काय, अगदी २०१४ पर्यंत, सगळीकडे स्त्री आणि पुरुष एवढेच पर्याय असायचे. आता तिसरा पर्याय उपलब्ध आहे.

लहानपणी आई गेल्यावर स्वत:ला संपवूनच टाकावे हीच इच्छा माझ्या मनात येत असायची. नेहमी असे वाटायचे की माझे असे असल्यामुळेच माझी आई मला सोडून गेली आहे. मी असे असण्यानेच माझे बाबा समाजात मान खाली करून जगतात. माझे असे असण्यामुळे माझ्या बहिणीचे लग्न होणार नाही. असे असंख्य प्रश्न माझ्या मनात यायचे. पण मागे वळून बघताना आणि हे सर्व आठवताना आता असे वाटते की जर मी तेव्हाच जीव दिला असता तर तो एका हिजड्याचा मृत्यू झाला नसता, तर तो मृत्यू असता माझ्या स्वप्नांचा आणि आयुष्य आपल्याला हवे तसे जगणाऱ्या व्यक्तीचा.

स्वत:ला आहोत तसे स्वीकारून पुढे जायचे. मीही स्वत:ला स्वीकारले आणि पुढे जात राहिले. याच आयुष्यात मला साथ लाभली ती माझ्या सावत्र आईची. आत्तापर्यंत हिंदी, मराठी सिनेमांमध्ये सावत्र आईला खूप खडूस कट-कारस्थानी दाखवले आहे. म्हणून मला नेहमी असेच वाटायचे की सावत्र आई तशीच असते. पण माझ्या बाबतीत तसे काही घडले नाही. मला माझ्या आईने हिंमत दिली. ज्या नाचामुळे मला आयुष्यात मारहाण झाली होती, ती कलाकृती मी जोपासली. बघता बघता मी आठवीत असताना डान्स क्लास सुरू केला. त्या पैशातून पुढे जाऊन मी डिग्री मिळवली. त्यानंतर एमबीएपर्यंत अभ्यास केला. आता मी HRLN (Human Rights Law Network) मध्ये कार्यरत आहे. मला सांगायला आनंद होतोय की मी एक TEDx स्पीकर आहे. तृतीयपंथीयांना घेऊन मला अनेक उपक्रम राबवता आले याचा मला विशेष अभिमान आहे. गणेशोत्सवाच्या काळात पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ गणपतीची पूजा तृतीयपंथीयांच्या हस्ते करण्याचा उपक्रम मी दरवर्षी राबवते ज्यायोगे समाजाच्या मुख्य प्रवाहात तृतीयपंथीयांना आणण्याकरता एक सकारात्मक, प्रभावी पाऊल मी समजते. पुण्यातील बंगाली असोसिएशनच्या दुर्गापूजेच्या दसऱ्याच्या दिवशी होणाऱ्या 'सिंदूर खेला' या कार्यक्रमात मी तृतीयपंथींना सहभागी होण्याकरता एकत्र आणते. २०१९ साली पुण्यातील नारायण पेठ येथील रमणबाग शाळेत मी ट्रान्सजेंडर मॅरेथॉन आयोजित केली होती. १०० ट्रान्सजेंडर यात सहभागी झाले होते. स्त्री-पुरुष, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक असे सर्व मिळून ५००० लोक ह्या कार्यक्रमात प्रेक्षक म्हणून उपस्थित होते.

आम्ही दरवर्षी 'संक्रांतीचं हळदी-कुंकू' हा समारंभ तृतीयपंथीयांना घेऊन मोठ्या थाटामाटात साजरा करतो. दरवर्षी महिला दिनाच्या दिवशी मी इतर सर्व माझ्या तृतीयपंथी मैत्रिणींना बरोबर घेऊन सफाई कामगार महिला, बस कंडक्टर महिला यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार समारंभ आयोजित करते. कोरोना महामारीच्या काळात मी अनेक नामवंत एनजीओच्या साहाय्याने गेल्या दोन वर्षांत अनेक तृतीयपंथीयांना रेशन वाटप, आरोग्य किट वाटप केले.

मी अजून एक उत्साहवर्धक, अभिनव उपक्रम राबवला. दिनांक २५ ऑगस्ट २०२१ रोजी मी पुण्यनगरीमध्ये प्रथमच सर्व तृतीयपंथीयांना घेऊन मंगळागौर साजरी केली. यथासांग पूजा, झिम्मा, फुगडी, इतर मंगळागौरीचे खेळ असा अविस्मरणीय कार्यक्रम केला. नखशिखांत नटूनथटून आलेल्या तृतीयपंथीयांच्या चेहऱ्यावरचा आनंद मी माझ्या हृदयात जपून ठेवला आहे. MIST ह्या संस्थेची मी अध्यक्षा आहे. अशा पद्धतीने मी माझे एक सुंदर विश्व निर्माण केले आहे.

माझा हा प्रवास अगदी जगजाहीर आहे. पण मी आता माझ्या आयुष्याचा, अगदी माझ्या मते गरजेचा आहे अशा विषयाला हात घालणार आहे, तो म्हणजे 'प्रेम'.

प्रेम या अडीच अक्षरी शब्दात आयुष्याचे सर्वस्व आहे असे मला वाटते. लहान असताना घरच्यांच्या प्रेमाला मी मुकले, समाजाचे प्रेम मिळाले नाही. नंतर आईचे प्रेम मिळाले, घरच्यांनी स्वीकारले आता तर समाजात खूप मानतात मला. मोठमोठ्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलावतात. हे सर्व बघून असे म्हणावेसे वाटते की ग्रह कधीही फिरू शकतात. ज्या पुण्याच्या मोठ्या शॉपिंग मॉलमध्ये जाण्यासाठी परवानगी नाकारली, त्याच शॉपिंग मॉलमध्ये मोठ्या कार्यक्रमात पाहुणी म्हणून मी जाते. पण ह्या सगळ्यात काहीतरी कमी राहिल्यासारखे वाटते. एका प्रियकराची कमी वाटते या सगळ्यात. मला नेहमी असे वाटते की सिनेमामध्ये जसा हिरो येऊन त्या नटीला पळवून घेऊन जातो तसे माझ्या आयुष्यात घडावे. काही नगण्य इच्छा आहेत माझ्या प्रियकराकडून, जसे की त्याने मला म्हणावे, 'सोनाली, तू सुंदर आहेस आणि फक्त माझी आहेस.' माझा प्रियकर मला समजून घेईल, माझ्या पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहित करेल.

मला श्रीदेवी लहानपणापासून खूपच आवडते. मी शाळेत असतानाही तिच्या गाण्यावर डान्स केला आहे. तिची भरपूर गाणी मला प्रियकराची कमी भासवून देतात. 'तेरे मेरे होठों पे

मीठे मीठे गीत मितवा, आगे आगे चले हम...' या गाण्यामध्ये जसे ऋषी कपूर श्रीदेवीच्या गळ्यात हात घालून चालत असतो, तिच्यासोबत नाचत असतो, अगदी तसेच काहीसे मला पाहिजे आहे. त्यात श्रीदेवीने नेसलेली गुलाबी साडी अगदी वेड लावून जाते. मी हिंदी गाण्यांची आणि सिनेमांची चाहती आहे. त्यातल्या त्यात मला ए.आर. रेहमान वेड लावून जातात. त्यांचे 'इश्क बिना क्या मरना यारा, इश्क बिना क्या जीना' यामुळे अजूनच जास्त प्रियकर शोधण्याची गरज वाटते.

आम्ही सोबत फिरायला कुठेतरी जावे... प्रियकरासोबत एक चहाचा कप हातात घेऊन तासन्तास गप्पा माराव्यात, पावसात भिजत असताना रस्त्याच्या कडेला कांदाभजी खावीत, लांबच्या प्रवासात त्याला घट्ट मिठी मारून बसावे, त्याच्या डोळ्यांत डोळे घालून एकमेकांकडे बघत राहावे, त्याचा हात हातात घट्ट पकडून ठेवावा, त्याच्यासाठी कधीतरी स्वयंपाक करावा, त्याने कधीतरी सकाळी कॉफीचा कप घेऊन मला उठवावे... कधीतरी पावसात त्याच्यासोबत बागडावे... अंघोळ करून आल्यानंतर माझ्या डोक्यावरचे पाणी त्याच्या तोंडावर उडवावे... किती छोट्या आणि सामान्य इच्छा आहेत माझ्या.



प्रेमात romanticism तर येतोच. पण खऱ्या प्रेमात गरज असते ती एकमेकांवर विश्वास असण्याची, एकमेकांच्या सुखदु:खात सोबत असण्याची, एकमेकांच्या आनंदात सहभागी होण्याची. अशीच निकड मलाही भासत असते. आणि माझ्या मते आपण दररोज नव्याने आपल्या प्रियकराच्या प्रेमात पडले पाहिजे म्हणजे प्रेम अजून बहरत राहते, फुलत राहते. खरेच आयुष्यात कोणी असा भेटेल का, जो अभिमानाने माझा हात या समाजासमोर पकडेल आणि प्रेमाने मला त्याच्या कुशीत घेईल?


दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!



सौ. सुमन साळी महिला व बालविकास संस्था, सांगली.

ध. आ. मु. सा. वि. ५० म • नोंदणी क्र. महा. ९३५५ सांगली

निराधार, गरीब, गरजू परित्यक्ता महिला व बालकांच्या विकासासाठी

(कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य)

सेक्रटरी
प्रेमलता वसंतराव साळी
महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा,
आखिल भारतीय ओबीसी महासभा
मो. ८३२९७५६७२०





अध्यक्षा
प्रतिभा प्रदीप शिंगारे
विश्वस्त,
डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन
मो. ८८९८७५०५५०

# अनहोनी प्रकृती

## भोपाल, मध्यप्रदेश के एक थर्ड जेंडर की कहानी




**सुश्री. संजना सिंह राजपूत**
ट्रान्सवुमन
*शब्दांकन* : श्री. अविनाश बनसोडे

मेरा थर्ड जेंडर होना यह एक कटु वास्तविक सत्य है, मैं भी इसी समाज क एक अभिन्न अंग हूँ, और इसी के साथ मैंने सुविधा के लिए मेरा पुराना नाम बदल दिया है। मेरी मध्यप्रदेश में अब आदरयुक्त नई पहचान बन गई है और मैं अब इसी नाम से लोकप्रिय हूँ, इस कारणवश भी यह नाम मुझे पसंद है। मुझे इसी नाम से सम्मान और गौरव मिला है और वह नाम है सुश्री. संजना सिंह। मेरी कहानी भोपाल शहर से शुरू होती है। मेरा जन्म १९८३ वर्ष में एक क्षत्रिय और मध्यम परिवार में हुआ था । मेरे पिता मध्यप्रदेश के पुलिस विभाग के सेवा में कार्यरत थे। वे काफी अच्छे इंसान थे. और हम एक खुशहाल ज़िंदगी बीता रहे थे। जब मैं १०-११ साल उम्र की थी तब अचानक पिता का साया सर से उठ गया। इस घटना ने हमारे घर को बड़ी क्षति पहुंची और इससे हमारे घर को उजाड दिया था। अब घर चलाने की जिम्मेदारी मेरे बड़े भाई और मेरी माँ पर आकर पड़ी थी।

मैं उस वक्त उम्र में काफी छोटी थी और मैं भोपाल स्थित सरकारी स्कूल में पढ़ भी रही थी। उस समय मुझे जेंडर आधारित भेदभाव के बारे में कुछ भी पता नहीं था। जब मैं किशोरअवस्था में प्रवेश कर ही रही थी तो मेरे चालढाल में लोगों को फर्क दिखने लगा था। तब मुझे हमारे अडोस-पडोस के हवाले से कुछ कुछ चीजें महसूस हो रही थी। सब लोग मेरे इशारे, दैनिक व्यवहार इत्यादी को गौर से देख रहे थे। समाज द्वारा मेरा सूक्ष्म निरीक्षण भी किया जा रहा था। मेरा पूरा रहन-सहन एक युवती की तरफ झुकने वाला था । कुछ साल गुजरने के पश्चात मुझे भी युवती जैसे गहने, कपड़े पहनना, सजना-सवरना इत्यादी पसंद आने लगा था । यह लडकियों वाली संवेदना मेरे साथ कब घटित होना शुरू हो गई यह मुझे समझने में आया ही नहीं । यह विचित्र संवेदना मेरे लिए हैरान और परेशान करने वाली थी।

अनेक सवाल मेरे माँ, भाई, रिश्तेदार आदी लोगों को भी पड़े होंगे, मेरा जन्म तो एक राजपूत परिवार में हो चुका था, तो यह ज़ाहिर सी बात है कि मेरे परिवार वाले, रिश्तेदार, माँ, भाई, बहन इनको अपने राजपूत खानदान की आन, बान और झुठी शान...? के खिलाफ यह बातें लग रही थीं, यह सब गुण राजपूत खानदान में कैसे आ सकते हैं? यह सवाल उनको बार-बार सता रहा था, न की अपने परिवार का बच्चा किस मनोदशा से गुजर रहा है।

लेकिन प्रकृती बड़ी बलशाली व अनहोनी होती है, विज्ञान केवल विज्ञान होता है और उसके नियम काफ़ी सटीक और सरल होते हैं । शरीरशास्त्र और रसायनशास्त्र के संयोग से मानव

का एक नश्वर शरीर उत्पन्न होता है और मेरे शरीर में कहीं ना कहीं शरीर की केमिस्ट्री बिगड़ गई थी और शरीरविज्ञान की संरचना के मूल प्रारूप में कुछ बाधाएं उत्पन्न हुईं थी और मेरा वर्तमान का रूप भी उसका मूर्तिमंत उदाहरण आपके सामने था। मेरे स्कूल के सभी छात्र और छात्राएँ मुझे चिढ़ाते थे। शिक्षक भी, ऐसे मत किया करो, वैसे मत किया करो यह सुझाव देते थे। मेरे उपर भद्दे भद्दे व्यंग कसे जाते थे और इसी कारण मुझे बड़ी परेशानी का सामना करना पड़ता था। मेरे बड़े भैय्या और माँ को भी बहुत कुछ कहा-सुना जाने लगा था। लेकिन मेरी वजह से हमारे घर की शांति भंग होने लगी थी। अब झगड़े तो रोज़ ही होते थे। रिश्तेदार, पड़ोसी भी घर आकर ताना मारते थे। आगे जाकर बात यहाँ तक पहुंची की, अब तू नहीं सुधरा तो तुझे घर से बाहर निकालेंगे ऐसी धमकी मिलने लगी थी। यह वक्त मेरे लिए बहुत कठिन समय था। जिसको वर्तमान में शब्दों में बयान करना मुश्किल ही नहीं नामुमकीन भी है।

आख़िर एक दिन वह भी आ ही गया, जिस दिन मुझे बड़ी बेदर्दी से घर से बाहर निकाल दिया, जैसे कोई सडा-गला घर का कचरा बाहर फेंक दिया जाता है अथवा जैसे एक मरे हुए चूहे या छिपकली को घर से बाहर उठाकर सड़क या कूड़ेदान में फेंक दिया जाता है, ठीक उसी तरह मुझे भी बाहर की बेदर्द दुनिया के सामने फेंक दिया गया। जब मुझे घर से बाहर निकाल दिया तब मेरी माँ का दिल बहुत तड़पा था लेकिन समाज के सामने वह भी मजबूर थी। सच में वह दिन मेरे जीवन का सबसे बड़ा बुरा और निराशाजनक दिन था जिसे मैं ज़िंदगी में शायद ही कभी भूल सकुंगी। आज भी वो यादें जब कभी ताज़ा होती हैं, तो मेरी आँख नम हो जाती हैं। हमारा हाल ऐसा है कि हम ठीक से रो भी नहीं सकते हैं, हमारा कोई हमदर्द नहीं होता जिससे हम अपना दुख-दर्द बांट सकें या अपनी व्यथा शेअर कर सकें। ऐसा कोई मरहम या दवा नहीं बनी है जिससे हमारे दु:खों का शमन किया जा सके। मेरे घर के सुरक्षित माहौल से बाहर पड़ते ही मैंने इस काली दुनिया की डरावनी शक्ल देखी और मैं निराशा की गर्त में चली गई और बाहर के असुरक्षित वातावरण की शिकार भी हो गई। जैसे सभी तृतीयपंथी लोगों के साथ दुरव्यवहार और अत्याचार होता है, मैं भी उन असामाजिक तत्व का शिकार बनकर रह गई थी। भारतीय समाज अपनी महान संस्कृती का कितना भी गुणगान क्यों न करता रहे, लेकिन अभी भी हमारे देश में अनेक विकृती और कु-प्रथाएं अस्तित्व में हैं।

मेरे जीवन में ऐसे बहुत सारे तणावपूर्ण प्रसंग उत्पन्न हुए जिसने मुझे निराशा के अंधेरी काल कोठरी में डाला। मैंने भयंकर शारीरिक और मानसिक उत्पीड़न का सामना किया है। उस वक्त मेरे जीवन में कई बार आत्महत्या के विचार भी मन में आए थे। ऐसा कलंकित जीवन जीने से बेहतर था कि मैं मृत्यू को गले लगाना चाहती थी। जीवन में चारों तरफ़ अंधकार दिखाई दे रहा था। किसी का भी सहारा नहीं दिख रहा था। ऐसी द्विधा-अवस्था में अपना जीवन समाप्त करने के विचार मन में एक बार नहीं तो अनेक बार आ गए थे। मैंने निराशा के मनोदशा में आकर कई बार आत्महत्या करने की कोशिश भी करके देख ली थी। लेकिन कभी किसी यार, दोस्त ने मेरी ज़िंदगी बचा ही ली, और इस तरह मुझे जीवन जीने का नया अर्थ मिल गया। अब मेरी जान बचाने वाला वह व्यक्ति मेरे साथ लिव इन रिलेशनशिप में रहता है, और मेरे साथ साये की तरह और चट्टान की तरह मेरे पीछे खड़ा रहता है। मेरी इस छोटी सी यात्रा में उसका बहुत बड़ा योगदान रहा है और मैं उसे अपने अंतर्मन से धन्यवाद देती हूँ।

हमारा जीना भी कितना मुश्किल है देख लीजिये की, हम दिनभर काम करके जब अपने घर लौटते हैं, तब हमें घरपर चाय का एक प्याला तक पूछने वाला कोई नहीं होता है। जब कभी मौसम बदल जाता है और जब कभी बीमार होते हैं, तब एक ग्लास पानी या एक तकिया सिरहाने को देने के लिए हमारे पास कोई नहीं होता। आज के इस व्यस्त समय में संजना बेटी तूने आज खाना खाया कि नहीं यह तक पूछने वाला कोई नहीं होता। दिनभर के थकान के बाद, अगर हमें कोई दर्द, पीड़ा हो तो हम बताएं तो भी किसको बताएं? हमें समझकर लेने वाला कोई भी तो नहीं होता, जिससे हम अपने की यादें, अपमान एवं सम्मान की बातें शेअर कर सकें। हमें समय पर एक ऐसा कंधा भी उपलब्ध नहीं होता जिसपर हम अपना सर रखकर जी भर रो सकें और जिसको हम अपना दुखडा सुना सकें। क्या आपने ज़िंदगी में खुदको कभी इस तरह असहाय / लाचार महसूस किया है? हम भी तो इसी समाज का एक अभिन्न अंग हैं, तो क्या हमें तकलीफ नहीं होती? हम लोग रोज मरते हैं और हर सुबह फिर से ज़िंदा होते हैं, अंधेरी रात काटने को दौड़ती है। आपको पता है, हमारी इस काली, सुनसान और बंजर ज़िंदगी में कितने कांटे हैं। जैसे रेगिस्तान में प्यासे को पानी / ओएॅसीस के दर्शन मिलते हैं, मेरे इस कठिन यात्रा में काफी अच्छे लोग भी मिले जिन्होने मेरी सहायता भी की है। तभी तो ज़िंदगी में आगे बढ़ने के लिए आशा की एक किरण ज़रूरी होती है।

भोपाल स्थित मेरे पिता के घर से मुझे बाहर निकलते ही, हमारे थर्ड जेंडर समाज के लोगों ने ही मुझे सहारा दिया। मुझे उनके साथ रहने, बैठने और पेहनवा पहनने का मौका मिला।




थर्ड जेंडर समाज की अपनी एक पुरातन परम्परा है, मुझे उससे रूबरू होने का मौका मिला। लेकिन मेरा मन अंदर से यह कह रहा था, संजना तेरा जन्म सिर्फ इतने तक के सीमित दायरे के लिए नहीं बना है, तुझे और भी कुछ ज़िंदगी में करना बाकी है। यह मेरे मन के भीतर से आवाज़ आयी और तभी मैंने एक नई ज़िंदगी का सपना देखा जो बहुत खूबसूरत था, जिसमें मुझे आदर और सम्मान की अपेक्षा थी, मेरे स्वाभिमान की भलीभांती रक्षा हो सके ऐसी ज़िंदगी बीताने का मैंने फैसला ले लिया था। अब मैं आत्मनिर्भर बनना चाहती थी।

मैंने बारहवीं की कक्षा पास कर ली थी, इसलिए शिक्षा का एक अमोघ हथियार मेरे पास मौजूद था और इस शिक्षा के हथियार को मैंने सही तरीके से इस्तेमाल करने का सोचा। योग्य समय पर कुछ अच्छे सामाजिक सरोकार सोच रखने वाले लोगों के संपर्क में आने पर मुझे मध्यप्रदेश सरकार के सामाजिक न्याय विभाग के संचालक के कार्यालय में कार्य करने का सौभाग्य प्राप्त हुआ। यह पदस्थापना अस्थायी स्वरूप की ही थी किंतु मेरे लिए यह एक बड़ा गर्व का विषय था। इस नौकरी के मिलते ही मेरा सामाजिक स्तर बदल गया था। अब मेरी ज़िंदगी पटरी पर आने लगी थी, तभी पूरे देश में कोविड इन्फेक्शन का प्रकोप आ गया था। मुझे भी औरों की तरह कोविड होने का डर सता रहा था। खुदा न खास्ता अगर मुझे कोविड हुआ तो मेरा कैसा क्या होगा? इस डर से खुद को सुरक्षित रखना चाहती थी। जब कोविड इन्फेक्शन हो जाएगा तो मेरा ख़याल कौन रखेगा? खाना और दवाईयों का इन्तजाम कैसे होगा? यह सोचकर मैं डर गई थी। मुझे अब कोविड से बचने के लिये स्वतंत्र रहने की व्यवस्था देखनी थी। मेरा एक माना हुआ भाई है उसके मदद से भोपाल में मकान किराये पर ढूंढना शुरू कर दिया। पर यहां भी किस्मत साथ नहीं दे रही थी, हमारे थर्ड जेंडर समाज के कुछ लोगों ने कुछ ग़लत काम करने की वज़ह से भोपाल के जनमानस हमें नफ़रत भरी नजरों से देख रहे थे। हमारा साया भी उनपर और परिजनों पर न पड़े इसलिए वे काफी दक्ष और जागरूक थे। हमारे समाज के कुछ लोगों ने गलत रास्ता भी अपनाया था और पुरानी परंपरा और रीतिरिवाज को भी साथ-साथ अपनाते जा रहे थे। इन सभी चीजों का प्रभाव यह भी हो रहा था कि, आम लोगों के मन में थर्ड जेंडर के बारे में नफ़रत एवं ग़लत-धारणाएं पनप रही थीं। उनके बारे में मन में अनेक अंधविश्वास भी थे। ऐसे सैकडों कारणों की वज़ह से मुझे भोपाल शहर में अच्छे परिसर में घर मिलने में दिक्कतों का सामना करना पड़ा। एक भले व्यक्ती के माध्यम से एक फ्लॅट के मालिक से मिले और हम थर्ड जेंडर हैं यह पता चलने पर वे बहुत चिंतित हुए। परंतु हमने उनको पूरा भरोसा दिलवाया की हम बहुत अच्छे से रहेंगे और ऐसा कोई भी ग़लत काम नहीं करेंगे जिससे उनको चोट पहुंचे। आख़िरी में उस मकान मालिक ने बड़ी उदारता से मुझे भोपाल के निजामुद्दीन कॉलनी में वन रूम, किचन, हॉल ऐसा मकान किराये पर दिया। घर मिलने

**हमारा जीना भी कितना मुश्किल है देख लीजिये की, हम दिनभर काम करके जब अपने घर लौटते हैं, तब हमें घरपर चाय का एक प्याला तक पूछने वाला कोई नहीं होता है। जब कभी मौसम बदल जाता है और जब कभी बीमार होते हैं, तब एक ग्लास पानी या एक तकिया सिरहाने को देने के लिए हमारे पास कोई नहीं होता।**

पर मेरी खुशियों का कोई ठिकाना नहीं था। मैं अब इस घर में सुकून के चार पल बीता सकती थी। मैं यह हमेशा सोचती रहती हूँ कि हमारे जैसे लोगों को सहजता से मकान क्यों नहीं मिल पाता? हमें यह मूलभूत अधिकार क्यों नहीं मिलते?

अब मैं मेरी ज़िंदगी का बुरा इतिहास, भयानक अनुभव और नकारात्मक बातें भुलकर ज़िंदगी में आगे बढ़ना चाहती हूँ। अब मैंने इग्नु (IGNOU) से बी. ए. (इतिहास) विषय लेकर पढ़ाई करने का निर्णय लिया है। इतिहास मेरा सबसे पसंदीदा विषय रहा है। २०१९ के फरवरी महीने में भारतीय विमेन द्वारा निर्मित फिल्म व डॉक्युमेंट्री की दो-दिवसीय प्रदर्शनी एवं चर्चासत्र का कार्यक्रम आयोजित किया गया था। यह कार्यक्रम मध्यप्रदेश की सांस्कृतिक नगरी के राज्य संग्रहालय में रखा गया था। उस कार्यक्रम में मुझे भी आमंत्रित किया गया था। सभी प्रसिद्ध विमेन फिल्म निर्माताओं के साथ मेरा भी मंच के माध्यम से सम्मान किया गया और मुझे अपने विचार प्रगट करने का मौका दिया गया। मध्यप्रदेश के सभी समाचारपत्रों ने मेरे विचारों को भी प्रसिद्धी दिलवाई। इस तरह के सामाजिक उपक्रम के तहत हमें जो सम्मान और प्रेरणा मिलती है उससे हमें जीवन मे आगे बढ़ने की ऊर्जा और शक्ति मिलती है। ऐसे प्रेरक के सफल आयोजन से आम समाज में थर्ड जेंडर के प्रति सकारात्मक जागरूकता का संदेश फैलाया जा सकता है। मैं यहां इस लेख के माध्यम से उन सभी इंडियन विमेन फिल्म मेकर्स के व्यवस्थापक सदस्यों के प्रति आभार व्यक्त करती हूँ।

मेरे सम्मान का यह सिलसिला आगे बढ़ता ही जा रहा है। इसी कड़ी में मुझे अब बहुत सारे सामाजिक संघटनों द्वारा मुख्य वक्ता के रूप में आमंत्रित किया जाता हैं, मेरे हाथों से बहुत सारे प्रतियोगिता कार्यक्रम में छात्रों को ट्रॉफी, सम्मानपत्र और उपहार बाँटे जाते हैं । यहां पर मैं विशेष उल्लेख करना चाहती हूँ कि मुझे मा. प्रधान मंत्रीद्वारा घोषित भारत स्वच्छता मिशन के कार्यक्रम के अंतर्गत मध्यप्रदेश के १५ ग्राम स्वच्छ करने के कार्य की देखरेख करने की ज़िम्मेदारी सौंपी गई। इस दौरान मैंने उपरोक्त ज़िम्मेदारी का सही से निर्वघ्न करते हुए अच्छा कार्य का प्रदर्शन किया और उसी कार्य के परिणाम स्वरूप भारतीय फिल्म उद्योग जगत के महानायक आदरणीय श्री. अमिताभ बच्चन साहब के करकमलों द्वारा मुझे मुंबई में सम्मानित किया गया था। मुझे ऐसा लगता है कि यह मेरे जीवन का बहुत बड़ा सम्मान था। उस दिन मैं बहुत खुश थी वह मेरे ज़िंदगी का एक शानदार दिन था। उपर उल्लेखित ऐसे अनेक अनुभवों से प्रेरित होकर मैं अब समाज सेवा भी करने लगी हूँ। महिला, तृतीयपंथी, पिछड़े, गरीब, विकलांग आदी के लिये मैं सामाजिक कार्य करना चाहती हूँ और मैं अपनी सामाजिक भूमिका अदा करना चाहती हूँ।

अंत में मैं आप सभी महानुभावों को बहुत ही विनम्रतापूर्वक यह आवाहन करना चाहती हूँ कि हम थर्ड जेंडर समाज के लोग भी मनुष्य हैं, हमारे अंदर भी वही भावनाएँ हैं जो आपके भीतर हैं । हमें भी प्यार, आदर, सम्मान की उतनी ही आवश्यकता है। जब आप हमें हीनदृष्टी और नफ़रत भरी नजरों से देखते हो और हम पर गंदे / भद्दे व्यंग कसते हो तब हमें भी पीड़ा होती है और चोट पहुंचती है । हमें भी खुशी, ग़म, गुस्सा, निराशा आदी संवेदनाएँ महसूस होती हैं। हम बस आपसे यह चाहते हैं कि हमारे भी मानवजाती के नाते कुछ संवैधानिक अधिकार हैं। हम आपसे यह गुज़ारिश करते हैं कि, हमें भी गरिमामय तरीके से जीवनयापन करने के लिए और आत्मनिर्भर बनने के लिए सभी एकजूट होकर हमारी रक्षा सुनिश्चित करनी चाहिए. हम भी भारत के संविधान के अनुसार समता, न्याय, बंधुता और एकता के आधार पर उचित आदर एवं सम्मान मिलने की अपेक्षा करते हैं। हमें भी सभी नागरिकों की तरह जीवन में आगे बढ़ने का विशेष प्रावधान प्राप्त होना चाहिये और उसी के अंतर्गत हम भी उचित न्याय मिलने की उम्मीद करते हैं।

अपना भारत देश आज़ाद होकर लगभग ७४ साल हो गये हैं, और हम सभी एक लंबा सफर तय करके यहां तक पहुंचे हैं। अगले वर्ष हम सभी भारत के स्वतंत्रता की ७५ वीं वर्षगाठ के मौके पर भारत का अमृत महोत्सव मनाने जा रहे हैं। लेकिन आज़ादी के ७४ वर्ष गुजर जाने के बाद भी थर्ड जेंडर समाज के प्रती आम भारतीयों की मानसिकता में बदलाव आया है क्या? भारत का जनमानस थर्ड जेंडर को उनके गुण-दोष सहित स्वीकारने के लिए तैयार है क्या? चलिए, आज हम एक नये भारत के समाज निर्माण की तरफ़ अपने कदम बढ़ाते हुए भारत के स्वतंत्रता के ७५ वर्ष के अमृत महोत्सव के पावन पर्व पर यह संकल्प करें कि, भविष्य में हम थर्ड जेंडर लोगों के प्रती किसी भी प्रकार का भेदभाव नहीं करेंगे । उनसे समानतापूर्वक व्यवहार करेंगे और खुले दिल से स्वागत करते हुए उन्हें रोटी, कपड़ा और मकान मिले यह सुनिश्चित करने का प्रण करेंगे। सभी भारतीयों को यह याद रहे कि, हमारा थर्ड जेंडर समाज इस बदलाव का सदियों से इंतज़ार कर रहा है और कृपया हमें निराश ना करें।

# इंद्रधनुचे सात रंग



संभव पुंडकर
ट्रान्समॅन

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | Red | - | Man Male | लाल |
| 2) | Orange | - | Woman Female | नारंगी |
| 3) | Yellow | - | L - Lesbian | पिवळा |
| 4) | Green | - | G - Gay | हिरवा |
| 5) | Blue | - | B - Bisexual | निळा |
| 6) | Indigo | - | T - Transgender (Transman - Transwoman) | गर्द निळा |
| 7) | Violet | - | Q - Queer | गर्द जांभळा |

**Who I am -** ७ रेनबो कलर, मी कोण तर, हो मी ७ रेनबोमधलीच एक व्यक्ती Transman. आम्हीसुद्धा मनुष्यच आहोत. एक commonman आणि एक transman यात माझ्यासाठी काही फरक नाही हो! I am Man. जेव्हा बाळ जन्माला येतं तेव्हा तुम्ही फक्त त्याच्या sex organ वरून ठरवता तो पुरुष आहे की स्त्री. मला असं वाटतं ती व्यक्ती ७ रेनबो कलरमध्ये स्वत:ला कुठे समजते तो संपूर्णपणे फक्त आणि फक्त त्या व्यक्तीचा निर्णय आहे. आणि तो पूर्णपणे त्याचा अधिकार आहे. जर आपण लहान असतानाच ही गोष्ट शिकवतो Male / Female, तेव्हाच आपण पूर्ण सात कलर शिकवावेत. आपण लहान असताना मुलांना आधी कलर शिकवतो. जेव्हा मूल शाळेत जाते तेव्हा त्याला लिंग शिकवतात Male / Female and other. पण मला वाटतं तेव्हा त्यांना other च्या जागी LGBTQ पण शिकवलं तर त्या व्यक्तीच्या मनात कधी गोंधळ निर्माण होणार नाही की मी कोण आहे आणि त्याचं बालपण आमच्या बालपणाप्रमाणे नाही घालवणार आणि तो या गोष्टीचा जास्त विचार न करता खूप आनंदाने जगेल आणि खूप पुढे जाईल.

आणि मला पडलेला प्रश्न 'Who I am' हा नाही पडणार. समाजात पण तो भीत भीत नाही जगणार. स्वतंत्रपणे जगणार अगदी लहानपणापासून.

मी एक मुलीच्या शरीरात जन्म घेतलेली व्यक्ती. शरीर मुलीचं पण आत्मा मात्र मुलाचा, पुरुषाचा.

माझा जन्म ११ एप्रिल १९८८ साली विदर्भातील अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यात एका सामान्य कुटुंबात झाला. माझ्या घरी माझे आई-वडील आणि मला चार बहिणी आहेत. तीन बहिणी माझ्यापेक्षा मोठ्या आणि एक माझ्यापेक्षा लहान आहे. आई सांगते की मी जन्माला आलो तेव्हा माझी तब्येत खूप खराब झाली होती. तेव्हा तिने डॉक्टरला दाखवून ४ ते ५ वर्षांचा होईपर्यंत माझी खूप काळजी घेतली आहे.

माझं शिक्षण सातवीपर्यंत जिल्हा परिषद शाळेत झालं आणि नंतर मी उच्च माध्यमिक शिक्षण घेतलं आणि नंतर बी.कॉम. केलं. पुढे Fashion Technology पण केलं.

मला आठवतं दुसरी-तिसरीत असतानाच मला मुलासारखं राहायला आवडायचं. माझ्या सर्वांत मोठ्या बहिणीला पप्पांनी जीन्सपँट आणि शर्ट घेतला होता, तो मला खूप मोठा होत होता. तरीही मी तो घालायचो. त्यावर्षीचा एक किस्सा सांगावासा वाटतो. माझ्या बहिणीला भाऊ नाही म्हणून ती नेहमी चुलत भावांना, मावस भावांना राखी बांधायची. तेव्हा मी खूप लहान होतो. तेव्हापासूनच मला वाटायचं की मला पण माझ्या बहिणीने राखी बांधावी. जसं त्या भावासोबत राहतात, वागतात तसं माझ्याबरोबरपण राहावं. मला भाऊ म्हणावं व तसं वागावं. मी दुसरीत असताना माझी बहीण सकाळी उठून सर्व मस्त तयारी करून माझ्या चुलत भावाला बोलवायला गेली, राखी बांधायला चल म्हणून. तेव्हा त्या भावाने दिदीला म्हटलं मी आधी माझ्या सख्ख्या बहिणीची राखी बांधणार मग तुमच्याकडे येणार. तेव्हा माझी मोठी बहीण खूप दु:खी झाली

होती. ती खूप नाराज होती. तेव्हा माझ्याकडे दोन रुपये होते. मी सायकलवर जाऊन दोन रुपयांचं एक गुलाबाचं फूल आणलं आणि दिदीला म्हणालो की, मी आहे ना तुझा भाऊ, मला राखी बांध आधी आणि मी तिच्याकडून राखी बांधून घेतली. तिच्या ताटामध्ये गुलाबाचं फूल तिला राखी गिफ्ट म्हणून दिलं. तो क्षण माझ्यासाठी खूप मोठा आनंद देणारा होता. मग दरवर्षी मी या दिवसाची वाट बघायचो.

मी लहानपणापासून मुलाचेच कपडे घालायचो. सर्व मुलांसारखी बाहेरची कामं करायचो आणि जास्त बाहेर राहायचो. माझा पहिला मुलाचा ड्रेस मला आठवतो. माझ्या पँटला खूप सारे पॉकेट्स होते आणि बेल्ट होता. हिरव्या रंगाचा टी-शर्ट होता.

मी चौथी-पाचवीत असतानाच मला मुली खूप आवडायच्या. त्या काळातच पेपरला मी एक लेख वाचला होता त्यात असं लिहिलं होतं की पुण्याचे एक प्राध्यापक Male होते ते Female झाले. तेव्हा मला वाटलं की जर Male to Female होऊ शकतं तर मी Female to Male होणार नक्की एक दिवस. मी ते कात्रण काही वर्षांपर्यंत जपून ठेवलं होतं.

पुढे मी सातवीनंतर दुसऱ्या शाळेत गेलो. मग तिथे मला जास्त त्रास होऊ लागला. खूप प्रॉब्लेम आले तिथे. आठवीपासून मुलींना पंजाबी सुट होता तेव्हा मला खूप प्रॉब्लेम व्हायचे, पण मी तिथेपण मुलांचा गणवेश घालायचो आणि प्रार्थनेच्या वेळी मी लपून राहायचो. आणि वर्गात पण नेहमी सर्वांत शेवटच्या बाकावर बसायचो. जेणेकरून मी जास्त कुणाला दिसणार नाही.

आठवीमध्ये असताना खूप जास्त त्रास व्हायला लागला. मला पाचवीपासून मुली आवडायच्या, पण माहीत नव्हतं असं का होतं. पण मी स्वत:ला मुलगा आहे म्हणून समजलं अणि मला काही फरक पडत नव्हता. मला कोण काय बोलतो ते मला माहीत होतं. मी मुलगा आहे आणि मी मुलगा म्हणून जगावं असं खूप वाटायचं, घरी बोलावं, सांगावं असं वाटायचं पण सांगणार कुणाला? तो प्रश्न होता आणि आपण काय समजवायचं असंच वाटतं. माझा परिवार आहे त्यांनी मला लहानाचं मोठं केलं. माझा हा प्रवास बघितला. त्यामुळे त्यांनी मला समजून घ्यावं, पण असं होत नाहीये. त्यांना फक्त समाज, नातेवाईक याची पडली असते. त्यामुळे मी नेहमी माझ्या मित्रांमध्ये आणि जी लोकं माझ्यावर प्रेम करतात त्यांच्यातच जास्त राहायला लागलो.

माझी नववी किंवा दहावी संपली होती तेव्हा मला त्या नको असलेल्या गोष्टींमधून त्रास सहन करावा लागला. जेव्हा मला पहिल्यांदा पाळी आली त्या दिवशी मी नेहमीप्रमाणे माझी सायकल घेऊन घराबाहेर होतो. मी माझ्या खूप जवळ असलेल्या व्यक्तीला एसटीडीवरून कॉल केला आणि बोललो की माहीत नाही काय झालं मला, असं काय झालं. खूप त्रास होत आहे वगैरे मी बोललो. तेव्हा ती बोलली की तू घरी जा, आईला सांग. मग मी घरी गेलो आणि मग समजलं हे काय असतं ते. पण मला तेव्हा स्वत:चाच राग येत होता. हे मला का झालं मी मुलगा आहे तरी, असे विचार मनात आले. पण नंतर मी त्या गोष्टीचा त्रास करून घेणं बंद केलं. मला काही फरक नाही पडत मी मुलगा आहे बस असा विचार केला आणि बिनधास्त राहायला शिकलो. तेव्हा मला पाळीचा त्रास एक किंवा दोन दिवस व्हायचा. त्यामुळे मला त्याचा काही फारसा फरक पडत नव्हता. हो, पण नेहमी मी हा विचार करायचो की असं काय करता येईल की जेणेकरून हा पाळीचा त्रास बंद होईल.

मी मुलांचेच खेळ खेळायचो. मुलांबरोबर बागडायचो. आणि मुलांसारखाच वागायचो. मी तेव्हा माझं नाव प्रतीक म्हणून सांगायचो. हो, हे खरं आहे की माझ्या जीवनामध्ये आजपर्यंत खूप मुली आल्यात माझ्या गर्ल फ्रेंड म्हणून, पण कधीच मी कोणत्या मुलांचा विचार नाही केला. शिक्षणाचं सांगायचं झालं तर मी बी.कॉम. केलं. माझी दहावी २००३ मध्ये झाली आणि बारावी २००५ मध्ये, पण पुढे बी.कॉम. करायला खूप वेळ लागला कारण तेव्हा माझा Dysphoriya खूप जास्त वाढत होता आणि मग माझ्या लक्षात नाही राहायचं. तेव्हा मी मग स्पोर्ट्स जॉइन केले होते. मला घरून विरोध असतानासुद्धा मी बॅडमिंटन स्टेट लेव्हलपर्यंत खेळले आहे. बी.कॉम.मध्ये गॅप पडला तर मी आयटीआय केला आणि त्यात पुढे सीटीआय पण केलं. मुंबईमधून फॅशन टेक्नॉलॉजीमध्ये. पण जेव्हा मी मुंबईला ॲडव्हान्स सीटीआय करायला गेलो तेव्हा केस वाढवले होते. कारण माझ्या जवळच्या व्यक्तीला प्रॉमिस केलं होतं की तिच्या लग्नात तिला मला एक मुलगी म्हणून बघायचं होतं. तिला ते लग्नाचं गिफ्ट म्हणून मी तसं केलं होतं. मला माझ्या जवळची माणसं जपायला खूप आवडतं आणि आजपर्यंत फक्त त्यांच्यासाठीच केलं सर्व. जरी ते माझ्या मनाविरुद्ध होतं तरी फक्त प्रेमाखातर ते मी केलं. मग लग्न झाल्यावर मला नाही जमलं तस राहायला. मी परत मुलाचा look केला माझा.

२०१२ ला मी पुण्याला आलो जॉबसाठी. कारण मला परत घरी नव्हतं जायचं. मग मी सात हजार रु. पगाराची नोकरी स्वीकारली. २०१३ ला घरात माझ्या लग्नाचा विषय चालू झाला. माझ्याशी बोलायला माझ्या बहिणी आणि जिजु पुण्यात आले. तेव्हापण मी जिजुबरोबर नेहमीप्रमाणे मुलासारखं एका हॉटेलमध्ये गेलो. मग त्यांनी विचारलं, तर मी बोललो की, एका मुलाचा मी माझ्या आयुष्यात कधीच विचार नाही केला आणि करणार नाही. त्यावर बहिणी खूप चिडल्या, वाद झाले. मी

बोललो की तुम्हाला लहानीचं करायचं असेल तर करा, पण मी नाही करू शकत. त्यांचा परत जायचा दिवस आला. तेव्हा मी फक्त १० मिनिटं बसमध्ये माझ्या पप्पांबरोबर बोललो की, मी कुठल्या मुलाबरोबर लग्न नाही करू शकत. जर जबरदस्ती करून लग्न केलं तर त्याला माझ्याकडून जे हवं आहे ते मी नाही देऊ शकणार. मला तुमचा मुलगा म्हणून जगायचं आहे आणि तुमचा मुलगा म्हणून मरायचं आहे. तर ते व्हावं. पप्पा मला बोलले, ठीक आहे. मग त्यासाठी काय करावं लागेल, किती खर्च होणार आहे हे मला त्यांनी विचारलं होतं. पण तेव्हा माझ्याजवळ जास्त माहिती नव्हती. मी काही बोललो नाही. मग पप्पांना शुगर आणि बीपीचा त्रास झाला तर मी त्यात माझा विषय मागे ठेवला. त्यानंतर असं माहिती झालं की लहान बहिणीलाच लग्न करायचं आहे. तिने लव्ह मॅरेज करायचं ठरवलं होतं आणि तिच्या लग्नाला कुणी संमती देत नव्हतं. त्यामध्ये परत माझा विषय मी मागे ठेवला आणि तिच्या आनंदासाठी सर्वांना समजावलं आणि तिचं लग्न करून दिलं.

त्यानंतर माझ्या आईला २०१६-२०१७ मध्ये कॅन्सर डिटेक्ट झाला. त्यामुळे मी माझ्याबद्दलच्या गोष्टी बाजूला ठेवल्या. आईच्या आजारात तीन वर्षं उलटून गेली, त्यानंतर मात्र मी आई-पप्पांशी आणि माझ्या बहिणींशी माझ्या 'Transition Surgery' बद्दल बोललो. पण त्यांनी कोणीच मला प्रोत्साहन दिलं नाही, मला support केला नाही.

पण मग मी वैयक्तिक कर्ज काढलं आणि मित्रांच्या मदतीने जानेवारी २०२१ मध्ये माझी transition surgery पार पडली. ह्या परिवर्तनामुळे मला खूप समाधान वाटतंय.

आता जीवनसाथीविषयी म्हटलं तर, हो, मलाही वाटतं की जीवन जगताना एक लाइफ पार्टनरची गरज असते. अशी व्यक्ती जिच्याकडे आपण आपले सर्व विचार व्यक्त करू शकतो. अशी व्यक्ती जी मला जसा आहे, माझ्यावर शरीराने नव्हे तर मनाने माझं नातं स्वीकारेल, अशी व्यक्ती मला आवडेल. तिला माझ्या भावना समजतील. जी माझ्या आई-पप्पांना पण तिचेच आई-वडील मानेल. अशा व्यक्तीशी मी लग्न करेन. आणि हो, मी आता ज्या व्यक्तीवर प्रेम करतो तीच जर माझ्या आयुष्यात आली तर माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे.

मला आवडेल जर एक अनाथ मूल मला दत्तक घेता आलं तर, अर्थात माझ्या बायकोच्या इच्छेनुसार घेणार! पण एकूण मला असं वाटतं की मला जीवनसाथी हवा, मूल हवं, माझादेखील संसार असावा.

प्रत्येक दिवस सकारात्मक जगावा असं मला वाटतं. आज जेव्हा मी community मध्ये जातो किंवा त्यांच्या संपर्कात येतो




तेव्हा ते स्वीकारत नाहीत. मला असं वाटतं की घरातल्या लोकांनी, आई-वडील, बहीण-भाऊ यांनी स्वीकारलं तर समाजदेखील स्वीकारेल. त्यामुळे सुरुवात घरापासून व्हायला पाहिजे.

समाजाला माझा एकच संदेश आहे. प्रत्येकाला जीवन जगण्याचा अधिकार आहे. त्याला त्याच्या मनाप्रमाणे जगू द्या. मला वाटतं शाळेतच हा transgender विषय शिक्षणात आला पाहिजे, शिकवला गेला पाहिजे.

ट्रान्सजेंडर्सकरता माझा संदेश आहे की स्वाभिमानाने जगा, शिक्षण घ्या आणि आपल्या पायावर उभे रहा. आपलं अस्तित्व हे आपलं आहे त्याला स्वीकारा आणि अभिमानाने जगा.

आपल्यात खूप पेशन्स आहेत आणि आपण खूप चांगले आहोत आणि समाजालासुद्धा आपण चांगलंच देऊ. सर्वांना नेहमी मदतीचा हात समोर करा.

सामाजिक जाणिवेतून मी माझ्याकडून होऊ शकेल तितकी मदत करेन आणि जर कुणा ट्रान्सजेंडरच्या आई-वडिलांना समजवायचं असेल तर मी नक्की ते समजावयाच्या प्रयत्न करेन. आपण समाजात एक कर्तृत्ववान व्यक्ती म्हणून जगलो पाहिजे. मी आजपर्यंत तीन-चार कंपन्यांमध्ये काम केलं आहे. तो अनुभव सामान्यच होता. कारण मी माझ्या जुन्या आयडेंटिटीने काम केलं. Manufacturing मध्ये चार वर्षं आणि आयटीमध्ये तीन वर्षं काम केलं. पण हो, आता मात्र नवीन नावाने पुरुष म्हणून काम करताना मला खूप समाधानी वाटतंय. आणि नवीन काय अनुभव येतील ते बघुयात. मला ट्रान्समॅन म्हणून मत व्यक्त करण्याची तुम्ही संधी दिली म्हणून खूप चांगलं वाटतंय.

# IN CONVERSATION WITH HAPPINESS!



**Kaishori Prangan**
S. No. 42, Near Dnyandeep School,
Manaji Nagar, Narhe, Pune- 41.

Showrooms, Shops,
1, 2 & 3 BHK Luxurious Flats.
Call : 8956695761, 8956695762



**Deveshwar Tekadi**
S. No. 1/1/1A/1, Bhilarewadi,
Katraj, Pune- 411046.

Showrooms, Shops,
1 & 2 BHK Luxurious Flats.
Call : 8956695764, 8956695765



**Vyomkesh**
S. No. 72, Off Sinhgad Road,
Near Bangalore- Mumbai Bypass,
Vadgaon (kh), Pune- 411058.

Shops,
1 & 2 BHK Luxurious Flats.
Call : 8010639913



**Navjyot Abha**
S. No. 150 & 151, Lane No. 27A,
Dhayri, Pune- 411041.

Shops,
2 BHK Luxurious Flats.
Call : 9011433233,8530433331,
8010642238

Best Locations & Smart Planning

Festival Wishes by

सुमेरु समूह
आम्ही घरे करतो

**Corporate off. :** S. No. 150 & 151, Lane No. 27A, Dhayri, Pune- 41.
(T): 020-24395454, 020-24395656.
**Mumbai off. :** Off. No. 403, Costa Rica, Plot No. 1 & 2,
Sector-18, Sanpada Palm Beach Road, Navi Mumbai- 400705.
sales@sumerugroups.com www.sumerugroups.com




# सकारात्मकता, स्वावलंबन : यशाची गुरुकिल्ली

**माधुरी सरोदे शर्मा**
ट्रान्सवुमन

नमस्कार! माझं नाव माधुरी सरोदे शर्मा. माझा जन्म मुंबई कुर्ला येथे झाला. माझं आधीचं नाव प्रकाश रामचंद्र सरोदे. दोन बहिणींनंतर माझा जन्म झाला. एकुलता एक मुलगा झाला या आनंदाने घरात खूप खुशी होती. लहान असताना सर्व काही नॉर्मल होतं, परंतु जसजशी मी मोठी होत होते तसतसे माझ्यामध्ये चेंजेस होत होते. मला मुलींमध्ये खेळायला आवडायचं. शाळेत जाताना मुलींचा गणवेश आपण का नाही घालत? आपण मुलांचा गणवेश का घालतो? असे प्रश्न मला नेहमी पडत असत. अभ्यासामध्ये मी हुशार होते. पण असे छोटे छोटे प्रश्न खूप पडायचे. नऊ-दहा वर्षांपर्यंत सगळं काही एका नॉर्मल मुलासारखं सरळ आणि सोपं होतं. परंतु जसजसं वय वाढत होतं, प्रश्न वाढत होते. बारा वर्षांची असताना मला असं वाटायचं की मी एका मुलाच्या शरीरामध्ये असलेली एक मुलगी आहे. जेव्हापण मी आरशासमोर काहीही कपडे न घालता उभी राहायची, तेव्हा मला खूप अवघडल्यासारखं वाटायचं. माझ्या आतमध्ये एक स्त्री आहे, परंतु शरीर पुरुषाचं आहे या गोष्टीने मला खूप त्रास व्हायचा. बारा वर्षांची असतानाच मी ठरवलं होतं की शरीर बदलो किंवा न बदलो, पण समाज हा बदलला पाहिजे. मला वाटत होतं की मी सगळ्यांपेक्षा वेगळी आहे, परंतु जसजशी मी मोठी होत गेले तसं मला कळलं की मी वेगळी नाही, मी 'स्पेशल' आहे, आणि तेव्हापासून ठरवलं की यापुढे सगळ्या गोष्टी स्पेशल करायच्या.

वयात आल्यानंतर, म्हणजेच ज्या वयामध्ये साहजिकच नॉर्मल मुलांना मुली आवडतात आणि मुलींना मुलं आवडतात त्या वयात, माझ्यामध्ये वेगळंच काहीतरी घडत होतं. मला शाळेत शिकवणारे सर आवडायचे आणि मी मुलांकडे आकर्षित व्हायचे. मला सिनेमामधल्या हिरोबद्दल जास्त आकर्षण वाटायचं आणि असं वाटायचं की असा हिरो आपल्यालासुद्धा आयुष्यात भेटावा. हे असं का होतंय हा प्रश्न मला खूप पडायला लागला आणि मला असं वाटलं की मी एकटीच अशी आहे का? मला काय झालंय? मला मुलीसारखं का वाटतं? आणि असं सगळं असूनसुद्धा लोक का म्हणतात की तू मुलगा आहेस! सगळ्या भावना स्त्रियांच्या होत्या पण शरीर मात्र पुरुषाचं होतं. रस्त्यावर जेव्हा मी हिजडा समाजाला बघायचे तेव्हा खूप भीती वाटायची. गल्लीमध्येसुद्धा जेव्हा हिजडे यायचे तेव्हा मी माळ्यावर लपायची. कारण मला आई सतत सांगायची की तू मुलींसारखा वागलास तर तुला हे लोक उचलून घेऊन जातील. पण मी मोठी होत गेले तसं कळलं की असं काही नसतं. हे लोक खूप चांगले असतात. ते कशाला मुलं उचलून घेऊन जातील? वयोमानाने शरीरात होणारे बदल मला मान्य नव्हते. पुरुषाचं शरीर असल्यामुळे चेहऱ्यावर दाढी येणं, नेहमी केस कापणं हे मला आवडत नव्हतं. मला मुलींसारखं जगायचं होतं. तेव्हा मला असं वाटलं की हिजडा समाजामध्ये मी जर गेले तर मला मुलींसारखं जगता येईल. म्हणून मी त्यांच्यामध्ये जायला सुरुवात केली. मला त्यांच्यात बसायला, राहायला खूप आवडायला लागलं. शिक्षण पूर्ण करायचं होतं म्हणून कसंबसं बारावीपर्यंतचं शिक्षण पूर्ण केलं आणि नंतर हमसफर ट्रस्ट या NGO मध्ये एलजीबीटीसाठी कामं करायला सुरुवात केली. तेव्हा हळूहळू एलजीबीटी काय आहे आणि हिजडा कम्युनिटी काय आहे आणि माझ्यात होणारे बदल असे का आहेत आणि मी कसं स्वत:ला बदलू शकते, स्वत:तली स्त्री कशी बाहेर काढू शकते हे मला तिथे काम करत असतानाच कळलं. मग हळूहळू मी स्वत:मध्ये बदल करायला सुरुवात केली.

शाळेत असताना मला शाळेत जायला नेहमी आवडायचं. शिक्षणाची आवड होती मला. पण त्याचबरोबर क्रीडा, कला

यामध्येसुद्धा मला खूप रुची होती. पाचवी-सहावीपर्यंत नॉर्मल मुलांसारखं शैक्षणिक वातावरण होतं. परंतु बारा वर्षानंतर थोडंसं अवघड झालं होतं. घरातून शाळेपर्यंत जाण्याच्या रस्त्यामध्ये काही जण मला बाहुल्या, गुड मामू अशा नावांनी हाक मारायचे, चिडवायचे. पण आपल्याला असं का बोलतात हे कधी कळलं नाही. म्हणून शाळेत जाताना खूप भीती वाटायची. कोण कुठून आवाज देईल, कोण आपल्याला काय बोलेल याची नेहमी भीती वाटायची. शाळेत गेल्यानंतर मधल्या सुट्टीमध्ये किंवा परेड चालू असताना बाईंना शौचालयासाठी बोट दाखवून जेव्हा बाहेर निघायचे तेव्हा माझ्यापाठोपाठ दुसरी मुलंसुद्धा शौचालयात यायची आणि मला चिडवायची. माझ्याबरोबर काही चाळे करायची, पण हे मला काही समजत नसायचं. त्यामुळे नंतर नंतर मी शौचाला जाणं बंद केलं. शाळेत असताना मैदानी खेळामध्ये फुटबॉल, क्रिकेट खेळायला कधी आवडलं नाही, नेहमी पकडापकडी, दोरीच्या उड्या आणि बैठे खेळ मला जास्त आवडायचे. शाळेत गॅदरिंग असताना डान्स बसवण्याची जिम्मेदारी किंवा कला-क्रीडा अशा गोष्टी माझ्यापर्यंत यायच्या आणि मी ते खूप चांगल्या प्रकारे करायचे. डान्स बसवायला आणि डान्स करायला मला खूप आवडायचं. चित्रकला स्पर्धेमध्ये नेहमी माझा नंबर असायचा. कविता म्हणणे, गाणी म्हणणे यामध्ये खूप रुची असायची. परीक्षेत बाकीच्या विषयांमध्ये तसे कमीच मार्क पडायचे पण नापास कधी झाले नाही. पास होण्यापुरते नेहमी मार्क्स मिळायचे. परंतु कला-क्रीडा यामध्ये मी उत्तम होते. मला त्याची आवड होती.

मी रोज सकाळी सहा वाजता उठते. फ्रेश होऊन सगळ्यात आधी मेडिटेशन आणि योगा करते कारण की आरोग्य चांगले असेल तर आपण चांगले असू आणि आपण जास्तीत जास्त काम करू यावर माझा विश्वास आहे. व्यायाम झाल्यानंतर मग चहापाणी, नाश्ता आणि मग कामाला जायची तयारी करते. माझ्याबरोबर माझे मिस्टर राहतात. आम्ही २०१६ मध्ये लग्न केलं. कॉमन मॅनच्या बरोबर लग्न करणारी मी पहिलीच तृतीयपंथी आहे. त्यामुळे मी माझ्या फॅमिलीबरोबर राहते. मी कामाला जाते आणि मग संध्याकाळी आल्यावर पुन्हा स्वयंपाकाची तयारी आणि मग हे सगळं करून वेळ मिळाल्यावर मी माझी ऑफिसचीही कामं करते. अशी माझी दिनचर्या आहे. यात शनिवार-रविवार सुट्टीच्या दिवशी मी माझ्या कलेला महत्त्व देते. मी एक नृत्यांगना आहे. कला ही जपली पाहिजे त्यासाठी वेळ काढणं खूप गरजेचं आहे असं मला वाटतं. मला असं वाटतं की प्रत्येकाने कुठली नि कुठली कला जोपासली पाहिजे.

माझ्या जीवनात मला मदत झाली ती माझ्यातल्या कलागुणांची, माझ्यामधल्या स्किल्सची आणि त्यामुळेच मी स्वत:च्या पायावर उभी राहू शकले. बाकीच्या गोष्टींना जास्त महत्त्व न देता आपल्या आतमध्ये असलेल्या कलागुणांना वाव दिला आणि काहीतरी रोजगार उत्पन्न होईल याचा प्रयत्न केला. काम करून स्वत:तील कलागुण जपून मी स्वत:चा मार्ग स्वत: शोधला. तृतीयपंथीयांना मदतीचा हात देण्यासाठी कोणी पुढे येत नाही. समाजामध्येसुद्धा खूप कमी हात आहेत पण तिने स्वत: खंबीरपणे उभं राहून स्वत:चा मार्ग स्वत: शोधावा असं मला वाटतं. मला असं वाटतं की, प्रत्येक तृतीयपंथीयाने आपल्या कलागुणांना वाव देऊन आपल्या पायावर उभं राहावं. छोटा-मोठा काहीतरी उद्योग सुरू करावा आणि स्वत:च्या पायावर उभं राहावं. माझ्या नवऱ्याने मला भरपूर सपोर्ट केला आहे. माझ्या सासरच्या मंडळींनी मला खूप सपोर्ट केला आणि मी खंबीर होते म्हणजे आजवर मी समाजामध्ये एक नवीन वाट लोकांना दाखवायचं काम करते आहे आणि स्वत:सुद्धा नाव कमावलं आहे आणि ते या सगळ्यांच्या मदतीमुळेच शक्य झालं. यशात माझ्या नवऱ्याचा खूप मोठा वाटा आहे आणि त्याच्याशिवाय मी हे करू शकले नसते. प्रत्येकाने स्वत:ला कमी लेखू नये. स्वत:तील कलागुण बाहेर काढावे असं मला वाटतं.

तृतीयपंथी म्हटला तर समाजाचा एकच विचार होतो की हा तृतीयपंथी आहे म्हणजे हा नक्की भीक मागत असेल किंवा सेक्स वर्क करत असेल. टाळी वाजवून शिव्यागाळ करणारा, पैसे नाही दिले तर शाप देणारा अशीच तृतीयपंथाची प्रतिमा असते. पण असं नाहीये, प्रत्येक व्यक्तीला जसं देवाने आयुष्य दिलेलं आहे तसंच तृतीयपंथींनादेखील आयुष्य दिलं आहे. तेदेखील चांगल्या विचाराने आयुष्य जगण्याचा प्रयत्न करतात. जेवण बनवणं, शिवणकाम, मेहंदी काढणं, पार्लरचं काम, फॅशन डिझायनिंग, ज्वेलरी मेकिंग असे सर्व कलागुण जसे सर्वसामान्य व्यक्तींमध्ये असतात तसेच ते तृतीयपंथीयांमध्येदेखील असतात. त्यामुळे फक्त तृतीयपंथी म्हणून समाजाने आमच्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून बघायची गरज नाहीये. कलागुण आमच्यामध्येसुद्धा आहेत. फक्त त्याला वाव देणं गरजेचं आहे. आम्हीदेखील आमच्या पायावर उभं राहू शकतो आणि हा दृष्टिकोन मला समाजाला द्यायचा आहे. हे माझ्यासाठी खूप मोठं आव्हान आहे. लोकांच्या मनामध्ये तृतीयपंथीयांबाबत खूप समज-गैरसमज आहेत. ते दूर करण्यामध्ये खूप अडचणी येत आहेत, पण मी माझे प्रयत्न सोडणार नाही. इतर सर्वसामान्य माणसांप्रमाणेच आम्हालापण प्रेमाच्या, वात्सल्याच्या भावना असतात.



आयुष्याच्या एका वळणावर जीवनसाथी असावाच लागतो कारण की प्रेम कुणाला नकोय? तृतीयपंथी समाजाच्या व्यक्ती प्रेमासाठी खूप भुकेलेल्या असतात, कारण की त्यांना त्यांच्या आयुष्यात प्रेमच मिळत नाही. ना घरातून, ना मित्र-मैत्रिणींकडून, ना नातेवाइकांकडून, आणि ना समाजाकडून. तृतीयपंथीय प्रेमाच्या चक्करमध्ये बऱ्याचदा संकटाच्या वेगवेगळ्या खड्ड्यात जाऊन पडतात. त्यांना प्रेमामध्ये धोका होतो. असंही खरं प्रेम शोधणं आणि समोरच्याने आपल्याला पूर्णपणे स्वीकारणं खूप मुश्कील असतं. परंतु मी भाग्यवान आहे की मला माझा जीवनसाथी मिळाला आणि रीतसर लग्न करून मी माझ्या पतीबरोबर, त्याच्या फॅमिलीबरोबर राहते. परंतु सगळ्यांनाच असं भाग्य मिळत नाही आणि ते मिळवण्यासाठी त्यांना बरंच काही गमवावं लागतं. वयाच्या एका वळणावर खरं तर साथीदाराची गरज लागते. एक खरा मित्र ज्याच्याशी आपण सगळं काही शेअर करू शकतो अशी व्यक्ती आपल्या आयुष्यात, आपल्यासोबत असणं खूप गरजेचं आहे. आणि अशा अर्थी तृतीयपंथी समाजाची अवस्था खूप वाईट आहे. तृतीयपंथीयांना खूप मनस्ताप, खूप समस्या आणि संघर्षाला तोंड द्यावं लागतं. त्यामुळे ते सुसह्य होण्यासाठी जीवनसत्त्वाची गरज असते आणि ते प्रत्येकाला मिळालं पाहिजे असं मला वाटतं. त्यामुळे कुठे न कुठे मैत्रीच्या स्वरूपात तरी प्रेम मिळणं खूप गरजेचं आहे.

प्रत्येकाला वाटतं की आपलं छोटंसं घर असावं आणि कुटुंब असावं. एका बाईला जशी आपली संसाराची ओढ असते तशीच आम्हालासुद्धा असते. एका स्त्रीला जसं आई व्हावंसं वाटतं तसं आम्हा तृतीयपंथीयांनादेखील आई व्हावंसं वाटतं. स्त्रियांचे सर्व अधिकार आम्हालाही मिळावेत असं वाटतं. आम्हाला प्रेम मिळावं, मायेने आम्हाला जवळ घ्यावं असं वाटतं.

तृतीयपंथीयांकडे आजच्या स्थितीला काही कामधंदा, रोजगार किंवा जोडव्यवसाय नाही. त्यांना बँकेतून लोन मिळण्याची सुविधा नाही, जेणेकरून ते आपला स्वत:चा व्यवसाय सुरू करतील. इतरांप्रमाणे त्यांच्याकडेही स्किल आहे. त्यांचे स्किल डेव्हलप करून त्यांच्या कलागुणांना वाव देऊन त्यांना पायावर उभं करणं आणि त्यांना रोजगार उपलब्ध करून देणं ही सरकारची, समाजाची आणि सगळ्यांचीच जबाबदारी आहे. तृतीयपंथीयांची आर्थिक परिस्थिती खूप बिकट आहे. सध्या कोरोना महामारीमुळे माधुकरी मागणं, बधाई-बस्ती सगळंच काही ठप्प झालेलं आहे. त्यांचा रोजीरोटीचा खूप मोठा प्रश्न आहे. राहण्यासाठी भाड्याचं घर, वीजबिल आणि राशनखत देण्यासाठी त्यांच्याकडे सध्याला काहीही पैसे नाहीत. त्यांना काहीतरी छोटा-मोठा उद्योग सुरू करण्यासाठी सगळ्यांनी काहीतरी प्रयत्न केला पाहिजे. त्यांचं शिक्षण जास्त नसतं कारण शिक्षणाच्या काळातच तृतीयपंथी साडी नेसून समाजासमोर येतात. परंतु त्यांच्यातल्या स्किल्स आणि कलागुणांना वाव देऊन त्यांना रोजगार आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करू शकतो असं मला वाटतं. तेव्हा सगळ्यांनी त्यांना योग्य मदत करायला हवी.

तृतीयपंथीयांकरता वृद्धपणा हा सगळ्यात मोठा कठीण काळ आहे. एखादा तृतीयपंथी जेव्हा वृद्ध होतो तेव्हा त्याच्याकडे काहीच पर्याय नसतो. राहण्यासाठी स्वत:चं घरही नसतं. छप्परही नसतं. त्यात सगळ्या नातेवाइकांनी दूर केलेलं असतं. जवान असताना, रूप असताना सेक्स वर्क तरी करू शकतो. पण म्हातारा झाल्यावर मात्र तेसुद्धा करायला जमत नाही. पैसे मागण्यासाठी दारोदार फिरणंसुद्धा जमत नाही. तेव्हा तृतीयपंथीयांची वृद्धावस्था खूप खराब असते. खूप दशा होते तृतीयपंथीयांची. त्यांच्यासाठी समाजाने, सरकारने शेल्टर होम होस्टेल ओपन करणं गरजेचं आहे. सरकारने लक्ष देऊन प्रत्येक विभागात, प्रत्येक राज्यात तृतीयपंथीयांसाठी शेल्टर होम आणि होस्टेल सुरू करावं किंवा बाकीच्या राज्यांमध्ये जशी राहण्याची सोय झालेली आहे, त्यांना फ्रीमध्ये घरं मिळाली आहेत त्याचप्रमाणे महाराष्ट्र सरकारनेसुद्धा फ्रीमध्ये घरकुल योजना सुरू करावी. त्यामुळे त्यांच्या राहण्याची सोय होईल आणि

वृद्धापकाळामध्ये त्यांची होणारी जी उपेक्षा आहे ती थांबेल.

माझा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन खूपच सकारात्मक आहे. जीवनामध्ये प्रत्येक आव्हानात्मक प्रसंगाने मला शिकवलं आहे. जीवनाकडे नाराज होऊन स्वत:चा जीव गमावणं, जीव देणं, आत्महत्या करणं हे मला कदापिही आवडत नाही. जीवन आपल्याला भरपूर काही शिकवून जातं. जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन चांगला ठेवला आणि स्वत: आपण स्ट्रगल करण्यासाठी तयार असू तर प्रत्येक दिवस हा एक नवीन दिवस असतो. नवीन दिशा दाखवणारा दिवस असतो. तेव्हा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन आपल्याला बदलायला हवा. आज दिवस आहे तो उद्या नसणार. आणि दिवसागणिक परिस्थिती नक्कीच बदलत राहणार. त्यामुळे जीवनाकडे पॉझिटिव्ह दृष्टीने बघणं खूप गरजेचं आहे. यामुळे आपण काही करत असताना आपल्या स्वत:ला धीर मिळतो. माझा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन हाच आहे की, आपण पुढे जात राहायचं.

मला समाजाला हे आव्हान करावंसं वाटतं की तुम्ही तृतीयपंथीयांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलावा. त्यांच्यामध्येही कलागुण आहेत ते ओळखून घ्यावेत आणि त्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी मदत करावी. तुम्ही मदत केली तरच आम्ही आमच्या पायावर उभं राहू शकतो. त्यामुळे समाजाला मी हे एकच सांगेन की तुमच्या डोक्यातले समज-गैरसमज काढून टाका. आम्हाला वाळीत टाकू नका. आम्हालासुद्धा चारचौघांमध्ये राहण्याचा मान द्या. आम्हालासुद्धा इज्जत द्या. आम्हालासुद्धा काहीतरी करून दाखवण्याची उमेद द्या. आमच्या नात्यांनी आमची मदत केली नाही. आमच्यासाठी आई-वडील, भाऊ-बहीण उभे राहिले नाहीत. जसं कमळ चिखलामध्ये असतं पण ते चिखलातून बाहेर येताच देवाच्या पायाखाली वाहिलं जातं तसंच आम्हालासुद्धा या चिखलामधून समाजाने बाहेर काढावं.

मला माझ्या तृतीयपंथी बहिणींना हाच संदेश द्यायचा आहे की त्यांनी आपल्या कलागुणांना वृद्धिंगत करावं. प्रत्येकाकडे काही ना काही कलाकौशल्य नक्कीच असतं. तेव्हा त्या कलाकौशल्याला डेव्हलप करा आणि त्यातून काहीतरी रोजगार, काहीतरी व्यवसाय सुरू करा, जेणेकरून तृतीयपंथी समाजाची उपजीविका व्यवस्थित होऊ शकेल. कोरोना काळामध्ये जे हाल झाले आहेत ते होणार नाहीत याची दक्षता सर्व तृतीयपंथीयांनी घ्यावी. भीक मागणं, सेक्स वर्क करणं किंवा अजून काही करणं किती दिवस पुरणार आहे? जर तुमच्याकडे काही कलागुण असतील तर ऑनलाइनही तुम्ही ती सादर करू शकता. त्यामुळे लोक आपल्याला वेगळ्या नजरेतून बघतील आणि समाजात आपल्याला त्यांच्या बरोबरीने उभं करतील आणि आपणही समाजामध्ये बिनधास्त वावरू शकू. एकही तृतीयपंथी रस्त्यावर भीक मागता कामा नये असा भारत आपल्याला बनवायचा आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्यातील कलेला वाव देऊन प्रत्येकाने वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये काम करावं असंच मी तृतीयपंथी समाजाला सांगू इच्छिते.

मला असं वाटतं की आमच्या समाजातील लोकांनी मिलिट्रीमध्येसुद्धा सामील व्हायला पाहिजे जसे सगळे जवान आपल्या सीमेवर उभं राहून देशाचं संरक्षण करतात. देशामध्ये राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचं संरक्षण करतात तसंच तृतीयपंथीयांनासुद्धा तो मौका मिळाला पाहिजे. त्यांनासुद्धा देशासाठी आपलं जीवन वाहून घेण्याची एक संधी मिळाली पाहिजे. जेणेकरून एक खूप मोठं उदाहरण समाजापुढे उभं राहील की आमच्या समाजातील व्यक्तीसुद्धा देशप्रेमी होऊन देशासाठी आपला प्राण देऊ शकतात.

मी गेल्या वीस वर्षांपासून एलजीबीटीसाठी समाजसेवा करतेय. जिओ आणि सीबीमध्ये काम करत आहे. त्याचप्रमाणे मी लहानपणापासून नृत्याचं प्रशिक्षण घेतलं आहे. त्यामुळे मी नृत्यकला क्षेत्रामध्येसुद्धा जमेल तेवढं काम करते. मी ज्वेलरी मेकिंगसुद्धा करते. ज्वेलरी डिझायनिंग करते आणि ज्वेलरी बनवू शकते. मला आर्टची खूप आवड आहे. मी एलआयसीच्या परीक्षा देऊन भारतातली पहिली ट्रान्सजेंडर एलआयसी एजंट झाले आणि एक गृहिणी म्हणून माझं घरही सांभाळते. तर मला माझ्या तृतीयपंथी मैत्रिणींना असं आव्हान करायचंय की त्यांनी स्वत:च्या पायावर उभं राहावं. मी या माझ्या मैत्रिणींकरता पूर्णपणे मदत करू इच्छिते. त्यांना काहीतरी कलागुण शिकवण्याचा प्रयत्न करू इच्छिते. जेव्हा माझ्या तृतीयपंथी मैत्रिणी या सगळ्या वाईट गोष्टी विसरून आपल्या पायावर उभ्या राहतील तेव्हा मला खूप चांगलं वाटेल. मला चांगले-वाईट दोन्हीपण अनुभव आहेत. पण चांगल्यापेक्षा वाईट अनुभव जास्त आहेत. मला आमच्या समाजामध्ये भरपूर विरोध झाला. परंतु सगळ्यांवर मात करून मी मात्र एकच ध्येय ठेवलं आहे की तृतीयपंथी समाजाला स्वावलंबी करून त्यांना त्यांच्या पायावर उभं करण्याची प्रेरणा द्यावी आणि त्या दिशेने मी कार्य करतेय आणि यापुढेही करत राहीन.

# सारथी आहे मी...

**करीना बळीराम आडे**
ट्रान्सवुमन
*शब्दांकन :* नीना भेडसगांवकर



मी करीना बळीराम आडे, एक तृतीयपंथी व्यक्ती. माझं वय आज ४५ वर्षं आहे. एक यशस्वी वाहनचालक म्हणून मी माझी कारकीर्द घडवली आहे. स्वत:ची स्विफ्ट डिझायर कारही आहे आज माझ्याजवळ.

एक सीनिअर कार ड्रायव्हर, सामाजिक जाणिवेनं काम करणारी, गरजूंना व माझ्या तृतीयपंथी बहिणींना मदत करणारी व्यक्ती म्हणून आज लोक मला ओळखतात. पण हे सारं आजचं वास्तव आहे. त्यापूर्वी लहानपणापासून माझ्या तृतीयपंथी असण्यामुळे मी काय काय सोसलंय, माझी टिंगलटवाळी करणाऱ्या व्यक्तींनी मला किती त्रास दिलाय आणि त्यामुळे आई-वडील, काका-काकू, आजी अशी माणसं असणारा मी कसा घराबाहेर फेकला गेलो, रस्त्यावर आलो, निराधार झालो ते सारं आज मी तुम्हाला सांगणार आहे. आणि हो, त्याबरोबरच पुढच्या आयुष्यात मला चांगली माणसंही कशी भेटली, त्यांच्यामुळे मी इथपर्यंत कसा आलो, तेही सांगणार आहे.

हे सारे अनुभव सांगण्याचा हेतू हा की, एक तृतीयपंथी व्यक्तीही घराच्या, समाजाच्या जाचातून बाहेर येऊन चांगलं काम करून आपलं पोट भरू शकते. सुरुवातीची समाजाची हेटाळणी सहन करूनही प्रामाणिकपणे कष्ट करून समाजात आपलं स्थान निर्माण करू शकते हे माझ्यासारख्या मुलामुलींना कळावं. त्यांचं नैराश्य नाहीसं होऊन त्यांच्या जगण्यातली उमेद वाढावी, हा हेतू.

माझं मूळचं नाव ज्ञानेश्वर बळीराम आडे. माझा जन्म वाशिम जिल्ह्यातल्या 'मानोरा' या तालुक्यातील 'खापरदरी' या खेड्यातला. माझे आई-वडील शेतावर काम करत होते. आणि कुटुंबाचं पालनपोषण करण्याइतके पैसे ते मिळवत होते. मला एक भाऊ व दोन बहिणी. आमच्या खेड्यातल्या शाळेतच माझं प्राथमिक शिक्षण झालं. मी दहावी (नापास) पर्यंत शिकलो. आई शेतावर कामाला जायची. आम्ही मुलं अंगणात खेळायचो. पण मुलांपेक्षा मुलींमध्ये खेळण्यातच मी जास्त रमायचो. मुली करतात तसं घरकाम करायचो. ते मला खूप आवडायचं. भांडी घासणं, घरातला पसारा, कपडे नीट आवरून ठेवणं, झाडणं-पुसणं सगळं आई यायच्या आधी अगदी मनापासून करून ठेवायचो. पण माझं हे काम बघून, मुलींमध्ये खेळणं बघून आसपासची सगळी मुलं म्हणजे 'मुलगे', मला 'बायल्या', 'मामू' म्हणून चिडवायचे.

आमच्या गावात चौथीच्या पुढच्या शिक्षणाची सोय नव्हती. म्हणून मला 'मांगुलपीर' या तालुक्याच्या गावी शाळेत घातलं. तिथे मी सरकारी वसतिगृहात राहत होतो. या शाळेत सुदैवाने मुलींच्या बाकांच्या ओळीत लगेच मागे अशी जागा मला बसायला मिळाली. मला खूप 'रिलॅक्स' वाटलं. या मुली मला खूप चांगलं सांभाळून घेत होत्या.

इथे इतर मुलं वाईट वागण्याच्या खूप आठवणी असल्या तरी या शाळेतल्या काही चांगल्या आठवणी आहेत त्या सांगतो. त्या चांगल्या घटनांमुळेच मला स्वत:ची ओळख व्हायला खूप मदत झाली. झालं असं – या शाळेत दहावीत असताना गॅदरिंगच्या नाटकात काम करायची संधी मला मिळाली. आणि तीसुद्धा 'स्त्री'भूमिका. मला खूप आनंद झाला. यानिमित्ताने मला प्रथमच 'स्त्री'चा वेष परिधान करता आला. त्या रंगीबेरंगी स्त्रीवेषात मला खूप छान वाटत होतं. जणू 'स्त्री' होण्याचं माझं स्वप्न नाटकाच्या निमित्ताने पूर्ण होतंय की काय असं मला वाटलं!

याच गॅदरिंगमध्ये नाटकातील भूमिकेखेरीज स्टेजवर एक नृत्य करण्याचीही संधी मला मिळाली. नृत्याचं गाणं आजही मला आठवतंय, 'आधा है चंद्रमा रात आधी'. व्ही. शांताराम यांच्या चित्रपटातलं ते गाणं होतं! विशेष गोष्ट म्हणजे आमच्या शाळेतील आणखीही एक तृतीयपंथी विद्यार्थी माझ्याबरोबर या गाण्यात होती. खरंच मला समजतच नाहीये की त्यावेळच्या 'आमच्यासाठी होता'

हे क्रियापद वापरू की, होती? आमच्यासारख्या अन्य तृतीयपंथीयांच्या, त्या वयातल्या आयुष्यावर पडलेलं हे एक भलंमोठं प्रश्नचिन्ह आहे. आम्ही कोण आहोत हे न उलगडणाऱ्या त्या वयात!

माझ्यासाठी त्या वर्षी घडलेली आणखी एक चांगली गोष्ट म्हणजे त्या वर्षीच्या गणेशोत्सवात विविध प्रकारचे फॅन्सी ड्रेस करून बैलगाडीतून निघणाऱ्या मिरवणुकीत मला स्त्रीवेष म्हणजे सीतेचा पोशाख करून सामील व्हायचं होतं. मला अर्थातच खूप आनंद झाला, कारण आपण जे आहोत, तो 'स्त्रीचा' पोशाख मला परत करायला मिळणार होता. स्त्रीसुलभ हालचाली तर माझ्या होत्याच. इथपर्यंत सगळं छान पार पडलं, पण इथून पुढच्या काळात हे इतकं साधं सरळ व्हायचं नशिबी नव्हतं. एस.एस.सी.ची परीक्षा झाली आणि मी परत गावी घरी आलो.

आता माझ्या एक गोष्ट पक्की लक्षात आली आणि मी कोण आहे हे मला समजलं, नव्हे मी स्त्री असण्याची मला जाणीव झाली. इतरांना काय वाटेल ते वाटो, पण माझ्या 'स्त्री' असण्याच्या जाणिवेत आता बदल घडणार नाही हे माझ्या लक्षात आलं.

मग आपोआपच घरी संध्याकाळच्या वेळी मुली लावतात तशी चेहऱ्याला पावडर लाव, हलकीशी लिपस्टिक लाव असं माझं होऊ लागलं.

पूर्वीसारखं आई दिवसभर घरी नसताना तर घरकाम करून मी घर चकाचक ठेवतच होते. पण आता धुण्याभांड्याच्या कामाबरोबर इतर मुलींसोबत कमरेवर घागर घेऊन विहिरीवर पाणी आणायलाही मी जाऊ लागले. रस्त्यात जाता-येता टवाळखोरांनी केलेली टिंगल सहन करत होतेच. त्यांनी 'बाई' म्हटल्याचा मला राग नव्हता, पण त्यांनी अपमानित केल्यामुळे मी रडवेली झाले की, त्यांना मजा येई याचं दु:ख होई. मला स्त्री-मुलगी होण्याची प्रचंड ओढ वाटायची आणि आता मी वयात येऊ लागले होते. मला गावातल्या एका मुलाबद्दल ओढ वाटू लागली होती. आणि कसं कोण जाणे तोही मुलगा माझ्याकडे प्रेमाने बघायचा. थोडा थोडा बोलायचा. कुठे दुकानात गेला तर माझ्यासाठी काही खायला घेऊन यायचा. त्याच्या नजरेत माझ्यासाठी काय आहे हे कळायचं नाही. पण त्याने माझ्याकडे हसून पाहिलं की मला हलकंफुलकं वाटायचं. छान वाटायचं. जीव आनंदून जायचा!

हळूहळू त्या मुलाशी माझी ओळख वाढली. मैत्री झाली. आणि मैत्रीत मी एके दिवशी सहजच त्याच्या घरी गेले. पण ते एका मुलाने पाहिलं आणि माझ्या भावाला भेटून त्याने माझ्याबद्दल नको नको त्या खोट्या कागाळ्या केल्या. ते पाहून आसपासच्या मुलांनीही काहीही माहीत नसता माझ्या भावाचे कान भरले. माझा भाऊ भयंकर संतापला. त्याने मला खूप मारलं आणि एकच दिवस नव्हे तर रोजच संशय घेऊन तो मला मारू लागला. एकदा तर त्याने मला इतकं मारलं की, त्या माराने मी मेलो असं वाटल्यावरच तो थांबला.

तो भयंकर मार पाहून माझी आई, आजी, काका, काकू, सर्वांनी त्याला विचारलं, 'तू याला इतकं का मारतोस?' तो काहीच बोलेना पण चुलतभावाने कारण सांगितलं.

शेवटी मार संपला. मी अर्धमेला झालो होतो. शरीर ठणकू लागलं होतं. मी जिवंत आहे, हे पाहून भावाने आईला धमकी दिली. 'यापुढे एक तर हा घरात राहील नाहीतर मी.' मला हे सारं सहन झालं नाही. धडपडत उठून मी मोठ्या भावाचे जे कपडे घालत होतो ते रागाच्या भरात जाळून टाकले. हे पाहून भावाने आमच्या अख्ख्या घराला आग लावायला सुरुवात केली. यावर आई, काका, काकू यांनी त्याला कसंबसं आवरलं. वडील तर मी आठ-नऊ वर्षांचा असतानाच वारले होते.

हा सगळा प्रकार झाल्यावर याने मला घराबाहेर घालवू नये म्हणून मी स्वत:चा जीव द्यायचा खोटा प्रयत्न केला. खोटा अशासाठी म्हणतो की इतकं होऊनही मला जगायचं होतं.

दोन-तीन दिवस झाले पण भाऊ काही बदलेल असं वाटेना. मग मात्र मला वाटलं आता इथे राहण्यात अर्थ नाही. तो अंगफुटेपर्यंतचा मार, तो अपमान आणि भावापुढे कोणाचं न चालणं हे सारं लक्षात घेऊन एका रात्री मी घर सोडलं. अगदी नाइलाजाने कोठे बाहेरगावी जाण्यासाठी. गाडीभाड्याचे पैसे आईच्या पिशवीतून घेतले. अंधारात घराबाहेर पडलो खरा, पण कुठे जायचं काहीच ठरवलं नव्हतं. डोळ्यांपुढे सगळाच अंधार होता. गावाची वेस आली आणि मी ठरवलं, मुंबईला जायचं.

'मुंबई' हे एक मोठं शहर आहे आणि तिथे काम मिळतं, एवढंच माहीत होतं. पण ते कुठे आहे, कसं जायचं काहीच माहीत नव्हतं. कसातरी रखडत रखडत गावापासून रेल्वे स्टेशनवर आलो. कोणाला तरी विचारून गाडीत बसलो आणि मुंबईच्या व्ही.टी. स्टेशनवर उतरलो.

शहरात प्रवेश केला, पण या अवाढव्य शहरात माणसं काय काम करतात, कुठून कुठे जातात, पोटाचे उद्योग काय, आपण इथे काय करायचं, कुठे काम मिळेल, कुठे राहायला मिळेल, कशाचंच उत्तर माझ्याजवळ नव्हतं. पाच-सहा दिवस रस्त्यावर राहून जवळच्या पैशातून पोटाला काहीतरी खाता आलं एवढंच. पण पुढे?

आणि एक दिवस माझ्या खांद्यावर एका व्यक्तीने हात ठेवला. मला पाच-सहा दिवस त्याच एका परिसरात वावरताना पाहून ही व्यक्ती माझ्याजवळ आली होती. ती म्हणाली, ''घाबरू नकोस. तू आहेस तसाच मी आहे. आपल्याला इथे कुत्रंसुद्धा विचारणार नाही, कोणी वाली नाही, पण आपल्यासारख्या लोकांची एक संस्था आहे इथे. तिथे मला आश्रय मिळाला. तुही चल तिथे.''

मी काही न बोलता, थकलेला, भागलेला संमोहित झाल्यासारखा त्याच्यामागून चालू लागलो. पण मग चालता चालता हळूच त्याला म्हणालो, ''मला पोटासाठी काम आणि राहण्यासाठी डोक्यावर छप्पर हवंय.'' त्यावर ती व्यक्ती म्हणाली, ''या मुंबईत प्रयत्न केल्यावर एखादं काम मिळेल. पण जागा मिळणं शक्य नाही. त्यासाठी तुला आपल्या 'कम्युनिटीत' यावं लागेल. तिथले लोकच तुला स्वीकारतील आणि तुला पोटापाण्याचं कामही ते सुचवतील.''

थोड्या वेळात आम्ही कम्युनिटीत पोचलो. त्यांनी तिथल्या गुरूंची मला भेट घालून दिली आणि तिथल्या 'गुरू-चेला' परंपरेची माहितीही सांगितली. मी अधिक विचार न करता परंपरेचा स्वीकार केला. कारण मला जगायचं होतं. गुरूंना अर्थात माझं नाव, गाव, कुटुंब सगळी माहिती द्यावी लागली.

इथून पुढे माझ्या आयुष्यातल्या एका नव्या पर्वाला सुरुवात झाली. आता मी कोण आहे ते नक्की ठरलं. मी स्वत:ला करीना म्हणू लागले. हे माझ्या आवडत्या अभिनेत्रीचं नाव आहे. आता मी 'करीना बळीराम आडे' झाले.

आमच्यासारख्या तृतीयपंथी व्यक्तींना उपजीविकेचे खूपच मर्यादित मार्ग असतात. मी काही दिवस बधाई, बस्ती केलं. काही दिवस गुरूंच्या मार्गदर्शनाखाली काम करत तिथेच संस्थेत राहिले. दुकानांच्या उद्घाटनाला जाऊ लागले. हळूहळू गुरूंनी मला नाच-गाणंही शिकवलं.

त्यानंतर मी स्वतंत्रपणे मुंबईत फिरू लागले. माझी पहिली गुरू होती 'अजगर पिंकी'. आणि त्यानंतर आता शोभा हजीसाहेब या माझ्या गुरू आहेत. त्या लालनवाला घराण्याच्या आहेत.

इथवर प्रवास झाल्यावर मला वाटू लागलं की मी आता स्वतंत्र राहावं. माझ्या गुरूंची मी याबाबत परवानगी विचारल्यावर त्या म्हणाल्या, ''आता तू तुझ्या पायावर पूर्णपणे उभी राहू शकतेस याची खात्री वाटत असेल, तर अवश्य स्वतंत्र रहा.''

मी स्वतंत्र झाले आणि हिजडा समाजाच्या 'हमसफर ट्रस्ट'मध्ये राहायला व कामाला रुजू झाले.

माझ्या मनात विचार येत होते. बधाई, बस्तीची कामं आत्तापर्यंत केली पण समाजाची आमच्याकडे बघण्याची नजर किती अपमानास्पद, आम्हाला किती घृणास्पद ठरवणारी! सर्वसामान्य माणसासारखं काम करून पोट भरता आलं तर आमच्याकडे पाहण्याची समाजाची नजर बदलेल का?

सुदैवाने 'हमसफर ट्रस्ट'मध्ये मला Outreach Worker - O.R.K. म्हणून काम मिळालं. माझ्यासारख्या स्त्रियांना किंवा अडचणीत असलेल्या कोणत्याही माझ्या आया-बहिणींना मदत करावी अशी माझी पूर्वीपासूनच खूप इच्छा होती. संस्था प्रमुखांनी काही दिवस माझं काम पाहिल्यावर माझ्यातलं कम्युनिकेशन स्किल



(संवाद क्षमता) त्यांना खूप आवडलं. म्हणून त्यांनी मला कौन्सिलिंगचं शिक्षण दिलं. दोन महिने मी कौन्सिलिंगचं कामही केलं. पण पुन्हा माझ्या सद्सद्विवेक बुद्धीने मला सुचवलं की, 'तुझं शिक्षण १०वी पासही नाही, आणखी काही काळ अनुभव घेतल्याशिवाय तू या कामाला योग्य न्याय देऊ शकणार नाहीस.' माझा आतला आवाज ऐकून मी खरोखरच त्या पदाचा राजीनामा दिला आणि O.R.K. च्या कामातून पुढची अधिक प्रगती साधायची असं ठरवलं. आणि अचानक एका घटनेमुळे माझ्या आयुष्याला एक आणखी वेगळा 'टर्निंग पॉइंट' मिळाला!

आमच्या 'हमसफर ट्रस्ट'मध्ये दर शुक्रवारी एक कार्यक्रम असायचा. यात बाहेरून विशेष अतिथी संस्थेचं काम पाहायला यायचे. आणि त्यांना आम्ही 'विविध गुणदर्शनाचा' कार्यक्रम करून दाखवायचो. या कार्यक्रमाच्या तयारीच्या निमित्ताने आम्ही खूप आनंदी असायचो. संस्थेतलं वातावरण असं खेळीमेळीचं, मोकळं, छान वाटायचं आम्हाला!

या वेळी पुण्याच्या विंग्ज मॅनेजमेंटमधून दोन मंडळी संस्थेची, म्हणजे आमची विचारपूस करण्यासाठी आली होती. एक होते 'अरुण खरात' (मॅनेजमेंटचे हे प्रमुख) आणि दुसरे मॅनेजर 'अमोल राऊत'.

आमची चौकशी करता करता गप्पा मारताना त्यांनी विचारलं, 'इथे कोणी अशी तृतीयपंथी व्यक्ती आहे का, जी चारचाकी गाडी चालवते? किंवा शिकण्याची तयारी असलेली व्यक्ती? ज्यामुळे तिला ड्रायव्हिंगचं काम देता येईल?'

हा प्रश्न ऐकल्याबरोबर मी एकदम आनंदाने उडाले. कारण मला गाडी चालवता येत होती आणि माझ्याकडे ड्रायव्हिंग लायसन्सही होतं. मी लगेच तयारी दर्शवली. त्यांनी मला नाव, गाव माहिती विचारली आणि मला कामावर रुजूही करून घेतलं.

सर्वसामान्य नागरिकांनी मला ड्रायव्हर म्हणून स्वीकारावं म्हणून ते व संस्था माझ्या पाठीशी राहणार होते. अर्थात त्यांनी माझं वागणं, बोलणं, गाडी चालवणं याची खात्री व परीक्षा करून घेतली.

तरीही खरोखरच प्रत्यक्ष काम करताना मला खूप टेन्शन आलं होतं. पण नशिबाने मला साथ दिली. मला ज्यांचं काम मिळालं होतं, त्या कॅब कंपनीचं नाव होतं, 'बुक माय कॅब'. विशेष म्हणजे, पहिल्याच वेळेला मला ११ बुकिंग्ज मिळाली आणि मी ११ स्टार्सची मानकरी झाले.

माझ्या पहिल्याच बुकिंगबद्दल एक आनंददायक अनुभव सांगावासा वाटतो, तो असा –

माझ्या गाडीत एक नवविवाहित जोडपं आणि त्यातल्या एकाची ७५ वर्षांची आई असं कुटुंब होतं. बहुधा या आईंना तृतीयपंथी लोकांबद्दल सहानुभूती असावी. कारण एरवी समाजात वावरताना, बधाई-बस्तीच्या वेळी मला जो अनुभव यायचा त्यापेक्षा हा फार वेगळा अनुभव होता. मला पाहताच त्या आई म्हणाल्या, ''अरे वा, तू?'' जणू आमची पूर्वीची ओळख होती!

त्यांच्या बोलण्याने मला इतका आनंद झाला की, आम्ही लोक म्हणजे जगातली 'एक अडचण' या समाजाच्या भावनेचे दाट काळे ढग माझ्या मनावरून एकदम बाजूला झाले. आणि जणू प्रकाशाचा एखादा उबदार किरण अंगावर पडावा तसं वाटलं.

त्या फॅमिलीतल्या मम्मांनी मला नाव विचारलं आणि विजयनगरीहून अंबरनाथला जायचंय हे सांगून लगेच बरोबरच्या जोडप्याची माझी ओळख करून दिली. ''ही माझी सून आणि हा मुलगा आणि आपल्याला पहिल्यांदाच हिच्या आईकडे जायचंय हं.'' मी आनंदाने तयार झाले. आठ तासांचं माझं हे बुकिंग होतं. ड्रायव्हरच्या भाषेत सांगायचं तर 'पिक अप' आणि 'ड्रॉप' होतं. मी वाहनचालक म्हणून प्रामाणिकपणे माझी भूमिका बजावत होते पण त्यांनीही मला खूप आपुलकीने वागवलं.

त्यांना अंबरनाथला ड्रॉप केल्यावर ते म्हणाले, ''तू गाडीमध्ये नाही थांबायचं, आमच्याबरोबर घरातच चल.'' मी नकार दिला तर त्या म्हणाल्या, ''आई म्हणतेस ना मला, मग चल बरं.'' त्यांनी मला चहा-पाणी, खाणं दिलं. हसून-खेळून बोलण्यात माझा दिवस खूप छान गेला. मी त्यांना अंबरनाथहून पुन्हा हिरानंदानीला सोडलं तेव्हा जगात जशी वाईट माणसं असतात तशी चांगलीही असतात यावर माझा विश्वास बसला. पण तरीही माझी खंत अशी आहे की, माझ्यासारख्या सगळ्याच माणसांकडे (मी माणसांकडे म्हणते कारण आम्हीही माणसं आहोत) सर्व लोकांनी 'हाही एक माणूस आहे' म्हणून पाहावं. आमच्याकडे पाहण्याची दृष्टी बदलावी. आज जशी मी एक करिना गाडी चालवते, तशी सर्व तृतीयपंथीयांना सर्व प्रकारच्या कामात येण्याची समाजाने संधी द्यावी. आणि माझ्या भावा-बहिणींनीही भिक्षा मागण्यापेक्षा ही संधी स्वीकारावी.

माझं पहिलं बुकिंग, दुसरं, तिसरं, चौथं, पाचवं आणि पुढेही सातत्याने एकाहून एक प्रतिष्ठित, सभ्य प्रवासी मला 'बुक माय कॅब' या कंपनीमुळे (हमसफर ट्रस्ट) मिळाले. माझं काम पाहून परदेशी पाहुण्यांची जबाबदारीही त्यांनी माझ्यावर सोपवली. तसंच टाटा कन्सलटंसी सर्व्हिसच्या (T.C.S.) अधिकारी व नोकर मंडळींचंही रोजच्या पिक अप अ‍ॅन्ड ड्रॉपचं काम त्यांनी मला दिलं. यात सर्व तरुण मुलामुलींचाही माझ्यावर छान विश्वास बसला. ही तरुण पिढीची मुलंमुली माझ्याशी छान संवाद साधायची याचं मला आश्चर्य आणि आनंद वाटायचा. माझंही वर्तन कधीच आक्षेपार्ह नव्हतं.

एक वर्ष याप्रमाणे काम झाल्यावर पुढच्या वर्षी ठाण्याला माझी राहण्याची सोय झाली. जाण्यायेण्याच्या सोयीसाठी मग मी मणिवाड्याच्या यंत्रापार्कमध्ये असलेल्या T.C.S.च्या शाखेत बदली करून घेतली. तिथून माझी बदली ऐरोलीच्या माइंड फ्रेशच्या कॉलसेंटरच्या मुलामुलींना पिक अप अ‍ॅन्ड ड्रॉप करण्यासाठी झाली. आणि दोन वर्षांपूर्वी पुन्हा मूळ शाखेत असं खूप काम झालं.

आता आर्थिकदृष्ट्या मी त्यातल्या त्यात स्थिर झाले. ट्रान्सजेंडर या विषयावर मी मात करण्याचा प्रयत्न करत होते. जमेल तशी लोकांना मदत करत होते.

पण माझ्या जन्मदात्या आईला, घरातल्या माणसांना त्यांच्या गरिबीत मी मदत केली पाहिजे, त्यांना आधार दिला पाहिजे, असं मला वाटू लागलं. जरी त्यांनी मला नाकारलं होतं.

त्यानंतर मग ज्या भावाने मला प्रचंड मारहाण केली, मानसिक छळ केला त्याचीच विधवा पत्नी, त्याच्या तीन मुली, माझी आई अशी सर्वांना घेऊन मी मुंबईला आले. त्यांना सांभाळणं ही माझी जबाबदारी आहे असं मला मनापासून वाटत होतं.

भावाच्या तिन्ही मुलींना मी उत्तम शिक्षण दिलं. मोठीचं बारावी झाल्यावर, तर मधलीचं आय.टी.आय.चा कोर्स झाल्यावर, चांगली मुलं बघून लग्न करून दिलं. त्या दोघी आज सुखाने संसार करताहेत. मोठी लग्न झाल्यावर पदवीधर झाली. लग्नानंतर पाच वर्षांनी तिला एक गोड मुलगी झाली आहे - अनन्या! माझी लाडकी नात. भावाच्या तीन नंबरच्या मुलीला १२वीला इतके छान मार्क्स पडले की, तिला मेडिकलला घालायचं होतं. पण ती म्हणाली की, आत्या एवढा मोठा खर्च आपल्याला झेपणार नाही. त्यामुळे आता ती एसएनडीटी कॉलेजमधून बी.एस्सी. नर्सिंग पूर्ण करत आहे.

कधी कधी मला नियतीचं आश्चर्य वाटतं की, ज्या भावामुळे मी बेघर झाले होते, त्याच्याच मुलींचं शिक्षण करताना, त्यांना प्रेम देताना, त्यांचं आयुष्य उभं करताना माझ्या मनात काडीचाही आकस नव्हता. ही मी परमेश्वराची कृपा मानते.

घरच्यांसाठी काम करताना मला समाधान वाटत होतं, तसंच समाजाने नाकारलेल्या माझ्या तृतीयपंथी भगिनींसाठी काही करावं, त्यांच्यासाठी एक 'निवारा घर' उभं करावं अशी माझी महत्त्वाकांक्षा होती. यासाठी मला माझ्या कामाचं वर्तुळ अधिक मोठं करायला हवं

असं वाटत होतं. म्हणून मग नगरसेवक, महिला मंडळं, आमदार, खासदार अशा लोकांचं पिक अप ॲन्ड ड्रॉप मी सुरू केलं. त्यांच्यामध्ये उत्तम काम केलं. थोरामोठ्यांच्या ओळखी झाल्या. नाव कमावलं. आणि या लोकांच्या मदतीने पुढे काही काम उभं करावं अशा विचारात असतानाच अचानक 'कोविड' सुरू झाला. आणि सारंच जग जणू थांबलं.

कोविड सुरू झाला त्या काळात कंपनीच्या टॅक्सीचं पूर्ण वेळ काम करताना माझी खाजगी गाडी घेऊन सोशल वर्क म्हणून कोविड रुग्णांना हॉस्पिटलमध्ये नेण्या-आणण्याचं काम करू लागले. महिला मंडळातल्या महिलांचंही पिक अप ॲन्ड ड्रॉप करू लागले.

कोविडमुळे सगळं जगच आर्थिकदृष्ट्या ठप्प झालं होतं, मग माझं गाव तरी त्याला अपवाद कसं असणार? म्हणून लॉकडाऊनच्या काळात मी गावी घरी आले. माझ्या गावातल्या ११० कुटुंबीयांना रेशन, धान्य, मेडिकल किट्स, ब्लँकेट्स, ब्लाऊज पिसेस, ओढण्या अशा गोष्टी पुरवण्यासाठी मी जोडलेल्या माझ्या आदरणीय बहिणी आणि त्यांची महिला मंडळं धावून आली. नागपूरच्या आदरणीय अरुणाताई पुरोहित, श्रद्धा जोशी, पद्मश्री सारडा आणि त्यांचं राजस्थानी महिला मंडळ यांचे ऋण मी कधीच विसरणार नाही. तसंच या काळात मदत करण्याचा एक थोर नमुना मला तुम्हाला सांगायचा आहे. त्या म्हणजे आदरणीय हेमांगीताई महाडिक. नुकतंच त्यांनी त्यांच्या जन्माच्या जोडीदाराला गमावलं होतं. संसार संपल्याचं दु:ख त्यांच्या मनात भरून राहिलं होतं. पण... मनाचा केवढा मोठेपणा! आपलं दु:ख विसरून त्यांनी स्वत:चं मंगळसूत्र विकलं आणि त्या पैशांतून गावाकडे माझ्या कुटुंबातील माणसांना, रोजगारहीन काळात आर्थिक मदत केली. स्वत:चा संसार संपला तरी दुसऱ्याचा उभा केला. याखेरीज त्यांनी एक गाय घेऊन ती आमच्या दारात बांधली आणि तिच्या देखभालीचे पैसेही ते दरमहा आम्हाला देतात.

खरं तर मी भाग्यवान. माझ्या प्रतिकूल दिवसांत किती किती माणसांनी मला आधार दिला. मानसिक बळ दिलं. आणि माझं जगणं सोपं केलं. त्या त्या व्यक्तींची नावं कृतज्ञ होऊन मला तुम्हाला सांगायची आहेत. कोणाचं नाव राहिल्यास कृपया माझ्यावर रागावू नये.

श्री. मिलिंद जोशी, त्यांची पत्नी आणि त्यांची दोन्ही डोळ्यांनी अंध असलेली सुकन्या या कुटुंबानं माझ्यावर खूप प्रेम केलं. त्यांच्या घरात मला घरच्यासारखं वागवलं. बरोबर जेवायला खायला तर सततच घातलं. स्वत:चं अंधपण विसरून त्यांच्या एकुलत्या एक लेकीने मला दिदी म्हणून हाक मारली तो क्षण मी विसरू शकत नाही. आजही ती मला मोठी बहीण मानते.

विद्या प्रसारण संस्थेतील प्रेरणा मावशी, नागपूरच्या निशा मालपाणी. अर्ध्या रात्रीही माझं दु:ख ऐकून घेणारे माझ्या वडिलांच्यासारखे माझ्या मावशीचे यजमान उत्तम पवार, एका पायाने अधू असलेले अनिल पवार या साऱ्यांनी माझं तृतीयपंथीपण समजून घेऊन माझ्यावर माया केली. त्यातलंच आणखी एक महत्त्वाचं नाव म्हणजे आमच्या गावच्या जगदंबेच्या मंदिराचे आदरणीय पुजारी विष्णु पवार. या व्यक्तीने मला मंदिरात आरतीचा मान दिला, पारायणात सामील करून घेतलं आणि माझा आत्मविश्वास वाढवला. त्यांच्या कुटुंबातही मी आता मिसळून गेले.

मी प्रामाणिकपणे कष्ट करून पोट भरू लागल्यावर पुढच्या आयुष्यात जी अनेक चांगली माणसं मला भेटली तशीच माझ्या बहीण-भावांनाही ती मिळावीत म्हणून मी आमच्या कम्युनिटीच्या वतीने आमची दु:खं आणि समस्या सांगते. काही बाबतीत समाजाकडून अपेक्षाही व्यक्त करते.

तृतीयपंथी व्यक्तीही तो, ती प्रमाणेच 'ते' म्हणून नैसर्गिकपणे जन्माला आलेली 'माणसं' आहेत, हे समाजाने समजून घ्यावं. तिची टिंगलटवाळी न करता तिला आपल्यात सामावून घ्यावं. तिला उपजीविकेसाठी काम द्यावं.

एक 'माणूस' म्हणून आम्हाला वागवलं गेलं तर आम्ही नोकरी, व्यवसाय, शिक्षण या सगळ्या गोष्टी करू शकतो. अशी काही उदाहरणं आज आपल्याला दिसत आहेत. हे समजून घ्यावं.

आम्हाला कोणी घर भाड्याने देत नाही व दिलं तर प्रचंड भाडं मागतात. शासनानेही यात लक्ष घालावं असं वाटतं.

समाजाच्या केवळ माहितीसाठी पुढील व्यथा मी सांगते. आम्हालाही सर्वसामान्य माणसासारखा संसार करावासा वाटतो. पण आम्हाला लाइफ पार्टनर मिळत नाही. तरुणपणी ठीक आहे, पण वृद्धापकाळी दोन्ही माणसांना आधार हवा. कधी कधी वाटतं – मृत्यूनंतर दहनविधीला तरी आपलं कोणी हवं, नाहीतर आमच्यासारख्या व्यक्ती बेवारस म्हणून रस्त्यावर पडून राहतात, हेही आम्ही पाहतो.

तेव्हा हे सारं कधी कमी होईल? आम्ही सामान्य माणूस कधी होणार? हा प्रश्न अहोरात्र छळत असतो. आमच्या किन्नर समाजाच्या वतीने शेवटी एवढंच म्हणावंसं वाटतं –

*टाळ्या वाजवून थकलेल्या आम्हाला*
*नको आता भीक नि उपकार*
*शक्य असेल तर द्या, माणूस म्हणून रोजगार!*
*जय भारत!*

समाजात चांगुलपणा आहे, याचा मला अनुभव आला आहे. आदरणीय ज्ञानेश्वर मुळेजी सरांच्या चांगुलपणाच्या चळवळीमुळे हा चांगुलपणा जगभर पसरो अशा माझ्या चळवळीला शुभेच्छा आहेत.

# दामिनीची कहाणी




**दामिनी यशवंत रेगडे यांची मुलाखत**
**ट्रान्सवुमन**
***मुलाखतकार : एसीपी सुधीर कुडाळकर***

'पाल ॲडोप्शन ॲन्ड रेस्क्यू ग्रुप' या समूहामार्फत मुक्या प्राण्यांची सेवा करत आहे व मुक्या प्राण्यांसाठी करत असलेली समाजसेवा हा माझा जिव्हाळ्याचा विषय आहे. पण जनावरांपेक्षादेखील काही वर्ग फार उपेक्षित जगतायेत. अजूनही म्हणावं तितकी समाज जागृती याबाबत झालेली नाही. कितीतरी क्षेत्रं आज दुर्लक्षित आहेत, जिथे माणसाने माणूस म्हणून बघणं आणि माणूस म्हणून वागवणं गरजेचं आहे.

टाळ्यांचे आवाज कानावर आले की आपण नजर फिरवतो. हास्यास्पद काहीतरी समोरून गेलं इतकंच किंवा कधीतरी कुतूहल जागवतं इतकंच काय ते! तुमच्या लक्षात आलंच असेल मी कोणाविषयी बोलतोय ते...

होय! ट्रॅफिक सिग्नल, टोल नाका, लोकल, गर्दीच्या ठिकाणी समाजाने ज्यांना अक्षरश: भिकारी बनवून ठेवलं अशा धडधाकट किन्नरांविषयी मी बोलतोय... ही अवस्था का? हा प्रश्न मला बोचतोय. मन, हृदय, बुद्धिमत्ता सारंच तर आहे या गटाकडे, मग आपण का समाजप्रवाहात त्यांना समाविष्ट करून घ्यायला कचरतो? कारणं असंख्य असतील, पण आता बुरसटलेल्या विचारांच्या बेड्या निखळून पडायला हव्यात. एक नवं जगणं ह्या वर्गाला बहाल करता यायला हवं. अशीच एक किन्नर समाजातील दामिनी मला भेटली. थक्क करणारी दामिनीची कहाणी अगदी तिच्याच शब्दांत थोडक्यात सांगतो.

"साहेब, मी दामिनी बोलते. माझं संपूर्ण नाव आहे दामिनी यशवंत रेगडे. मी मानखुर्द, मुंबईमध्ये राहते. परवा देवीच्या पूजेत होते बघा. पण तुमच्याशी बोलणं झालंच नाही."

मी तिला म्हणालो, "दामिनी, आता बोलूयात. बोल, सांग तुझी कहाणी!"

ती म्हणाली, "हो बोलते ना."

मी तिला म्हणालो, "हे लिहून सर्वांना वाचायला देणार, चालेल नं तुला?"

त्यावर ती म्हणाली, "साहेब, आमचं कोणी ऐकतं यात किती समाधान आहे हो! बिनधास्त लिहा आणि सगळ्यांना सांगा. तुमच्यासारखा मोठा अधिकारी आमच्याविषयी कळकळीने बोलतोय हेच खूप बरं वाटतंय बघा." असं म्हणून तिने आपल्या मनातल्या सर्व गोष्टी व्यक्त करायला सुरुवात केली.

"साहेब, समाजाने नाकारलेली मी आणि आमच्यासारखे कितीतरी. काय बोलावं आमच्याविषयी? पण साहेब, आयुष्यात मी हिम्मत हारले नाही. मी उत्साहाने जीवन जगते. कोणाकडे काही सण, समारंभ असेल तर त्यांना जेवण बनवून देते. माझ्या हातचा 'पाईनॅपल शिरा' सगळ्यांना खुप आवडतो. साहेब, मी होलसेलमध्ये साड्यांचा बिझनेसदेखील करते. स्त्रियांकरता बचत गट चालवते. गणपती उत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी अशा सार्वजनिक सणांना तरुण मुलांना समारंभाच्या नियोजनाकरता योग्य ते मार्गदर्शन करते आणि हो, महत्त्वाचं म्हणजे मी मुंबई दर्पण फाउंडेशनकरता २०१२ ते २०१६ सालापर्यंत



**ती म्हणाली, ''हिजडा समुदायाला कोणी काम देत नाही साहेब. घराबाहेर पडल्यावर कोणती कागदपत्रं नाहीत. रूम घ्यायची झाली तरी भाडं डबल द्यावं लागतं. सोसायटी प्रॉब्लेम करते, टिंगलटवाळी, अनेक दडपणं असतात.**

एचआयव्ही कौन्सिलर म्हणून काम केलं. अशा खूप समाधानाच्या गोष्टी आहेत माझ्या आयुष्यातल्या. पण लॉकडाऊनमध्ये हालत झाली बघा आमची. कितीतरी जण एचआयव्ही पॉझिटिव्ह, ना दवाखान्यात जाण्या-येण्याची सोय, ना कोणते मेडिसिन आमच्यापर्यंत पोहचले. आहो, आम्हालाही इतर आजार असतात. ना बीपीच्या गोळ्या, ना डायबिटीसच्या गोळ्या, काही म्हणता काही नाही आमच्याकडे आले. घरातून हाकलून लावलेले, नकोसे झालेले आम्ही समाजानेही नाकारलेच.

''टाळ्या पिटून भीक मागणं हेच का आमचं आयुष्य? आमच्याकडेही बुद्धी आहे, मन आहे, हृदय आहे. समाज जेव्हा घृणास्पद वागणूक देतो ना, तेव्हा काळीज पिळवटून निघतं. वाटतं, लोकलच्या डब्यात बाईशेजारी बसलो की बाईने बाईसारखंच मला बघावं. पण त्यांचं हसणं, उठून बाजूला निघून जाणं, दुर्लक्ष करणं, घाबरणं, हे सगळं जिवाला लागतं बघा. मला तर वाटतं मी बाई होऊनच जगावं. माझ्यातल्या बाईचं मन कोणी ओळखू शकेल का? साहेब, माझ्या अगदी मनातलं बोलतीये.''

मी तिला जरा धाडस करून विचारलं,

''दामिनी, प्रेम जडलं का कधी तुझं कोणावर?''

तिने अगदी मनमोकळेपणाने उत्तर दिलं,

''हो साहेब, पण त्याच्या सुखासाठी दूर झाले त्याच्या आयुष्यातून. त्याने लग्न केलं दुसरीसोबत, एक मुलगा पण आहे त्याला. मला तेव्हा खूप त्रास झाला, पण मानसोपचार तज्ज्ञांनी मला खूप मदत केली. मला खूप वाटतं मीपण आई व्हावं, संसार असावा, माझ्यावर प्रेम करणारा असावा. पण तसं घडत नाही नं! मग मी लहान मुलांमध्ये रमते, देवीची पूजा करते. साहेब, आयुष्यासाठी खूप झगडा करावा लागला मला.''

मला खूप उत्सुकता होती की घरच्यांची तिला कशी साथ मिळाली असेल, म्हणून मी तिला विचारलं, ''आई-वडिलांचा अनुभव कसा आहे ग तुझा?''

ती म्हणाली, ''तेच झालं ना. आई आपली असली, तरी वडिलांना वाटतं आपण कोणत्या मुलाला जन्म दिला. मग ते शिवीगाळ, मारझोड करतात. टोमणे देतात आईला. आई ती आईच असते. तिच्यासारखं प्रेम कोणीच करू शकत नाही.

''पण मी लहानपणीच, माझं वय वर्षं नऊ असतानाच, आयुष्य समजून घेतलं. हॉटेलमध्ये भांडी घासली, फडकं मारलं, मेहनत केली, शिक्षण घेतलं, पत्रकारिता केली. नंतर संस्थेत काम केलं आणि आज एका बँकेत जॉब करते. रात्री लेडिजला घरापर्यंत नेण्याची जबाबदारी मी पार पाडते. तृतीयपंथी गार्ड म्हणून माझं पहिलं नाव आहे.''

माझ्या तोंडून आपसुकच निघालं, ''खरंच तू खूप विचारी, धाडसी आहेस. कर्तबगार आहेस. पण तुझ्यासोबत इतरांची अवस्था काय?''


ती म्हणाली, ''हिजडा समुदायाला कोणी काम देत नाही साहेब. घराबाहेर पडल्यावर कोणती कागदपत्रं नाहीत. रूम घ्यायची झाली तरी भाडं डबल द्यावं लागतं. सोसायटी प्रॉब्लेम करते, टिंगलटवाळी, अनेक दडपणं असतात. समाजाच्या दृष्टिकोनातून जोगता, हिजडा देवीचे करते, आशीर्वाद देतात. पण ते जाऊ देत, खूप सांगण्यासारखं आहे साहेब, पण लॉकडाऊनने हालत केली. लाईट बिल माफ नाही, मोबाइल रीचार्ज फ्री नाही. ट्रेन बंद असल्यामुळे खूप प्रॉब्लेम झाले आमचे. साहेब आमचं आयुष्य संपेल, पण सतावणारे प्रश्न संपणार नाहीत.''

मंडळी, खरंच दामिनीची आणि असंख्य तृतीयपंथीयांची प्रश्नमालिका ही न संपणारी आहे. पण आपण सर्वांनी जर या घटकांचा विचार केला तर अशक्य असं काहीच नाही. कितीतरी दामिनी प्रतिक्षेत आहेत. त्यांचंही आयुष्य आपण बदलू शकतो. चला तर मग, उपेक्षितांचं जगणं संपवूया. थोडी कदर, थोडं प्रेम, थोडा आपलेपणा आणि इज्जतीचं काम देऊन समाजप्रवाहात त्यांनाही समाविष्ट करून घेऊयात.

शेवटी म्हणतात ना, 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे.'

# भावना, संघर्ष आणि आत्मविश्वास यांचा सुरेख मिलाफ म्हणजे 'पिया'

**पिया सवाईराम**
ट्रान्सवुमन
*शब्दांकन :* सौ. शैला कांबरे



हृदयी प्रीत जागते, जाणता अजाणता, अशीच प्रीत 'गणेश' या मनाने सोज्ज्वळ असलेल्या, स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून रिक्षाचालक म्हणून काम करणाऱ्या माझ्या लाइफ पार्टनरबद्दल निर्माण झाली. मी कळत-नकळत माझे मन त्याला देऊन बसले. आता आम्ही दोघे गेली सात वर्षे एकत्रच राहतो. त्याचा एक दिवसाचा दुरावाही मला सहन होत नाही.

म्हणूनच माझे व्हॉट्सॲपचे स्टेटस -

*'एक आस, एक विसावा,*
*तुझा चेहरा रोज दिसावा,*
*नाहीतर तो दिवसच नसावा.'*

असे मी ठेवले आहे.

मला माझ्या लाईफ पार्टनरसोबत जन्मभर राहायचे आहे. जशी आपल्या समाजातील स्त्रियांची इच्छा असते की, मरेपर्यंत आपण सौभाग्यवती असावे, तशीच मला लाइफ पार्टनरसोबत जन्मभर राहण्याची इच्छा आहे. आणि माझा प्रियकर गणेश हा मला माझ्या व्यवसायात अखंड साथ देत आहे. पण माझ्या घरच्यांना, मी एकच मुलगा आणि माझी बहीण ही एक मुलगी असल्याने व मी तृतीयपंथी असल्याने वंश वाढू शकत नाही, ही खंत आहे. तशीच खंत गणेशच्या आई-वडिलांनाही तो एकुलता मुलगा असल्याने राहू नये, म्हणून त्याने लग्न करावे अशी माझी मनापासून इच्छा आहे.

'प्रेमवेडी राधा, साद घाली मुकुंदा' या काव्यातील राधा जशी श्रीकृष्णवेडी झालेली असते तशीच मी 'पिया' गणेशवेडी झालेली आहे. राधेने श्रीकृष्णावर जसे निस्सीम प्रेम केले तसेच माझे गणेशवर प्रेम आहे आणि कायम राहील.

तृतीयपंथी म्हणून जन्माला आले याचे दु:ख मी करत बसले नाही. लहानपणी मुलींसारखे वागावे असे वाटे, पण आई-वडिलांच्या भीतीने तशी वागत नव्हते. पण मोठी होत गेले तेव्हा मला साडी नेसावी, बांगड्या घालाव्या अशी प्रबळ इच्छा होऊ लागली. तेव्हा आई-वडील दोघांचीही ते स्वीकारण्याची मानसिक तयारी झाली नाही. मग मी दोन वर्षे घरापासून बाहेर राहिले. इतर तृतीयपंथीयांप्रमाणे मीही टाळ्या वाजवून दुकाने,

> **सुरुवातीला एका दुकानगाळ्यात स्त्रियांच्या मेकअपचे साहित्य, ज्वेलरी अशा वस्तू, छोट्या पर्स ठेवून विक्री सुरू केली. हळूहळू व्यवसायाचा जम बसू लागला. मग मी आणखी एक दुकानगाळा रेंटवर घेऊन ब्रँडेड पर्सचे भव्य शॉप सुरू केले. माझ्या व्यवसायामुळे आज समाजातील चार मुलींना नोकरी मिळाली. मला माझ्या लाईफ पार्टनरची म्हणजे गणेशची साथ नेहमीच असते. मी जेव्हा एक बिझनेसवुमन म्हणून चेअरवर बसते तेव्हा समाजाचा माझ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन चांगला असतो. याचा मी स्वत: अनुभव घेतीये.**

स्टेशन अशा ठिकाणी पैसे कमावले. पण हे करत असताना स्त्रियांना लागणाऱ्या मेकअपच्या वस्तू, ज्वेलरी, पर्स, नटण्याची शृंगाराची साधने कोणकोणत्या दुकानात मिळतात याचे निरीक्षण मी करत होते. अगदी पुण्यामुंबईपर्यंत फिरून मी या वस्तूबाबत अभ्यास केला आणि मग एकेदिवशी ठरवले की, आपण स्त्रियांना आवडणाऱ्या आणि आताच्या काळात स्त्रियांना आवश्यक अशा मेकअप व शृंगाराच्या साहित्याचे 'शॉप' सुरू करायचे. पण मग माझ्यासमोर प्रश्न होता तो भांडवलाचा. पैसे कोठून उभे करायचे? मी बचत करून काही पैसे साठवले होते, पण त्यातून काहीच करता आले नसते.

बँकेत लोन मागायला गेले तर आधार कार्डवरील तृतीयपंथी हे जेंडर पाहून बँकेने लोन दिले नाही. आता अगदी परवाची गोष्ट. मी एका बँकेत अकाउंट काढले. अकाउंट चालू झाले असा मेसेजही आला. पण नंतर मला कळवण्यात आले की ट्रान्सजेंडर हा ऑप्शन बँकेच्या सॉफ्टवेअरमध्ये नसल्याने तुमचे खाते चालू होऊ शकत नाही. म्हणजे तृतीयपंथी आहोत ही आमची चूक आहे का? जसा एक पुरुष माणूस असतो, जशी एक स्त्री माणूस असते, तशीच तृतीयपंथी व्यक्ती हीसुद्धा माणूसच असते ना? मग आमच्याच बाबतीत असे प्रॉब्लेम का होतात?

अशा प्रश्नांची उत्तरे मिळवत मी माझ्या तृतीयपंथी मित्रांकडून पैशांची जमवाजमव केली. माझ्या मित्रांनी सावकाराकडून कर्ज घेऊन पैसे दिले. आणि अगदी भव्यदिव्य स्वरूपाचे 'रेणू नॉव्हेल्टीज' हे शॉप इचलकरंजीसारख्या शहरात मध्यवर्ती ठिकाणी सुरू केले. सुरुवातीला एका दुकानगाळ्यात स्त्रियांच्या मेकअपचे साहित्य, ज्वेलरी अशा वस्तू, छोट्या पर्स ठेवून विक्री सुरू केली. हळूहळू व्यवसायाचा जम बसू लागला. मग मी आणखी एक दुकानगाळा रेंटवर घेऊन ब्रँडेड पर्सचे भव्य शॉप सुरू केले. माझ्या व्यवसायामुळे आज समाजातील चार मुलींना नोकरी मिळाली. मला माझ्या लाईफ पार्टनरची म्हणजे गणेशची साथ नेहमीच असते. मी जेव्हा एक बिझनेसवुमन म्हणून चेअरवर बसते तेव्हा समाजाचा माझ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन चांगला असतो. याचा मी स्वतः अनुभव घेतीये. लहानपणी आणि तरुणपणी ज्या समाजाने किन्नर, छक्का, बाबू अशा वर्णनाने मला हिणवले होते, तोच समाज आज मला एक यशस्वी उद्योजिका म्हणून मान देत आहे. अनेक ठिकाणी मला कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करतात. आज मला या इचलकरंजी शहरात मान मिळतो आहे. त्याबद्दल या शहरवासीयांना धन्यावाद द्यावेसे वाटतात. आणि महाराष्ट्रात सर्वांत प्रथम तृतीयपंथीयांचे रेशन कार्ड आणि मतदान




ओळखपत्र हे इचलकरंजीतच तयार झाले. इचलकरंजी नगरपालिकेने २५ लाख रुपये तृतीयपंथीयांच्या विकासयोजनांसाठी राखून ठेवले आहेत. इचलकरंजीमधील लोक एकात्मतेने राहतात हा माझा अनुभव आहे. समाजकल्याण विभाग कोल्हापूर या ठिकाणचे मला सदस्यत्वही मिळाले आहे. तृतीयपंथींच्या आरोग्यविषयक किंवा इतर समस्या सोडवणारी 'मुस्कान' या संस्थेमध्येही मी पदाधिकारी म्हणून कार्य करत आहे. जसे मी मनाशी ठरवले की आपण जन्मभर याचक म्हणून न राहता काहीतरी उद्योग करून स्वतःच्या पायावर उभे राहायचे, तसे माझ्यासारख्या इतर तृतीयपंथीयांनीही असे मनाशी ठरवून काहीतरी स्वतःचा उद्योग केला पाहिजे.

थोडा संघर्ष तर सर्वांनाच करावा लागतो. माझ्या प्रत्येक तृतीयपंथी फ्रेंडला मी हेच सांगू इच्छिते,

'जे काही करायचे ते हिमतीवर करा.

जे लोक आपल्या टाळीवरून आपल्याला हिणवतात,

तेच लोक तुमच्या हिमतीला दाद देऊन टाळ्या वाजवतील!'

# चांगुलपणाच्या हिंदोळ्यावर

**धनंजय भावलेकर**
**नाट्य-सिने लेखक, दिग्दर्शक, पुणे**




समाजात कुठल्याही क्षेत्रात आपण वावरत असताना विविध लोकांना आपण भेटत असतो. अनेक वेगवेगळ्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय प्रवाहामध्ये देवाणघेवाण होत असते. संपूर्ण जगामध्ये भारत हा देश अगदी विविधतेने नटलेला आहे. अनेक भाषा, जमाती, धर्म, संस्कृती, उत्सव यांनी खच्चून भरलेला आहे. या सर्वांची प्रतिबिंबे कलेच्या विविध रूपांमध्ये आपल्याला पाहायला मिळतात. कलेला विविध वर्गातील रसिकवर्ग आत्मसात करत असतो. नाटक हा फॉर्म साहित्यात आणि आविष्कार म्हणून ही महत्त्वाची भूमिका पार पाडतो. नाटक माध्यम हे इतके प्रभावी आहे की समोरच्या प्रेक्षकांना नाटकात मांडलेल्या विषयाशी समरस करून टाकतो. अनेक नाटके ही समाजातील गुंतागुंतीच्या प्रश्नांवर आधारित असतात. त्यातून एखादा सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केलेला असतो. समाजातील दुर्बल घटकांना परिघावरून केंद्रस्थानी कसे आणता येईल हा प्रयत्न सुरू असतो. अशाच एका नाटकात म्हणजे माझ्या महाविद्यालयीन जीवनामध्ये उत्तम बंडू तुपे यांच्या 'झुलवा' या नाटकापासून सुरुवात झालेली होती. या नाटकात मी गावातील पानवाला तांबोळी ही भूमिका केली होती. भूमिका जरी छोटी असली तरी नाटकाचा एकूण आवाका आणि ग्रामीण विषय, वास्तविकता दर्शवणारा होता. नाटकात एकूण सहा गाणी होती आणि ती लाईव्ह म्हणण्यासाठी होती. 'झुलवा' हे नाटक देवदासी आणि यल्लामा देवीला पुजणारे लोक आहेत त्यावर आधारित आहे. या नाटकातील परसू (परशुराम) हे पात्र तृतीयपंथी आहे. अतिशय भेदक पद्धतीने हे पात्र रेखाटलेले आहे. नाटकातील मुख्य पात्र जगन, जी देवाला सोडलेली आहे तिचा देवाबरोबर झुलवा लागलेला आहे आणि गावातील लोक तिचा उपभोग घेतात. लैंगिक शोषण करतात हे या नाटकात दिसते. जगनपाठोपाठ परसू हे तृतीयपंथी पात्रदेखील अशाच चुकीच्या रूढी-परंपरांमध्ये अडकलेले दिसते. परसूला कुठलीही सामाजिक प्रतिष्ठा नाही. गावातील पुरुष लैंगिक उपभोगासाठी परशालाही वाईट वागणूक देतात. तृतीयपंथी असणे हा किती मोठा कसूर आहे असे त्याला नेहमी ऐकवत असतात. पण हाच परसू जरी नैसर्गिकरीत्या तृतीयपंथी असला तरी स्वभावाने खूप मायाळू आहे. जगन, जिला देवदासी म्हणून झुलवा लावून देवाला सोडली आहे तिला चांगले जगता यावे, शिक्षण घेता यावे म्हणून परसूच्या मनात एक चांगुलपणा आहे. तो त्याच्या संवादातून जाणवत नाही तर अप्रत्यक्षपणे दिसत असतो. परंतु समाजातील लादलेला पुरुषी दृष्टिकोन हे सगळे परसूच्या चांगुलपणावर आघात करत असते. तृतीयपंथी असणे म्हणजे किती मोठा अपराध आहे हेच त्याच्यावर बिंबवले जाते. त्याने

कसे चालावे, कशा हालचाली कराव्यात, कसे हेल काढून बोलावे, कशा टाळ्या वाजवल्या पाहिजेत याचे काही समाजातील शोषक वर्गाने ठरवलेले संदर्भ या नाटकात दिसतात. नाटकातील प्रत्येक संदर्भ लेखक उत्तम बंडू तुपे आम्हाला तालमीत समजावून सांगत असत कारण ते स्वत: सातारा भागातील जोगत्यांमध्ये वावरले होते आणि राहिले होते. आमच्या नाटकात काम करणारा कलाकार त्यांच्याकडून प्रशिक्षण घेत असे. तृतीयपंथी असेच चालतात, त्यांची मानसिकता अशी का असते, ते असेच का बोलतात ही नोंदवलेली निरीक्षणे ते सांगत असत. आपला मुलगा हा मुलींसारखा वागतो आहे किंवा त्याला स्त्रियांसारखे हावभाव करायला आवडतात किंवा त्याला साडी नेसायला आवडते आहे, मेकअप करायला आवडतो. अशा गोष्टी एकदा का घरात केल्या की मुलाला घरातून हाकलून देतात. त्याला वाळीत टाकले जाते, कुटुंबातून बहिष्कृत केले जाते. शिक्षणाचा अभाव तर आहेच आणि लैंगिक विषमता ही आपल्या देशात फार खोल रुजली आहे. या सगळ्या गोष्टींचे प्रतिबिंब समाजात विविध ठिकाणी आपल्याला दिसते आणि अलीकडच्या काळात चित्रपटांतून आणि नाटकांमधूनदेखील ठळकपणे त्या विरोधात आवाज उठवण्याचा प्रयत्न सुरू आहे. या नाटकाचे पाच प्रयोग झाले आणि निधीअभावी ते बंद पडले.

'राणी द किंग' अशा नावाच्या एका माहितीपटाचा प्रयोग आम्ही केला होता. डेक्कन कॉलेज परिसरात एक तृतीयपंथी रोज पक्ष्यांना, कुत्र्यांना काहीतरी खायला टाकायचा. सहावारी साडी, मोठे डोळे, कृष्णवर्णीय, कपाळी एक टिकली, केस विखुरलेले, डोक्यावरून पदर, हातात एक कापडी पिशवी, पायात स्लीपर असा त्याचा पेहराव असायचा. प्राण्यांवर एवढे प्रेम करणारी ही व्यक्ती नेमकी कोण आहे असा प्रश्न पडायचा. जेव्हा जेव्हा ही व्यक्ती त्या भागात यायची तेव्हा असंख्य घारींचा गराडा त्याच्याभोवती व्हायचा आणि अनेक कुत्रीदेखील त्याच्या पाठोपाठ चालायची. नंतर आम्ही थोडी माहिती काढली तेव्हा कळले की तो पुण्यातील फुलेनगर या भागात राहतो. एकेदिवशी आम्ही असे ठरवले की प्राण्यांविषयी एवढे प्रेम असणारी ही व्यक्ती कोण आहे हे जाणून घेण्याकरता आपण त्याच्याशी बोलले पाहिजे. अनेकदा स्वत:ला पुरुष समजणारे पुरुषार्थ गाजवण्यासाठी त्याला चिडवायचे, उचकावयाचे, तेव्हा अशा लोकांना तो दगड मारायचा आणि हुसकून लावायचा. धाडस करून एकेदिवशी आम्ही त्याला गाठले आणि विचारले. तेव्हा वाटले की ही व्यक्ती आपल्याला शिव्या देईल, काहीतरी वाईट बोलेल कारण तृतीयपंथी लोकांविषयी आपल्या समाजामध्ये अनेक गैरसमजुती आहेत. त्या आमच्याही मनात होत्या. त्याचे नाव विचारले असता त्याने 'राणी' असे सांगितले. त्याच्याशी अतिशय विस्तृत चर्चा केली. ज्या पोटतिडकीने आणि संवेदनशीलतेने तो बोलत होता त्यातून आमची उत्सुकता वाढली. आमची एवढी गट्टी जमली की त्यानंतर त्याने त्याच्या घरी आम्हाला आमंत्रित केले. त्याचे घर साधे दहा बाय दहाचे होते. घरात एक देव्हारा, छोटासा टीव्ही होता. काही भांडी होती आणि एक बल्ब लावलेला होता. आम्ही घरी गेलो असता आम्हाला अजून एक धक्का बसला. 'राणी'ने एक मुलगा दत्तक घेतला होता. तो महाविद्यालयात शिकत शिकत नृत्य शिक्षणही घेत होता. जी व्यक्ती उदरनिर्वाहासाठी गल्लोगल्ली फिरून पैसे मागते त्याच व्यक्तीने एक मुलगा दत्तक घेणे आणि त्याचे पालनपोषण करणे हे आश्चर्यकारक होते. राणीने त्याच्या घरची परिस्थिती सांगितली. त्याचे मूळ गाव अक्कलकोट. घरात जेव्हा कळले की हा तृतीयपंथी आहे तेव्हाच त्याला घरातून हाकलून दिले. अनेक वेगवेगळ्या तृतीयपंथीय लोकांच्या जथ्थेत तो राहिला. परंतु इतर लोकांचे राहणे, दारू पिणे, टाळ्या वाजवून नाचणे, पैशासाठी लैंगिक व्यवसाय करणे हे त्याला पसंत नव्हते. त्यामुळे कालांतराने त्याने त्या समूहांपासून फारकत घेतली. आज तो ज्या ज्या दुकानांसमोर जातो आणि पैसे मागतो तिथे त्याला चांगली वागणूक देतात. थोडक्यात, पैसे मागण्याची ठिकाणे ठरलेली आहेत. त्याने काही गोष्टी ज्या सांगितल्या त्या कल्पनेपलीकडच्या आहेत. काही त्याच्या तृतीयपंथीय मित्रांनी ऑपरेशन करून लिंगबदल करून घेतला. अशा अनैसर्गिक गोष्टींमुळे काही लोक गंभीररीत्या आजारी पडून मृत्यूमुखीही पडले. हे सर्व पाहता राणी हे व्यक्तिमत्त्व आम्हाला खूप संवेदनशील वाटले. म्हणून आम्ही तिचे शुटिंग करायचे ठरवले. कुठलेही शिक्षण नसताना, कुटुंबीयांनी वाळीत टाकले असताना, फक्त स्वत:तील चांगुलपणा जिवंत ठेवत राणी आपले जीवन जगत होता आणि दत्तक घेतलेल्या मुलाला सांभाळत होता. तो मुलगादेखील राणीविषयी अभिमानाने बोलत होता. म्हणून आम्ही या फिल्मचे नाव 'राणी द किंग' असे ठेवले. कारण खऱ्या अर्थाने कल्याणकारी, चांगुलपणाचा विचार घेऊन जगणारा आम्हाला तो 'खरा राजा' वाटला आणि आम्ही त्याच्यासमोर पुरुष असूनही थिटे वाटत होतो.

# न्यायालयीन निकाल



**डॉ. ज्योतिका कालरा**
**(राष्ट्रीय मानवाधिकार आयोग सदस्य)**
***भाषांतर* : प्रा. दिलीप सुतार**

भारतातील ट्रान्सजेंडर्सचे नेहमीच एक वेगळे अस्तित्व राहिले आहे, ज्याला या इको सिस्टीममध्ये स्वाभाविकपणे कोणताही हक्क नव्हता. सुरुवातीला नालसाचा निर्णय होता. जेव्हा मी तो निर्णय वाचला तेव्हा ते जाणून मला आश्चर्य वाटले की या निर्णयाने ट्रान्सजेंडर्सना बँक खाते उघडण्याचा अधिकार दिला आहे. एखाद्या व्यक्तीला बँक खाते उघडण्यासाठी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची आवश्यकता आहे, यावर विश्वास ठेवता येईल का? मी त्या निर्णयाचा थोडक्यात सारांश देऊ इच्छिते. National Legal Services Authority Vs Union of India and Others (2014) 5 SCC 438, जी NALSA case म्हणून ओळखली जाते. त्यामध्ये न्यायालयाने ट्रान्सजेंडर्सच्या ओळखीच्या स्थितीवर विचार केला. एकमेकांशी संबंधित असलेले न्यायनिर्णय आणि आंतरराष्ट्रीय करार पडताळल्यानंतर असे मत व्यक्त केले की, लिंग ओळख ही जीवनातील सर्वांत मूलभूत पैलूंपैकी एक आहे, जी एखाद्या व्यक्तीच्या पुरुष, महिला किंवा ट्रान्सजेंडर किंवा ट्रान्ससेक्शुअल व्यक्ती असण्याच्या भावना दर्शवते. या निर्णयानंतर LGBTI (लेस्बियन, गे, बायसेक्शुअल आणि इंटरसेक्स) समुदायाबद्दल आणखी एक नवीन निर्णय झाला. पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने नवतेज सिंग जोहर विरुद्ध युनियन ऑफ इंडिया 2018 (1) SCC 791 हा निकाल दिला. सुप्रीम कोर्टाने असे म्हटले की, एलजीबीटी व्यक्ती 'अप्राप्य अपराधी'च्या छायेतून अबाधित जीवन जगण्यास पात्र आहेत. शेवटी न्यायालयाने असे घोषित केले की, IPC कलम 377 जे प्रौढांच्या सहमतीच्या लैंगिक कृत्यांना अपराध ठरवते, (म्हणजे १८ वर्षांपेक्षा जास्त वयाचे व्यक्ती जे संमती देण्यास सक्षम आहेत) ते घटनेच्या कलम १४, १५, १९ व २१ चे उल्लंघन आहे आणि त्यामुळे चांगला कायदा नाही. हे जाणून घेणे उचित आहे की, याआधी याच मुद्द्यावर म्हणजे आयपीसी कलम ३७७ ला जेव्हा नाझ फाउंडेशन केस प्रकरणी आव्हानित केले तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने अनैसर्गिक लैंगिक संबंधाला अपराध ठरवण्यास नकार दिला आणि दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय जो अनैसर्गिक संभोगाला अपराध ठरवतो तो रद्द करण्यात आला.

**NHRC ची भूमिका (National Human Rights Commission)**

योग्यकर्ता प्रिन्सिपल्सनी ट्रान्सजेंडर्सची जबाबदारी NHRC वर लादली आहे. एक कायदेशीर मान्यताप्राप्त ग्रुप, स्त्री

आणि पुरुषांच्या पलीकडे दोन्हींचा मिळून ट्रान्सजेंडर म्हणून ओळखला जातो. जेथे व्यक्ती हा शब्द वापरला जातो, त्यात सर्व पुरुष, महिला आणि ट्रान्सजेंडर यांचा समावेश असावा. NHRC टीजींचे मानवाधिकार सुरक्षित करण्याचे आपले कर्तव्य पार पाडत आहे. NHRC ने २०१८ मध्ये LGBTIQ वर एक मुख्य (core) ग्रुप स्थापन केला आहे आणि त्याच्या तीन मुख्य बैठकाही घेतल्या आहेत. NHRC च्या प्रमुख शिफारशी संबंधित विभागांना पाठवण्यात आल्या आहेत. NHRC ने ट्रान्सजेंडर्सवर संशोधन केले आहे आणि त्यात असे आढळून आले की ट्रान्सजेंडर्सची सार्वजनिक ठिकाणी शौचालयाची अतिशय व्यावहारिक समस्या आहे. ट्रान्सजेंडर्समध्ये शिक्षणाचा अभाव आहे, समाजात वेश्याव्यवसाय मोठ्या प्रमाणावर आहे. ट्रान्सजेंडर्सविरोधातील गुन्हे गांभीर्याने घेतले जात नाहीत आणि परिणामी पुराव्याअभावी बहुतेक प्रकरणे कमी होतात.

**कायदा आणि ट्रान्सजेंडर्स :**

ट्रान्सजेंडर व्यक्ती (अधिकारांचे संरक्षण) अधिनियम २०१९, ट्रान्सजेंडर व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांचे कल्याण त्याच्याशी संबंधित गोष्टींसाठीचा कायदा, व्याख्येनुसार ट्रान्सजेंडर व्यक्ती म्हणजे अशी व्यक्ती ज्याचे लिंग जन्माच्या वेळी त्या व्यक्तीला दिलेल्या लिंगाशी जुळत नाही आणि ट्रान्समॅन किंवा ट्रान्सवुमन (अशा व्यक्तीने लैंगिक पुनर्मूल्यांकन शस्त्रक्रिया किंवा हार्मोन थेरपी किंवा लेसर थेरपी केली आहे किंवा नाही किंवा अशी इतर थेरपी) आंतरलिंग भिन्नता असलेली व्यक्ती, लिंगकर्ता आणि किन्नर, हिजडा, अरवणी आणि जोगता अशी सामाजिक, सांस्कृतिक ओळख असलेली व्यक्ती.

ट्रान्सजेंडर्ससाठी कर्नाटक राज्य धोरण, २०१७ चे लक्ष्य टीजी समुदायांना मुख्य प्रवाहातील समाजात समाविष्ट करणे आणि त्यांच्या सुरक्षित भविष्याची हमी देणे आहे. हे धोरण ट्रान्सजेंडरसाठी कलंकमुक्त, सर्वसमावेशक आणि न्याय्य वातावरण सुनिश्चित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हे त्यांच्या असुरक्षिततेला समग्रपणे संबोधित करते आणि त्यांच्या सामाजिक, मानसिक, आर्थिक कल्याणासाठी पुढाकार प्रस्तावित करते.

**भारतातील ट्रान्सजेंडर्स :**

भारतीय जनगणनेत ट्रान्सजेंडर्स यांची अनेक वर्षे नोंद घेण्यात आलेली नव्हती. त्यांची गणतीच करण्यात आलेली नव्हती. परंतु २०११ च्या जनगणनेत त्यांची गणती, त्यांच्या नोकरी व्यवसायासंदर्भात माहिती संकलित करण्यात आली. तसेच जात व साक्षरतेसंदर्भातही तृतीयपंथीयांची माहिती संकलन करण्यात आले.

> **... ट्रान्सजेंडर व्यक्ती म्हणजे अशी व्यक्ती ज्याचे लिंग जन्माच्या वेळी त्या व्यक्तीला दिलेल्या लिंगाशी जुळत नाही आणि ट्रान्समॅन किंवा ट्रान्सवुमन (अशा व्यक्तीने लैंगिक पुनर्मूल्यांकन शस्त्रक्रिया किंवा हार्मोन थेरपी किंवा लेसर थेरपी केली आहे किंवा नाही किंवा अशी इतर थेरपी) आंतरलिंग भिन्नता असलेली व्यक्ती, लिंगकर्ता आणि किन्नर, हिजडा, अरवणी आणि जोगता अशी सामाजिक, सांस्कृतिक ओळख असलेली व्यक्ती.**

२०११च्या जनगणेनुसार भारतातील तृतीयपंथीयांची एकूण संख्या ४.८८ लाख इतकी होती. जनगणना २०२१ मध्ये ट्रान्सजेंडर्स यांची समग्र माहिती, लिंग आधारित उदाहरणार्थ, पुरुष, स्त्री, तृतीयपंथी अशा शीर्षकाखाली संकलित होण्याची शक्यता आहे.

**आव्हाने :**

तृतीयपंथीयांची ओळख - ट्रान्सजेंडर्सची नेमकी व्याख्या आणि स्थानीय भाषांतर करणे आहे. २०२१च्या जनगणनेत ट्रान्सजेंडर कुटुंबीयांच्या सदस्यांची नोंद घेणे आवश्यक आहे. ट्रान्सजेंडर्सना मुख्य प्रवाहात आणणेही आवश्यक आहे. या गोष्टीला प्राधान्य दिले पाहिजे. जर ट्रान्सजेंडर्स एक कुटुंब म्हणून राहत असतील, त्यांना मुले असतील, आणि ट्रान्सजेंडर्सच्या म्हणजे आई-वडिलांच्या मालमत्तेची त्यांची मुले वारस म्हणून नोंद होणार असेल, आणि ट्रान्सजेंडर्स एक कुटुंब म्हणून जीवन व्यतीत करू इच्छित असतील तर हे सर्व शक्य होईल. ट्रान्सजेंडर्सच्या बाबतीत कौटुंबिक हिंसा किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा भेदभाव किंवा पोलीस यंत्रणेकडून जर त्यांना काही त्रास अथवा अन्याय इत्यादी सहन करावा लागत असेल तर त्याचाही विचार करावा लागेल. शाळा-महाविद्यालय पातळीवर ट्रान्सजेंडर्स चळवळीसंदर्भात माहिती प्रबोधन आवश्यक आहे. जेणेकरून सर्व समावेशक-भेदविरहित समाजरचना शक्य होईल.



# सामाजिक न्यायाचे एक सकारात्मक पाऊल

ॲड. डॉ. सुचित्रा घोगरे-काटकर
सातारा

**सामाजिक न्यायाचे एक सकारात्मक पाऊल कलम ३७७ वरील महत्त्वपूर्ण न्यायनिवाडे :**

'दोन समलिंगी व्यक्तींमध्ये असलेले लैंगिक संबंध हा गुन्हा नाही', असे सांगत कलम ३७७ वर सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने एकमताने दिलेला निकाल ऐतिहासिक ठरला आहे. समलिंगी व्यक्तींच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्याबरोबरच या निकालाने एलजीबीटी समूहाला कायद्याचे संरक्षण लाभले आणि त्यांच्या जीवनात एक नवी पहाट उगवली.

सुमारे दोन दशकांच्या या कायदेशीर लढाईत सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा महत्त्वपूर्ण निकाल हा सामाजिक न्यायाचे एक सकारात्मक पाऊल ठरला आहे. ब्रिटिश काळात तयार झालेल्या भारतीय दंड संहिता १८६०च्या कलम ३७७ मधील तरतुदीनुसार दोन समान लिंगी व्यक्तींतील शारीरिक संबंध हे अनैसर्गिक संभोग असून त्यास दहा वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सांगितलेली आहे. कलम ३७७मधील या तरतुदीमुळे तृतीयपंथी व्यक्तींवर गुन्हे दाखल होत आणि त्यामुळे त्यांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागत होते. ही बाब लक्षात घेऊन २००१ मध्ये तृतीयपंथीयांसाठी काम करणाऱ्या 'नाझ फाउंडेशन' या संस्थेने दिल्ली उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली होती.

नाझ फाउंडेशनच्या या याचिकेवरील सुनावणीत 'दोन प्रौढ व्यक्तींमधील खाजगी लैंगिक संबंध जर परस्पर संमतीने असतील तर तो गुन्हा नाही' असा निकाल २००९ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने दिला होता. परंतु भारतीय समाजात याविषयी असलेली नकारात्मकता आणि कट्टर रूढी-परंपरावादी विचारसरणी यामुळे काही संघटनांनी याला विरोध केला आणि या निर्णयाविरुद्ध केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले.

‘समलिंगी व्यक्तींच्या लैंगिक संबंधांना कायदेशीर मान्यता दिली तर सामाजिक अध:पतन होईल’ असे सांगून धार्मिक संघटनांनी कलम ३७७ रद्द होण्यास विरोध दर्शवला होता. दिल्ली उच्च न्यायालयाच्या निकालाविरुद्ध सामाजिक व धार्मिक संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सुरेश कुमार कौशल विरुद्ध नाझ फाउंडेशन या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने समलिंगी संबंधांना मान्यता देणारा दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय २०१३ मध्ये रद्दबातल ठरवला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ‘भारतीय दंड संहितेतील कलम ३७७ काढून टाकण्याचे अधिकार संसदेचा आहे’ असे सांगून कलम ३७७ वरील निर्णय केंद्र सरकारकडे सोपवला होता. याचबरोबर या निकालाचा फेरविचार करावा अशी मागणी करणारी याचिकादेखील या वेळी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली होती.

पुन्हा जानेवारी २०१८मध्ये गोपनीयतेचा हक्क (Right to Privacy) यावर सर्वोच्च न्यायालयाचा एक महत्त्वपूर्ण निकाल आला. या निर्णयानंतर एलजीबीटी समुदायाने पुन्हा सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली. सदर याचिका पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे वर्ग करण्यात आली. सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील या खंडपीठात जस्टिस आर. एफ. नरिमन, जस्टिस ए. एम. खानविलकर, जस्टिस डी. वाय. चंद्रचूड आणि जस्टिस इंदू मल्होत्रा यांचा समावेश होता. तर नवतेज जोहर, सुनील मेहरा, रितू डालमिया, आयेशा कपूर या व्यक्तींनी ही याचिका दाखल केली होती. त्यावर सलग चार दिवस सुनावणी होऊन दि. ६ सप्टेंबर २०१८ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने भारतीय दंड संहितेतल्या कलम ३७७विषयी ऐतिहासिक निकाल देत समलैंगिकतेला गुन्ह्याच्या श्रेणीतून बाहेर काढले आणि समलैंगिकता हा आता गुन्हा ठरणार नाही असे सांगितले. या निकालात सर्वोच्च न्यायालयाने अनेक बाबींवर सविस्तर चर्चा केली असून दोन सज्ञान व्यक्तींमध्ये असलेले लैंगिक संबंध हे गुन्ह्याच्या कक्षेत येणार नसल्याचा निर्णय एकमताने दिला.

या प्रकरणात कलम ३७७ तसेच तृतीयपंथीयांच्या मूलभूत अधिकाराच्या बाबतीत न्यायालयासमोर पुढील मुद्दे उपस्थित झाले होते. (१) कलम ३७७ हे एलजीबीटी समुदायाच्या व्यक्तींच्या लिंग अभिव्यक्तीला गुन्हेगारी ठरवून राज्यघटनेच्या कलम १९ (१) (अ) अंतर्गत अभिव्यक्तींच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करते का? (२)सुरेश कुमार कौशल प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे औचित्य हे नैतिकतेला सामाजिक नैतिकता समजण्यात योग्य होते का? (३) कलम ३७७ हे राज्यघटनेचे कलम १४ आणि १५ चे उल्लंघन करत ‘लैंगिक अभिमुखता’ आणि ‘लिंग ओळख’च्या आधारावर भेदभाव करण्यास परवानगी देते का? (४) कलम ३७७ हे समलिंगी व्यक्तींमधील खासगी सहमतीच्या कृत्यांना दंड देऊन राज्यघटनेच्या कलम २१ नुसार स्वायत्तता आणि सन्मानाच्या अधिकाराचे उल्लंघन करते का?

> **तसेच मानवी लिंग ओळखताना केवळ नर व मादी एवढेच वर्गीकरण करू शकत नाही. त्याने तृतीयपंथी समुदायाची ओळख नाकारली जाते. कलम ३७७ ला दोषमुक्त / अपराधमुक्त करणे ही एलजीबीटी व्यक्तींना त्यांच्या घटनात्मक हक्कांची हमी देण्याच्या मार्गातील एक आवश्यक पहिली पायरी आहे अणि राज्यघटनेने आणखी बरेच काही सांगितले आहे असे न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी आपल्या निकालपत्रात म्हटले आहे.**

या मुद्द्यांच्या अनुषंगाने चर्चा करून दोन सज्ञान व्यक्तींमधील खासगी गोष्टीत हस्तक्षेप करण्याचा अधिकार केंद्र सरकारला नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. तसेच कोणासोबत राहावे आणि कोणासोबत लैंगिक संबंध ठेवावे हा त्या व्यक्तीचा निर्णय आहे. एलजीबीटी समाजाला कायद्याचे सुरक्षा कवच दिले पाहिजे. त्यांना शिक्षा द्यायला नको असेही सर्वोच्च न्यायालयाने या निकालात सांगितले आहे. पाच न्यायाधीशांच्या या खंडपीठाने एकूण चार निकालपत्रे दिली असून या चार निकालांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३७७ वर चर्चा करताना मूलभूत हक्कांच्या उल्लंघनाचा एकमताने उल्लेख केला आहे.

भारतीय राज्यघटनेतील कलम १४, १५, १९ (१) (अ) व २१ मधील मूलभूत हक्क यावर न्यायालयाने सविस्तर चर्चा केली असून कलम ३७७ हे व्यक्तींच्या लैंगिक प्रवृत्ती, लिंग ओळखीच्या आधारावर भेदभाव करते, संविधानाच्या कलम १४ आणि १५चे तसेच कलम २१ अंतर्गत जीवनाचे अधिकार, सन्मान आणि वैयक्तिक निवडीच्या स्वायत्ततेचे उल्लंघन करते. हे एलजीबीटी व्यक्तीची त्यांची ओळख पूर्णपणे ओळखण्याच्या क्षमतेस प्रतिबंध करते, तसेच कलम १९ (१) (अ) अंतर्गत देण्यात आलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन करते असे सांगून

या मुद्द्यांवर चर्चा करताना न्यायालयाच्या राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (मान्यताप्राप्त ट्रान्सजेंडर ओळख) आणि पुट्टास्वामी (गोपनीयतेचा मूलभूत अधिकार ओळखला) या दोन निकालांचा संदर्भ दिला.

या निकालात कलम ३७७ अंशत: फेटाळले असून सुरेश कुमार कौशल प्रकरणातील २०१३ चा निकाल रद्द केला. सुरेश कुमार कौशल प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने कलम ३७७ची घटनात्मकता कायम ठेवली होती. सुरेश कुमार कौशल या प्रकरणात अल्पसंख्याक तर्कशक्तीचा वापर केला असून 'केवळ अल्पसंख्याक नागरिकांवर कलम ३७७ द्वारे नकारात्मक परिणाम होत असल्याने न्यायालयाने हस्तक्षेप करण्याची गरज नाही', असे म्हटले होते.

परंतु, राज्यघटना सर्व नागरिकांना लैंगिक अभिमुखता किंवा लिंग ओळख, त्यांच्या मूलभूत हक्कांची हमी देते. न्यायालयाचा संबंध 'लोकप्रिय नैतिकता' नव्हे तर 'संवैधानिक नैतिकता' जपण्याशी आहे असे या निकालात न्यायालयाने आवर्जून सांगितले आहे.

मुख्य न्यायमूर्ती दीपक मिश्रा यांनी स्वत: आणि न्यायमूर्ती खानविलकर यांच्या वतीने निर्णय लिहिला असून त्यात त्यांनी एखाद्या व्यक्तीच्या योग्य आत्मनिर्णयावर भर दिला आहे. कलम ३७७ हे एखाद्या व्यक्तीची संमती देण्याची क्षमता ओळखण्यात अपयशी ठरते असे सांगून कलम ३७७ केवळ मूलभूत जैविक निर्धारकांच्या आधारावर व्यक्तींमध्ये भेदभाव करत नाही तर एखाद्या व्यक्तीच्या निवडीच्या आधारावरदेखील भेदभाव करते असे सांगितले. तसेच न्यायमूर्ती मिश्रा यांनी राज्यघटना एखाद्या व्यक्तीची लैंगिक स्वायत्तता आणि जिव्हाळ्याच्या वैयक्तिक निवडीचे संरक्षण करते असेही नमूद केले आहे.

न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी कलम ३७७ ला 'कालदोषयुक्त वसाहती कायदा' म्हटले असून यामुळे 'लैंगिक अभिमुखतेच्या अधिकाराला मान्यता न दिल्याने पुट्टास्वामी प्रकरणात गोपनीयता हा मूलभूत अधिकार सांगितला आहे, तो अधिकार नाकारला जातो असे आपल्या निकालात नमूद केले आहे. तसेच मानवी लिंग ओळखताना केवळ नर व मादी एवढेच वर्गीकरण करू शकत नाही. त्याने तृतीयपंथी समुदायाची ओळख नाकारली जाते. कलम ३७७ ला दोषमुक्त / अपराधमुक्त करणे ही एलजीबीटी व्यक्तींना त्यांच्या घटनात्मक हक्कांची हमी देण्याच्या मार्गातील एक आवश्यक पहिली पायरी आहे आणि राज्यघटनेने आणखी बरेच काही सांगितले आहे असे न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी आपल्या निकालपत्रात म्हटले आहे.

न्यायमूर्ती नरिमन यांनी आपल्या निकालपत्रात २०१७च्या मानसिक आरोग्य कायद्यावर भर दिला. या कायद्यानुसार समलैंगिकता हा रोग नाही. कलम ३७७ मधील तरतुदीत नैसर्गिक आणि अनैसर्गिक यातील फरक स्पष्टपणे अनियंत्रित आहे आणि राज्यघटनेच्या कलम १४चे उल्लंघन करते हे दाखवण्यासाठी त्यांनी या कायद्याचा वापर केला. शिवाय, न्यायमूर्ती नरिमन यांनी एलजीबीटी व्यक्तींना राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत सन्मानाने जगण्याचा मूलभूत अधिकार असल्याचे सांगितले असून एलजीबीटी असण्याचा कलंक कमी होण्यासाठी या विषयाला भरपूर प्रसिद्धी मिळण्याची गरज असून अधिकारी, विशेषत: पोलीस अधिकारी यांना सरकारने संवेदनशीलतेचे प्रशिक्षण द्यावे अशी सूचना केली आहे.

न्यायमूर्ती मल्होत्रा यांनीही राज्यघटनेच्या कलम २१मधील जीवनाचा अधिकार यामध्ये आरोग्याचा मूलभूत अधिकाराचा समावेश होत असल्याचे सांगून मूलभूत हक्कांविषयी चर्चा केली आहे. याचबरोबर संपूर्ण भारतात एलजीबीटी समुदायांमध्ये एचआयव्ही / एड्स आणि लैंगिक संक्रमित रोगांच्या उच्च घटनांबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे.

अशा प्रकारे आपल्या सविस्तर निकालपत्रात कलम ३७७ मधील तरतुदी या समानतेच्या अधिकाराविरुद्ध असल्याने हे समलिंगी संबंधांना कायद्याच्या कक्षेतून वगळण्यात आले आहे. थोडक्यात, या निकालापूर्वी कलम ३७७ मधील तरतुदीनुसार समलिंगी व्यक्तींमध्ये जरी परस्पर संमतीने होत असलेले शारीरिक संबंध हे गुन्हा होते. तेवढ्याच मुद्द्यांच्या अनुषंगाने हा निकाल देण्यात आला आहे. मात्र प्राणी आणि मुलांसोबत करण्यात येणाऱ्या लैंगिक संबंधांना कायद्याने अपराध असल्याचे नमूद करत कलम ३७७ मधील तरतूद कायम ठेवण्यात आली आहे.

स्वत:ला अभिव्यक्त न करता येणे हे मरण स्वीकारण्यासारखेच आहे असे मत सरन्यायाधीश दीपक मिश्रा आणि ए. एम. खानविलकर यांनी व्यक्त केले आहे. कलम ३७७ मधील तरतुदीमुळे भेदभाव होत होता. सामाजिक नैतिकतेचे कारण सांगून दुसऱ्यांच्या अधिकारांचे उल्लंघन करण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही. कुठलाही नागरिक आपल्या अस्तित्वापासून दूर जाऊ शकत नाही. न्यायालयाचा हा निर्णय अनेक गोष्टींचा विचार करून घेण्यात आला आहे. महत्त्वाचे म्हणजे तृतीयपंथी व्यक्तींना इतर नागरिकांसारखेच मूलभूत आणि मानवीय अधिकार आहेत असे न्यायालयाने या निकालात आवर्जून सांगितले आहे. त्यामुळे हा निकाल तृतीयपंथीयांसाठी ऐतिहासिक तर आहेच, पण त्याचबरोबर तृतीयपंथीय व्यक्तींच्या जीवनात आशेची नवीन पहाट आणणारा आहे.

# तृतीयपंथी समुदाय
## कायदे आणि आव्हाने

**डॉ. आशिष देशपांडे**
सहाय्यक प्राध्यापक,
सिम्बायोसिस विधी महाविद्यालय

समाज हा विविध घटकांनी बनलेला असतो. समाजात सर्व प्रकारच्या शारीरिक, आर्थिक, सामाजिक, मानसिक, राजकीय इत्यादी पातळीवरील व्यक्ती असतात. या सर्वांना सोबत घेऊन सामाजिक सलोख्यासाठी सर्वांना न्याय देण्याचे काम कायदे करतात. 'समाजकल्याण' हा हेतू डोळ्यांसमोर ठेवून विशिष्ट देशातील वर्षानुवर्षे चालत आलेल्या रूढी, परंपरा, केंद्राचे आणि राज्य सरकारचे कायदेमंडळ, न्यायव्यवस्था इत्यादी घटकांच्या पुढाकाराने कायदे केलेले असतात. 'समानता' हे कायद्याचे उद्दिष्ट आहे. परंतु शोषित, आर्थिकदृष्ट्या मागासलेले, वयाने लहान, शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अबला, इत्यादी वर्षानुवर्षे मागे राहिलेले आणि मुख्य प्रवाहापासून दूर असे काही असतात ज्यांना मदतीचा हात देण्याची नितांत गरज असते, त्याचप्रमाणे जास्तीच्या संरक्षणाची आणि संवर्धनाची गरज असते. त्यांच्यासाठी खास काही कायदे केलेले असतात.

समाजातील एक नाजूक व उपेक्षित घटक म्हणजे तृतीयपंथी समुदाय. साधारणतः लैंगिक निकषावर केलेल्या भेदभावानुसार जी व्यक्ती स्त्री किंवा पुरुष यापैकी कोणत्याही एका प्रकारामध्ये मोडत नाही त्याला तृतीयपंथी असे संबोधले जाते. समाजात वावरताना, मनोरंजन विश्वातून, विशेषतः सिनेमा, नाटके, दूरचित्रवाणीतील मालिका इत्यादींमधून आपण या घटकाला पाहत असतो. वर्षानुवर्षे रुजलेल्या रीतिरिवाज, श्रद्धा-अंधश्रद्धा इत्यादींसोबत या समुदायाचा संबंध जोडलेला आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'लक्ष्मी' या चित्रपटातून तृतीयपंथी हा नाजूक विषय हाताळलेला आहे आणि भीषण वास्तव समोर ठेवले आहे. तृतीयपंथीयदेखील एक माणूस आहे. त्या सर्व समुदायाला एक माणूस म्हणून पूर्णपणे जगण्याचा आणि स्वत:चा आणि आपल्या समाजाचा उद्धार करण्याचा पूर्ण हक्क आहे. जे सामर्थ्य एखाद्या खंद्या पुरुषामध्ये आहे किंवा कर्तबगार स्त्रीमध्ये आहे तेच या समुदायामध्येही आहे.

याच अनुषंगाने २०१९मध्ये केंद्र सरकारने तृतीयपंथी समुदाय संरक्षण कायदा आणलेला आहे. त्याची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत -

१) भेदभावास मनाई - शिक्षण, नोकरी, आरोग्य सुविधा, सरकारी कार्यालयातील वावर इत्यादीमध्ये तृतीयपंथीयांना भेदभावास मनाई आहे. वास्तविक संविधानानेच १९५० पासून भेदभावास बंदी आणली होती, पण या विशिष्ट कायद्याने केवळ तृतीयपंथी आहे म्हणून भेदभाव करणेस मज्जाव केलेला आहे.

२) बेघरांना निवाऱ्याची सोय - ज्यांना घरे नाहीत अशा उपेक्षित तृतीयपंथीयांना सरकारकडून पुनर्वसन करून निवाऱ्याची हमी असेल. सुप्रीम कोर्टाने ओलेग टेलिस विरुद्ध दिल्ली प्रशासन या खटल्यामध्ये घर असण्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे, असे नमूद केलेले होते. परंतु या कायद्याने, विशेषतः तृतीयपंथीयांना संरक्षण दिले आहे.

३) नोकरीची हमी - सरकारी आणि खाजगी क्षेत्रामध्ये कोणताही लिंगभेद न करता नोकरीची हमी. केवळ तृतीयपंथी आहे म्हणून एखाद्या उमेदवारास जर हा अधिकार डावलला जात असेल तर तिथे या कायद्याखालील उभारण्यात आलेल्या तक्रार निवारण मंचाकडून याची गंभीर दखल घेतली जाईल.

४) शैक्षणिक सुविधा - शिक्षण हा मानवी विकासाचा पाया आहे. त्यामुळे सर्व सरकारी आणि खाजगी शाळा-महाविद्यालयांमध्ये तृतीयपंथीयांना प्रवेश द्यावा आणि त्यांचा उद्धार करण्यास हातभार लावावा अशी तरतूद आहे.

५) तृतीयपंथीयांच्या उत्तम आरोग्यासाठी सरकारने पावले उचलावीत. विशेषतः लैंगिक रोग होऊ नये म्हणून आरोग्य खात्याने विशेष लक्ष द्यावे. याविषयी सखोल अभ्यासक्रम असावा.

६) जिल्हा अधिकाऱ्याकडून तृतीयपंथीयांचे प्रमाणपत्र देण्यात येईल. सरकारी कामकाज लहान लहान भागात विभागले गेलेले आहे. त्यामुळे एखादी व्यक्ती ही तृतीयपंथी आहे किंवा नाही याची पडताळणी आणि प्रमाणपत्र जिल्हा दंडाधिकाऱ्याकडून दिले जाईल.

७) सरकारकडून विविध कल्याणकारी योजना आणून तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले जाण्यासाठी प्रयत्न केले जातील.

८) गुन्हे आणि शिक्षा - जिथे वेठबिगारी आणि बळजबरीने कामे करून घेतली जातात, तृतीयपंथीयांना हाकलून दिले जाते, शारीरिक, मानसिक आणि आर्थिक पिळवणूक केली जाते व छळ असतो त्या ठिकाणी दोषींना कमीत कमी ६ महिने ते २ वर्षांपर्यंतचा कारावास आणि त्यासोबत दंडाची तरतूद आहे.

९) राष्ट्रीय तृतीयपंथी परिषद - केंद्र सरकारला या समुदायाबद्दल कायदे, धोरण, प्रकल्प बनवण्यासाठी आणि अमलात आणण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर एक कौन्सिल असेल. याचे काम तृतीयपंथीयांच्या तक्रार निवारणाचे असेल. केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री याचे चेअरमन असतील. विविध राज्यांचे मंत्री, नीति आयोग, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग यांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे.

**कायद्याला सर्व स्तरांतून अपेक्षित यश मिळण्यासाठीचे उपाय –**

१) निमसरकारी संस्थांचा पुढाकार – केवळ सरकारी मदत किंवा कायद्यावरच अवलंबून न राहता, समाजाच्या विकासात हातभार लावण्यासाठी निमसरकारी संस्थादेखील मोठ्या प्रमाणात काम करताना दिसतात. काही पंजीकृत असतात तर काही विनापंजीकृत व केवळ समाजसेवा या भावनेने कार्य करतात. प्रत्येक निमसरकारी संस्थेची काही धोरणे / आराखडे असतात. ती धोरणे साध्य करण्यासाठी कामे करतात. जर सरकारी धोरणांना साजेसे काम अशा संस्थांनी केले तर त्याचा खूप मोठा उपयोग तृतीयपंथीयांच्या उद्धारासाठी होऊ शकतो.

२) सजग प्रसारमाध्यमे – प्रसारमाध्यमे हे लोकशाहीचे चौथे स्तंभ आहेत. त्यांच्यामध्ये खूप मोठी ताकद आहे. वाईट प्रवृत्तींचा समूळ नाश करणे आणि चांगल्याचे संवर्धन करण्याची कुवत प्रसारमाध्यमांमध्ये आहे. त्यामुळे सकारात्मक दृष्टिकोन समोर ठेवून प्रसारमाध्यमांनी सजग राहणे आवश्यक आहे. समाज बदलण्याचे मोठे सामर्थ्य प्रसारमाध्यमांमध्ये आहे. जर दर्जेदार आणि सत्य घटनांचा आदर करून ते बातमीद्वारे लोकांच्या मनावर बिंबवले तर त्याचा समाजावर दूरगामी परिणाम होतो. त्यामुळे नि:पक्षपाती, दक्ष आणि समाजाभिमुख माध्यमे ही काळाची गरज आहे.

३) मनोरंजन विश्वावर नियंत्रण – बऱ्याच सिनेमांमध्ये किंवा अन्य मनोरंजन विषयातील माध्यमांमध्ये अशा व्यक्तींवर खोचक डायलॉग, गाणी, नाच, द्विअर्थी विधाने असतात. अशी शेरेबाजी काही वेळापुरती मनोरंजन करू शकतात व त्याचे दूरदृष्टीने पाहिले तर गंभीर परिणाम असतात. सुरुवातीला प्रेक्षकांना बघायला किंवा ऐकायला खूप छान वाटते. परंतु टोमण्यांचा / शेऱ्यांचा दीर्घकाळ परिणाम ठरावीक समुदायावर राहू शकतो. त्यामुळे माध्यमांनी आणि मनोरंजन विश्वातील मंडळींनी याचे भान ठेवून काम करावे.

४) शाळा महाविद्यालय – मानसिक जडणघडण शालेय जीवनातून होत असते. विद्यार्थी कोणत्या शाळेत व काय शिकला याचा व्यक्तिमत्त्वावर मोठा प्रभाव असतो. शाळा महाविद्यालयांमधील शिकवण ही माणसाच्या आयुष्याची शिदोरी असते. कोवळ्या वयात मने निरपेक्ष आणि निरागस असतात. त्यामुळे याच वेळेस सकारात्मक शिकवण, विशेषत: तृतीयपंथी समुदायाबद्दल वास्तव समजून घेऊन आणि कनवाळू वृत्ती तयार होणे ही काळाची गरज आहे. उत्तम प्रकारे त्यांना या समुदायाबद्दलची माहिती देऊन त्यांना मुख्य प्रवाहात कसे आणता येईल याबद्दल कल्पना दिली तर त्याचा सकारात्मक परिणाम बालमनावर होऊ शकेल.

५) सशक्त मानसिकता – कोणीही कितीही कायदे आणले तरीही समाजातील सर्व घटकांनी त्याचा आदरयुक्त स्वीकार करून त्या पद्धतीने मानसिकता विकसित केली पाहिजे, तरच त्या कायद्याचे प्रभावी अमलीकरण होईल.

६) जनजागृती – हिंदुस्थान हा खेड्याचा देश आहे. एकीकडे कायदे सर्वांना माहीतच आहेत या गृहीतकाखाली न्यायाधिकरण चालते तर दुसरीकडे खेडोपाडी कायद्याबद्दलचे अज्ञान कमालीचे आहे. केवळ जागरूकता नसल्याने कायद्याची अंमलबजावणी ठप्प असल्याची कित्येक उदाहरणे आहेत. त्यामुळे समर्थ रामदासांनी दासबोधामध्ये सांगितल्याप्रमाणे 'जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी शिकवावे, शहाणे करून सोडावे सकळ जन.' या उक्तीप्रमाणे सजग व्यक्ती आणि संस्थांनी पुढाकार घेऊन हा कायदा जास्तीत जास्त पोहचवण्याचे काम करावे.

कायदा केला म्हणून सर्व काही झाले असे नाही. तृतीयपंथीयांचा उद्धार हे सामुदायिक ध्येय आहे. यासाठी नवीन केलेल्या कायद्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सशक्त मानसिकतेसोबतच सरकारी, निमसरकारी संस्था, माध्यमे, महाविद्यालये, इत्यादींच्या अथक प्रयत्नांची नितांत गरज आहे. ज्यायोगे २०१९ च्या कायद्याचे खरे फलित मिळेल. आणि राष्ट्रीय पातळीपासून ते आंतरराष्ट्रीय पातळीवरील केलेल्या धोरणांचा आणि यंत्रणांचा आदर ठेवून खऱ्या अर्थाने तृतीयपंथीयांना न्याय मिळेल.

## २०१९ पासून चांगुलपणाच्या चळवळीअंतर्गत डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशनने केलेले सामाजिक कार्य

१) पूरग्रस्त २०० लोकांची एका आठवड्यासाठी राहण्याची व जेवणाची सोय केली.

२) दत्तक घेतलेल्या दोन पूरग्रस्त गावांतील लोकांना कपड्यांचे वितरण.

३) विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार पुस्तकांचे, शैक्षणिक साहित्याचे वितरण.

४) Flood ट्रेनिंग.

५) जवळपास ९० विद्यार्थ्यांची अंशत: शैक्षणिक फी भरली.

६) पुणे येथे कृषीपूरक अभ्यासासाठी शेतकऱ्यांसमवेत अभ्यास भेट.

७) ३५ युवकांना नोकरीच्या संधीचा अभ्यास आणि प्रशिक्षण यासाठी मुंबई येथे अभ्यास भेट.

८) खराब झालेल्या घरांच्या दुरुस्तीसाठी सिमेंटचा पुरवठा.

९) कोरोना काळात औषधे, २५०० मास्क, २०० पीपीई किट व फेस शिल्ड वाटप.

१०) कोरोनाच्या काळात गावात भाजी पुरवठा.

११) कोव्हिड सेंटरसाठी विनामोबदला हॉस्टेल व फर्निचर वापरण्यासाठीची सोय.

१२) गरजू व गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी नांगरून देण्यात आल्या.

१३) गरजू शेतकऱ्यांना वनस्पती बियाणे देण्यात आले.

१४) दोन्ही गावांतील शेतकऱ्यांच्या भाजीपाल्याचा लॉकडाऊनच्या वेळी शहरात पुरवठा करण्यात आला.

१५) रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांना व गायींना पुरेसे अन्न पुरवण्यात आले.

१६) ११५ लोकांची संस्थात्मक विलगीकरणासाठी सोय करण्यात आली.

१७) लॉकडाऊनच्या काळात विलगीकरण कक्षेतील लोकांची एक वेळची जेवणाची सोय करण्यात आली.

१८) दोन्ही गावांमधील महिला सदस्यांना शिलाईचे काम देण्यात आले. तसेच बिस्कीट तयार करणारे मशीन वितरित केले.

१९) गरजूंना किमान आवश्यक धान्य पॅकेज प्रदान करण्यात आले, तसेच कॉफी पॅकेट्सचे गरजूंना वाटप.

२०) देणगीदारांकडून साहित्य गोळा करून त्याचे गरजू लोकांना वाटप करण्यात आले.

२१) विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३४व्या जयंती दिनानिमित्त आंतरशालेय मराठी निबंध स्पर्धा आयोजित केली.

२२) हेल्थ चेकअप कॅम्प.

२३) ४० लोकांचे रक्तदान शिबिर.

२४) अंदाजे २०० लोकांच्या ड्रायव्हिंग लायसन्ससाठी RTO Camp.

२५) जिवामृत (जैविक खत ) करण्यासाठी पाच कुटुंबांना बॅरल व कॅन दिले.

२६) विधवा महिला मेळाव्याचे आयोजन.

२७) महिला सबलीकरणासाठी मेळाव्याचे आयोजन.

२८) आपत्तीग्रस्तांना (जळालेल्या झोपड्यांतील) कुटुंबांना संसारोपयोगी साहित्य वाटप.

२९) याचक महिलांना नवीन साड्यांचे वाटप.

३०) रस्त्याच्या कडेला झोपणाऱ्या वृद्ध व्यक्तींना ब्लँकेट वाटप.

३१) नेत्रदान, देहदानबाबत जनजागृती व फॉर्म्स भरून घेऊन Certificate वाटप. तसेच दात्यांना रोपे वाटप.

३२) तृतीयपंथीय लोकांना बिझनेससाठी प्रोत्साहन.

३३) पाणी आडवा, पाणी जिरवा प्रकल्प - वर्षाला १० कोटी लिटर पाणी जमिनीमध्ये मुरेल असे ५-६ ठिकाणी J.C.B. ने खड्डे खणले. (संभापूर गावामध्ये)

३४) वृक्षारोपणासाठी रोपांची देणगी.

३५) एका शाळेचे रंगकाम.

३६) लायब्ररीला पुस्तके प्रदान.

वरील नमूद केलेले डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशनचे वैविध्यपूर्ण उपक्रम दत्तक घेतलेल्या दोन गावांमध्ये निलेवाडी आणि बस्तवाड, त्याचप्रमाणे रेंदाळ व इतर गावांमध्ये राबवले आहेत. तसेच चांगुलपणाच्या चळवळीचे अनेक शिलेदार पूर्ण देशभर विविध क्षेत्रांत सामाजिक जाणिवेतून कार्य करत आहेत.

# चांगुलपणाच्या चळवळीअंतर्गत महत्त्वाच्या सहयोगी संस्था

१) ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन, कोल्हापूर
२) अन्नक्षेत्र फाउंडेशन, नागपूर
३) भारतीय जन संविधान मंच, कोल्हापूर
४) जय मल्हार थिएटर, पुणे
५) सौ. सुमन साळी महिला व बाल विकास संस्था, सांगली
६) पुढचे पाऊल, नवी दिल्ली
७) वुई पुणेकर, पुणे
८) महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान साहाय्यता केंद्र, कोल्हापूर
९) प्रारंभ कला अकॅडमी, ठाणे
१०) अर्जुन फाउंडेशन, नवी दिल्ली
११) बालोद्यान, कोल्हापूर
१२) ऊर्जा फाउंडेशन. कोल्हापूर
१३) दीपस्तंभ फाउंडेशन, जळगाव
१४) स्पोर्टस्इंडी, पुणे
१५) ओरायन ॲडव्हटाईजर्स, मुंबई
१६) मिळून साऱ्याजणी, पुणे
१७) सिल्वर एज युटोपियन, पुणे
१८) संकल्प (ॲन अपॉइंटमेंट विथ लाइफ), पुणे
१९) विधायक फाउंडेशन, अब्दुल लाट
२०) उमेद फाउंडेशन, कोल्हापूर
२१) सेवांकुर, इचलकरंजी
२२) पार्थ नॉलेज नेटवर्क, ऐरोली, नवी मुंबई
२३) संवाद संस्था, पुणे
२४) महाराष्ट्र साहित्य कला प्रसारणी
२५) गुरुकुल शिक्षण संस्था, इचलकरंजी
२६) अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, वाठार
२७) सिंबॉलिक स्कूल, शिरोली, कोल्हापूर
२८) गोशिमा बिझनेस असोसिएशन, कोल्हापूर
२९) विद्यानिकेतन, कोल्हापूर
३०) शहाजी कॉलेज, कोल्हापूर
३१) रवळनाथ को-ऑपरेटिव्ह, गडहिंग्लज, कोल्हापूर
३२) सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट, मुंबई
३३) गीता एज्युकेशन ॲन्ड सोशल फाउंडेशन, पुणे
३४) ऑरगॅनिक एम्पॉवरिंग फार्मर्स ऑफ इंडिया, पुणे
३५) सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, पुणे
३६) ग्रामपंचायत, निलेवाडी
३७) ग्रामपंचायत, बस्तवाड
३८) धनंजय भावलेकर मोशन पिक्चर्स
३९) ग्रेट मिशन ग्रुप कन्सल्टन्सी, पुणे
४०) कौन्सिल ऑफ रॉयल रुट्स, नवी दिल्ली
४१) रुहानियत, नवी दिल्ली
४२) जयहिंद फाउंडेशन
४३) वाचन कट्टा प्रोडक्शन
४४) सीओ दिल्ली-पुणे
४५) जनसंघर्ष समिती
४६) दिशा अकॅडमी
४७) माणुसकी फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य
४८) धनंजय गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
४९) झंकार स्टुडिओज, पुणे
५०) चैतन्य शिक्षण संस्था, अब्दुल लाट
५१) विवेकानंद शिक्षण संस्था
५२) रयत शिक्षण संस्था
५३) दैनिक लोकमत
५४) दैनिक पुढारी
५५) दैनिक सकाळ
५६) दैनिक आधुनिक केसरी (औरंगाबाद)
५७) युवा शक्ती, अब्दुल लाट
५८) सी न्यूज चॅनेल, अब्दुल लाट
५९) प्रणवतीर्थ चॅरिटेबल ट्रस्ट
६०) अवेक फाउंडेशन
६१) यंग नॅचरॅलिस्ट, नेटवर्क
६२) 4C's कौन्सिलिंग सेंटर, पुणे
६३) हॉटेल व्यवसाय संघटना, कोल्हापूर
६४) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
६५) बारा बलुतेदार संघटना, महाराष्ट्र राज्य
६६) नॅचरल आयुर्वेद स्टुडंट ॲन्ड युथ असोसिएशन
६७) नेचर केअर फर्टिलायझर प्रायव्हेट लिमिटेड
६८) श्यामची आई फाउंडेशन, पुणे
६९) जे. के. एंटरप्राइजेस लिमिटेड
७०) आर्ष पब्लिकेशन्स
७१) इन्व्हेस्टमेंट इन मॅन ट्रस्ट
७२) एडवांटेज महाराष्ट्र
७३) देश भगत युनिव्हर्सिटी, पंजाब

७४) जम्मू युनिव्हर्सिटी, जम्मू
७५) आयसीएफएआय युनिव्हर्सिटी, सिक्कीम
७६) महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई
७७) आदिवासी विकास मंत्रालय, भारत सरकार
७८) कृषी पर्यटन केंद्र
७९) इंटरनॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशन
८०) लाफ्टर योगा इंटरनॅशनल फाउंडेशन
८१) विद्या प्रतिष्ठानचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बारामती
८२) द काउंसिल फॉर टीचर एज्युकेशन फाउंडेशन
८३) मळगंगा अंध-अपंग सेवा संस्था
८४) लघुउद्योग भारती, नागपूर
८५) नितिका फार्मा, नागपूर
८६) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
८७) स्मित ओल्ड एज होम अॅन्ड केअर फाउंडेशन
८८) मिशन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रेनिंग रिसर्च अॅन्ड अॅक्शन, नागपूर
८९) थिंक पॉझिटिव्ह, दिवाळी अंक
९०) स्नेहालय, अहमदनगर
९१) आदर्श फाउंडेशन
९२) नॅशनल टेक्निकल रिसर्च ऑर्गनायझेशन
९३) क्रांती उद्योग समूह
९४) अस्तित्व सामाजिक संस्था
९५) सुमित ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज
९६) ग्लोबल बायोटेक (एच के) लिमिटेड
९७) एम सी वर्ल्ड ट्रॅव्हल अॅडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड
९८) वीणा वर्ल्ड
९९) पीस असोसिएशन एनजीओ, पुणे
१००) नॅशनल यूएस इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स
१०१) उच्च शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र
१०२) डायस्पोरा क्लब, दिल्ली
१०३) दिल्ली मराठी ऑफिसर्स
१०४) अनगोळ फाउंडेशन, पुणे




*With*
*Best Compliments*
*From*

BG "ASSOCIATES"

STRESS ASSETS MANAGEMENT & NPA RECOVERY SERVICES

**Pankaj Bhave** 99230 15379 | **Vijay Gomte** 98239 29989

pbhave69@gmail.com

816, M-2, Adarsh Colony, Main Road,
ST Colony, CIDCO, N-2, Aurangabad

*With*
*Best Compliments*
*From*

**Ketan Jogalekar**
M.Com., FCA
***Partner***

CA

# Ketan Jogalekar & Associates

## CHARTERED ACCOUNTANT

1151, Sadashiv Peth, Laxmi Keshav Apts, Near Perugate Chowky, Pune 411 030.
Tel. : 020-24459047 Mobile : +91 9011010390
ketan@jogalekar.com

**www.jogalekar.com**




अधिक माहितीसाठी बँकेच्या जवळच्या शाखेस भेट द्या.

ORION
ADVERTISERS

OUT OF HOME MEDIA SOLUTIONS
OWNERS OF MEDIA PROPERTIES
HOARDINGS / NEON SIGNS

WITH BEST WISHES
FROM

*Atul Ashar*

FOUNDER & CEO

1220, 12th Floor, Maker Chambers V, Nariman Point, Mumbai 400 021, India.
+91-22-22021312, 22021314, 22021315 9820915992
info@orionadvertisers.com